# भूदान-गंगा

## [ तृतीय खंड ]

९५५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ९२७५

विनोबा

REFBK-0009776

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

अनु० २८१२१

निबंध

/ १२८५

दि० १२।२।६१

# भूदान–गंगा

## [ तृतीय खंड ]

विनोबा

किंमत एक रुपया

REFBK-0009776

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

प्रकाशक :
भाऊ पानसे
ग्राम-सेवा-मंडळ
परंधाम विद्यापीठ
पो. पवनार (वर्धा)

प्रथम आवृत्ति–३०००
२७ मे १९५८

मुद्रक :
मोहनलाल भट्ट
राष्ट्रभाषा प्रेस, वर्धा

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| | | पृष्ठांक |
| १ | सापेक्ष आणि निरपेक्ष नीति | १ |
| २ | धर्मचक्र-प्रवर्तन केव्हां होतें ? | ६ |
| ३ | नीतीचें अधिष्ठान शेती | १० |
| ४ | भिक्षुक वृत्तीची आवश्यकता | १४ |
| ६ | मुद्दाम बनविलेल्या संस्थेकडून क्रांति होत नसते | २१ |
| ७ | आजच्या युगांत आत्मौपम्य | २२ |
| ८ | देशाच्या रोगाचें मूल-शोधन व उपाय | २५ |
| ९ | शांतिमय क्रांति कीं सत्याग्रह ? | ३५ |
| १० | भूदान-यज्ञ : धर्माचा एक नवा पैलू | ४० |
| १० | नवा अध्याय | ४५ |
| ११ | सर्वोदयाचा पूर्ण मंत्र | ४५ |
| १२ | अहिंसेनें च धर्म-प्रचार संभवनीय आहे | ५४ |
| १३ | अपरिग्रहांत सामर्थ्य हि आहे | ६१ |
| १४ | जनतेच्या प्रत्यक्ष इच्छेनें च प्रश्न सोडवावा | ६६ |
| १५ | सख्य-भक्तीचा काळ आला आहे | ७० |
| १६ | भेदासुराचा अंतकालीन आक्रोश | ७५ |

पृष्ठांक


१७ साम्ययोगाचें समग्र दर्शन ७७

१८ ज्ञान-विज्ञानाच्या साह्यानें सामूहिक अहिंसा ८३

१९ युगाचे प्रमुख गुण :--निर्भयता, समता व समाजनिष्ठा ९१

२० वाणिज्य धर्म आहे, संग्रह नव्हे १०२

२१ निर्वैर-प्रतिकाराचा युगधर्म १०६

२२ विज्ञानाच्या आधारावर नवें समाज-शास्त्र ११४

२३ सज्जन आणि सत्याग्रह १२८

२४ सत्ता-निरपेक्ष सेवा १३३

२५ वेदान्त व अहिंसा यांचा समन्वय १३८

२६ मंदिर-प्रवेश-बंदीपेक्षां हि हा मोठा अपराध १४०

२७ भूदान-यज्ञांत आपला भाग न देणें हा देशद्रोह १४१

२८ जीवन-दान १४३

२९ राजनीतीचें लोकनीतींत परिवर्तन १४३

३० अहिंसेचे तीन आधार--संयम, अस्तेय, असंग्रह १५०

३१ चोरी आणि शिक्षा १५६

३२ क्रांतीचा त्रिकोण १५८

३३ दागिन्यांनीं भगिनींना दडपलें आहे १६३

३४ क्रांतीसाठीं भगिनींनीं वैराग्य संपन्न बनावे १६४

३५ हें ईश्वरी कार्य पुरें झाल्यावाचून राहणार नाहीं १६८

३६ पहिलें भांडवलवादी आपलें शरीर १७१

३७ भारताला येशू ख्रिस्त मान्य आहे १७२

३८ महायुद्धाचीं मूळें आमच्या च जीवनांत आहेत १८२

३९ अहिंसेच्या विकासांत शेती व सत्याग्रह यांचा शोध १९६

# बिहार

[ १४-९-'५२ ते ३०-१२-'५४ ]

# भूदान-गंगा

## (तृतीय खंड)

## सापेक्ष आणि निरपेक्ष नीति :१:

आपल्यामध्यें नीतिविचार नवा नसून जुन्या काळापासून च चालत आलेला आहे. नीतीला 'धर्म' असें नांव दिलें गेलें आहे. आत्मा व परमात्मा यांचा संबंध, ऐहिक जीवन व त्यानंतरचें जीवन; हें सारे त्यांत समाविष्ट आहे. इह-लोकांत जो व्यवहार करावा लागतो तो सारा धर्मांत च येतो.

### धर्माचीं दोन अंगें

हल्लीं आपल्या राज्याला 'धर्मनिरपेक्ष राज्य' असें नांव दिलें जातें. पण ही कांहीं नवी कल्पना नव्हे. जें खरोखर चांगलें राज्य असतें तें धर्म-निरपेक्ष असतें, 'धर्महीन' नसतें. धर्मांत किती तरी गोष्टींचा समावेश होतो. मृत्यूनंतरचें जीवन हें धर्माचें एक अंग आहे. त्यांत आत्मा, परमात्मा हे विषय येतात. त्यांचा राज्याशीं कांहीं संबंध नसतो. राज्याशीं संबंध येणारें असें जें धर्माचें दुसरें अंग आहे, त्यांत इहलोकांतील व्यवहार आणि सत्य-प्रेम व न्याय इत्यादि सिद्धान्त येतात. वस्तुतः या सिद्धान्तांवर च राज्य आधारलें जावें. या अर्थानें प्रत्येक सरकार हें धार्मिक सरकार असलें पाहिजे. धर्म-निरपेक्ष राज्याचा अर्थ 'लोकयात्रिक सरकार' असा वास्तविक आहे. लोकांचें ऐहिक जीवन उत्तम प्रकारें चालावें यासाठीं काम करणारें सरकार तें 'लोकयात्रिक सरकार'. धर्माच्या जुन्या अर्थानुसार आपण त्याला धार्मिक सरकार म्हणतों. परंतु धर्माच्या पारलौकिक अर्थानें मात्र आम्ही त्याला धार्मिक म्हणत नाहीं.

धर्म हा एक व्यापक शब्द आहे. ज्या नीति-तत्त्वांवर आपलें जीवन आधारलें आहे, त्यांना आम्ही धर्म म्हणतों. धर्म हा अचल असतो. त्याचे सिद्धान्त सनातन असतात. ज्याप्रमाणें गणिताचे सिद्धान्त देशा-देशांत वेगळे नसतात व वेग-वेगळ्या काळांत हि ते स्थिर च राहतात, त्याचप्रमाणें धर्माचे सिद्धान्त हि असे च स्थिर व अविचल असतात. धर्माचे सिद्धान्त हे मूल-भूत स्वरूपाचे, तिन्ही काळांत व सर्व देशांत सारखे च अचल असतात. ज्यांना भगवंतांनीं दैवी संपत्ति म्हटलें आहे, ते सत्यनिष्ठा, प्रेम, दया यासारखे सद्‌गुण म्हणजे च वस्तुतः सनातन धर्म होय. तो अविचल, ध्रुव, शाश्वत, स्थिर व नित्य असतो. प्राचीन काळापासून आपण हें च मानीत आलों आहोंत व आज हि हें च मानतों.

## आजची सापेक्ष नीति

परंतु कांहीं काळानें समाजांत एक नवा विचार आला. या देशांत आधीं आला नंतर इतरत्र हि आला. तो विचार असा होता कीं, 'या अविचल धर्माचे म्हणजे सत्य, अहिंसा, प्रेम इत्यादि सद्‌गुणांचे, सिद्धान्त सर्व लोकांसाठीं नाहींत. या तत्त्वानुसार आचरण करणारा असा एक वेगळा च पारमार्थिक वर्ग आहे व त्यांत संन्यासी वगैरेंचा समावेश होतो, त्यांच्याशिवाय जे इतर लोक आहेत त्यांनीं मिश्रित सत्याचें पालन करावें. सत्य पूर्णपणें सोडूं मात्र नये. या विचाराचा परिणाम असा झाला कीं, सत्य, अहिंसा प्रेम इत्यादि तत्त्वें कांहीं थोड्या लोकांपुरतीं च मर्यादित राहिलीं. आणि इतर सर्व लोक धर्माच्या नांवानें व्यावहारिक सोयीप्रमाणें आचरण करूं लागले. धर्माच्या प्रत्येक नियमाला अपवाद शोधले गेले ; मग संन्याशाचा एक धर्म मानला गेला व गृहस्थाचा दुसरा धर्म. गृहस्थ परिग्रही असला तरी चालेल पण संन्याशानें मात्र अपरिग्रही राहिलें पाहिजे. गृहस्थानें प्रसंगविशेषीं हिंसा केली किंवा असत्य भाषण केलें तरी चालेल, पण संन्याशानें मात्र नेहमीं च अहिंसेचें व सत्याचें पालन केलें पाहिजे. याप्रमाणें विभाजन झालें. पण जेथें याप्रमाणें गुणांचें विभाजन होतें, तेथें समाजाची स्थिति अतिशय खालावते. समाज छिन्न-विच्छिन्न होऊन जातो. ही च स्थिति आज आपल्या देशाची व इतर हि देशांची झालेली आहे. प्रत्येक शाळेंत मुलांना सत्याचें महत्त्व

सांगितलें जातें. तेथें असत्य शिकविणें कोणाला च मान्य नसतें. पण हें सत्य शाळेपुरतें च मर्यादित राहतें. कॉलेजच्या शिक्षणांत दुसऱ्या च गोष्टी येतात. समाजांत ज्याप्रमाणें सत्य हें केवळ संन्याशांसाठीं च आहे, त्याचप्रमाणें शिक्षणांत तें केवळ लहान मुलांसाठीं च आहे. पण हीं लहान मुलें मोठीं झालीं कीं मग त्यांना सत्याचे अपवाद शिकविले जातात.

मागासलेल्या जाती किंवा आदिवासी जाती या च वस्तुतः अधिक सत्य-निष्ठ असतात. पण त्यांचा जसजसा बाहेरच्या जगाशीं संबंध येत गेला तसतसा त्यांना सत्याचा विसर पडत चालला. या जातींत काम करणाऱ्या लोकांनीं हा आपला अनुभव लिहून ठेवला आहे. त्यांनीं असें लिहिलें आहे कीं, ' पूर्वीं हे लोक नग्न राहत, पण आमच्या संपर्कानें कपडे घालूं लागले. पूर्वीं यांना भाषा चांगली येत नसे, ती आमच्या संपर्कानें येऊं लागली. परंतु पूर्वीं हे मूर्ख असल्यामुळें सत्य च बोलत, ते आतां आमच्या संगतीनें थोड-थोडा असत्याचा आश्रय करूं लागले आहेत. ' या लोकांचें सत्य बोलणें हें लहान मुलांच्या सत्य बोलण्यासारखें असतें. त्यांना असत्यांतील खुबी माहीत नसते, म्हणून ते सत्य बोलतात. याप्रमाणें, संन्यासी, लहान मुलें व आदिवासी लोक यांच्या पुरतें च सत्य सीमित ठेवलें गेलें; व गृहस्थ, कॉलेज कुमार आणि सुधारलेले लोक यांच्यासाठीं असत्य येऊं लागलें. आज ही च विचार-प्रणालि प्रचलित आहे. याला च ' सापेक्ष नीति ' किंवा ' राजनीति ' म्हणतात.

## गांधीजींचा महान् विचार

या प्रचलित नीतीचा गांधीजींनी घोर विरोध केला. त्यांनीं सांगितलें कीं, ' धर्म हा अविचल च असतो. त्याचें पालन करतांना मरण आलें तरी चालेल. त्याचें पालन करण्यानें च आपलें कल्याण होईल. त्याचें पालन केलें नाही तर आमचें भलें होणार नाहीं व दुनियेचें हि भलें होणार नाहीं; ' ही कांहीं नवी गोष्ट नाहीं. पण धर्मावर निष्ठा ठेवली पाहिजे हें गांधीजींनीं आपणांस शिकविलें. पूर्वीं हिंदुस्थानांत ही निष्ठा संन्याशांसाठीं च विहित होती ; परंतु गांधीजींनीं सांगितलें की संन्याशाप्रमाणें च गृहस्थाला हि या निष्ठेची तितकी च आवश्यकता आहे. सार्वजनिक सेवेसाठीं हि जीवनाला कांहीं नियम असले पाहिजेत. पूर्वीं दोन विभाग करीत असत. (१) जगाशीं

ज्यांचा कांहीं संबंध नाहीं अशा पारमार्थिक साधकांचा व सत्याच्या उपासकाचा एक वर्ग असे. यांना जगाची सेवा करण्याची कांही गरज नसे. याशिवाय (२)जगाची सेवा करणारांचा दुसरा वर्ग असे. त्यांच्यासाठीं सत्याच्या आचरणांत अपवाद मानले जात असत. परंतु गांधीजींनीं सांगितलें की, पारमार्थिक साधकांसाठी ज्याप्रमाणें सत्य आदि तत्त्वांची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणें सेवापरायण माणसासाठीं हि तशी आवश्यकता आहे. जो सेवापरायण आहे त्यानें सत्याचें पालन केलें पाहिजे व जो सत्याचा उपासक आहे त्यानें जगाची सेवा केली पाहिजे. अशा तऱ्हेनें गुणांचे तुकडे करतां येत नाहींत व करतां उपयोगी हि नाही, हा महान् विचार गांधीजींनीं आपणांस शिकविला.

## आजची वाईट परिस्थिति

आपल्याकडे सत्याचा एवढा महिमा मानला गेला आहे, पण व्यापारांत, बाजारांत, वकिलींत व लग्नांत फार खोटेपणा चालतो. एका गृहस्थानें सांगितलें की शुद्ध चांदीचे रुपये बनवितां येत नाहींत. त्यांत इतर धातूंचें थोडें तरी मिश्रण लागतें च. त्याचप्रमाणें व्यवहारांत हि पूर्ण सत्य चालत नाहीं. आणि राजनीतिज्ञांसाठीं तर असत्य हें आवश्यक च आहे असें मानलें गेलें आहे. धर्माचें पालन करतांना हि सत्य विरुद्ध अहिंसा असा प्रश्न उत्पन्न केला जातो. एखाद्याचा जीव वाचविण्यासाठीं खोटें बोललेलें चालतें असें मानलें गेलें आहे. याचा च अर्थ हा कीं, अहिंसेच्या रक्षणासाठीं सत्याचा त्याग केला तरी चालतें हें मान्य केलें गेलें आहे. याप्रमाणें एका गुणाच्या विरुद्ध दुसरा गुण उभा केला जात आहे. महाभारतांत हि सत्याच्या अपवादांबद्दल चर्चा आलेली आहे. कोण-कोणत्या प्रसंगीं खोटें बोलावें याबद्दल विवेचन आहे. याप्रमाणें सापेक्ष नीति चालत आली आहे. हिंदुस्थानांतील धार्मिक पुरुष हि सांगतात कीं, सत्याचा कधीं-कधीं त्याग करावा लागतो. एका धार्मिक पुरुषानें तर असें सांगितलें की, रामावतारानंतर कृष्णावतार झाला, हा धर्माचा विकास आहे. रामाची कृष्णाशीं तुलना करीत तो म्हणाला की रामाचा अवतार हें बालक होतें. अवतारी पुरुषांचा हि विकास होत असतो. कृष्ण कधीं-कधीं सत्याचा त्याग करीत होते, म्हणून कृष्णावतार हा पूर्णावतार मानला गेला आहे. कोणत्या सिद्धान्ताचा कोणत्या प्रसंगीं उपयोग करावा हें ते जाणत

होते. अशा प्रकारचें विवेचन जेथें एका धार्मिक पुरुषान च केलें, तेथें इतरां-बद्दल विचारावयास च नको. जो बाह्य व्यवहार असतो, त्याचा च घरांत प्रवेश होत असतो. म्हणून गांधीजी अगदीं या अलीकडच्या काळांत होते, तरी त्यांनीं नेहमीं सत्यावर च जोर दिलेला आहे. ते तर येथपर्यंत म्हणाले की, सत्यासाठीं मी स्वराज्य हि सोडून देण्यास तयार आहे. आपण सर्वांनीं त्यांच्या बरोबर काम केलें होतें व त्यांच्या पावलावर पाऊल टाकून जाण्याचा प्रयत्न केला होता, तरी हि आज हिंदुस्थानचें वातावरण अत्यंत दूषित झालेलें आहे.

## भूदान-यज्ञ हें पूर्णार्थानें क्रांतिकारी कार्य

भूदानयज्ञाचें काम करणाराला ही पूर्ण जाणीव असली पाहिजे की हें कार्य पूर्णार्थानें क्रांतीचें कार्य आहे. पूर्वीच्या कार्यामध्यें ज्या पद्धति मान्य झाल्या होत्या, त्या येथें मान्य होणार नाहींत. या कार्याला पूर्ण सत्य-निष्ठेची आवश्यकता आहे. आपल्या हिशेबांत कोठें हि चूक होतां उपयोगी नाहीं. वचनाची निष्ठा असली पाहिजे. दडपण आणण्याचा थोडासा हि प्रयोग करतां उपयोगी नाहीं. अविचल, शाश्वत नीतीच्या आधारावर च क्रांति होऊं शकते. केवळ जमीन मिळविण्यावर च आपण अधिक जोर दिला, तर यासारखीं काम आजवर पुष्कळ झालेलीं आहेत, हें आपल्या ध्यानांत येईल. पण साऱ्या समाजाच्या उत्थानासाठीं आपला हा कार्यक्रम आहे. सारा समाज वर यावा ही आमची इच्छा आहे. आज हिंदुस्थानची इतकी जी दुर्दशा झाली आहे तिचें कारण हें की, प्रत्येक जण स्वतःला कांहीं मिळवण्याकडे, स्वतःसाठीं संग्रह करण्याकडे धांवत आहे. संग्रह किती करावयाचा याला कांहीं मर्यादा च राहिलेली नाहीं. त्यामुळें साधनांची मर्यादा, मोजमाप व परिमाण हीं हि सर्व नष्ट झालीं आहेत. आम्ही सांगतों की, कायद्यानें ज्या जमिनीवर एखाद्याचा हक्क असेल, ती च जमीन त्यानें दान द्यावी. दान ही कांहीं यांत्रिक क्रिया नाहीं किंवा तो एखादा कर हि नाहीं. भूमिदान ही हृदयाच्या प्रेरणेनें होणारी गोष्ट आहे. भूमिदान देतां देतां त्या मागचा संपूर्ण विचार हि लोकांनीं ग्रहण करावा व त्याप्रमाणें आचरण करावें अशी माझी इच्छा आहे. अखेर जो जमीन देईल तो त्या बरोबर इतर हि आवश्यक साधनें देईल आणि

आपल्या जीवनांत परोपकाराची भावना स्थिर करील. जो जमीन देईल तो आपल्या शेजाऱ्याची हि काळजी वाहील. अशा प्रकारें समाजाचें उत्थान व्हावें अशी माझी इच्छा आहे. तेव्हां या कार्यासाठीं जो जीवनदान देईल त्यानें आपल्या जीवनाच्या अखंड शुद्धीची जाणीव मनांत ठेवून काम करावें.

नेतरहाट, १४-६-१९५३.

---

## धर्मचक्र-प्रवर्तन केव्हां होतें ? : २ :

मी एक नैतिक सामर्थ्य निर्माण करूं इच्छितों. हिंदुस्थानन एका अपूर्व प्रकारच्या साधनानें आपलें स्वातंत्र्य मिळवलें. व त्यामुळें एक नैतिक सामर्थ्य उत्पन्न झालें. आज हि जर हिंदुस्थानांत कोणत्या सामर्थ्याची निर्मिति होणें शक्य असेल, तर ती नैतिक सामर्थ्याची च.

### नैतिक प्रभाव व हृदय-परिवर्तन

भुकेलेल्या शेजाऱ्याची चिंता करावी असें आपला धर्म आपणांस शिकवतो. भोवतालच्या लोकांत जर उपासमार, अज्ञान व रोग पसरले असतील, तर ज्यांच्यापाशीं धन, बुद्धि व शक्ति आहे त्यांना सुख उपभोगावें असें वाटतां उपयोगी नाहीं. याला च मी 'हृदय-परिवर्तन' म्हणतों. नैतिक प्रभाव व हृदय-परिवर्तन यांत भेद करतां उपयोगी नाहीं. बिहारमध्यें आतां-पर्यंत चाळीस हजार लोकांनीं दान दिलें आहे. जमीन कांहीं जास्त मिळाली नाहीं. कारण या दात्यांत बहुतेक गरीब लोक च होते. पण आतां त्यांचा प्रभाव मोठ्या लोकांवर पडूं लागला आहे. त्यांचीं मनें आतां विरघळूं लागलीं आहेत. त्यांच्या मनामध्यें अशी भावना निर्माण होत आहे कीं जिच्याकडे त्यांना दुर्लक्ष करतां येत नाहीं. या जिल्ह्यांत तर एक राजा आमचा एजंट बनून भूदानासाठीं हिंडत आहे. हें हृदय-परिवर्तन नव्हे तर काय आहे ? परंतु हृदय-परिवर्तनाचें कांहीं गणित नाहीं. एखाद्या माणसाचें

हृदय-परिवर्तन झालें, तरी त्याचा प्रभाव भोवतालच्या चाळीस-पन्नास लोकांवर पडतो. याला च माणसांच्या 'विचारांचा प्रभाव' म्हणतात. हा हिंसाशक्ती-हून सर्वस्वी भिन्न आहे. वेदांत म्हटलें आहे कीं, दान जें दिलें जातें तें लोक-लज्जेस्तव दिलें जातें. तेव्हां लोक-लज्जा ही एक मोठी च गोष्ट म्हटली पाहिजे. सारा समाज काय म्हणतो हें पाहून कांहीं करणें हें हृदय-परिवर्तन च आहे; हृदय-परिवर्तनाचें मोजमाप करणें योग्य नाहीं.

बाह्य परिस्थितीमुळें अनेकदां हृदय-परिवर्तन होत असतें, त्याच प्रमाणें हृदय-परिवर्तनाचा परिणाम बाह्य परिस्थितीवर होत असतो. परस्प-रांचा परस्परांवर परिणाम होत असतो. बींपासून फळ होतें व फळापासून बीं होतें. एखाद्या माणसाचा म्हातारपणीं मुलगा मरण पावला व त्यामुळें त्याला वैराग्य आलें, तर त्याला म्हातारपणामुळें वैराग्य आलें असें कां आपण म्हणूं? तें खरें असणार नाहीं. तो माणूस तरुण असतांना आणि त्याचा मुलगा जिवंत असतांना त्याच्यामध्यें आसक्ति होती, असें म्हणणें ठीक आहे. पण किती तरी लोक म्हातारे होतात आणि त्यांचे मुलगे हि मरतात पण ते कांहीं विरागी बनत नाहींत. तेव्हां याचा अर्थ हा कीं, त्या माणसांत प्रथमपासून च एक भावना होती व मुलाच्या मृत्यूच्या निमित्तानें ती हृदयांतील भावना जागृत झाली. यासाठीं प्रत्येक मनुष्याच्या हृदयांत सद्भावना असते हा विश्वास बाळगा. आपण प्रत्येक माणसाला मताचा हक्क दिला आहे याचा च अर्थ हा कीं प्रत्येकांत सद्भावना आहे ही गोष्ट आम्ही मान्य करतों.

## दुहेरी काम : हृदय-परिवर्तन व परिस्थिति-परिवर्तन

आम्ही दोन बाजूंनीं काम करीत आहोंत. (१) प्रत्येक गरीब व श्रीमंत व्यक्तीच्या हृदयांत जो परमेश्वर आहे त्याच्यावर श्रद्धा ठेवतों, आणि (२) लोकांत जागृति निर्माण करण्यासाठीं दान दिल्यावाचून लोकांना राहवूं नये अशी परिस्थिति निर्माण करूं इच्छितों. या प्रकारें आम्ही नैतिक जागृति किंवा हृदय-परिवर्तन आणि जन-जागृति अशी दोन प्रकारची जागृति निर्माण करूं इच्छितों. केवळ लोकजागृति झाली आणि नैतिक जागृति झाली नाहीं, तर परिणामीं हिंसाशक्ति उत्पन्न होईल. त्याचप्रमाणें केवळ नैतिक जागृति झाली, तर कार्य पूर्ण होण्यास फार काळ लागेल. म्हणून

आम्ही हें दुहेरी व दोन्हीं बाजूंनीं काम करीत आहोंत. पक्ष्याला ज्याप्रमाणें दोन पंख असतात, एका पंखानें तो उडू शकत नाहीं, त्याप्रमाण धर्म-कार्य हि दोन प्रकारांनीं होतें, हृदय जागृत करणें व परिस्थितींत परिवर्तन करणें.

## धर्म-चक्र-प्रवर्तन

सर्व सामान्य धर्मप्रचार आणि क्रांति किंवा 'धर्म-चक्र-प्रवर्तन' या दोन भिन्न-भिन्न वस्तु आहेत. ऋषि व साधुसंत हे नेहमीं च सामान्य धर्म समजावून सांगत असतात, तेव्हां सर्व साधारण धर्मप्रचार ही एक गोष्ट आहे पण परिस्थितीची मागणी काय आहे हें जाणून त्या मागणीला च धर्मविचार जोडून देणें ही सर्वस्वी भिन्न गोष्ट आहे. गांधीजींनीं या दुसऱ्या मार्गानें च लोकांना अहिंसा शिकवली. प्रेमानें, अहिंसेनें लढण्याची कल्पना जुनीपुराणी च होती. पण त्यांनीं ती स्वराज्याच्या मागणीला जोडली नसती, तर त्यांना फक्त दहा वीस अनुयायी तेवढे मिळाले असते.

त्यावेळीं आपण शस्त्रांनीं लढू शकत नव्हतों. कारण आपण निःशस्त्र होतों आणि शस्त्रास्त्रांमध्यें इंग्रजांचें सामर्थ्य पुष्कळ मोठें होतें. म्हणून अहिंसेनें लढणें च शक्य होतें. परिस्थिति हि अनुकूल होती. तेव्हां धर्म-विचाराचें आंतरिक बल आणि परिस्थितीचें बल या दोहोंचा संयोग करून त्यांनीं आपल्याला अहिंसा शिकवली व तिनें च आपणांस स्वराज्य मिळवून दिलें, त्यावेळच्या त्या मागणीप्रमाणें आज गरिबांची जमिनीची मागणी आहे. केवळ हिंदुस्थानांत च नव्हे तर संबंध आशिया खंडांतील गरीब लोकांना च जमिनीची तहान लागली आहे. जमीन मिळाल्याशिवाय गरीब लोक शांत होणार नाहींत अशी वास्तविक परिस्थिति आहे. या बरोबर च आम्ही लोकांना हा धर्म-विचार समजावून देत आहोंत, कीं गरीब शेजाऱ्याला जमीन दिली पाहिजे, जमीन ही ईश्वराची देणगी आहे म्हणून तिच्यावर सर्वांचा सारखा अधिकार आहे. हा च विचार जर मी हजार पांचशे वर्षांपूर्वीं सांगितला असता, तर कोणीं ऐकून घेतला नसता. पण आज हा विचार मी आजच्या जमिनीच्या मागणीबरोबर जोडून दिला आहे म्हणून तो नुसता साधा धर्म-विचार होत नाहीं, तर तें धर्म-चक्र-प्रवर्तन होतें. संत व ऋषि सामान्य धर्म-प्रचार नेहमीं करीत च राहतात. पण त्यामुळें धर्म-चक्र-प्रवर्तन होत नाहीं.

पण जेव्हां परिस्थितीच्या गरजेशीं धर्मभावना जोडली जाते तेव्हां ती लोकांच्या हृदयाला जाऊन भिडते: त्यांतून च महान् क्रांति निर्माण होते व त्यामुळें च धर्म-चक्र-प्रवर्तन होतें.

असे कांहीं प्रसंग असतात कीं, जेव्हां धर्म-कृत्यें करण्याची प्रेरणा होत असते. आजचा हा ग्रहणाचा दिवस असा च आहे. आज जर कोणी दान देण्याबद्दलचा विचार समजावून सांगेल तर तो तात्काळ मनाची पकड घेईल. वस्तुत: दान तर रोज च केलें पाहिजे. पण ग्रहणाच्या दिवशीं ही गोष्ट चटकन् समजते, कारण हा दान देण्याचा प्रसंग मानला गेला आहे. आज आम्हांला लाखों एकर जमीन मिळत आहे. पूर्वीं असें कधीं घडलें नव्हतें. मग काय एकदम एवढ्या सगळ्या लोकांच्या हृदयांत धर्मभावना उचंबळून आली ? हें तर शक्य च नाहीं. सध्याच्या भूदानामागें धर्मभावना आहे खरी. पण त्याबरोबर च परिस्थितीची गरज व युगधर्म हीं हि आहेत.

जेव्हां काळाची गरज आणि धर्मभावना या दोहोंचा संयोग होतो, तेव्हां सर्वांचें च हृदय-परिवर्तन होतें. हें पूर्ण हृदय-परिवर्तन असें म्हणतां येणार नाहीं ; पण थोडें हृदय-परिवर्तन मात्र निश्चित झालें आहे. संपूर्ण हृदय-परिवर्तन होऊन जर एखाद्यानें दान दिलें, तर मात्र त्याला मोक्ष च प्राप्त होईल. पण नुसत्या धर्मभावनेनें जरी दान दिलें, तरी आमच्या या आंदोलनाला तेवढें हि पुरें आहे. प्रत्येकानें पूर्ण चित्तशुद्धि करून मग च दान द्यावें हें कांहीं आमच्या आन्दोलनासाठीं आवश्यक नाहीं. आज जमीन देणें आवश्यक आहे एवढें जरी लोकांना पटलें तरी आम्हांला तेवढें हि पुरे आहे.

## परमेश्वराची फजीती

हें वस्तुत: ईश्वराचें कार्य आहे व तो माझ्यासारख्या क्षुद्र साधनाच्या द्वारानें तें करून घेत आहे. नाहीं तर माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या शब्दांना आज इतकी किंमत आली नसती. पण ईश्वराची इच्छा असली कीं, सारें कांहीं घडून येऊं शकतें. लोक मला विचारतात कीं हें काम अयशस्वी झालें तर काय होईल ? पण मी या प्रकारें कधीं विचार च करीत नाहीं. हें काम विनोबाचें नाहीं, तर परमेश्वराचें आहे. तेव्हां तें जर अयशस्वी झालें तर फजीती विनोबाची नाहीं तर परमेश्वराची होईल.

सिसई, २७-६-५३.

# नीतीचें अधिष्ठान शेती                                                    : ३ :

आपल्या या यात्रेमध्यें मला मोलाचे अनुभव मिळाले आणि मनुष्य-स्वभावाचें दर्शन हि उत्तम झालें. आपल्या धर्मग्रंथांत व पुराणांत देव-दानवांच्या युद्धांचे नेहमीं उल्लेख येतात. हे देव व दानव कोण आहेत, कोठें राहतात आणि आज ते कोठें आहेत असा प्रश्न साहजिक आपल्यापुढें उभा राहतो.

## प्रत्येक हृदयांत देवासुरांचा संग्राम

आमच्या शास्त्रकारांनीं असें सांगितलें आहे कीं, देव व राक्षस हे दोन्ही माणसामध्यें च वास करीत असतात. मनुष्याच्या हृदयांत, मनांत व बुद्धींत ज्या असद्भावना असतात, त्या च राक्षसांचें स्वरूप होत. तेव्हां देव-असुरांची लढाई ही प्राचीन काळीं च नव्हे, तर आज हि प्रत्येकाच्या हृदयांत चाललेली आहे. हिला च देवासुर-संग्राम म्हणतात. या प्रकारचा देवासुर-संग्राम जेथें होत असतो, तेथें कांहीं काळ राक्षसांचा जय होतांना जरी दिसला, तरी अखेर देवांचा च विजय होणार असें पुराणांतरीं लिहिलें आहे. सांगण्याचें तात्पर्य हें कीं मनुष्याच्या हृदयांत ज्या सद्भावना असतात त्या सामर्थ्यशाली असतात व असद्भावना बलशून्य असतात. असद्भावना कांहीं काळ दिसूं लागल्या कीं लागली च असें वाटूं लागतें कीं, सारा समाज भ्रष्ट झाला आहे सर्वत्र अधर्म पसरला आहे. परंतु मनुष्याच्या हृदयांत वास करणारे सुप्त देव लवकर च जागे होतात. ते जागे होतां च असुर टिकूं च शकत नाहींत. ज्याप्रमाणें सूर्योदय झाला कीं, नक्षत्रें लोप पावतात आणि अंधकाराचा नाश होतो, त्याप्रमाणें जेथें देव जागे होतात तेथें सार्‍या वाईट गोष्टी नाहींशा होतात. मनुष्याच्या हृदयाच्या खोल गाभार्‍यांत देव च राहतात आणि राक्षस हे मनुष्याच्या मनांत व बुद्धींत लपून राहतात.

## दानात् देवः रक्षणात्-राक्षसः

बिहारच्या या यात्रेंत मला हा च अनुभव आला. मी जेथें जेथें गेलों, व ज्याला ज्याला भूदानाचा संदेश ऐकवला, त्या सर्वांनीं त्याला मान्यता

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत

दिली. कांहीं लोकांनीं पुष्कळ दान दिलं, कांहींनीं हिशेबानें दिलें, आणि ज्यांनीं दिलें नाहीं, त्यांनीं हि दान देणें योग्य आहे हा आमचा विचार मान्य केला. याचा अर्थ असा होतो कीं, योग्य संधि येतां च दान देण्याचें त्यांनीं मान्य केलें. दान देण्याला अनमान करणारा असा मला अजून एक हि भेटला नाहीं. सत्ययुग आतां वाट चालूं लागलें आहे, असा च मीं या सर्वांचा अर्थ लावला. पुराणांत चार युगांचा उल्लेख आहे. प्रत्येक युगाची एक विशिष्ट वर्षमर्यादा आहे असें हि म्हणतात. पण त्या चारी युगांमध्यें हि वेगवेगळीं युगें येत राहतात. ज्या प्रमाणें एका दिवसांत च दिवसां प्रकाश व रात्रीं अंधार होतो, ज्या प्रमाणें शरीरांत श्वास व उच्छ्वास हे प्रतिक्षण चालू च राहतात किंवा ज्याप्रमाणें चन्द्राची एका च वेळीं क्षय व वृद्धि होत असते, त्या च प्रमाणें एकेका युगांत हि दुसरीं युगें येत असतात.

सध्यां कलियुग चाललें असलें, तरी त्यांत हि आज सत्ययुग येऊं शकतें. तसें च सत्ययुग चाललें असलें, तर त्यांत कलियुग हि प्रवेश करूं शकतें. पुराणांत आपण हें वाचतों कीं, रामाच्या युगांत रावणासारखा राक्षस झाला. आणि सध्याच्या कलियुगांत असंख्य सत्पुरुष होऊन गेले. या सर्वांचा अर्थ हा कीं, ज्योतिषशास्त्राप्रमाणें युगाचें नांव कोणतें हि असलें, तरी भावनांच्या दृष्टीनें एका च युगांत चारी युगें येऊं शकतात आणि एकूण सत्ययुगाची वर्ष-संख्या सर्वांत जास्त भरते. कलीचा अर्थ 'एक' असा आहे. त्याच्या दुप्पट द्वापर युग असतें. त्याच्या तिप्पट त्रेतायुग असतें. आणि चौपट कृतयुग असतें. संस्कृतांत कलीचा अर्थ एक, द्वापरचा दोन, त्रेताचा तीन, व कृतचा चार, असा होतो. यावरून असें स्पष्ट होतें की कलियुगापेक्षां सत्ययुगाची शक्ति चौपट आहे. आणि मनुष्यांत हि कलियुगापेक्षा सत्ययुगाचें सामर्थ्य चौपट असतें. मधून-मधून कलि जोर करतो हें खरें आहे,. पण सत्य हें अधिक बलवान् आहे. जिला मी 'मानवता' म्हणतों ती दैवी-संपत्ति हि मनुष्याच्या हृदयांत अधिक प्रमाणांत वास करीत आहे. मनुष्यांत सत्त्वगुण प्रधान आहे व रजोगुण आणि तमोगुण हे राक्षसांप्रमाणें च गौण आहेत. या गोष्टीचें प्रत्यक्ष दर्शन मला बिहारमध्यें घडलें.

लोक म्हणतात कीं हिंदुस्थानांत चहूंकडे भ्रष्टाचार माजला आहे, लोक सारे बिघडले आहेत. पण वस्तुस्थिति अशी नाहीं. मला तर असें च

दिसून आलें की लोकांचीं हृदयें पवित्र आहेत. हें पाहून मला नुसता आनंद च झाला असें नाहीं, तर ती पवित्रता हि मीं अनुभवली. अशा कित्येक घटना घडल्या कीं, ज्यामुळें मी सांगू शकतों की, सत्ययुग जवळ येत आहे. लहान लहान मुलांनीं हि आपल्या आई-बापांना त्याग करायला लावला व जमीन देण्यास भाग पाडलें. स्त्रियांनीं स्वतः दान दिलें व पुरुषांना हि दान देण्याची प्रेरणा दिली. लहानांनीं व मोठ्यांनीं सर्वस्वदान केलें. हें सारें पाहिल्यावर मी निश्चयानें सांगू शकतों कीं मनुष्यांत देवत्व च प्रधान आहे. राक्षसत्व दडलेलें व अल्पशक्ति आहे. मनुष्याच्या हृदयांत जे चांगले भाव आहेत ते सर्व देव आहेत व जे वाईट भाव आहेत ते सगळे राक्षस आहेत. संस्कृतांत म्हटलें च आहे कीं, 'दानात् देवः, रक्षणात् राक्षसः' म्हणजे जे दान देतात ते देव व जे आपल्यापाशीं राखून ठेवतात ते राक्षस. दान देण्याची वृत्ति हें सर्व सद्गुणांचें सार आहे आणि संग्रह करण्याची वृत्ति हें सर्व दुर्गुणांचें सार आहे. संग्रहाहून मोठा राक्षस नाहीं व दानाहून मोठा देव नाहीं.

## सूर्योदयाचें आगमन सुचविणारे पक्षी

आजची परिस्थिति पाहून माझा उत्साह तर वाढत च चालला आहे. माझा तर असा विश्वास आहे कीं ज्या सामाजिक व आर्थिक क्रांतीची आम्ही अपेक्षा करीत आहोंत ती झाल्यावाचून राहणार च नाहीं. भूदानाच्या कामांत निमित्तमात्र बनून जे लोक कार्य करीत आहेत, ते फार भाग्यवान् आहेत. कारण ती अपेक्षित क्रांति वेगानें येत आहे, आम्ही तिला आणीत नाहीं. पण आम्ही जर तिच्या बरोबर राहिलों, तर आम्हांला यश मिळेल. वस्तुतः जगांत जें घडतें तें सारें ईश्वर च करीत असतो. परंतु त्याचें हें वैशिष्टच आहे कीं, तो आपल्या भक्तांना यश देत असतो. सूर्योदय तर होणार च असतो. पण त्याच्या आगमनाचीं गीतें गाणाऱ्या पक्ष्यांना सूर्योदय घडवून आणण्याचें श्रेय प्राप्त होतें. तुलसीदास म्हणतात, 'पंछी बन बोले' पक्षी सूर्याचें आवाहन करतात म्हणून त्यांना विनाकारण च यश मिळून जातें. त्यांच्या प्रमाणें च या कामांत भाग घेणारे आम्ही सारे पक्षी च आहोंत. आम्ही गांवोगांव हिंडून सांगतों की, सूर्योदय होऊं लागला आहे. लोक म्हणतात कीं, विनोबांना जमीन मिळूं लागली आहे. पण नुसत्या हिंडण्यानें जमीन मिळत नाहीं. एकदा

हें काम सुरू झालें आहे तेव्हां यानें प्रश्न सुटतील व साऱ्या समाजांत परिवर्तन होईल.

या कार्यांत एवढी शक्ति आहे ही कल्पना त्या वेळीं कुणाला हि आली नाहीं व खुद्द मला हि आली नाहीं. तरी हि माझी श्रद्धा मात्र अढळ होती. ज्या दिवशीं भगवंताच्या इषाऱ्यानुसार मीं हें काम सुरू केलें त्या दिवसापासून माझी ही दृढश्रद्धा बनली कीं, हिंदुस्थानांत हें कार्य व्हावें अशी भगवंतांची च इच्छा आहे. स्वराज्य-प्राप्तीनंतर हिंदुस्थानांत आतां हें च कार्य करावयाचें आहे. रात्रीनंतर दिवस जसा सहजपणें येतो, त्याप्रमाणें राजकीय स्वातंत्र्यानंतर आर्थिक स्वातंत्र्य हें सहजपणें येत असतें. ज्या साधनांच्या द्वारां आपण स्वातंत्र्य मिळविलें ती साधन-संपदा सहजासहजीं नाहींशीं होत नसते. ती कांहीं काळ दडपलेली, लपलेली आहे असें दिसलें, तरी ती निश्चित प्रकट होणार आहे, असा माझा दृढ विश्वास होता. माझी अशी समजूत होती कीं, जो पुण्याचा प्रभाव स्वराज्याच्या आन्दोलनांत प्रकट झाला, व जो मध्यंतरीं चार वर्षें लुप्त झाला होता, तो प्रकट होणार च आहे. राजकीय आंदोलनांत तो ज्या उत्कटतेनें प्रकट झाला, त्यापेक्षां अधिक प्रमाणांत तो या आंदोलनांत प्रकट होईल.

## भूदानामुळें किसानांचें नैतिक संघटन

हें कार्य शहरांत प्रचार करण्यानें, सभांतून कोणाला पाठिंबा देण्यानें किंवा कोणाविरुद्ध निषेध व्यक्त करणारे ठराव पास करून, किंवा वर्तमान पत्रांतून लेख देऊन होण्यासारखें नाहीं. यासाठीं गांवोगांव हिंडावयास हवें.

यावर कोणी विचारतील कीं, निवडणुकीच्या निमित्तानें किसानांच्याजवळ जाण्याची संधि मिळत च असते. पण ती संधि म्हणजे किसानांकडून कांहीं मिळविण्याची संधि असते. भूदान-यज्ञ ही किसानांना लाभ मिळवून देण्याची संधि आहे. तसें च पाहिलें तर किसानांना लुटण्यासाठीं चोर देखील रात्रीं किसानांच्या घरांत शिरतात. पण त्यामुळें किसानांशीं संपर्क जोडला जात नाहीं. निवडणुकींत तर आत्म-स्तुति, परनिंदा आणि मिथ्या भाषण, हे तीन कार्यक्रम घेऊन च लोक किसानांपाशीं जात असतात. यामुळें जनतेचें उत्थान होऊं शकणार नाहीं. म्हणून मी राजकारणी नेत्यांना

अशी जाहीर सूचना देऊं इच्छितों की, कोटचवधि रुपयांचा चुराडा करणारी ही जी पक्ष-राजकारणाची व निवडणुकीची पद्धति तुम्ही पाश्चात्यांकडून घेतली आहे, ती फार अनिष्ट आहे. म्हणून आपल्याला दुसरी चांगली पद्धति शोधून काढली पाहिजे ; निवडणुकींत जो जनसंपर्क होतो व भूदान-यज्ञांत जो होतो, त्यांची तुलना च होऊं शकत नाहीं. कारण भूदान-यज्ञामुळें जनतेंतील दिव्य शक्ति किंवा देव प्रकट होण्यास अवसर मिळतो. म्हणून च ज्यांना क्रांतीची दृष्टि आहे, अशीं माणसें या कार्यांत आलेलीं आहेत. जय-प्रकाश या कार्यांत आकर्षिले गेले कारण त्यांची दृष्टि विशाल व व्यापक आहे. आजवर जगांत क्रांत्या कशा झाल्या व अहिंसक साधनांनीं ती कशी होऊं शकते याचें त्यांना ज्ञान आहे. म्हणून च ते रात्रंदिवस या कामांत गूंतलेले आहेत. आम्हांला हि क्रांतीचें तसें दर्शन झालें, तर आमच्यामधील सारे पक्ष-भेद नष्ट होतील. सूर्याच्या उदयाबरोबर जशा चांदण्या लोपून जातात त्याप्रमाणें आमचे सगळे पक्ष-भेद, जातिभेद व व्यक्तिभेद नष्ट होऊन जातील.

रांची, १-७-१९५३

---

## भिक्षुक वृत्तीची आवश्यकता :४:

आपल्या आंदोलनाचा मी जस-जसा खोलांत जाऊन विचार करूं लागतों तस-तसें मला अडीच हजार वर्षांपूर्वीच्या त्या प्रचंड आंदोलनाचें स्मरण होतें. भगवान् बुद्ध व भगवान् महावीर यांचें तें प्रचंड आन्दोलन होय.

**प्राचीन काळीं दुःख अधिक होतें:-**

त्या काळीं आजच्यापेक्षां लोकांची परिस्थिति अधिक चांगली होती असें समजण्याचें कारण नाहीं. आपण नेहमीं जुन्या काळच्या चांगल्या गोष्टी ध्यानांत ठेवतों व वाईट मात्र विसरून जातों. म्हणून वस्तु जेवढी अधिक प्राचीन तेवढें तिचें आकर्षण अधिक वाटत असतें. परंतु सत्त्व, रज व तम हे तिन्ही गुण प्रत्येक काळीं अस्तित्वांत असतात च. तेव्हां सर्वसामान्य

जनतेची परिस्थिति तेव्हां आजच्यापेक्षा अधिक चांगली होती असें समजण्याचें कांहीं च कारण नाहीं. त्यावेळीं परिस्थिति जर चांगली असती, तर सगळें जग दुःखानें भरलें आहे व हें दुःख नाहींसें करणें हें च धर्म-कार्य आहे, अशा प्रकारची विचारसरणी त्यावेळीं निर्माण झाली नसती. मग दुसरी च विचार-सरणी निर्माण झाली असती. ज्यावेळीं दुःख फार प्रमाणांत पसरलेलें असतें त्या च वेळीं दुःख-निवृत्ति हें जीवनाचें साध्य आहे असें मानण्याची प्रवृत्ति होत असते. जेव्हां दुःखाचें प्रमाण विशेष नसतें, तेव्हां जीवनाचा उद्देश सुख-दुःखांहून भिन्न मानण्याची प्रवृत्ति होते. परंतु जेथें दुःख नाहींसें करण्याचा विचार येतो, तेथें कामक्रोधादि षड्रिपूंपासून मुक्ति मिळवणें, असा त्याचा अर्थ केला जातो. आणि तेव्हां च तो विचार तत्त्वज्ञानांत टिकून राहतो. केवळ दुःखमुक्तीचा विचार तत्त्वज्ञानांत टिकू शकत नाहीं, तो केवळ परिस्थितींत च राहूं शकतो.

आज कम्युनिस्ट सांगतात कीं दुःखमुक्ति हा च आमचा उद्देश आहे. म्हणजे दुःख ही अशी गोष्ट मानली जाते कीं, तिच्यापासून मुक्ति मिळवणें ही च जीवनाची परम सीमा समजली जावी. सर्वांना अन्न, वस्त्र, शिक्षण मिळावें, औषधपाणी मिळावें, व न्याय मिळावा हा च आमचा उद्देश आहे, असें कम्युनिस्ट म्हणतात. या गोष्टी त्यांच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाच्या झाल्या आहेत. पण आपण जर अधिक विचार करूं लांगलो, तर आमच्या हें लक्षांत येईल कीं, या जीवनाच्या अगदी सामान्य गोष्टी आहेत. खाणें व पिणें या संबंधींच्या गोष्टी सर्व साधारण आहेत. पण जेथें दुःखाची अतिशय वाढ होते, तेथें तत्त्वज्ञानामध्यें हि दुःख नाहींसें करण्याचा प्रश्न समाविष्ट होतो. मात्र तत्त्वज्ञानांत दुःखाचा अर्थ फार सखोल व व्यापक असतो. सर्व दुःखां-पासून मुक्ति मिळवणें हा अर्थ त्याला प्राप्त होतो. याला च ते परम पुरुषार्थ मानतात. सर्व दुःखांपासून मुक्ति म्हणजे कामक्रोधांपासून मुक्ति होय असें ते म्हणतात. हें तत्वज्ञान तेव्हां पटतें. कारण लोक अतिशय दुःखी झालेले असतात.

तेव्हां भगवान्-बुद्धांच्या तत्त्वज्ञानावरून त्या वेळचा समाज अतिशय दुःखी होता हें समजून येतें. असें असणें स्वाभाविक हि होतें. कारण त्या काळीं मोठीं अरण्यें पसरलीं होतीं. जंगली जनावरांपासून रक्षण करणें कठिण होतें. विज्ञानाची कांहीं प्रगति झालेली नसल्यामुळें निसर्गावर

विजय मिळवणें माहीत नव्हतें. कोणाचा दांत दुखूं लागला तर तो त्रासावांचून उपटून काढण्याची कला माहीत नव्हती. कोणाच्या पोटांत दुखूं लागलें तर शस्त्रक्रिया सुखानें करणें अवगत नव्हतें. जनावरांप्रमाणें च तेव्हां मनुष्यावर शस्त्रक्रिया होत होती. आजच्या प्रमाणें सुखाची शस्त्रक्रिया तेव्हां ठाऊक नव्हती. ज्या काळांत अशी परिस्थिति होती आणि विज्ञानाचा अगदी च थोडा आरंभ झालेला होता, त्या काळांत मनुष्य-समाज सुखी होता हे मानणें चुकीचें आहे. पण असें सारें असतां हि तेव्हां मोठ मोठे महाल बांधले गेले व राजे-महाराजे निर्माण झाले. मग हें सारे कसें होऊं शकलें ? खेडयांना लुटून च हें शक्य झालें.

## भगवान् बुद्धांचा दुःख-मुक्तीचा शोध

आपल्या मुलाला दुःखाचें दर्शन हि होऊं नये ही काळजी भगवान् बुद्धाच्या पित्यानें कटाक्षानें घेतली. कारण आपल्या मुलाला जर जगांत मोकळें हिंडू फिरूं दिलें तर तो या खेडयांच्या लुटींत सामील होणार नाहीं, हें त्याला माहीत होतें. म्हणून त्याच्यासाठी त्यानें दृष्टि फेकावी तेथें सुख, आराम व सौंदर्य यांचीं स्थानें व बाग-बगीचे निर्माण केले. अशा सुखपूर्ण वातावरणांत त्याला ठेवलें तरी हि एक दिवस फिरतांना त्याला दुःखाचें दर्शन घडलें च. तो बुद्धिमान् होता, म्हणून त्यानें हें चटकन् ताडलें कीं, मी राज-पुत्र असल्यामुळें व मला दुःखापासून कटाक्षानें दूर ठेवलें असल्यामुळें मला जरी एवढें थोडें दुःख दिसतें, तरी जगांत तें फार मोठ्या प्रमाणांत असलें पाहिजे. तेव्हां माझ्या भोवतालचें वातावरण हें अगदी कृत्रिम असलें पाहिजे. मला ही जीं सुखें मिळतात तीं जगाला लुटून च मिळविलीं असलीं पाहिजेत. ही जाणीव होतां च त्यानें घर सोडलें व तपस्या केली. नंतर हें कळलें की वासना वाढवीत गेल्यानें दुःख होतें. कांहीं लोक आपल्या वासना इतक्या वाढवीत राहतात कीं त्यांच्या पूर्तीसाठीं दुसऱ्यांना लुटावें च लागतें. मनुष्य-देहा बरोबर कांहीं वासना या राहणार च. पण त्या ताब्यांत ठेवल्या पाहिजेत. आपल्यासारख्या वासना दुसऱ्यांना हि आहेत या गोष्टीची जाणीव ठेवली पाहिजे. तेव्हां वासनांचें नियंत्रण करण्याचा मार्ग भगवान् बुद्धांनीं त्यावेळीं दाखवला व त्या काळच्या सुखासीन लोकांना त्या प्रमाणें उपदेश दिला.

आपला पिता हा च त्यांना पहिला शिष्य मिळाला. तेव्हां दुःख-निवारणाचें कार्य त्यांनी राजमहालापासून च सुरु केलें. दुसऱ्यांना दुःखी करून तुम्ही सुखी होऊं शकत नाहीं हें त्यांनीं लोकांना समजावून दिलें. एका च शरीराचे अवयव असले म्हणजे ज्याप्रमाणें डोळ्याला दुःख देऊन पाय सुखी होऊं शकत नाहीं, त्याच प्रमाणें समाजाचें हि आहे. शरीरांत एका अवयवाच्या दुःखानें दुसरे अवयव दुःखी होतात, कारण ते एकमेकांशीं निगडित झाले आहेत. त्यावेळीं भगवान् बुद्धांना असे कांहीं लोक भेटले कीं, ज्यांना मानवतेची ही शिकवण द्यावी लागली. या सर्वाचा अर्थ हा आहे कीं, आजच्या मानानें त्या काळीं लोक अधिक सुखी होते असें मानण्याचें कारण नाहीं. आज जशी लूट चालली आहे, तशी च त्या काळीं हि चालत असे. फक्त त्या लुटीचे मार्ग थोडे बहुत भिन्न होते. त्या लुटीच्या मार्गापासून परावृत्त होण्याची शिकवण त्या काळीं भगवान् बुद्धांनीं दिली ही फार मोठी घटना आहे. जगाला तिचा कधीं विसर पडणार नाहीं.

## भगवान् बुद्धांचें महान् कार्य

आज बुद्ध धर्म हा हिंदुस्थानांत धर्म या नात्यानें प्रचलित नाहीं. परंतु प्रत्येक हिंदु मनुष्य धर्मकार्य करतांना 'बौद्धावतारे' असें म्हणत असतो. म्हणजे बुद्धाचा अवतार आज हि चालू आहे. भगवान् बुद्धांनीं यति-संघ व भिक्षु-संघ निर्माण केले होते या गोष्टीची मला आठवण होते. 'यति' याचा अर्थ संयम करणारा, आणि 'भिक्षु' याचा अर्थ जगाची निरंतर सेवा करणारा व लोक देतील तें च खाऊन राहणारा, असा आहे. समाजानें कांहीं हि खाऊं घातलें तरी तो आपलें सेवा-कार्य सतत करीत राहतो. दळणवळणाचीं आजच्यासारखीं साधनें नसतांना त्या काळीं अशा प्रकारचें व्रत घेणारे हजारों लोक बुद्धांनीं तयार केले. हे भिक्षु गांवोगांव हिंडत व लोकांना त्या धर्माची दीक्षा देत.

भगवान् बुद्धांची एक कथा आहे. एकदा एक शिष्य आपल्या एका बांधवाला घेऊन भगवंतांकडे आला व त्याला दीक्षा देण्यास भगवंतांना सांगू लागला. भगवंतांनीं त्याला विचारलें, 'आज तुझें जेवणखाण झालें आहे ना?' आपण दोन दिवस कांहीं खाल्लें नाहीं असें जेव्हां त्यानें सांगितलें,

तेव्हां भगवंतांनीं आपल्या शिष्याला सांगितलें ' याला प्रथम जेवूं घाल. याला देण्यासाठीं याहून अधिक चांगला उपदेश माझ्यापाशीं नाहीं.' हा असा बुद्ध धर्म आहे. याच्या च प्रचारामुळें त्या काळीं आम्ही जे पशु होतों ते माणसांत आलों. ही च गोष्ट अरबस्तानांत घडली. ' रहीम ' व ' रहमान ' याचें नांव घेऊन तेथें एक फकीर निर्माण झाला आणि त्यानें तेथील लोकांत खरी मानवता आणली. अशी च घटना पॅलेस्टाइनमध्यें घडली. तेथें ईश्वराच्या प्रेषितानें सांगितलें कीं प्रेम हें च ईश्वराचें खरें स्वरूप आहे. ईश्वर हा मूर्तींत किंवा चित्रांत थोडा च आहे ? आपल्या ध्यानासाठीं आपण तें एक प्रतीक बनवीत असतों. पण ईश्वराचें खरें स्वरूप प्रेम च आहे.

मी सांगत होतों की, भिक्षूंनीं जनतेंतील अगदीं खालच्या व दुःखी लोकांसाठीं आपलें सर्वस्व सोडावें अशी भगवान् बुद्धांची इच्छा होती. सर्वांना सुखी करण्यासाठीं भिक्षूंनी त्याग केला पाहिजे व गांवोगांव हिंडत राहिलें पाहिजे. मी जेव्हां भूदान-यज्ञाचा विचार करूं लागतों तेव्हां त्या भिक्षूंचें मला स्मरण होतें. ते कसे हिंडत असतील याची मला आठवण होते. एक कथा आहे. एकदा त्यांचा शिष्य आनंद यानें एका भगिनीला भगवंतांपाशीं नेऊन म्हटलें कीं, आजवर आपण फक्त पुरुषांना दीक्षा देत होतां. आतां या भगिनीला हि द्यावी. तेव्हां भगवंतांनीं तिला दीक्षा दिली. तेव्हांपासून स्त्रियांना दीक्षा देण्यास प्रारंभ झाला व हिंदुस्थानांत हजारों स्त्रिया भिक्षुणी किंवा संन्यासिनी बनून गांवोगांव हिंडूं लागल्या. जेव्हां या सर्व गोष्टींची मला आठवण होते तेव्हां या देशांत मला जन्म मिळाला याचा मला अतिशय अभिमान वाटूं लागतो. एवढा महान् वारसा त्यावाचून मला कसा मिळाला असता ?

## भिक्षूची वृत्ति पाहिजे

आतां जो यज्ञ चालू झाला आहे, त्याच्यासाठीं सर्वस्वाचा त्याग करणारे यति व भिक्षु पाहिजे आहेत. पण मीं चांडिलमध्यें सांगितल्याप्रमाणें त्यासाठीं मी संघ स्थापन करणार नाहीं, फक्त ही वृत्ति निर्माण करीन. अशी वृत्ति निर्माण झाल्यावर ते लोक आपल्या जीवनांत स्वतः च परिवर्तन घडवून आणतील. ज्याप्रमाणें दिव्यानें दिवा लागतो, त्याचप्रमाणें एकेका व्यक्तीच्या द्वारां दुसऱ्या व्यक्तीमध्यें परिवर्तन होईल. विचार-प्रचारासाठीं संघ बनविण्यानें संकु-

चितता उत्पन्न होत असते. विचाराला मुक्त राहूं देणें च आवश्यक आहे एकदा एकानें मला विचारलें कीं, 'मला भूदानाचें काम करण्याची इच्छा आहे पण माझें घर आहे व शेतीचें काम घरीं च आहे. तेव्हां त्यासाठीं कांहीं वेळ मला द्यावा लागेल.' यावर मीं त्याला विचारलें कीं, 'तूं तुरुंगांत असतास, तर काय केलें असतेस ?' त्यानें उत्तर दिलें कीं, 'तुरुंगांत असतों, तर घरादाराची चिंता सोडावी च लागली असती.' तेव्हां मीं म्हटलें तुरुंगांत असतां तूं जसें केलें असतेस तसें च आतां कर. घराचें काम तुझ्यावाचून जसें चाललें आहे, तसें च चालू दे. अखेर या जगांतून एक दिवस निघून जायचें च आहे. त्यावेळीं घराचें काय होईल ? बायकोला व चार-पांच मुलांना न सांगतां सवरतां सोडून जाणारे बे-जबाबदार लोक मीं पाहिले आहेत. तेव्हां घरादाराची चिंता करण्याची जरूर नाहीं !'

भिक्षु आणि यति हे घराचा त्याग करून जात असत. याप्रमाणें त्याग करण्याची शक्ति जोंवर आमच्यांत येत नाहीं, तोंवर हें काम चालणार नाहीं. जुन्या दहा पांच कामांबरोबर हें हि एक काम मी करीन, असें जोंवर मनुष्य म्हणेल, तोंवर क्रांति होणार नाहीं. जेथें सामर्थ्यशाली विचार पसरावयाचा असतो तेथें त्यागाचें सामर्थ्य हवें असतें. याला च 'संन्यास' म्हणतात. असा फकिरी बाणा स्वीकारून, सर्वस्वाचा त्याग करून व नम्र बनून कार्य करणारे कार्यकर्ते पाहिजे आहेत. आपणांस पांच कोटि जमिनीचें वाटप करावयाचें आहे. क्रांति करावयाची आहे, असें आम्ही म्हणतों. पण केल्यावाचून हें काम कसें होईल ? लोकांच्या हृदयांत परिवर्तन घडवून आणणें हें कांही सोपें काम नाहीं.

## कांहींनीं सर्वस्व-त्याग करावा

कम्युनिस्ट म्हणतात कीं, तुम्हांला कांहीं लाख एकर जमीन मिळाली आहे, पण तेवढ्यानें काय होणार ? त्यांचें म्हणणें बरोबर आहे. थोडी जमीन मिळविण्यानें आमचें काम होणार नाहीं. आम्हांला तर हृदय-परिवर्तन घडवून जमीन मिळवावयाची आहे. माझी अशी इच्छा आहे कीं ज्यांनीं जमीन दिली, त्यांनीं गरिबांना आपल्या घरच्या मुलासारखें मानावें. माण-साच्या मनांत एवढें परिवर्तन करावयाची हिंमत आम्हीं बाळगली पाहिजे.

ज्यांनीं आपल्या मनांत परिवर्तन घडवून आणलें आहे, जे निरंतर जागृत आहेत व आत्म-शुद्धीचा सतत यत्न करीत आहेत, ते च ही हिंमत बाळगूं शकतील. कम्युनिस्ट आणखी असें म्हणतात कीं, 'समाजाची सर्व व्यवस्था बदलल्याशिवाय काम होणार नाहीं.' त्यांच्या म्हणण्यांत थोडें सार आहे यांत शंका नाहीं. पण हें कार्य प्रेमाने व शांतीनें व्हावें अशी माझी इच्छा आहे. शांतींत व प्रेमांत जें सामर्थ्य आहे, तें अशांतींत व द्वेषांत नाहीं. अशांतीनें व द्वेषानें एखादें कार्य घडवून आणलें गेलें, तरी त्यांतून लवकर च दुःख उत्पन्न होतें. म्हणून च मी प्रेमाचा मार्ग च पसंत करतों.

हें कार्य आत्म-शुद्धीवाचून व सर्वस्व-त्यागावाचून होणें शक्य नाहीं. मी सगळ्या जगाला सर्वस्व-त्याग करण्यास सांगत नाहीं. जगाला मी एवढें च सांगतों कीं, गरिबाला आपल्या घरांत स्थान देऊन आपल्या सहाव्या हिश्याइतकें दान करावें. आपल्या हृदयांत गरिबांविषयी प्रेमभाव उत्पन्न व्हावा एवढी च माझी इच्छा आहे. म्हणून च नीट समजून प्रेमानें दान देणारे लोक मला हवे आहेत. पण यासाठीं कांहीं लोकांना सर्वस्व-त्याग करावा लागेल. सर्वांना परिमित व समान सुख देण्यासाठीं कांहींना सर्वस्व-त्याग करावा लागेल. लोकांना थोडासा त्याग शिकविण्याची जर आमची इच्छा असेल, तर कांहीं लोकांना असीम त्याग करावा लागेल. सूर्य अखन्ड तापत राहतो, तेव्हां कोठें आमच्या शरीराचें उष्णतामान ९७ अंशाइतकें राहतें. पण सूर्याचें उष्णतामान च जर ९७ अंश झालें, तर आपली काय दशा होईल ? लोकांचें जीवन प्रेममय व्हावें अशी जर आमची इच्छा असेल, तर आम्हांला आमचें जीवन पूर्ण प्रेममय बनविलें पाहिजे.

रांची, २-७-१९५३

# मुद्दाम बनविलेल्या संस्थेकडून क्रांति होत नसते :६:

मुद्दाम बनविलेल्या संस्थेकडून क्रांति होत नसते ही गोष्ट आम्हीं ध्यानांत ठेवली पाहिजे. एखादी संस्था केवढी हि मोठी झाली, तरी ती म्हणजे राष्ट्र नव्हे. कांहीं झालें तरी ती आपल्या पक्षाच्या धोरणानुसार च चालेल. पण पक्ष-धोरणानुसार क्रांति होत नसते. वेगवेगळचा व्यक्ति हे च क्रांतीचे अग्रदूत असतात. क्रांतीचें निशाण व्यक्ति च उचलीत असते. व्यक्ति सर्व समाजांत जातात, आपला संदेश लोकांना ऐकवितात आणि समाजाचा एखादा आवश्यक कार्यक्रम हातीं घेतात. ज्यांना क्रांतीचें दर्शन घडतें, ते सरळ जनतेंत जाऊन काम करूं लागतात. जे राजनैतिक व संकुचित दृष्टीनें पाहतात त्यांना शक्ति व सत्ता यांतील भेद कळत नाहीं. ते सत्तेला च शक्ति समजतात.

## हे माझें काम आहे

आम्हांला साऱ्या समाजांत परिवर्तन करावयाचें असेल, तर वीरांची अहिंसा त्यासाठीं हवी. तेव्हां कोणीं आमचा विरोध केला, तरी त्याच्याशीं आम्ही प्रेमानें च बोललें पाहिजे. या क्रांतीचें सर्वांत सामर्थ्यशाली साधन म्हणजे अखंड क्षमाशीलता. आमची वृत्ति मेरु पर्वताप्रमाणें अखंड स्थिर राहिली पाहिजे. आणि आमचे विचार अधिकाधिक शुद्ध होत गेले पाहिजेत. हें माझें काम आहे, एवढी खूणगांठ मीं माझ्या मनाशीं पक्की बांधली होती. हें आणखी कुणा-कुणाचें काम आहे हें ज्याचें त्यानें च ठरवावें. पण हें माझें काम आहे व तें करतां करतां च माझें विसर्जन होईल एवढें निश्चित.

## एव्हरेस्ट व अत्युच्च व्यक्ति

आमच्यांत एक फार मोठी उणीव आहे. हिंदुस्थानांत मोठे, उच्च व थोर लोक इतके आहेत कीं जगांतील इतर देशांच्या तुलनेंत ते टिकतील एवढें च नव्हे, तर त्यांच्याहून अधिक श्रेष्ठ आहेत असें सिद्ध होईल. पण हिंदुस्थानांतील सर्वसामान्य जनतेची पातळी ही इतर देशांच्या मानानें कमी आहे, ही एक विचित्र गोष्ट आहे. याचें कारण हे च आहे कीं येथे जे सत्पुरुष होऊन गेले, त्यांनीं ध्यान, योग आदि बरी च साधना केलेली आहे. त्यांनी जगा-

पासून वेगळें राहण्याची हिंमत दाखवली, पण जगाशीं एकरूप होण्याची हिंमत दाखवली नाहीं. कोठें गडबड झाली किंवा दुष्टपणा दिसूं लागला कीं तेथून दूर जाण्याकडे च त्यांची प्रवृत्ति होती. गडबडीच्या किंवा दुरवस्थेच्या प्रसंगीं आपली जास्त च गरज आहे, असा विचार त्यांनीं कधी केला नाहीं. एकांतवासांत राहण्यानें त्यांना पुष्कळ क्लेश झाले. ते व्यक्तिगत क्लेश त्यांनीं सहनहि केले, पण सामाजिक क्लेश सहन करण्याचा प्रयत्न केला नाहीं. येथील कांहीं अत्युच्च व्यक्ति एव्हरेस्ट शिखराप्रमाणें सदा अगम्य राहिल्या होत्या. पण आतां लोक एव्हरेस्टवर हि पोचले आहेत. तेव्हां आता साधारण लोक हि त्या अत्युच्च सत्पुरुषांपर्यंत जाऊन पोचतील अशी आशा करण्यास हरकत नाहीं. गांधीजींनी मार्ग खुला केला आहे. आतां सत्पुरुषांना सामान्यांबद्दल सहानुभूति वाटूं लागेल. गांधीजींच्या काळांत हें घडलें आहे. तेव्हां आतां या काळांत आपण एव्हरेस्टपर्यंत सहज पोचूं शकूं.

रांची, २-७-५३

---

## आजच्या युगांत आत्मौपम्य : ७ :

या जगांत विविधता व विषमता दोन्ही आहेत. कोणा एकाचा चेहरा दुसऱ्याच्या चेहऱ्यासारखा नाहीं. प्रत्येकाचा चेहरा इतरांहून वेगळा आहे. एका झाडावर जीं पानें असतात, तीं हि एकमेकांहून भिन्न असतात. याप्रमाणें साऱ्या च सृष्टींत विविधता, विचित्रता व विभिन्नता आहे.

### आन्तरिक एकता

पण ही विभिन्नता बाहेरची आहे. आंत तर आपणांस एकतेचा च अनुभव येतो. भुकेची व तहानेची भावना सर्वांमध्यें एकसारखी च आहे. प्रेमाची हि भावना सर्वांत आहे. याप्रमाणें कांहीं मूलभूत भावना सर्वांमध्यें समान रूपांत वास करीत असतात. म्हणून च शास्त्रकारांनीं सांगितलें आहे कीं, स्वतःवरून दुसऱ्याची कल्पना करावी. आपल्याला भूक लागली व

लागली च अन्न मिळालें कीं सुख वाटतें. तेव्हां दुसऱ्यांना खाऊ घालून नंतर जेवणें हा आमचा धर्म आहे. पण आम्हांला भूक च न लागती, तर दुसऱ्यांना खाऊं घालून मग खाण्याचा हा धर्म आम्हांला प्राप्त झाला नसता. पण आपल्याला भूक व तहान आहे म्हणून दुसऱ्याच्या हि तहान-भुकेची आपण चिंता वाहिली पाहिजे. आत्मौपम्य भावनेनें दुसऱ्यांशी वर्तन करा, ही सरळ शिकवण सगळ्या धर्मांनीं याच साठीं दिली आहे.

रावणासमोर उभा राहून हनुमान म्हणत होता कीं "तुम्ही गृहस्थ आहांत व राम हि गृहस्थ आहेत, तुमच्या पत्नी आहेत व रामाची हि पत्नी आहे. तेव्हां रामाच्या भावनांचा तुम्हांला अनुभव आहे च. तुमच्या पत्नीचें कोणीं हरण केलें, तर तुम्हांला किती दुःख होईल याचा विचार करा. हा विचार करून तुम्ही सीतामाईला सोडून दिलें तर तुम्हांला क्षमा करण्या-इतके राम क्षमाशील आहेत.'—याप्रमाणें हनुमंतानें रावणाला आत्मौपम्य बुद्धीचा उपदेश केला.

## आत्मौपम्य हें धर्माचें आधारभूत तत्त्व

आत्मौपम्य बुद्धीनें वर्तन करणें हें च धर्माचें आधारभूत तत्त्व आहे. आजकाल स्पर्धेची च चलती दिसत आहे. भगवंतानें ज्याला ज़ास्त बुद्धि, शक्ति किंवा संपत्ति दिली आहे तो या शक्तीचा उपयोग दुसऱ्यांना दडपण्यासाठीं करीत असतो. पण जोंवर असें चालू राहील, तोंवर मनुष्य-समाजांत मानवता नांदणार नहीं. तो आसुरी समाज बनेल. आज विज्ञानामुळें माणसाच्या हातीं नाना प्रकारच्या शक्ति व सिद्धि आल्या आहेत. मनुष्य जर आत्मौपम्य बुद्धीने त्यांचा उपयोग करील तर पृथ्वीचा स्वर्ग बनून जाईल. एके काळीं निसर्गाशीं झगडण्यांत मनुष्याची बरी च शक्ति खर्च होत असे. कारण त्याला निसर्ग-नियमांचें ज्ञान नव्हतें. आज त्याला त्या नियमांचें पुरें ज्ञान नसलें, तरी कांहीं थोडें बहुत आहे. म्हणून पूर्वींइतकी शक्ति आतां निसर्गाशीं झगडण्यांत खर्च करावी लागत नाहीं. आज आपल्या हातीं अशी शक्ति आली आहे कीं, जिच्या साह्यानें आपण पृथ्वीचा स्वर्ग बनवूं शकतों. पण विज्ञानाशीं हिंसेची सांगड घातली, तर मात्र जगाचा संहार च होईल.

विज्ञानाची पुष्कळ प्रगति व्हावी अशी च माझी इच्छा आहे. कारण विज्ञानामुळें मनुष्याचें जीवन सफल बनूं शकतें, समृद्ध होऊं शकतें. पण याच बरोबर दुसरी एक गोष्ट ध्यानांत ठेवणें अवश्य आहे. वैद्य आजाऱ्याला औषध सांगतो व त्याबरोबर पथ्य हि सांगतो. वैद्य सांगतो कीं हें औषध परिणामकारक आहे. परन्तु त्याचें पथ्य पाळणें अतिशय अवश्य आहे. तें पथ्य पाळलें नाहीं, तर हें परिणामकारक औषध उलट शरीराचा नाश च करील. याचप्रमाणें विज्ञानाला अहिंसेच्या पथ्याची जरूर आहे. अगदीं पूर्वींच्या काळीं मनुष्य जेव्हां हिंसेच्या साह्यानें च आपले प्रश्न सोडवीत होता तेव्हां हिंसा एवढ्या विशाल स्वरूपाची नव्हती. त्यामुळें ती फारसा नाश करूं शकत नव्हती. प्राचीन काळीं बिहारमध्यें भीम व जरासंध यांची कुस्ती झाली होती. त्या द्वंद्वयुद्धांत जरासंध मारला गेला व अशा तऱ्हेनें प्रश्नाचा निकाल लागला. पण या द्वंद्वयुद्धामुळें दुसऱ्यांना उपसर्ग पोचला नाहीं. कारण ती हिंसा सीमित होती. म्हणून ती फारसा संहार करीत नव्हती. पण आज द्वंद्वयुद्धाचा काळ राहिला नाहीं. आज हिंसेनें एखादा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला तर दुसरे पन्नास प्रश्न समोर उभे होतात. आजच्या लढाईचें क्षेत्र अत्यंत विस्तृत बनलें आहे. तेव्हां आज हिंसेनें एखादी समस्या सोडवूं म्हटलें तर लगेच दुसरी उभी ठाकते. म्हणून च विज्ञानाला अहिंसेचें पथ्य आज विशेष च आवश्यक आहे.

आम्हांला हें अहिंसेचें पथ्य पाळावयाचें नसेल, तर आम्ही विज्ञानाचें औषध हि घेतां उपयोगी नाहीं. मग विज्ञानाची प्रगति थांबवून धरावी लागेल. पण विज्ञानाची प्रगति थांबविण्याची कोणाची च इच्छा नाहीं. थांबविण्याची इच्छा असली तरी हि ती थांबवितां येणार नाहीं अशी वस्तुस्थिति आहे. विज्ञानाचा विकास व्हावा अशी च माझी इच्छा आहे. पण मनुष्याचे प्रश्न मानवतेनें च सोडविले पाहिजेत हें हि त्यासाठीं आवश्यक आहे. तेव्हां हिंसेचा त्याग करून सगळ्या समस्या आत्मौपम्य बुद्धीनें च सोडविल्या पाहिजेत.

रामगड, १३-७-१९५३

## देशाच्या रोगाचें मूल-शोधन व उपाय :८:

आज सकाळीं, येथें गोवध बंदीसाठीं उपवास करणाऱ्या वीरांपुढे मीं आपलें म्हणणें मांडलें. त्यांनीं माझें म्हणणें मान्य केलें व आपला उपवास सोडला. त्यांना मीं जें सांगितलें तें साररूपानें मी आपणांसमोर ठेवूं इच्छितों. कारण त्यांत एक धर्म-विचार आहे.

### अनशन केव्हां करावें

मीं त्यांना सांगितलें कीं "एक मनुष्य आपल्या विचारासाठीं स्वतःस क्लेश देत आहे व कदाचित् त्यांत त्याचा अंत हि होईल, अशा प्रकारची कोणती हि भावना मनांत आणून मी हें सांगत नाहीं. शरीर हें केव्हां तरी नष्ट होणार च आहे. तेव्हां कोणाचा जीव वांचविण्यासाठीं कांहीं मी बोलत नाहीं, किंवा त्याचा जीव वांचवा असें सरकारला हि सांगत नाहीं. मी जो विचार तुमच्या समोर मांडत आहें तो तुम्हांला मान्य झाला, तर तुम्ही उपवास सोडा आणि मान्य न झाला, तर सोडूं नका." एवढें बोलल्यावर मी पुढें म्हटलें कीं, आपल्या या एवढ्या विशाल देशांत जेथें अनेक प्रांत, अनेक भाषा, अनेक जाति, अनेक पंथ, अनेक धर्म, अनंत प्रकारचे प्रश्न आणि जनतेच्या नाना प्रकारच्या अडचणी आहेत ' तेथें एकेका प्रश्नासाठीं जर एकेक व्यक्ति अनशन करूं लागली, तर फार मोठा अनवस्था-प्रसंग उद्‌भवेल. अशा एकेका उपवासापुढें सरकार जर मान वाकवूं लागलें तर लोकांनीं त्याच्यावर टाकलेल्या जबाबदारीस तें सर्वथा अपात्र ठरेल. आणि सरकार जर नमलें नाहीं, तर एकेका माणसाच्या प्राण-संकटाचा प्रश्न उभा राहील, दया-बुद्धीला आवाहन होईल व नाजुक अवस्था निर्माण होईल. बिहारचा एक विभाग बंगालला जोडला जावा या साठीं नुकता च एक गृहस्थ उपवास करीत होता. त्यानें आपला उपवास सोडला ही आनंदाची गोष्ट आहे. याच प्रकारें बंगालचा एखादा विभाग बिहारला जोडण्यासाठीं एखादा बिहारी बंधु उपवास करूं शकेल. पण एकेका प्रश्नाबाबत ज्याची भावना तीव्र असेल त्यानें जर याप्रमाणें सरकारविरुद्ध उपवास सुरू केला, तर त्यांत अहिंसा राहणार नाहीं.

सत्याग्रह्याला उपवासाचा प्रसंग येणार नाहीं किंवा त्याला उपवास करण्याचा हक्क नाहीं, असा मात्र याचा मुळींच अर्थ नाहीं. उपवास हें सत्याग्रह्याचें उत्तम शस्त्र आहे ही च माझी धारणा आहे. मी सत्याग्रह्याला निःशस्त्र बनवूं इच्छीत नाहीं. पण या शस्त्राचा उपयोग योग्य प्रकारें केला गेला, तर च तें सफल होऊं शकेल. नाहीं तर तें शस्त्र निरुपयोगी होईल. जेव्हां सरकार गप्प राहील, जनता कोणाचें ऐकणार नाही आणि बहकून जाईल, तेव्हां अत्यन्त व्याकुल होऊन परमेश्वराची प्रार्थना करण्यासाठीं सत्याग्रह्याला उपवास करतां येईल. परंतु सरकार जर त्या प्रश्नाचा विचार करीत असेल आणि आंदोलन करण्यासाठीं जनमत जागृत करण्यास वाव असेल, तर त्या परिस्थितींत उपवास करतां कामा नये. जेथें सरकार व जनता हे दोन्ही मूग गिळून बसले असतील आणि भगवान् व्यासांनीं शेवटीं म्हटल्याप्रमाणें 'नच कश्चित् श्रुणोति माम्'—' माझें कोणी हि ऐकत नाहीं '—अशी परिस्थिति झाली असेल, त्या प्रसंगीं ज्यानें जगाची पुष्कळ सेवा केली असेल आणि ज्याचें हृदय शुद्ध असेल असा महापुरुष उपवास करूं शकतो. परंतु असे बिनतोड प्रसंग फार क्वचित् येतात. साधारण परिस्थितींत उपवास करणें चुकीचें आहे.

## सत्याग्रह ही धमकी नसून प्रेमाचा प्रकर्ष आहे

जेथें जनतेची शक्ति प्रकट झाली आहे व जनतेच्या हातीं सत्ता आली आहे, तेथें सत्याग्रह करण्याला अवसर च नाहीं, असें हि माझें म्हणणें नाहीं. सत्याग्रह तर कुटुंबामध्यें हि होऊं शकतो. तेव्हां आतां आपलें राज्य असल्यामुळें सत्याग्रह करतां उपयोगी नाहीं, अशी मुळी च गोष्ट नाहीं. वस्तुतः सत्याग्रह ही धमकी नव्हे, तर ती प्रेमाची पराकाष्ठा आहे. तो एक तीव्र उपाय आहे. समोरच्या माणसाला आपल्या आत्म्यांत स्थान देण्याच्या वृत्तीनें सत्याग्रह व्हावयास हवा. सत्याग्रह करण्याचा हक्क आईचा आहे. आई-बाप मुलांविरुद्ध व मुलें आई-बापांविरुद्ध सत्याग्रह करूं शकतात, प्रह्लादानें असा च अतिशय निर्वैर बुद्धीनें पित्याविरुद्ध सत्याग्रह केला होता. याप्रकारें आपल्या राज्यांत हि सत्याग्रहाचा प्रसंग उद्भवूं शकतो. 'अनशन' हा अंतिम सत्याग्रह आहे. जेथें प्रेमाची पराकाष्ठा आहे, तेथें च तो होऊं शकतो. जेथें दुसऱ्याला मारणें झोडणें शक्य नाहीं तेथें त्याच्याविरुद्ध उपवास करावयाचा, असें मुळीच नाहीं.

नुकते च भाषावार प्रांतरचनेसाठीं उपवास झाले. त्यां बरोबर हिंसा हि आली. उपवास व हिंसा दोन्ही मिळून एक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न झाला. अशा तऱ्हेचा उपवास हा प्रेम-प्रकर्षाचा नमुना नव्हे. तो केवळ दडपण आणण्याचा एक प्रकार आहे. म्हणून एक प्रकारच्या हिंसेंत च त्याची गणना केली जाईल. त्यानें तर शस्त्रापेक्षां हि अधिक हिंसा होऊं शकते; तेव्हां विवेक ठेवून च उपवासाचे प्रयोग केले गेले पाहिजेत. हिंदुस्थानांत जेथें जेथें माझें हें भाषण पोंचेल, त्या त्या ठिकाणीं अनशन करण्याचा प्रसंग येतां च माझा सल्ला विचारला जावा अशी माझी इच्छा आहे. गीतेंत भक्तांच्या लक्षणांत सांगितलें आहे कीं ते परस्परांशीं विचार-विनिमय करून च आपलें काम करतात--'बोधयन्तः परस्परम्.' अशा तऱ्हेनें विचार विनिमय केल्यानें त्यांचें कांहीं हि नुकसान तर होणार च नाहीं, उलट फायदा च होईल. त्यांच्या म्हणण्यांत खरेपणा असला तर अनशनाचा प्रसंग माझ्यासारखा माणूस टाळणार नाहीं. म्हणून ज्याला अनशन करावयाचें असेल, त्यानें प्रथम माझा सल्ला विचारावा असें मला वाटतें.

## मूलभूत चूक

मी दररोज वर्तमानपत्रांत वाचतों कीं, लोक आगगाडी थांबवून धरतात आणि मग पोलिसांकडून ठोकले जातात. हें असें कां होत आहे? तिकडे मद्रास प्रांतांत राजाजींनीं शिक्षणक्रमांत परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी बनविलेल्या नव्या योजनेनुसार विद्यार्थी तीन तास शिक्षण घेईल व उरलेला वेळ सुतार, विणकर, किंवा शेतकरी यांच्याकडे जाऊन उद्योग शिकण्यांत घालवील. म्हणजे त्याचें मन व बुद्धि हीं दोन्ही विकसित होतील. पण ही योजना कांहीं लोकांना पसंत पडली नाहीं. ते म्हणूं लागले, 'तुम्ही शहरवाल्यांना बुद्धि वाढविण्याचें शिक्षण देतां आणि आम्हांला मात्र श्रम करण्यास सांगतां. आम्हांला म्हणतां की दळत रहा व नांगर हाकीत रहा. याप्रमाणें कांही लोकांनीं त्या योजनेचा विरोध केला. या विरोधाचा प्रकार त्यांनीं आगगाड्या थांबविणें, दंगे माजविणें अशा स्वरूपांत व्यक्त केला. तिकडे बंगालांत हि असे च प्रकार चालले आहेत. तेव्हां आपणांस असा विचार केला पाहिजे कीं, ही जी हिंसाशक्ति उत्तरोत्तर वाढत चाललेली दिसत आहे, तिचें मूळ कारण काय?

आपणांला स्वराज्य मिळालें हें उघड आहे. पण देशापुढील प्रश्न हे अजून जसेच्या तसे च पडलेले आहेत. सरकारनें एक पंचवार्षिक योजना तयार केली आणि तिचा अर्धा अधिक काळ निघून गेल्यावर त्यांच्या ध्यानांत आलें कीं, देशांतील बेकारी वाढत च चालली आहे. याचा अर्थ एवढा च कीं आमची बुद्धि अजून मंद आहे. तिला योग्य विचार करतां येत नाहीं. कोणती हि योजना अगदी पक्की व कायम स्वरूपाची होऊं शकत नाहीं, तिच्यांत लवचिकपणा असावा च लागतो, ही गोष्ट मला मान्य आहे. परंतु आम्हीं दिल्लीला जाण्याचा रस्ता बनवला व त्या रस्त्यानें थोडें दूर गेल्यावर आम्हांला जर असें आढळून आलें कीं, तो दिल्लीकडे जात नसून कलकत्त्याकडे चालला आहे, तर आमच्या विचारांत नक्की च कोठें तरी चूक असली पाहिजे. आमच्या चालण्याचा वेग किती हि कमी असला तरी, त्या रस्त्यानें आम्ही दिल्लीजवळ थोडें तरी जायला हवें होतें. त्या रस्त्यांत थोडा-फार फरक करून कांहीं च फायदा होणार नाहीं. कारण मुळांत च चूक झालेली आहे. आजचे योजना बनविणारे मोठे देशसेवक आहेत. त्यांच्यापैकीं कांहीं माझे मित्र हि आहेत. देशासाठीं त्यांनीं आपलें शरीर झिजविलें व आज हि ते झिजवीत आहेत. देशसेवा करण्याची च त्यांची इच्छा आहे. पण जेथें सबंध देशाचा प्रश्न सोडवावयाचा असतो, तेथें मुळापासून जर योग्य विचार केला नाहीं तर काय निष्पन्न होणार? दिल्लीला मीं प्लॅनिंग कमिशनसमोर मोठ्या प्रेमपूर्वक सांगितलें कीं, तुम्ही जर देशांतली बेकारी नष्ट करण्याची जबाबदारी स्वीकारली नाहीं तर तुमचें प्लॅनिंग हें नॅशनल प्लॅनिंग (राष्ट्रीय नियोजन) न होतां तें पार्शल प्लॅनिंग (आंशिक नियोजन) होईल. कारण नॅशनल प्लॅनिंगचें हें तत्त्व च आहे कीं त्यामुळें देशांतील सगळ्या लोकांना काम मिळालें पाहिजे. ही कांहीं सिद्ध करण्याची गोष्ट नव्हे. भूमितीचीं गृहीत तत्त्वें सिद्ध करावी लागत नसतात. तेव्हां देशांतील सर्व लोकांना आम्ही काम देऊं शकणार नाहीं हें ज्यानें मान्य केलें, त्यानें राष्ट्रीय नियोजनामधील आपली अपात्रता च सिद्ध केली असा अर्थ होतो. बाप किती हि गरीब असला, तरी तो असें म्हणत नाहीं कीं माझ्या कांहीं मुलांना मी खाऊं घालूं शकतों, इतरांना खाऊं घालूं शकत नाहीं. प्रत्येक पिता हें च म्हणतो कीं कुटुंबाची जी कमाई आहे ती सगळ्या कुटुंबियांत वाटली जाईल.

या च दृष्टिकोणांतून मीं ही गोष्ट देशासमोर मांडली. मीं म्हटलें कीं सामान्यतः प्रत्येक कुटुंबांत पांच भाऊ असतात. तेव्हां मी तुमचा सहावा भाऊ दरिद्रीनारायणाचा प्रतिनिधि बनून आलों आहे असें समजा. तो अव्यक्त आहे. कारण नारायण अव्यक्त च असतो. तेव्हां त्याच्यावर श्रद्धा ठेवून त्याच्यासाठीं आपला सहावा हिस्सा मला द्या. आपल्या राष्ट्रीय सरकारला हि सगळ्या लोकांकडून अशी मागणी करतां येईल अशी माझी समजूत आहे. अशी मागणी करण्याचा सरकारला हक्क आहे व सरकारशीं सहकार्य करण्याचें लोकांचें कर्तव्य च आहे. असें जर होऊं शकलें, तर देशांत एक हि भुकेला मनुष्य उरणार नाहीं. तकली चालविल्यानें सगळ्यांना काम मिळू शकत असलें, तर आम्हीं तकली दिली पाहिजे. चरखा देण्यानें सर्वांना काम मिळत असेल तर चरखा दिला पाहिजे. यंत्रांचा च आग्रह धरतां उपयोगी नाहीं. आंशिक बेकारी कीं यंत्र, असा प्रश्न जर आमच्या समोर टाकला, तर आम्ही यंत्र च स्वीकारूं असें म्हणणें किंवा यंत्रांची आसक्ति धरणें योग्य नाहीं. मी यंत्रांचा विरोधक मात्र नाहीं.

## यंत्र-संबंधीं विवेक

मी यंत्रांचा विरोधक आहे असा मात्र या सांगण्याचा अर्थ नव्हे. यंत्रें तीन प्रकारचीं असतात. (१) समयसाधक (२) संहारक, आणि (३) उत्पादक. यांपैकीं समयसाधक यंत्रांचा मी विरोध करीत नाहीं. आगगाडी, विमान, जहाज, यांसारख्या यंत्रांनीं उत्पादन होत नाहीं, पण वेळ वाचतो. जहाजाची बरोबरी दहा हजार घोड्यांना हि करतां येणार नाहीं. म्हणून अशीं यंत्रें आम्हांला पाहिजेत. पण तोफा, बन्दुका, बॉम्ब यांच्यासारख्या संहारक यंत्रांना अहिंसेंत स्थान नाहीं. म्हणून तीं आम्हांला नकों.

तिसऱ्या प्रकारच्या उत्पादक यंत्रांचे हि दोन प्रकार आहेत (१) पूरक व (२) मारक यंत्र. जेथें लोकसंख्या अधिक असते तेथें जर एखाद्या यंत्रानें अनेक लोक बेकार बनविले, तर तें मारक यंत्र होय. पण जेथें लोकसंख्या कमी व काम जास्त करावयाचें असतें, तेथे तें च यंत्र पूरक होईल. एक यंत्र एका देशांत पूरक तर दुसऱ्यांत मारक होऊं शकतें. हिंदुस्थानांत ट्रॅक्टरसारखीं मोठी यंत्रें आणल्यानें सामान्यतः बेकारी च वाढेल. पण अमेरिका किंवा

रशिया यांसारख्या देशांत तीं च यंत्रें पूरक बनतील. याच प्रकारें एखादें यंत्र एका काळीं मारक तर दुसऱ्या काळीं पूरक बनतें. तेव्हां देश, काल व परिस्थितीनुसार कोणतें हि यंत्र पूरक किंवा मारक होत असतें. म्हणून मी कोणत्या हि यंत्राचा केवळ यंत्र म्हणून द्वेष हि करीत नाहीं किंवा त्याबद्दल मला प्रेम हि वाटत नाहीं. कोणत्या हि यंत्राची उपयुक्तता पाहून च आम्ही त्याचा उपयोग करूं. पण जर आम्ही यंत्रांची च आसक्ति ठेवली व गिरण्यांच्या तोडीचीं सक्षम साधनें ग्रामोद्योगांत नाहींत म्हणून त्यांचा उपयोग करणार नाहीं, असें म्हणूं लागलों, तर देशासाठीं ज्या तऱ्हेनें विचार करावयास पाहिजे तसा केला असें म्हणतां येणार नाहीं. पाश्चात्यांत एखादी गोष्ट होते म्हणून तिच्या नादानें किंवा आकर्षणानें जर आम्ही ती करूं लागलों तर, गांधीजींनीं या विरुद्ध इषारा दिला असतां हि, आम्ही फार मोठी चूक करीत आहोंत असें च म्हणणें भाग आहे.

मीं हें हि पाहिलें आहे कीं, जेव्हां आपण समतेची गोष्ट पुढें आणतों तेव्हां समोरचा माणूस विरोध करतांना विषमतेचें समर्थन करीत नाहीं, परंतु क्षमतेचा प्रश्न पुढें आणतो. तो म्हणतो कीं, तुम्ही समतावादी असलांत, तर आम्ही क्षमतावादी आहोंत. याप्रमाणें तो एका गुणाविरुद्ध दुसरा गुण उभा करतो, त्यामुळें दोघांत संग्राम सुरू होऊं शकतो. हल्ली भांडवल-दारांनीं ही क्षमतेची घोषणा सुरू केली आहे. मला हि क्षमता पाहिजे आहे. पण कुटुम्बांतील कांही माणसांनी जेवावें व दुसऱ्यांना मुळींच अन्न मिळूं नये हें मात्र मला मान्य नाहीं. सर्वांना अन्न मिळालें पाहिजे अशी माझी इच्छा आहे. आज ग्रामोद्योगाच्या साधनांनीं सर्वांना अन्न मिळणार असेल, तर त्यांचा च उपयोग केला पाहिजे. कांहीं थोड्या लोकांसाठीं इतरांना बेकार ठेवून सक्षम बनण्याचें समर्थन आम्ही कधीं हि करूं शकत नाहीं ; नुकत्याच आगऱ्याला भरलेल्या कॉंग्रेस कमिटीच्या बैठकींत ग्रामोद्योगांकडे लक्ष दिलें गेलें आहे, या गोष्टीचा मला आनन्द वाटतो.

## आजच्या असंतोषाचें कारण, बेकारी

आज हिंदुस्थानांत सर्वत्र असंतोष पसरला आहे. कोणाच्या हि मनांत समाधान नाहीं. कोणत्या ना कोणत्या कारणावरून सतत असंतोष प्रकट

होत च आहे. वेगवेगळे प्रश्न हातीं घेऊन लोक हिंसा करण्यास प्रवृत्त होत आहेत. कारण त्यांच्या हृदयांत असमाधान आहे व तें हिंसेंच्या रूपानें वाट काढीत आहे. मी जेव्हां शरणार्थींमध्यें काम करीत होतों तेव्हां तेथें मारवाडी व्यापारी, सिंधी व्यापाऱ्यांचा विरोध करतांना दिसले. तेथें मारवाडी-सिंधी वाद चालू होता. मीं म्हटलें कीं हा वाद अगदीं निरर्थक आहे. हें एक निमित्त बनलें आहे. कधीं मारवाडी विरुद्ध सिंधी, कधीं तेलुगुविरुद्ध कानडी, कधीं बिहारी विरुद्ध बंगाली, कधीं हिंदूविरुद्ध मुसलमान—हे जे वेगवेगळे वाद चालतात त्यांचें मूळ कारण हें आहे कीं, हिंदुस्थानांत आज उत्पादन अतिशय कमी व बेकारी जास्त आहे. यामुळें च हा असंतोष निर्माण झाला आहे. आणि तो कोणत्या ना कोणत्या प्रकारें फुटून बाहेर पडत आहे. यासाठीं असंतोष नाहींसा करण्याचा यत्न केला पाहिजे.

## प्रथम भुकेले

गांधीजींचें हें वैशिष्ट होतें कीं, ज्याला सर्वांत जास्त मदतीची गरज असें, त्याला ते प्रथम मदत देत. आतां च 'दुखायल' कवींनी मला जें ऐकवलें, त्यांत मदत देण्याचा क्रम, प्रथम भुकेला, नंतर दुःखी आणि नंतर सुखी असा आहे. पण हल्लीं तर उलटा च क्रम चालू आहे. गांधीजी नेहमीं असा विचार करीत कीं ज्यांना मदतीची सर्वांत अगोदर गरज आहे, त्यांना मदत देण्याचा मार्ग शोधला पाहिजे. यांतून च चरखा निघाला. ती त्यांची अद्‌भुत प्रतिभा च होती. ती काव्यशक्ति च होती. काव्याच्या ओळी लिहून च कांहीं कोणी कवि होत नसतो. यास्माचार्यांनी म्हटलें आहे कीं, 'कविः क्रांत-दर्शी'—ज्याला क्रान्तदर्शन होतें, दूरचें दर्शन होतें, सूक्ष्मदर्शन होतें, तो कवि असतो. या च अर्थानें गांधीजी कवि होते. त्यांनीं किती तरी वर्षांपूर्वीं च हें सांगितलें होतें कीं, हिन्दुस्थानला ग्रामोद्योगांची गरज आहे. त्यांनीं नई तालीम, राष्ट्रभाषा, जमिनीचें वाटप इत्यादींच्या बाबतींत आपलें मत किती तरी वर्षांपूर्वीं सांगून ठेवलेलें होतें. त्यांचे केवढे उपकार आहेत, केवढी महान् बुद्धिमत्ता, केवढी प्रतिभा व केवढी वत्सलता आहे! एवढें सारें असून हि, त्यांच्याकडून एवढा प्रकाश मिळाला असून हि, आज आम्ही लटपटत आहोंत हें आमचें केवढें दुर्दैव आहे!

सरकारला सर्वांचें सहकार्य मिळालें, तर च कामाची प्रगति होईल.

पण आपल्यासाठीं खरोखर च कांहीं स्पष्टपणें केलें जात आहे, याची जनतेला जेव्हां खात्री पटते तेव्हां च जनतेचें सहकार्य मिळतें. 'कम्युनिटी प्रॉजेक्ट' मध्यें जनतेचें सहकार्य मिळत नाहीं. कारण मूळ विचार च ठीक नाहीं. आयात-निर्यातीवर निर्बंध घालण्याचा हक्क गांवाला असला पाहिजे. गांवांत जो कच्चा माल उत्पन्न होतो व ज्याच्या पक्या मालाची गांवाला गरज आहे, तो माल गांवांत च ठेवला गेला पाहिजे. आपल्या हिताची च गोष्ट केली जात आहे हा विश्वास जनतेंत निर्माण झाला पाहिजे. सारांश, देशांत आम्हांला शांतता नांदावयास हवी असेल, तर जनतेच्या हिताचा मूलभूत विचार होणें अवश्य आहे.

## हिंसा कधीं हि होऊं नये

दुसरी गोष्ट अशी कीं, आम्हांला जर देशांत शांतता हवी असेल, तर आमच्या मनांतून आम्हीं हिंसेचा विचार अजीबात काढला पाहिजे. हिंसेनें हा देश संपूर्ण नाश पावेल. आपला देश मागासलेला आहे. अनेक वर्षें त्याच्या-वर लक्ष्मीची अवकृपा च राहिलेली आहे. लक्ष्मी, सरस्वती व शक्ति या तीन देवतांची जर आम्हांला उपासना करावयाची असेल, तर अज्ञान, उपासमार व रोग या तीन राक्षसांना आम्हीं प्रथम घालवून दिलें पाहिजे. यासाठीं हृदयांत हिंसेचा भाव न ठेवतां परस्पर सहकार्याचा भाव ठेवला पाहिजे. मी तुम्हां लोकांना जितक्या स्पष्टपणें पाहत आहें, तितक्या च स्पष्टपणें हें हि मला दिसत आहे, कीं, हिंदुस्थानांतील भिन्न-भिन्न राजकीय पक्ष सहकार्य करण्यास शिकले नाहींत, तर या देशाचा नाश होणार आहे.

## निवडणूक खेळवा, लढवूं नका

येथील भूमीचा प्रश्न सोडविण्याची प्रेरणा मला कां झाली कोण जाणे. पण ऋषींची आज्ञा आहे कीं, "चरैवेति चरैवेति"।

कलि: शयानो भवति संजिहानस्तु द्वापर:।
उत्तिष्ठन् त्रेता भवति कृतं संपद्यते चरन्॥

या श्रुतीवर विश्वास ठेवून मीं चालण्यास प्रारंभ केला. मनें सांधलीं जावीं अशी माझी इच्छा आहे. लोक म्हणतात कीं तुम्ही तर जमिनीचे लहान लहान तुकडे करीत आहांत. पण मी म्हणतों की, 'अरे, जेथे मनें तुटलीं

आहेत, तेथें जमिनीचा कसला विचार करतां ? प्रथम मनें जुळूं द्या. तीं एकदां जुळलीं की, सारें जग जुळून येईल. आणि जमिनीचे तरी तुकडे कोठे आहेत ? मी कोठें हि दृष्टि फेंकली तरी मला अनंत आकाश, अखंड पृथ्वी आणि परमेश्वराची असीम कृपा ही च दृष्टीस पडतात. तुम्ही 'वन्दे-मातरम्' असें एकीकडे म्हणतां आणि भाऊ-भाऊ आपसांत झगडतां. 'वन्दे-मातरम्' बरोबर 'वन्दे-भ्रातरम्' असें जो म्हणत नाहीं, त्याच्यावर माता प्रसन्न होत नाहीं, असें रवींद्रनाथांनीं म्हटलें आहे. यासाठीं मी आपणांस सांगतों की, 'निवडणूक खेळवा' पण लढूं नका—'निवडणुकी लढविणें' हा इंग्रजी भाषेचा प्रयोग आहे. तो आमचा नाश करील. आपल्या ऋषींनीं जग हा एक खेळ आहे, असें म्हटलें आहे. कुस्तींत ज्याप्रमाणें जिंकणाऱ्याला इनाम मिळतें व त्याचा जयजयकार लोक करतात आणि हरणाऱ्याचा हि जयजयकार करतात आणि त्याला नारळ मिळतो, त्याप्रमाणें दृष्टि ठेवून निवडणूक खेळली पाहिजे.

एकदां आमच्या आश्रमांत एक राजकारणी पुढारी आले. मीं त्यांना म्हटलें कीं, आपले व माझे विचार भिन्न आहेत. पण आपण माझे परम मित्र आहांत. आपल्यावर माझें फार प्रेम असल्यामुळें मी आपणांसाठी आपला जीव हि देईन. पण आपल्याला मी मत देऊं शकत नाहीं, कारण आपले विचार मला पटत नाहींत. तुम्ही व मी एकत्र काम करूं, एका च आश्रमांत राहूं. पण जोंवर तुमच्या व माझ्या विचारांत फरक आहे तोंवर मी लोकांना हें च सांगेन कीं, हा माझा मित्र असला, तरी याला मत देऊं नका. कारण याचे विचार चुकीचे आहेत. तुम्ही हि लोकांना हें सांगा कीं, विनोबा माझे मित्र आहेत, पण त्यांना मत देऊं नका. कारण त्यांचे विचार चुकीचे आहेत. मग लोक आपणांमधून कोणा हि एकाला निवडोत. त्यानंतर ज्याला जनता निवडून देईल तो सरकारांत जाऊन जनतेची सेवा करील आणि ज्याला जनता निवडून देणार नाहीं, तो सरळ लोकांत जाऊन सेवा करील. याप्रमाणें दोघे हि आपापल्या परीनें जनतेची सेवा करतील व एकमेकांवरचें प्रेम हि कायम ठेवतील. असें जर झालें नाहीं, तर पश्चिमेकडून आलेली ही निवडणुकीची प्रथा या देशाचा नाश केल्यावाचून राहणार नाहीं. कारण या देशांत अगोदर च जातीचे, भाषेचे वगैरे किती तरी भेद आहेत.

## शंकरासारखे व विष्णूसारखे सेवक

तेव्हां निवडणूक खेळतांना हि प्रेम कायम ठेवा. जनता कोणाला हि निवडो. जनतेंत जाऊन जे सेवा करतील ते भगवान् शंकरासारखे असले पाहिजेत. आणि जे सत्ता ग्रहण करतील त्यांनीं भगवान् विष्णूप्रमाणें सत्तेंत व संपत्तीत अनासक्त व अलिप्त राहिलें पाहिजे. जे सत्ता ग्रहण करतील त्यांनीं जनक राजासारखें व्हावें व जे सत्तेपासून दूर राहतील त्यांनीं शुक देवाप्रमाणें असावें. जनक राजा हा वैभवांत व उपभोगांत हि अत्यंत अनासक्त होता. लोक त्यांच्याबद्दल म्हणत कीं, 'जनको जनक इति वै जनाः धावन्ति.' हा जनक राजा म्हणजे माझा जनक, पिता, च येत आहे असें म्हणून लोक त्यांच्यापाशीं धावत जात असत. त्यांच्या बाबतींत असें म्हणतात कीं जनक यज्ञाच्या अग्नीजवळ च निजत असत. झोपेंत चुकून त्यांचा पाय अग्नीवर पडला तरी त्यांना जाग येत नसे. इतके ते अनासक्त व विदेही होते. आणि शुकदेव तर वैराग्याची मूर्ति च होते. भगवान् विष्णु लक्ष्मीपासून अलिप्त राहत होते. लक्ष्मी त्यांच्या चरणापाशीं असे तरी हि ते तिच्याकडे लक्ष देत नसत. तेव्हां ज्यांना सत्ता ग्रहण करावयाची आहे, त्यांनीं जनकाप्रमाणें किंवा विष्णूप्रमाणें झालें पाहिजे. आणि ज्यांना सत्ता ग्रहण करावयाची नाहीं, त्यांनीं शंकरासारखें किंवा शुकदेवासारखें झालें पाहिजें. सर्वांचा सहयोग ज्यांत मिळूं शकेल असा कार्यक्रम बनविण्याची आज देशाला फार गरज आहे. भूदान-यज्ञ हा च असा एक कुशल कार्यक्रम आहे कीं जो सर्वांना एकत्र आणतो व सर्वांना एकमेकांशीं प्रेमानें वागण्याचा अवसर प्राप्त करून देतो.

मीं आज दोन मुख्य गोष्टी सांगितल्या. एक अशी कीं जनतेच्या दुःखांचें निवारण करण्याच्या दृष्टीनें मूलभूत विचार झाला पाहिजे. आणि दुसरी ही कीं, सर्व पक्षांना परस्परांशीं प्रेमानें वागण्याची संधि मिळाली पाहिजे. अशी वृत्ति व एवढी मानसिक अहिंसा फार आवश्यक आहे. भूदान यज्ञाच्या द्वारें ही संधि मिळूं शकते. हिंदुस्थानांत या दोन गोष्टी होऊं शकल्या नाहींत, तर आमचें स्वातंत्र्य संकटांत आलें आहे असें म्हणावें लागेल.

हजारी बाग, १८-७-१९५३

## शांतिमय क्रांति कीं सत्याग्रह ? :९:

तीन वर्षांपासून चालणारें कोरियाचें युद्ध आतां समाप्त झालें आहे व तेथें आतां संधि झाला आहे. हा संधि शक्तिशाली करण्याचें काम आतां पुढे आहे. परंतु या दुष्ट युद्धाचा एकदाचा अंत झाला, ही आनंदाची गोष्ट आहे. या युद्धांतून जागतिक युद्ध निर्माण होतें की काय अशी शंका सर्वांना वाटली होती. म्हणून जगाचे डोळे या युद्धाकडे लागले होते. संधि करण्या बद्दल वाटाघाटी केव्हांपासून तरी चालल्या होत्या. पण त्यांत वारंवार विघ्नें येत होतीं. परमेश्वरी कृपेनें आतां निर्विघ्न संधि झाला आहे. तेव्हां आम्ही परमेश्वराची मानसिक पूजा करतों व त्याची अशी प्रार्थना करतों कीं आम्हां मानवांना अशी सद्‌बुद्धि दे कीं, यापुढें असे भयानक युद्ध उत्पन्न च होऊं नये.

### आजचीं युद्धें निसर्ग-नियमांविरुद्ध

अशीं युद्धें होतात तरी कां ? युद्ध सुरु झाल्यानें कोणाला च बरें वाटत नाहीं. जे या युद्धांत पडतात ते अगतिकतेमुळें च पडतात. आजकालचीं युद्धें होतात तीं अतिशय भयंकर विध्वंसक असतात. तीन वर्षें चाललेल्या या युद्धानंतर त्या देशाला आपल्या पायावर उभें राहण्यासाठीं किती तरी वर्षें लागतील. युद्धांत जी हानि झाली आहे ती केव्हां भरून निघेल तें हि सांगतां येत नाहीं. या युद्धांत जे मेले ते तर बिचारे सुटले. पण जितके मेले त्यांच्या पेक्षा किती तरी पटींनी जास्त माणसें जखमी होऊन आयुष्यभर भार-भूत होऊन राहिलीं असतील. आजकालच्या युद्धांतील अतिशय वाईट गोष्ट कोणती असेल तर ती ही कीं हीं युद्धें निसर्गाच्या शास्त्रीय नियमांविरुद्ध लढलीं जात आहेत. जीव-शास्त्राचा असा नियम आहे कीं, सर्वांत शक्तिशाली असतील ते च या जीवन-संग्रामांत टिकतील. ('सरव्हायव्हल ऑफ दि फिटेस्ट') पण वैज्ञानिक पद्धतीनें चालणाऱ्या या आजकालच्या युद्धांत फार मोठ्या प्रमाणांत सशक्त तरुणांची च आहुति दिली जात आहे. जे 'फिटेस्ट' आहेत त्यांची आहुति दिली जात आहे व जे 'अन्‌फिटेस्ट' आहेत ते घरीं बसल्यामुळें

जीव बचावून आहेत. हा प्रकार सृष्टि-नियमाच्या विरुद्ध आहे. तेव्हां याच्या कारणांचें संशोधन करणें अवश्य आहे.

## स्थिति-स्थापकता आणि हिंसा

या युद्धांचीं कारणें उघड आहेत. तेव्हां त्याबाबतींत बारीक संशोधनाची गरज नाहीं. समाजाची जी कोणती व्यवस्था केली जाते ती समाजाला सुखी व निरोगी ठेवण्यासाठीं केली जाते, आणि त्यांतून समाजाला कांहीं फायदा हि मिळत असतो. पण कांहीं काळानंतर त्या व्यवस्थेपासून फायदा होण्याची क्रिया थांबते. जुनें घर पडलें म्हणजे जसें नवें घर बांधणें अवश्य असतें, त्याप्रमाणें समाजाची हि रचना नंतर बदलणें अवश्य असतें. समाज-रचना बदलावयाची म्हटली की माणसांना कांहीं क्लेश हे होणार च. ज्यांना हे क्लेश सहन करावयाची इच्छा नसते, त्यांना स्थितिस्थापक असें म्हणतात. ते सुधारणा फार सावकाश घडूं देतात व होतां होईल तों समाजाची जुनी च रचना कायम ठेवण्याचा प्रयत्न करतात. पडणारें घर आज ना उद्यां पडणार च आहे तर मग तें टिकविण्यांत शक्ति कां खर्च करावी ? पण जेव्हां तें जुने घर पडतें तेव्हां किती तरी माणसांचा त्याच्या खालीं नाश होतो. म्हणून शांतिवादी लोक पुराणवादी बनतात. जुनें कायम ठेवावें तर 'हिंसे वाचून समाज बदलूं शकत नाहीं' अशा विचाराचे लोक समाजांत बदल घड-विण्यासाठीं हिंसावादी बनतात. ते म्हणतात कीं जुने स्वरूप कायम ठेवलें, तर क्रांति होणार नाहीं. समाज-रचनेंत सुधारणा पाहिजे असेल, तर हिंसेचा आश्रय केला च पाहिजे.' अशा तऱ्हेने दोन पक्ष बनतात.

## शांतिमय क्रांतिवाद : सत्याग्रह

शांतिवादी लोक पुढें आले तर स्थितिस्थापकतेवर विश्वास ठेवावा लागतो व क्रांतिवादी लोक पुढे आले तर हिंसेवर विश्वास ठेवणें भाग पडतें. याप्रमाणें क्रांतिवादाचा संबंध हिंसेशीं जोडला गेला आहे. जेथें जुना समाज उरत नाहीं, तेथें क्रांति होते आणि जेथें जुनी समाजरचना कायम ठेवावयाची असते, तेथें शांतीच्या मार्गानें काम करावें लागतें. आतां आम्हांला असा नवा विचार मिळाला आहे कीं ज्यामुळें आम्ही क्रांति आणि शांति या दोहोंच्या माध्यमांतून समाजाची रचना बदलूं इच्छितों,

व तिचें पूर्ण परिवर्तन करूं इच्छितों. आम्हांला शांति हि पाहिजे व क्रांति हि पाहिजे. क्रांतीशिवाय काम होणार नाहीं. जुन्या घराची आठवण विसरणें च ठीक होईल. जेव्हां आम्ही शांतीचा मार्ग पाहिजे असें म्हणतो, तेव्हां आम्हांला हें सिद्ध करून दाखविलें पाहिजे कीं, शांतींत असें एक सामर्थ्य आहे कीं ज्यामुळें समाजाची रचना हळू हळू नव्हे तर क्रांतीच्या वेगानें बदलणें शक्य आहे. हें जर आपणांस सिद्ध करून दाखवतां आलें, तर क्रांतिवादाबरोबर हिंसा अनिवार्य राहणार नाहीं आणि समाजाचें रक्षण होईल. याला च मी 'शांतिमय क्रांतिवाद' किंवा 'सत्याग्रह' म्हणतों.

## श्रद्धा, निष्ठा व तपस्या यांचा समन्वय

आपण सर्वोदयवादी व जनहिताची इच्छा करणारे सत्याग्रहाचा आधार घेतों व त्याच्या साह्यानें समाज सामर्थ्यशाली बनवूं इच्छितों. पण यासाठीं सत्याग्रहाच्या विचारावर दृढ श्रद्धा असणें अवश्य आहे. दुसरी गोष्ट ही कीं, या कार्यक्रमांत दुःख सहन करण्याची तयारी पाहिजे. जितकें दुःख सहन करावें लागेल व जितका त्याग करावा लागेल, तितकें सर्व करण्याची आमची तयारी असली पाहिजे. दुःख सहन करण्याची तयारी व विचारावर दृढ निष्ठा. याशिवाय हृदय-परिवर्तन करण्याची हिंमत, ही तिसरी गोष्ट आवश्यक आहे. आपण मनुष्याचें हृदय-परिवर्तन करूं शकतों. कारण त्याच्या हृदयांत आत्मज्योत तेवत असते. वरून अंधाराच्या आवरणामुळें ज्योत झाकलेली दिसली, तरी ती कधीं विझत नाहीं. तिच्यांतील चैतन्यावर आमचा गाढ विश्वास असला पाहिजे. सारांश आमच्यामध्यें दुःख सहन करण्याची तयारी, विचारावरील निष्ठा, आणि हृदयस्थ ईश्वरावरील श्रद्धा, हीं तिन्ही असली पाहिजेत. या तीन गोष्टी जेथें असतात, तेथें शांतीच्या मार्गानें आपण क्रांति आणूं शकतों. यासाठीं समाजाचे आवश्यक प्रश्न हातीं घेतले पाहिजेत, व्यापक प्रमाणावर त्यासंबंधींचे प्रयोग केले पाहिजेत आणि त्याबरोबर च सतत अंतःशुद्धि वाढवीत राहिलें पाहिजे. समाजाचे प्रश्न घेऊन आम्हीं हें सिद्ध करून दाखविलें पाहिजे कीं, शांतीच्या मार्गानें समाजाची रचना बदलणें शक्य आहे.

## हृदयस्थ परमेश्वरावर श्रद्धा

भूमिदानाच्या या कार्याबरोबर च जीवननिष्ठा व सत्याग्रहाचें सामर्थ्य

वाढविण्याची आणि शांतीची शक्ति प्रगट करण्याची माझी इच्छा आहे. या दृष्टीनें जर आपण या कार्याकडे पाहिलें तर त्यांतील सौंदर्य आपणांस दिसून येईल. लोक म्हणतात कीं, हें काम कायद्यानें होऊं शकेल. मी त्यांना उत्तर देतों 'करा, जरूर करा. आम्ही कोणाचा मार्ग अडवून तर धरीत च नाहीं, पण आम्हांला मात्र जनशक्ति वाढविण्यांत च आनंद वाटतो.' या कार्याला कमींत कमी वेळ लागावा अशी इच्छा आहे. हें कार्य पूर्ण होणार आहे व अतिशय लवकर होणार आहे, असा माझा दृढ विश्वास आहे. या कार्यांतून असे कांहीं गुण लाभतील व अशी कांहीं अद्‌भुत किल्ली हातीं येईल कीं जिच्यामुळें पन्नास कुलपें उघडूं शकतील. तिच्यामुळें सगळया समस्या सुटूं शकतील, जमीन किती मिळाली व कशी मिळाली याचा हिशेब आम्ही ठेवीत आहोंत च. पण हा बाहेरचा स्थूल हिशेब झाला. याच्या च बरोबर आम्ही हें हि पारखतों कीं मानवतेवर बिश्वास ठेवणारे व विचारावर अचल निष्ठा ठेवणारे असे किती कार्यकर्ते आम्हांला प्राप्त झाले. अशा सेवकांना मी एक गोष्ट सांगतों कीं, आपल्या सहकाऱ्यावर तुमची आंतरिक श्रद्धा असली पाहिजे. आईचा मुलावर विश्वास असतो, तसा विश्वास असला पाहिजे. मुलाच्या हातून किती हि वाईट गोष्टी घडल्या तरी आई म्हणत राहते कीं तो आंत चांगला आहे. मुलानें थोडेसें चांगलें काम केलें कीं, तेवढयावरून हि मुलगा सुधारला अशी खात्री तिला वाटूं लागते. अनेक वाईट कामें मुलानें केलीं, तरी ती त्याच्यावर विश्वास च ठेवते. असा च विश्वास आम्ही सहकाऱ्यांवर व विरोधकांवर हि ठेवला पाहिजे. सहकाऱ्यांच्या बाईट गोष्टी ऐकल्या तर त्यांच्यावर विश्वास ठेवतां कामा नये. पण त्यांच्या चांगल्या गोष्टी ऐकल्या तर मात्र त्यांच्यावर अवश्य विश्वास ठेवावा. मनुष्य-हृदयांत जो परमेश्वर वसत आहे, त्याच्या च द्वारां चागलीं कामें होत असतात.

## वाईटपणाचा च पुरावा पाहिजे

मी शाळेंत इंग्रजी व्याकरण शिकत असतां, एक वाक्य आलें "दि न्यूज ईज टू गुड टु बी ट्रू" ही बातमी इतकी चांगली आहे कीं ती खरी असूं शकत नाहीं,

असा याचा अर्थ आहे. माझ्या मनांत तेव्हां येई कीं हें असें कां? असें कां नसावें कीं," दि न्यूज ईज टू गुड टू बी फॉल्स " म्हणजे ही बातमी इतकी चांगली आहे कीं ती खोटी असूं च शकत नाहीं, ती खरी च असली पाहिजे. एखाद्यामध्यें इतका चांगुलपणा असणें शक्य नाहीं असें मानणें मला तर मानवतेविरुद्ध वाटतें. कायदेपंडितांना कायद्यांतलें हें तत्त्व माहीत आहे कीं, दहा गुन्हेगार सुटले तरी चालतील पण एका हि निर्दोष माणसाला शिक्षा होतां कामा नये. जेथें गुन्ह्याबद्दल थोडी हि शंका असेल, तेथें संशयाचा फायदा त्याला मिळाला पाहिजे. संशयाचा लाभ हा चांगल्याच्या बाजूनें मिळावा वाइटाच्या बाजूनें नव्हे. कायद्यांतलें हें तत्त्व फार चांगलें आहे व तें मानवतेवर च आधारलें आहे. मनुष्याच्या हृदयांत जो चांगुलपणा असतो, त्यासाठीं पुराव्याची गरज नसते. वाईटपणा सिद्ध करण्यासाठीं च पुराव्याची गरज असते. तसा पुरावा मिळाला तर त्यावर विश्वास ठेवूं. पण पुरावा मिळेपर्यंत वाईटपणावर विश्वास ठेवणार नाहीं.

अशी ही मानवावरची परम श्रद्धा आहे. कायदे कांहीं वरून लादले जात नाहींत. मानवांत जो चांगुलपणा असतो त्यांतून च कायदा तयार होत असतो. मनुष्यांत खरोखर वाईटपणा असता, तर त्याला वाईटपणाबद्दल बक्षीस मिळालें असतें, चांगुलपणासाठीं नाहीं. मानवी हृदयांत जर वाईटपणा च असता तर वाईटपणासाठीं त्याला शिक्षा झाली नसती. उलट गुन्हेगारानें चांगलें काम केलें असें सिद्ध झालें तर त्याला शिक्षा झाली असती आणि वाईट काम केलें असें सिद्ध झालें तर त्याला सोडून देण्यांत आलें असतें. पण कायदा चांगुलपणाला बक्षीस देतो व वाईटपणाला शिक्षा देतो. याचा अर्थ हा च कीं मनुष्याच्या हृदयांत वास्तविक पाहतां चांगुलपणा च भरलेला आहे, ही श्रद्धा आम्हीं बाळगली तर शांतीच्या मार्गानें क्रांति आणूं शकतों. हा एक मूलभूत स्वरूपाचा विचार आहे. आपल्यांत जर ही श्रद्धा असेल, तर आपण हा भूदान-यज्ञ यशस्वी करून दाखवूं शकूं.

जुलै १९५३.

---

## भूदान-यज्ञ : धर्माचा एक नवा पैलू : १० :

मागल्या वेळीं जेव्हां मी येथें आलों होतों, तेव्हां येथील महंतजींनीं मला कांहीं जमीन दिली होती. पण ती पहिली वानगी होती. त्यानंतर भूदानवाले त्यांना भेटले व त्यांनीं आणखी जमीन दिली. आज हि ते आणखी देतील. पण याहून हि अधिक आनंदाची गोष्ट घडली आहे. कांहीं शेतकरी आपल्या तक्रारी घेऊन आले होते. महंतजींच्या मॅनेजरविरुद्ध त्या तक्रारी होत्या. त्या तक्रारींची चौकशी करून त्यांच्या बाबतींत योग्य ती कारवाई करण्याचें वचन मला मिळालें आहे. या गोष्टीचें महत्त्व मी अधिक मानतों. याच्या तुलनेंत त्यांनीं जें भूदान दिलें आहे, त्याची हि किंमत मी कमी च लेखतों. आसपासच्या किसानांचीं दुःखें समजावून घेऊन आपण तीं दूर केलीं, तर सारें वातावरण सुगंधित होतें. जे फक्त भूदान मागण्यास जातात त्यांच्यामुळें फक्त भूदानाचें च वातावरण तयार होतें.

### शंकराचार्यांचें अद्‌भुत कार्य

या दिवसांत कांही बड्या लोकांनीं हि मला दान दिलें आहे. यांपैकीं कांहीं जणांनीं खरोखर च दरिद्रनारायणाची सेवा करण्याच्या वृत्तीनें दान दिलें आहे. कांहीं असे आहेत कीं, दान देऊन शिवाय आमच्याबरोबर काम करण्यास हि निघाले आहेत. धर्माचा हा एक नवा पैलू प्रकट होत आहे. धर्माचा उदय होत आहे. आपण गीतेंत वाचलें आहे कीं, जेव्हां जेव्हां धर्माची ग्लानि होते, तेव्हां तेव्हां भगवान् धर्मबुद्धि जागवीत राहतात व अशा रीतीनें धर्म सामर्थ्यशाली व नवचैतन्य-युक्त बनतो. आज हिंदुस्थानांत धर्मबुद्धि जागृत होत आहे ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. या बोधगयेच्या मठाकडून जमीन मिळाली त्यांत आश्चर्य कांहीं नाहीं. हा शंकराचार्यांचा मठ आहे. त्यांनीं काय शिकविलें ?

न कर्मणा, न प्रजया, न धनेन।
त्यागेनैके अमृतत्वमानशुः॥

हें उपनिषदांतील वचन आहे. आणि याच्या च आधारानें शंकराचार्य धर्माचें

रहस्य समजावून देत देत हिंदुस्थानभर पदयात्रा करीत होते. आम्ही हि पायीं हिंडत आहोंत. पण आमच्या मागें-पुढें आमचें सामान नेण्यासाठीं मोटारी धांवत आहेत. त्या काळांत अशी कसली हि सोय नव्हती. आणि तरी हि दहा बारा वर्षांचा एक मुलगा घर सोडून बाहेर पडला, आणि पायीं हिंडू लागला. त्यानें ब्रह्मचर्यामधून एकदम संन्यास-दीक्षा घेतली व त्यासाठीं त्याला जोराचा विरोध सहन करावा लागला. त्यानें ज्ञान प्राप्त करून अद्वितीय असे ग्रंथ लिहून ठेवले. त्याची असाधारण प्रभा आज हि हिंदुस्थानला प्रभावित करीत आहे. शंकराचार्यांनीं विपुल लिखाण केलें. सामान्य लोकांसाठीं त्यांनीं रचलेलीं भक्तिस्तोत्रें तर अमृतापेक्षां हि मधुर आहेत.

## शंकराचार्यांचा संदेश

एकता सत्य व त्याग, यांचा संदेश घेऊन ते गांवोगांव हिंडले. ब्राह्मणासाठीं याहून श्रेष्ठ असा कोणता हि धर्म नाहीं. हें जग म्हणजे माया आहे असें मानल्यामुळें त्यागाहून श्रेष्ठतर असें त्यांना कांहीं वाटलें नाहीं. वस्तुतः हा माया-वाद फार प्राचीन आहे. पण त्याला अतिशय लोकप्रियता कोणीं मिळवून दिली असेल, तर ती शंकराचार्यांनीं च. ते तर ब्रह्मचारी होते. त्यामुळें त्यांचें स्वतःचें अपत्य नव्हतें च. पण धर्माचे जे सारे सत्पुरुष त्यानंतर झाले, तीं सारीं त्यांचीं च मुलें होतीं. स्वामी विवेकानंद, रामकृष्ण परमहंस, आदि सर्व च सत्पुरुष शंकराचार्यांच्या पावलावर पाऊल ठेवून जात होते. हा मठ हि त्यांच्या च नांवानें चालविला जात आहे. म्हणून माझी अशी अपेक्षा आहे कीं, हे लोक आपली सर्व संपत्ति सगळ्या गरिबांना वाटून देऊन, गरिबांची सेवा करण्यासाठीं बाहेर पडतील.

"शिवोऽहम्"—मी शिव आहें, सेवक आहें. शंकराचार्यांना गरिबांचा केवढा अभिमान होता ! योगभ्रष्ट पुरुषाचें वर्णन करतांना गीतेंत लिहिलें आहे, 'योग्याला या जन्मांत आपलें कार्य पुरें करतां आलें नाहीं तरी कांहीं बिघडत नाहीं. पुढच्या जन्मांत तो श्रीमंताच्या किंवा बुद्धिमान् ब्राह्मणाच्या घरांत जन्म घेऊन आपलें कार्य पुरे करतो. याप्रमाणें अपूर्ण योग्याला पुढचा जन्म प्राप्त होत असतो. श्रीमंताच्या घरीं जन्म घेतल्यानें कोणतें भाग्य प्राप्त होतें ? जनक राजाप्रमाणें जे पवित्र व श्रीमान् असतात, त्यांच्या

घरीं जन्म मिळणें ही भाग्याची गोष्ट आहे. पण याहून हि अधिक श्रेष्ठ असा जन्म शंकराचार्यांनीं मिळविला. "धीमतां दरिद्राणां कुले",—पवित्र श्रीमंताच्या घरीं ज्यांना जन्म मिळतो, त्यांच्यापेक्षां दरिद्री योग्याच्या घरीं जन्म मिळणें हें परम भाग्याचें आहे. शंकराचार्यांना अशा च दरिद्री कुलांत जन्म मिळाला. आणि तरी हि त्यांच्या च मठवाल्यांना एवढी माया, एवढा मोह कां असावा, याचें मला मोठें आश्चर्य वाटतें. माया-मोह हीं एकदम सुटत नसतात हें मी जाणतों. म्हणून मी परमेश्वरापाशीं अशी प्रार्थना करीन कीं, शंकराचार्यांना जे प्रमाण मानतात त्यांना सद्बुद्धि दे.

## हिंदु धर्माची उदारता

हिंदु धर्माला जर कोणीं सामर्थ्यशाली बनविलें असेल, तर तें शंकराचार्यांनीं च. भगवान् बुद्धांनीं जें कार्य केलें तें च यांनीं पुढे चालविलें. बुद्धांच्या काळांत यज्ञयाग व कर्मकांड फार जोरांत चालत असे. लोक पशुहत्या करून त्याचा नैवेद्य देवाला दाखवीत असत. निष्ठुरतेचें हि लोकांनी धर्मांत च रूपांतर केलें होतें. मानवतेचें यापेक्षां अधिक पतन तें काय व्हावयाचें? भगवान् बुद्धांनीं यावर च प्रहार केला. शंकराचार्यांनीं हि सरळ कर्मकांडावर च प्रहार केला. त्यांनीं या गोष्टीवर जोर दिला कीं, या जीवनांत या च शरीरांत हृदयाची शुद्धि व आत्म्याची अनुभूति प्राप्त होऊं शकतात. यांत च खरी शुद्धि आहे आणि हें च धर्माचें सार आहे. शंकराचार्यांनीं आम्हांला कर्मकांडापासून मुक्त केलें. तरी अजून हि तें कोठें-कोठें चालू च आहे. हिंदु धर्मांत वस्तुतः कोणत्या हि गोष्टीचा आग्रह नाहीं. हिंदुस्थानांत नाना विचारांचे, पंथांचे व धर्मांचे लोक आहेत. जो मूर्तिपूजा मानतो, तो हिंदु होऊं शकतो तसा जो मानीत नाहीं, तो हि होऊं शकतो. येथपर्यंत कीं, ईश्वराला मानणारा हि हिंदु होतो व न मानणारा हि होतो. हिंदु धर्मांत एवढी विलक्षण उदारता आली याचें श्रेय मी शंकराचार्यांना देतों. वस्तुतः ही कांहीं नवी गोष्ट नव्हे. जी गोष्ट वेदांत व उपनिषदांत होती, ती च त्यांनीं सर्व लोकांसमोर मांडली आणि वेगवेगळ्या वचनांमधील विरोध मिटवून टाकला.

## बुद्ध व शंकर

याचा परिणाम असा झाला कीं लोक म्हणू लागले कीं शंकराचार्य हे

प्रच्छन्न बुद्ध म्हणजे झांकलेले बुद्ध च आहेत. लोक म्हणूं लागले कीं हे शंकराचार्य आहेत खरे, पण हा भगवान् बुद्धांचा दुसरा अवतार च आहे. त्या दोघांत फार थोडा भेद होता. आणि तो ब्रह्मविद्येसंबंधीं होता. भगवान् बुद्ध त्या बाबतींत मूक होते. ते त्या चर्चेंत च कधीं शिरले नाहींत. त्यांचे शिष्य जेव्हां त्यांना या बाबतींत विचारीत तेव्हां ते उत्तर देत 'दीनांची सेवा करा. त्यांत च शांति आहे. हें च खरें कार्य आहे. आत्म्याच्या वादांत व्यर्थ पडूं नका.' परन्तु त्यांच्या प्रयाणानंतर त्यांचे शिष्य या वादांत शिरले च. शंकराचार्यांनीं त्यांतील न्यून दाखवलें. एवढा च शंकराचार्य व बुद्ध यांच्यांत विरोध आहे. बाकी जो संन्यास-मार्ग बुद्धांनीं मान्य केला, तो च शंकराचार्यांनीं पुढें वाढवला. त्यांच्याप्रमाणें कर्मकांडाचा विरोध केला, यति-संघांची स्थापना केली व धर्माचें अनुकरण केलें.

## हिंदुधर्माचें सार : वेदान्त व भूतदया

या मंदिराचे विश्वस्त हे हिंदु व बुद्ध असे दोन्ही हि आहेत हें ऐकून मला आनंद वाटतो. बुद्ध धर्माचें उज्ज्वल आचरण हिंदुस्थानांत पुष्कळ प्रमाणांत झालें हें मला मान्य आहे. आमचें आचरण फार चांगलें होतें असा मात्र माझा दावा नाहीं. पण जेवढें आचरण झालें, तेवढयावरून आम्ही हें म्हणूं शकतों की, बुद्धाचा संदेश आमच्या जीवनांत उतरला आहे. त्यांचा मुख्य संदेश अहिंसेचा होता. येथें अहिंसा जितकी बहरली व फुलली, तितकी ती इतर देशांत बहरली किंवा नाहीं हें मला माहीत नाहीं. बुद्ध धर्मांतील दया व करुणा आणि हिंदुधर्मांतील आत्मविद्या हीं दोन्ही मिळून आजचा हिंदु धर्म बनला आहे. हिंदु धर्माच्या दोन मुख्य गोष्टी आहेत. जिला वेदान्त म्हणतात ती ब्रह्मविद्या. आणि दुसरी भूतदया. त्यांतील एक हि गोष्ट नसेल तर तो हिंदु धर्म होणार नाहीं. शंकराचार्यांनीं रचलेलें एक स्तोत्र त्यांच्या मठांत दररोज म्हटलें जातें. ती षट्पदी प्रार्थना आहे. तिच्यांतील एक श्लोक असा आहे :

> "अविनयमपनय विष्णो, दमय मनः शमय विषयमृगतृष्णाम् ।
> भूतदयां विस्तारय तारय संसार–सागरतः ॥"

'भगवन्ता, तूं च माझ्या भूतदयेचा विस्तार कर' असा याचा अर्थ आहे. भगवान् बुद्धांनीं हि हें च सांगितलें आहे. तेव्हां 'ब्रह्मविद्या व भूतदया' या

दोन शब्दांत हिंदुधर्म व बुद्धधर्म यांचें सार आहे. हें च घेऊन विवेकानन्द व रामकृष्ण यांनीं पुढें पाऊल टाकलें.

## भूदान-यज्ञांत धर्माचा नवा प्रयोग

या भूदान-यज्ञांत धर्माचा नवा प्रयोग, नवा पैलू, प्रकट होत आहे. मी केवळ निमित्तमात्र बनलों आहे. हिंदुस्थानांत जी धर्मभावना आहे तिचें च हें फळ आहे. वेदान्तांत हें सांगितलें आहे की आम्ही सर्व आत्मरूप आहोंत, सर्व समान आहोंत, कोणी उच्च नाहीं व कोणी नीच नाहीं. याहून अधिक मोठा आधार समतेला मिळणें शक्य नाहीं व समतेचा अधिक श्रेष्ठ धडा मिळणें शक्य नाहीं. समतेचें नांव तर रशियानें, ब्रिटननें व अमेरिकेनें घेतलें आहे, पण वेदान्तांत समतेला जो आधार मिळतो, तो दुसरीकडे कोठें हि मिळत नाहीं. भारतीय संस्कृतींत दोन मूल विचार आहेत, पहिला आत्यंतिक समता व दुसरा भूतदया. अर्थात् च सर्व गरिबांचा भूमीवर समान हक्क आहे. म्हणून दुसऱ्यांचा अगोदर पाणी देऊन मग स्वतः प्यावें. भूदानामध्यें हे च दोन विचार आहेत. यांत सर्वांविषयीं समान बुद्धि व दया दोन्ही आहेत. इस्लाम धर्मांत हि भूतदयेचा आविष्कार आहे. कुराणांत लिहिलें आहे की, 'सबपर रहम करो,' ख्रिश्चन धर्मांत हि या दोन गोष्टी अंतर्भूत आहेत च. याप्रमाणें भूतदयेचा विचार प्रत्येक धर्मांत आहे. हे बहुतेक धर्म हिंदुस्थानांत वाढले बहरले आहेत. तरी हि हिंदुधर्माचें एक वैशिष्टच आहे आणि तें म्हणजे ब्रह्म-विद्या. मी या च परिशुद्ध धर्म-विचाराचा प्रचार करूं इच्छितो. हा च धर्म-विचार प्रचलित करूं इच्छितों. यासाठीं मला भूदानाचें निमित्त मिळालेलें आहे, कारण आजच्या काळाची ती च मोठी समस्या आहे. तेव्हां ही च आम्हांला प्रथम सोडविली पाहिजे.

बोधगया, २-८-'५३

## नवा अध्याय

: १० :

तेलंगणांत जेव्हां मीं काम सुरू केलें, तेव्हां दोन तीन जमीनदारांनीं दान दिलें होतें. त्यांनीं इतरांकडून दान मागण्याचें हि काम केलें होतें. तेव्हां जमीनदारांनीं जी मदत केली होती ती व्यक्तिगत स्वरूपाची होती. पण आज जमीनदार वर्ग हें कार्य अंगावर घेत आहे, ही फार मोठी गोष्ट आहे. म्हणून च मी म्हणतों की, भूदान-यज्ञाच्या इतिहासांत आतां एक नवा अध्याय सुरु झाला आहे. जिची मी नुसती कल्पना करीत होतों, ती गोष्ट आज साकार झालेली दिसत आहे. आतां हे लोक आपलें काम करून सारा समाज एकरस बनविण्यांत मदत करतील.

मीं बत्तीस लाख एकर चांगल्या जमिनीची मागणी केली आहे. लोक आम्हांला पडीत जमीन हि देतात. मी ती नाकारीत नाहीं. आपल्या च देशांतली जमीन न घेणें हें मातृभक्तीच्या विरुद्ध आहे असें मी समजतों. भगवान् श्रीकृष्णांनीं रुक्मिणीचा स्वीकार केळा यामध्यें कांहीं च विशेष नव्हतें. पण त्यांनीं आठी अंगांत वाकडया असणाऱ्या कुब्जेचा स्वीकार केला यांत च त्यांचें वैशिष्टच आहे. म्हणून आपण जें जें देतां त्याचा मी स्वीकार करतों. पण पडीत जमिनीनें भूदान-यज्ञाची मागणी पुरी होणार नाहीं. म्हणून या यज्ञांत चांगली जमीन दिली पाहिजे. मीं जी बत्तीस लाखांची मागणी केली आहे, ती चांगल्या जमिनीची च केली आहे.

गया, ४-८-'५३

---

## सर्वोदयाचा पूर्ण मंत्र

: ११ :

आज नऊ ऑगस्ट आहे. या काळाच्या इतिहासांत हा दिवस सर्वांच्या हृदयावर कोरलेला आहे. या दिवशीं या देशाला एक मंत्र दिला गेला. तो मंत्र स्वराज्याचा च होता. पण त्याचा तो शेवटचा पैलू होता.

## स्वराज्याचा मंत्र

दादाभाई नौरोजींनीं १९०६ सालीं प्रथम हा मंत्र उच्चारला. त्यापूर्वीं लोकांच्या लहान-मोठ्या तक्रारी व दुःखें येथील पुढारी व सेवक त्या वेळच्या सरकारसमोर मांडीत व एकेका दुःखाचें निवारण करवून घेण्याचा प्रयत्न करीत. बरीं च वर्षें असा प्रयत्न केल्यानंतर ही गोष्ट ध्यांनात आली कीं, या सर्व दुःखांचें मूळ आहे आपलें पारतंत्र्य. जोंपर्यंत देश स्वतंत्र होणार नाहीं, तोंवर हीं दुःखें दूर होणार नाहींत. या गोष्टीची जाणीव झाली, तेव्हां महर्षि दादाभाई नौरोजींनीं देशाला हा स्वराज्याचा मंत्र दिला. तेव्हांपासून त्या मंत्राची साधना सुरू झाली व त्याचा शेवटचा चरण, 'भारत सोडा' हा मंत्र, या तारखेला लोकांसमोर आला. त्यावेळीं या देशावर एका सामर्थ्यशाली सरकारचें राज्य होतें. त्याच्याशीं सामना घ्यावयाचा होता. त्या सरकार-पाशीं शस्त्रें होती आणि देश सारा निःशस्त्र होता. अशा परिस्थितींत अहिंसेच्या शक्तीचा आधार घेऊन 'भारत सोडा' या मंत्राचा उच्चार केला गेला. याचा तत्काळ परिणाम असा झाला कीं लोकांवर ज्यांचा थोडा बहुत प्रभाव होता अशा हजारों लोकांना कैद केले गेलें. उरलेल्या नेतृत्वहीन लोकांनीं मनांत जें आलें तें केलें. सरकारनें आपल्या सामर्थ्याच्या जोरावर ही चळवळ दडपून टाक-ण्याचा प्रयत्न केला. सगळ्या सामर्थ्यानें चळवळ नष्ट करण्याची त्याची इच्छा होती. वर वर पाहतां चळवळ बंद झालेली, दडपली गेलेली दिसली, लोकांची हिंमत नाहींशी झाल्यासारखी वाटली. त्याच दिवसांत तिकडे बंगालमध्यें मोठा दुष्काळ पडला. त्यांत किती तरी लाख लोक मृत्यु-मुखीं पडले. याप्रमाणें त्यावेळीं हिंदुस्थानची दुर्दशा झाली होती.

त्या काळांत आम्ही तुरुंगांत होतों. आमच्यांत तेव्हां चर्चा चालत असे कीं, देश एवढा दडपला गेला, आतां हा वर डोकें कसें काढणार ? पण मंत्र कधीं दबले जात नाहींत. त्यांच्या मागें एक दर्शन असतें, एक शक्ति असते. दर्शनानंतर जेव्हां मंत्राची प्राप्ति होते, तेव्हां पंखांवाचून हे मंत्र उडूं लागतात आणि स्वयं प्रचार करूं लागतात. सूर्य नारायणाचे किरण ज्याप्रमाणें सगळीकडे पोंचतात, त्याप्रमाणें मंत्र सगळीकडे पोंचतात व प्रत्येकाच्या हृदयांत प्रवेश करतात. त्या काळीं वरून अंधार पसरल्यासारखा जरी दिसत होता तरी

आंदोलनांतील ज्योत जळत च होती. ती विझणारी ज्योत नव्हती. याचा परिणाम हा झाला कीं, मंत्रोच्चाराच्या पांच वर्षांनंतर इंग्रजांना हिंदुस्थान सोडून जावें लागलें, हें आपण पाहिलें च आहे. हें आन्दोलन या च तारखेला सुरू झालें. म्हणून हा दिवस आपल्या दृष्टीनें प्रेरक दिवस आहे. या दिवसाच्या स्मरणानें हि आम्हांला प्रेरणा मिळते, स्फूर्ति मिळते व नव्या कामाचा नवा उत्साह मिळतो. अशा दिवसाचें स्मरण नित्य जागृत ठेवलें पाहिजे.

## मंत्रांचा अवतार

जेव्हां एका मंत्राची समाप्ति होते, तेव्हां परमेश्वर दुसरा मंत्र देतो व समाजाचें गाडें चालू होतें. या प्रमाणें मंत्रांचे अवतार होत असतात. वास्तविक मंत्रांचे अवतार हे च खरे अवतार होत. आपण रामकृष्ण इत्यादि अवतार मानतों. पण ते निमित्तमात्र होते. त्यांच्या द्वारां मंत्र फलित झाले. मंत्रांत जी शक्ति असते, ती सर्व समाजाला चालना देत असते व कांहीं व्यक्तींना विशेष स्फूर्ति देत असते. त्या व्यक्तींच्या नांवानें मोठमोठीं कृत्यें पार पडतात. लोक त्यांचें नांव घेऊन त्यांना च अवतार मानतात. परंतु वास्तविक पाहतां मंत्रांचे च अवतार होत असतात. रामापाशीं एक मंत्र होता. तो घेऊन हिंडत हिंडत ऋषींच्या आश्रमापाशीं रामचंद्र पोचले. तेथें एक रास रचलेली दिसली. ही कशाची रास आहे, असें त्यांनीं विचारतां च ऋषींनीं उत्तर दिलें "ऋषि अविरोधी असतात. त्यांच्या विरुद्ध ज्या राक्षसांनीं शस्त्र उचललें त्यांच्या हाडांची ही रास आहे." हें एकून रामचंद्र म्हणाले, 'या ऋषींच्या तपस्येमुळें मला प्रेरणा मिळाली आहे. आतां ही सारी पृथ्वी राक्षसहीन होईल. ऋषींच्या तपस्येंतून रामचंद्रांना मंत्र मिळाला आणि त्यांनीं तो सिद्ध केला. तरी हि लोक रामचंद्रांचें च स्मरण करतात आणि त्यांना च अवतार मानतात. वास्तविक रामचंद्र एक कळसूत्री बाहुलें होतें. त्यांच्यामागें जो मंत्र होता त्यानें च सगळें कार्य केलें.

परमेश्वर हें परमोच्च तत्त्व आहे. त्या च तत्त्वांतून मंत्र स्फुरतात. महापुरुषांना त्यांमुळें च स्फूर्ति मिळते. महापुरुषांचे विचार समाजाला चेतना देतात. याप्रमाणें स्फूर्तीचें स्थान व मंत्रांचें मूळ परमेश्वर च आहे. तें परम

तत्त्व मंत्राच्या स्वरूपांत प्रकट होतें. एका अवताराची पूर्ति होते तेव्हां दुसरा अवतार येतो आणि समाजांत सतत जागृति चालू राहते. ही च ईश्वराची लीला आहे. रामचन्द्राच्या काळांत एक मंत्र अवतरला, कृष्णाच्या काळांत दुसरा, व बुद्धाच्या काळांत तिसरा. या प्रमाणें वेगवेगळे मंत्र मिळत गेले व जग पुढें पुढें चालूं लागलें.

## स्वराज्यानंतर सर्वोदयाचा मंत्र

एक मंत्र दुसऱ्या मंत्राला जन्म देऊन लुप्त होतो. ज्याप्रमाणें बींपासून फळ व फळापासून बीं उत्पन्न होत राहतें,आणि एकेक बीज नाहींसें होतें व दुसरें उगवतें, त्या प्रमाणें जेव्हां एक मंत्र अव्यक्त अवस्थेंत जातो, तेव्हां दुसरा मंत्र प्रकट होतो. जगांत मूलद्रव्य विनाश पावत नाहीं हें च विज्ञानानें आपल्याला शिकविलें आहे. स्वराज्याच्या मंत्राचा अवतार संपला, तेव्हां गांधीजींनीं दुसरा मंत्र देशासमोर ठेवला. त्यांनीं त्याची पूर्वतयारी करून ठेवली च होती. त्या नव्या मंत्राचें नांव आहे 'सर्वोदय.' या मंत्राचें बीज स्वराज्य-आंदोलनांत पूर्वीं च पेरलें गेलें होतें. स्वराज्य-प्राप्तीनंतर तें आतां अंकुरित झालें आहे. जोंपर्यंत 'स्वराज्य' हा मंत्र चालू होता, तोंपर्यंत हा पेरलेल्या स्थितींत होता, अंकुरित झाला नव्हता. पण जेव्हां 'स्वराज्य' सफल झालें, तेव्हां पेरलेलें सर्वोदयाचें बीज दिसूं लागलें, अंकुरित झालें. या प्रमाणें सर्वोदयाचें आंदोलन सुरू झालें. मंत्र प्रथम शब्दांत अवतरतो, त्यानंतर समाजांत थोडी हालचाल सुरू होते, त्यामुळें कांहीं प्रेरणा मिळूं लागते व त्यानंतर कार्य सुरू होतें. या च क्रमानें सर्वोदयाचें कार्य चाललें. प्रथम 'सर्वोदय' हा शब्द अवतरला. या शब्दाचा अर्थ महान् आहे. हा शब्द संपूर्ण अर्थ एकदम व्यक्त करूं शकत नव्हता, तो एकेक पैलू व्यक्त करूं लागला. त्यामुळें सर्वांना प्रेरणा मिळाली. गांधीजींनंतर सेवाग्राममध्यें त्यांच्या सर्व अनुयायांचें एक संमेलन भरलें होतें. त्या सर्वांनीं असा निर्णय घेतला कीं, गुरूच्या नांवानें आपण कोणता हि संप्रदाय किंवा पंथ स्थापन करावयाचा नाहीं. ते केवळ निमित्त-मात्र होते, पण त्यांनीं आम्हांला जो मंत्र दिला त्याची पूर्ति आम्हीं केली पाहिजे. मीं म्हटलें, मंत्राचें मूळ परमतत्त्वांत असतें. अनेक संकल्पांच्या द्वारां तें प्रकट होत असतें. अप्रकट रूपांत तर तें सदैव राहत च असतें. 'सर्वोदय' हा कांहीं नवा मंत्र नाहीं. तो

जुना च मंत्र आहे. ऋषींनीं म्हटलें होतें 'सर्व भूतहिते रताः।' आम्हांला सर्वांचा उदय हवा आहे. सर्वांच्या हितासाठीं आम्हांला कार्य करावयाचें आहे. हा च सर्वोदय आहे.

## 'विज्ञान' हा अपूर्ण व 'सर्वोदय' हा पूर्ण मंत्र

सध्यांचें हें वैज्ञानिक युग आल्यापासून लोक वेगळ्या प्रकारानें विचार करूं लागले आहेत. नवे नवे विचार समोर मांडले जात आहेत व जुन्या शब्दांना नवे नवे अर्थ दिले जात आहेत. त्यामुळें अनर्थ होत आहे. कारण विज्ञान हें अपूर्ण आहे. अपूर्ण विज्ञानांतून निघालेले अपूर्ण मंत्र जगापुढें मांडले जात आहेत. आज पाश्चात्यांचें जें विज्ञान आहे तें अपूर्ण आहे. त्यानें विचार मांडला. 'अधिकांत अधिक लोकांचें अधिकांत अधिक हित' ( ग्रेटेस्ट गुड ऑफ दि ग्रेटेस्ट नंबर ) हा एक अनिष्ट शब्द आहे. परंतु विज्ञान-युगानें दिलेल्या या शब्दानें मोहून जाऊन आम्हीं तो आपल्या हिताचा आहे असें मानलें. पण त्यांतून भेदासुर निर्माण झाला. नंतर 'अल्प संख्या, बहु संख्या' यांतून संख्यासुर हि निघाला. जेव्हांपासून अल्पसंख्य व बहु-संख्य यांच्या वादांत लोक पडले, तेव्हांपासून जगांतल्या प्रत्येक देशांत कलह उत्पन्न झाले. अपूर्ण मंत्रांतून निर्माण झालेले हे विचार एकांगी च निघाले.

वस्तुतः याची पूर्तता आत्मज्ञानाच्या दर्शनानें च होऊं शकते. पूर्ण विचार म्हणजे 'सर्वांचें समान हित' हा च होय. अधिकांत अधिक लोकांचें हित म्हटलें कीं, कमींत कमी जे लोक आहेत त्यांच्यावर त्यामुळें अन्याय होतो. आपल्या परिवारांतल्या माणसांबद्दल आपण असें नाहीं म्हणत कीं नवांचें भलें होवो व एकाचें न होवो. पण समाजाचा प्रश्न आल्याबरोबर विज्ञानानें सांगितलें कीं, 'अधिकांत अधिक लोकांचें अधिकांत अधिक हित झालें पाहिजे.' परंतु आम्हांला मात्र सर्वांचें हित हवें आहे. विज्ञान हा अपूर्ण मंत्र व सर्वोदय हा पूर्ण मंत्र आहे. सर्वोदयांत आत्म्याचा विचार आहे. त्याचा अभ्युदय आत्मज्ञानामध्यें आहे. सर्वोदयानें संपूर्ण विचार दिला आहे. तो पूर्ण, सत्य व शुद्ध आहे. वीस विरुद्ध पंचवीस, अशा प्रकारें मतें घेणें हें मला अतिशय चुकीचें वाटतें. आत्म्याच्या तुकड्यांचा चुकीचा विचार आत्मज्ञानांत नाहीं. आत्मा हा तर

एक, अविभाज्य, पूर्ण, समान व निर्दोष आहे. तो प्रत्येक प्राण्यांत समान रूपानें वसत आहे. 'मी पूर्ण आहें, हें पूर्ण आहे, तें पूर्ण आहे, आणि पूर्णांतून पूर्ण निष्पन्न होतें.' आत्म-ज्ञान पूर्ण आहे म्हणून च त्यांतून पूर्ण विचार च निघतो. त्यांत बहुसंख्य, अल्पसंख्य यांना अवसर नाहीं, हा विचार आपल्यापुढें आला आहे. याचा एकेक पैलू घेऊन आपण काम करूं शकूं. भूमीची समस्या हा सर्वोदयाचा आधारभूत पैलू आहे.

## पूर्ण मंत्रांत एकतेचें सामर्थ्य

त्याचा आतां च प्रारंभ झाला आहे. हें सर्वोदय-विचाराचें पहिलें पाऊल होय. स्वराज्यानंतर आम्हांला सर्वोदयाचा नवा मंत्र मिळाला आहे. नदीचें मूळ जेथें असतें, तेथें तिचें परिशुद्ध स्वरूप असतें. त्या च प्रमाणें सर्वोदयाची नदी पुढें पुढें वाहूं लागली आहे. एकेका मनुष्याची अनुकूलता तिला प्राप्त होऊं लागली आहे. आज हिंदुस्थानांत जुन्या विचारांच्या किती तरी संस्था चालू आहेत. कॉंग्रेसवाले, सोशॅलिस्ट, हिंदुमहासभावादी इत्यादि अनेक विचार-सरणीचे लोक आहेत. ते जसजसा अधिक विचार करूं लागले तसतशी सर्वोदय विचारांची पकड त्यांच्या मनावर जास्त जास्त घट्ट होऊं लागली आहे. कारण पूर्ण मंत्रांत एकतेचें सामर्थ्य असतें, व अपूर्ण मंत्रांत चुकीचे विचार असतात. पूर्ण मंत्र आपल्या एकतेच्या सामर्थ्यानें अनेकांना एक करून सोडीत असतो. वस्तुतः अपूर्ण मंत्राला मंत्र तरी कां म्हणावें ? ते केवळ चुकीचे विचार च असतात. समाजाचे तुकडे करणारे ते चुकीचे विचार असतात. पण लोक ते हि मान्य करतात. आज जगांत समाजाचे तुकडे करणारे अनिष्ट विचार व समाज एकरस बनविणारे सर्वोदयाचे विचार, असे दोन विचार-प्रवाह चालू आहेत. जगांत यांच्यावर चर्चा चाललेली आहे. या दोन विचारांत संघर्ष चालू आहे. तो दिवसेंदिवस वाढत च आहे. सर्वोदयाच्या हातीं शस्त्र नसून विचार आहे व विचाराच्या साधनानें च आम्ही शस्त्रांचा विध्वंस करूं शकतों. शस्त्रांची मजल आज अण्वस्त्रांपर्यंत येऊन पोंचली आहे. जगावर त्यांचा आज प्रभाव आहे. पण सर्वोदयांत जी आध्यात्मिक शक्ति आहे ती प्रभाव पाडल्यावाचून राहणार नाहीं. शेंवटीं तिची विचार-सरणी च कार्यान्वित होईल.

## अद्वैतवादी सर्वोदय

हिंदुस्थानांत वेगवेगळे पक्ष आहेत. ते आपापसांत भेदभाव राखतात, पण भूदानाचें काम सर्व च करतात. त्यांनीं हें काम मान्य केलें आहे. भूदानाचा विरोध करणारा मला अजून एक जण हि भेटला नाहीं. त्यांच्यांत परस्परांच्या विचारांविषयींचा विरोध व्यक्त होत राहतो, पण भूदान-यज्ञाच्या व्यासपीठावर खांद्याला खांदा भिडवून ते काम करीत आहेत. साऱ्या समाजाला एकरस बनविण्याचा आमचा हा प्रयत्न अवश्य सफल होईल व त्यांतून एक महान् शक्ति प्रकट होईल.

स्व-सिद्धान्त-व्यवस्थासु द्वैतिनो निश्चिता दृढम् ।
परस्परं विरुध्यन्ते तैर् अयं विरुध्यते ।।

जे पूर्णाला मानीत नाहींत, अंशाला मानतात ते अंशवादी असतात. मग तो अंश केवढा हि मोठा असो त्यांना 'द्वैतवादी' म्हणतात. ते पक्के निश्चयी असतात. आपापले विचार आपापल्या पक्षाला देतात व आपला पक्ष श्रेष्ठ मानतात. ते एकमेकांच्या विरोधांत उभे राहतात, आपापल्या धर्माची, पंथाची व पक्षाची वाढ करूं इच्छितात. आणि आपापसांत कलह उत्पन्न करतात. पण त्या सर्व पक्षांचा समावेश सर्वोदयाच्या विशाल उदरांत होत असतो. सर्वोदयाचा कोणाशीं च विरोध नाहीं. तो सर्वांना आपल्या उदरांत सामावून घेत असतो. तो अद्वैतवादी असतो.

जे भूदानांत येतात ते सर्व मिळून काम करतात. प्रथम त्यांच्या मनांत भेदभाव असतात. पण जसजसे ते काम करूं लागतात, तसतसे त्यांचे भेद मिटत जातात, आणि मग त्यांची परस्परांविषयींची द्वेष-भावना राहत नाहीं. आज असें दृश्य दिसत आहे कीं जे आजवर एकमेकांशीं बोलत हि नव्हते, ते आतां मिळून मिसळून काम करीत आहेत. मनांत थोडा बहुत भेद तर असेल च. पण आतां विरोधी विचार राहणार नाहींत, सगळे एक विचारांचे होतील व समाज एकरस बनेल अशी माझी अपेक्षा आहे. सर्वोदय-विचाराची ही च मौज आहे कीं तो सगळ्या परस्परविरोधी पक्षांना आपल्या उदरांत सामावून घेतो. या च विचारानें मला प्रेरणा मिळत राहते.

मराठी ग्रंथालय ... दा. क्र. ८०८९

## मंत्रानें लहान मोठे बनतात

मी आज अडीच वर्षें हिंडत आहें. हा मंत्र मला नित्य नवा विचार व नित्य नवी प्रेरणा देत आहे. मी तुम्हांला सांगूं इच्छितों कीं तुम्ही लहान नसून मोठे आहांत. तुमच्यासमोर हा मंत्र प्रकट स्वरूपांत उभा आहे. आतां येथें कोणी लहान राहणार च नाहींत. जेव्हां रामासमोर मंत्र प्रकट झाला, तेव्हां वानर वानर राहिले नाहींत, अस्वलें अस्वलें राहिलीं नाहींत, साधारण मनुष्य साधारण राहिला नाहीं. एक मंत्र अवतरला व त्यानें त्यांचीं शरीरें अभिमंत्रित करून टाकलीं. मग तीं शरीरें शरीरें राहिलीं नाहींत, तर त्या मंत्राचीं वाहनें बनलीं. या कार्यांत लहान लहान माणसें काम करीत आहेत. यांना ही प्रेरणा कशी मिळत आहे याचें मला नवल वाटतें. मुलांना, स्त्रियांना, लहान-मोठ्यांना, सर्वांना च प्रेरणा मिळत आहे व ते दान देत आहेत. आंधळ्यांनीं हि दान दिलें. आतां तर एक नवा अध्याय सुरू झाला आहे. आतां जमीनदार हि जागृत झाले आहेत. असा विश्वव्यापक मंत्र प्रकट झाला कीं, तेथें कोणी लहान राहूं च शकत नाहीं. सारे मंत्रानें प्रभावित होऊन जातात. अशी श्रद्धा ठेवून कामाला लागा. सर्वोदयावर विश्वास ठेवा. सर्वोदय साधण्यासाठीं आपला एक हिस्सा दुसऱ्याला द्या. जें जें आपलें आहे, तें आपलें नाहीं, सर्वांचें आहे. म्हणून च आपला एक हिस्सा द्या.

## यज्ञांत तूप नव्हे तर आसक्ति जाळायची

'अग्नये इदं न मम' जें आपलें आहे, त्याचा एक हिस्सा अग्नीला अर्पण करा. तो हिस्सा अग्नीचा आहे, आपला नाहीं. लहान लहान जमिनीच्या तुकड्यांनीं उत्पादन घटतें हें बरोबर नाहीं. पूर्वीं यज्ञांत तुपाची आहुति देत तेव्हां लोक म्हणत कीं, 'हें तर तूप जाळणें आहे.' पण ऋषींनीं सांगितलें, 'हें तूप जळत नसून आमची आसक्ति जळत आहे.' त्या काळीं जंगलें तोडलीं जात होतीं, जाळलीं जात होतीं व मनुष्य-वस्ती वाढविली जात होती. तेव्हां अग्नीची स्थूलरूपानें उपासना चालत होती. पण आतां तर आंतला अग्नि जाळायचा आहे. आंतील अग्नीची च उपासना आपणांला शिकविली गेली आहे. त्यांत आपल्या स्वार्थाची आहुति द्यावयाची आहे. जिच्यावर आमची अतिशय आसक्ति आहे त्या भूमीचा मोह आम्हांला सोडला पाहिजे.

व या यज्ञांत आपल्या भूमीची आहुति दिली पाहिजे. मी तर येथपर्यंत सांगतों कीं, यामुळें देशाचें उत्पादन घटणार असलें, तरी हि मला तें चालेल. जेथें मनें जुळलीं जातील, तेथें उत्पादन शेंकडों पटींनीं वाढेल. किसान उत्तम बीं पेरतो, त्या वेळीं बीं नाहींसें झालेलें दिसतें. पण कांहीं काळ वाट पाहिल्या-वर असें दिसून येतें कीं, आपलें कांहीं च नष्ट झालें नाहीं, तर उलट चौपट आपल्याला मिळालें च आहे. एक बीं पेरलें तर तें शतपट पीक देतें.

यासाठीं आपण आपली जमीन गरिबांना वाटून द्या. वाटण्यानें मनें जुळतील. मग जमिनीचे कसे हि तुकडे होऊं द्या. त्यांतून तुम्हांला हवें तें पीक काढतां येईल. तुम्ही सहकारानें शेती कराल, तर तुम्हांला शतपटीनें पीक मिळेल. अग्नींत तूप नष्ट होत नाहीं, तर शतगुणित होतें. तें शतगुणित होतांना माझ्या डोळ्यांना दिसत आहे. मीं हा नुसता दृष्टान्त दिला. सध्यांच्या काळांत कोणी तूप जाळून यज्ञ करील, तर तें मला पटणार नाहीं हें मी मान्य करतों. ज्या काळांत तें होत होतें, त्या काळांत तें ठीक होतें.

ही अल्पदृष्टि सोडून जरा दीर्घ दृष्टि करा, दूरवर दृष्टि फेका. जमिनीचे तुकडे करण्याचा माझा उद्देश नसून मनें जोडण्याचा आहे. मनाचे जे तुकडे झाले आहेत ते प्रथम जोडावयाचे आहेत. मनाचे हे तुकडे मी कापडाच्या तुकड्यांसारखे शिवून जोडूं इच्छितों. जोडण्यासाठीं च मी तुकडे करीत आहें. शिंप्याला जर आपण विचारलें कीं, तूं कपडा कापतोस कां? तो उत्तर देईल कीं कापून मला शिवायचें आहे म्हणून कापतों.

ही सारी भूमि जर्जर झाली आहे. तिचे तुकडे तुकडे झाले आहेत. ती छिन्नविच्छिन्न झाली आहे. म्हणून आम्ही ती गरिबांना वाटून देऊं व एकदां तोडून कां होईना पण सगळ्या देशाला एकरस बनवूं.

हुल्लासगंज, ९-८-५३

## अहिंसेनें च धर्म-प्रचार संभवनीय आहे :१२:

आज सकाळीं नालंदाचें अवशेष पाहण्यास गेलों होतों. हें एक प्राचीन ऐतिहासिक स्थान आहे. जुन्या काळच्या स्मृति माणसाला उत्साह देतात व कर्तव्याची प्रेरणा देतात. आपल्या इतिहासांत जें जें घडलें तें सारें चांगलें च आहे असें नाहीं. कांहीं गोड हि आहे व कांहीं कडू हि आहे.

लोक इतिहासांतलें सारें चांगलें च मानतात व वाईट गोष्टी पाहत च नाहींत. पण हें चुकीचें आहे. आम्हांला आपल्या गुणदोषांचें हि ज्ञान पाहिजे. विवेक व समन्वय-युक्त बुद्धि ठेवून इतिहासाकडे पाहिलें पाहिजे, तर च फायदा होईल. आजकाल शाळांतून मुलांना कितीक राजा-महाराजांची नामावली पाठ करावी लागते. पण इतिहास म्हणजे राजामहाराजांचा इतिहास नव्हे. आपल्या जीवनासाठीं जे आवश्यक व इष्ट आहे, तें जर जुन्या इतिहासाच्या अवलोकनानें मिळत असेल, तर तें ग्रहण केलें पाहिजे ; व त्यांतून लाभ मिळविला पाहिजे. इतिहासांत कांहीं अनिष्ट असेल, तर त्या-पासून स्वतःला सांभाळलें पाहिजे. म्हणून आपण इतिहासाचा केवळ अभिमान धरतां उपयोगी नाहीं. इतिहासाचें योग्य दर्शन झालें पाहिजे.

नालंदाचें सगळें दृश्य अतिशय मधुर व सुखद वाटलें. हजारों विद्यार्थी येथें येत व अध्ययन करीत, या गोष्टीचें दर्शन येथें होतें. पण ही गोष्ट आम्हांला नवीन नाहीं. नालंदाचें विश्वविद्यालय हें अतिशय प्राचीन आहे यांत शंका च नाहीं. पण आमच्या पुराण ग्रंथांतून आढळतें कीं, आपल्याकडे विद्येचें अध्ययन अति प्राचीन कालापासून, नालंदाच्या हि आधींपासून, चालत आलें आहे. प्रातःकाळीं विद्यार्थी आपल्या गुरूजवळ बसून विद्याध्ययन करीत, मनन व चिंतन करीत. प्रातःकाळच्या प्रहरीं झोपेंत राहून आपला अमूल्य वेळ ते व्यर्थ घालवीत नसत. वेदांत म्हटलें आहे.

"यो जागार तं ऋचः कामदंते"

जे जागृत राहतात, त्यांचें स्मरण भगवान् करतात व त्यांना ऋचा स्फुरतात. ही परंपरा अनेक कालापासून चालत आलेली आहे. पण

मराठी ग्रंथ संग्रहालय

जेव्हांपासून इंग्रजी विद्या आली, तेव्हांपासून हा धर्म बाजूस टाकून दिला. ही विद्या वस्तुतः विद्या नसून तें उदरभरणाचें एक साधन आहे. तिला अविद्या च म्हणावें लागेल. त्याचा परिणाम असा झाला कीं, ही विद्या शिकणारे खेडीं सोडून शहरांत गेले. पण फार च थोड्यांना इंग्रजी विद्या शिकतां आली. बाकी सारे अज्ञानी च राहिले. जातांना इंग्रजांनीं आपले संस्कार येथें ठेवले. त्यामुळें आमच्या संस्कृतीच्या विपरीत विचार शिकले जाऊं लागले.

## उपनिषत्कालीन राज्याचें वर्णन

उपनिषदांत एक राजा आपल्या राज्याचें वर्णन करीत आहेः—

न मे स्तेनो जनपदे न कदर्यः न मद्यपः ।
न अनाहिताग्निः न अविद्वान्.... ॥

म्हणजे माझ्या राज्यांत कोणी चोर नाहीं, कोणी कंजूष नाहीं. जेथें कंजूष लोक असतात, तेथें च चोर असतात. मीं कितीदां तरी म्हटलें आहे कीं कंजूष हा चोराचा बाप असतो. कंजूष माणूस च चोऱ्या वाढवीत राहतो. त्या राजानें पुढें सांगितलें कीं, माझ्या राज्यांत कोणी मद्य पीत नाहीं. त्या काळीं हिंदुस्थानांत कोणी दारू पीत नसे. पण इंग्रजांनीं दारू पिण्याची फॅशन काढली त्यामुळें शहरांतून दारू उघडपणें चालू लागली . आज ती थांबविण्याची हि आम्हांला भीति वाटते. त्या राजानें नंतर सांगितलें कीं, माझ्या राज्यांत कोणी अविद्वान नाहीं, लिहितां वाचतां न येणारा असा कोणी हि येथें नाहीं. तसें च जो देवाची पूजा करीत नाहीं असा हि कोणी माझ्या राज्यांत नाहीं. सारांश फार प्राचीन काळापासून येथें विद्याध्ययन चालत आलें आहे. पण आज आम्हांला विज्ञान व आत्मज्ञान या दोहोंचें हि अध्ययन करावयाचें आहे. प्राचीन काळापासून चालत आलेलें ज्ञान आम्हांला आत्मसात् करावयाचें आहे व पश्चिमेकडून आलेलें विज्ञान हि हस्तगत करावयाचें आहे. नालंदाचे अवशेष आम्हांला ही च शिकवण देत आहेत. त्या च तऱ्हेनें आपल्याला आपल्या गुणांचा विकास केला पाहिजे.

## जबरदस्तीनें धर्माचा प्रचार होत नाहीं

आम्हीं काय करतां उपयोगी नाहीं हें हि मला येथें शिकायला मिळालें.

येथें मीं एक चित्र पाहिलें. त्यांत शंकरपार्वतीच्या मस्तकावर एक मूर्ति उभी असलेली दाखवली होती. एखादा बौद्ध राजा उन्मत्त झाला असावा. तेव्हां एखाद्या चित्रकारानें असें चित्र रंगवून बुद्ध-धर्माचा लय झाला असें दाखवलें असावें. या च राजाच्या आधारावर येथें विद्या शिकविली गेली. पण राज्याश्रयानें धर्माचा जय होतो, किंवा धर्माचा उदय होऊं शकतो किंवा एक धर्म दुसऱ्याला जिंकू शकतो असें मी मानत नाहीं. बुद्ध-धर्माच्या नाशाचीं जीं कारणें आहेत त्यांत हें हि एक कारण आहे. यामुळें च येथें बुद्ध-धर्म टिकूं शकला नाहीं. जेथें शक्ति येते तेथें धर्म क्षीण होतो. धर्मप्रचारासाठीं जेव्हां बलाचा उपयोग केला जातो तेव्हां धर्म टिकत नाहीं. हें केवळ बौद्ध धर्मांत च आहे असें नाहीं. शैव, वैष्णव इत्यादि धर्मपंथांत हि असें च घडलें. जेव्हां धर्म-प्रचाराविषयींचा उत्साह फार वाढतो, तेव्हां त्यांत विवेक राहत नाहीं. जेव्हां राजामहाराजांचा आधार घेऊन धर्माचा बलानें किंवा जबरदस्तीनें प्रचार होऊं लागतो, तेव्हां धर्म हा 'धर्म' राहत नाहीं. बलात्कारानें कोणता च धर्म टिकूं शकत नाहीं. तो 'अधर्म' बनून जातो. प्राचीन काळापासून हें असें च होत आलें आहे.

परशुरामानें पृथ्वी निःक्षत्रिय करण्याचा प्रयत्न केला. एकवीस वेळां त्यानें पृथ्वी निःक्षत्रिय बनवली. तरी हि पृथ्वीवर क्षत्रिय राहिले च. कारण परशुराम स्वतः ब्राह्मण असून हि त्यानें क्षत्रियाचें काम केलें. त्यामुळें च क्षत्रियत्वाचें एक बीज पेरलें गेलें. ब्राह्मण असून हि ते शांत राहिले नाहींत. उलट त्यानें क्षत्रियांचें शस्त्र आपल्या हातीं घेतलें. म्हणून त्याचें काम सफल झालें नाहीं. परशुराम शांतीनें काम करते तर त्यांची इच्छा सफल झाली असती. पण त्यांचें स्वतःचें च अगोदर 'धर्मांतर' झालें.

मुसलमानांनीं हि बलात्कारानें धर्माचा प्रचार केला. पण धर्माच्या बाबतींत जबरदस्ती होऊं शकत नाहीं असें कुराणांत च लिहिलें आहे. समाजा-समोर सत्य व मिथ्या दोन्ही मांडून त्यांतून काय पाहिजे याचा निर्णय करण्याचें काम समाजावर च सोडून दिलें पाहिजे. सत्य व मिथ्या लपून राहूं शकत नाहीं. तेव्हां लोकांना जें योग्य वाटेल, तें ते स्वीकारतील आणि त्यांना जे मिथ्या वाटेल, त्याचा ते त्याग करतील. कुराणांत असें

लिहिलें असतां हि मुसलमान राजांनीं जबरदस्तीनें धर्माचा प्रसार केला. पण त्यामुळें द्वेष च उत्पन्न झाला. आज जर महंमद पैगंबर असते, तर त्यांना ही संख्यावृद्धि पाहून आनंद वाटला नसता.

सगळ्या च धर्मांनीं संख्या वाढविण्याकडे लक्ष दिलें हें खरें. पण संख्येंत धर्म राहत नसतो. तें एक निर्मल, परिशुद्ध तत्त्व असतें. मनुष्याची मानवता वाढविण्याचें च कार्य धर्म करीत असतो. हें च करण्यासाठीं वेगवेगळ्या ऋषींनीं समाजासमोर वेगवेगळ्या प्रकारांनीं धर्म ठेवला व स्वतः त्याप्रमाणें आचरण केलें. त्यांनीं तटस्थ वृत्तीनें धर्म-विचार समोर मांडले. पण पुढें अविचारांना जबरदस्तीनें निर्मूल करण्याचा प्रयत्न झाला, तेव्हां तो हि सफल झाला नाहीं. कारण जबरदस्तीनें आपण अविचार हि घालवूं शकत नाहीं. जबरदस्तीनें आचार-विचार शिकविणें हा अधर्म च आहे.

## जबरदस्तीनें धर्म नष्ट होतो

शंकरपार्वतीची पूजा करणें हा कोणी धर्म मानतात. तर त्यांची पूजा करणें हा अधर्म आहे असें कोणी मानतात . ज्याला हा अधर्म वाटतो, त्यानें तो करूं नये, त्यानें आपल्या धर्माप्रमाणें आचरण करावें. ज्याच्या धर्मांत मूर्ति-पूजा मान्य आहे, तो मूर्ति-पूजा करील आणि ज्याच्या धर्मांत ती नसेल तो ती करणार नाहीं. परंतु आपला धर्म दुसऱ्यावर लादणें व तो हि जबरदस्तीनें, हा अधर्म आहे. अशा मुळेंच धर्म नष्ट होऊन जातो. त्याच कारणानें सर्व धर्मांविषयीं तरुणांच्या व इतरांच्या हि मनांत अश्रद्धा उत्पन्न झाली आहे, व नास्तिक लोकांची संख्या वाढली आहे. आज इतके जे नास्तिक दिसून पडतात, ते या च कारणामुळें. धर्म हा संख्याबलानें वाढत नसतो, तर आपल्या निर्मल व परिशुद्ध प्रचारानें च वाढत असतो. यांत मी कोणाची निंदा करूं इच्छीत नाहीं, पण सर्व धर्मांत जे दोष आहेत, त्यांचें दर्शन घडवूं इच्छितों. त्यांतून आम्हीं धडा घेतला पाहिजे.

१९५७ सालापर्यंत भूदानाचें काम पूर्ण व्हावें अशी माझी इच्छा आहे. परंतु हें काम अहिंसेनें, प्रेमानें व लोकांना समजावून पटवून करण्याची माझी इच्छा आहे. जबरदस्तीनें काम घेण्याची इच्छा नाहीं, तर धीरानें घेण्याची आहे. आम्ही धीर सोडला तर शांति हि घालवून बसूं. वस्तुतः जबरदस्तीनें

काम होत च नसतें. पण झालें तरी हि तें करणें अयोग्य आहे. आम्हांला जबरदस्तीनें जर जास्त जमीन मिळाली, तर त्यामुळें लोकांचें काम साधणार नाहीं व आमचें हि साधणार नाहीं. म्हणून आम्ही आपला विचार लोकांना समजावून दिला पाहिजे व तो समजून च त्यांनीं जमीन दिली पाहिजे, या गोष्टीची मी नेहमीं काळजी वाहत असतों.

## भूदान हें शुद्ध धर्म-कार्य

हें धर्मचक्र-प्रवर्तनाचें शुद्ध कार्य आहे म्हणून च आम्ही शुद्ध भावानें जमीन मागत आहोंत. आज भगवान् बुद्ध येथें असते व शिवपार्वतीच्या मस्तकावर एक बौद्ध उभा आहे अशी मूर्ति जर ते पाहते, तर त्यांना आनंद वाटला असता कां? त्यांना तर ती मूर्ति पाहून किती तरी दुःख झालें असतें. पण जे उन्मादी असतात ते उत्साहाच्या व आवेशाच्या भरांत अशीं कृत्यें करून टाकतात. वैष्णवांनीं हि अशीं कृत्यें केलीं आहेत. हीं सारीं तामस-भावाच्या बुद्धीचीं लक्षणें आहेत. धर्म-कार्यांत जबरदस्ती व अत्याचार चालत नाहीं हें मला या पुराण अवशेषांनीं शिकविलें. धर्मकार्य हें पवित्र असतें. तें पूर्ण होण्यास वेळ लागला तरी हि तें अहिंसेनें च झालें पाहिजे. १९५७ सालापर्यंत भूदानाचें कार्य पुरें करण्यासाठीं हिंसेचें साह्य घेतलें तरी चालेल, हें मी कधीं हि म्हणणार नाहीं. प्रेमानें व अहिंसेनें समजावून व पटवून हें कार्य मी करूं इच्छितों. प्रेमानें जर हें कार्य पुरें झालें नाहीं, तर १९५७ पर्यंत च तर काय पण हजार वर्षांत हि तें पुरें होणार नाहीं. वस्तुतः एकाची जमीन दुसऱ्याला देण्याचा हा गोरख-उद्योग मला कां हातीं घ्यावासा वाटला? लोकांत प्रेम, त्याग व परस्पर सहकार्याची भावना उत्पन्न व्हावी हा च माझा उद्देश आहे आणि याच साठीं मी ही भूमीची समस्या हातीं घेतली आहे. अशी एखादी समस्या हातीं घेऊन जर धर्म-प्रचार केला, तर लोकांना तो चटकन् समजतो. लोकांच्या नित्य-जीवनावर त्याचा परिणाम होतो. पण केवळ विचार-प्रचार च करीत राहिलों तर लोकांना तो विचार चटकन समजत नाहीं. नुसता प्रेमाचा तोंडी उपदेश केला तर तो हवेंत च राहतो. आणि यदाकदाचित् त्याचा कांहीं परिणाम झाला च, तर तो अतिशय सूक्ष्म असतो. म्हणून च

वेगवेगळ्या काळीं, त्या त्या काळची एखादी समस्या हातीं घेऊन च लोकांनीं धर्म-प्रचार केला. असा प्रचार शुद्ध धर्म-विचाराचा प्रचार होतो.

## भूदानाच्या वाहनावर आरूढ होऊन धर्म-चक्र-प्रवर्तन

मला हि जमिनीची ही समस्या केवळ एक निमित्त म्हणून लाभली आहे. वास्तविक रीतीनें शुद्ध धर्माचा प्रचार करण्याची व त्याबरोबर च त्याग व प्रेम यांची भावना पसरविण्याची माझी इच्छा आहे. भगवान् विष्णूंचें ज्याप्रमाणें गरुड हें वाहन आहे व भगवान् शंकरांचें नंदी हें आहे, त्याच प्रमाणें भूदानाचें कार्य हें आमचें वाहन च बनलें आहे. वाहन यासाठीं हवें कीं त्यावाचून काम होऊं शकत नाहीं. कार्य हें साकार नसतें, अव्यक्त असतें. भूदानाची समस्या हें आमच्यासाठीं वाहन बनलें आहे. म्हणून त्याच्यावर आरूढ होऊन आम्ही धर्म-चक्र-प्रवर्तनाचें काम करण्यास निघालों आहोंत.

## सत्य हा सर्वश्रेष्ठ धर्म

आपल्या कार्यांत थोडीशी हि आसक्ति आपण ठेवतां उपयोगी नाहीं, हा हि विचार मीं दृढ केला आहे. फलासक्तींत गुंतून या कार्यांत कांहीं वाईटपणा येऊं नये यासाठीं आम्हीं सतत लक्ष ठेवलें पाहिजे. स्वच्छ, शुद्ध दुधांत ज्याप्रमाणें थोडा हि कचरा असलेला चालत नाहीं– वरणभात खाणाऱ्याला कदाचित् थोडासा कचरा चालेल हि– त्या च प्रमाणें धर्मकार्यांत थोडासा हि अधर्म आलेला आम्हांला चालणार नाहीं. अधर्माच्या आधारानें हि धर्म वाढू शकतो असा विचार आम्ही करीत नाहीं. धर्म तर त्याचें परिशुद्ध तत्त्व जें सत्य त्यावर च पसरत असतो. हिंदु, मुस्लिम, ख्रिश्चन आदि सर्व धर्मांनीं हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. कारण धर्माच्या नांवावर या सर्वांनीं फार जुलूम केले आहेत. याचा परिणाम असा झाला आहे कीं, आमचा तुमच्या धर्मावर विश्वास नाहीं असें तरुण लोक म्हणूं लागले आहेत. आम्हांला फक्त सत्य न्याय व दया हीं च हवीं आहेत. याप्रमाणें तरुणांच्या मनांत सर्व च धर्मांविषयीं अश्रद्धा उत्पन्न झाली आहे. मी यावर असें सांगतों कीं, बरें बाबा, तुमचा ज्या तत्त्वांवर विश्वास आहे, त्यांना च मी धर्म मानतों. सत्याहून श्रेष्ठतर असा कोणता च धर्म नाहीं. 'नास्ति सत्यात् परोधर्मः'— सत्याहून श्रेष्ठ

असा कोणता च धर्म असूं शकत नाहीं. ज्या धर्मावर तुमचा विश्वास असेल, तो धर्म माना. सत्याला प्रत्येक धर्मांत मान आहे.

## धर्माचें सार : अभिमानरहित दया

पिकलेल्या उत्तम आंब्यामध्यें हि त्याच्या रक्षणासाठीं कोय व वर साल असते. परंतु आपण कोय व साल टाकून नुसता रस च खातों, त्याप्रमाणें धर्मग्रंथांतील जीं मुख्य तत्त्वें—सार—आहेत तेवढीं ग्रहण केलीं पाहिजेत. दया व प्रेम हें सर्व धर्मांचें सार आहे, म्हणून दया व सत्य यांना अनुसरून वर्तन करा. तुलसीदासांनीं म्हटलें आहे, ‘दया धर्मका मूल’. आणि लागली च त्यांनीं लिहून टाकलें कीं, ‘पाप मूल अभिमान’. लोक दया करतात. पण मालक होऊन बसतात. ते संपत्तीचा संग्रह करतात. पण मालकीची भावना ठेवून ते दया कशी करणार? कारण दयेंत, मी मालक व तो हीन अशी भावना राहिल्यानें अहंकार उत्पन्न होतो, पाप उत्पन्न होतें. ही अहंकार-भावना आली कीं तें पाप च समजावें. दया कशी असावी? तुकारामांनीं म्हटलें आहे, ‘दया करणें जे पुत्रासी। ते चि दासा आणि दासी।’ बाप मुलावर करतो तशी दया असावी. तिच्यांत अभिमानाचा अंश हि नसतो. अशी च दया आम्हीं प्राणिमात्रांवर केली पाहिजे.

भूदान कार्यांत अशी च भावना ठेवली पाहिजे. आम्ही लोकांकडून भिक्षा मागत नसतों. आम्ही लोकांना आपला विचार समजावून देतों, म्हणून ते आम्हांला दान देतात. पण आम्ही जर मालक राहून दान देऊं लागलों, तर कांहीं फायदा होणार नाहीं. आम्हांला मालकी सोडली च पाहिजे. मी गरिबांसाठीं च आपल्याकडून जमीन मागतों. त्यांचा तो हिस्सा आहे. तो आम्हांला हवा. हा गरिबांचा हक्क समजून च जर आपण दान दिलें, तर आपण उपकार केले असें न होतां आपणांवर च उपकार झाले असें होईल. जेथें याची जाणीव होणार नाहीं, तेथें खरी दया नाहीं. खरी दया ही अभिमानरहित असते. सर्व धर्मांचें हें च सार आहे कीं, दया करा व अभिमान सोडा. याच्यावर च मी नेहमीं जोर देतों व याचा च प्रचार करतों. भगवान् बुद्धांच्या नांवानें मीं गयेंत संकल्प केला कीं, “जोंपर्यंत बिहारची भूमिसमस्या सुटत नाहीं तोंपर्यंत मी बिहार सोडणार नाहीं.” मी हें भगवान् बुद्धांच्या

प्रेरणेनें च केलें. मी हिंदुधर्म, बुद्धधर्म, असा भेद करीत नाहीं. धर्म वेगवेगळे असले, तरी सर्वांचें मूलतत्त्व एक च आहे.

मुक्तीचा एक च मार्ग आहे. 'असतो मा सद् गमय, तमसो मा ज्योतिर्गमय'। आपल्याला असतांतून सत्त्याकडे जावयाचें आहे. अंधारांतून प्रकाशाकडे जावयाचें आहे. आणि 'मृत्योर्मा अमृतं गमय' विकारांतून निर्विकाराकडे जावयाचें आहे. वेगवेगळ्या प्रकारांनीं अखेर तें च समजावून दिलें आहे. कोणत्या हि धर्मांतले ऋषि असोत, मी त्यांना मानतों. त्यांच्या च प्रेरणेनें व आशीर्वादानें आमचें काम चालतें. आज मला येथें पुष्कळ च शिकण्यास मिळालें. नालंदांत येऊन 'कोणती गोष्ट आम्हांला टाळली पाहिजे व कोणती गोष्ट घेतली पाहिजे' हें मी शिकलों. तसें च 'काय केलें पाहिजे व काय करतां कामा नये' हें हि मी शिकलों.

नालंदा, १७–८–१९५३,

---

## अपरिग्रहांत सामर्थ्य हि आहे : १३ :

जेव्हांपासून मी जमिनीचें दान मागूं लागलों, तेव्हांपासून च संपत्तिदानाचा विचार माझ्या मनांत येत होता. पण एकेका कामाची प्रगति साधल्याशिवाय दुसऱ्या कामांत शक्ति खर्चणें योग्य नाहीं. मीं बिहारांत जेव्हां प्रवेश केला तेव्हां येथें फार मोठ्या प्रमाणावर काम करावयास हवें हें स्पष्ट झालें होतें. वस्तुतः प्रत्येक च ठिकाणीं मोठ्या प्रामाणावर काम करावयास हवें. पण आरंभ बिहारमध्यें झाला. या आरंभकालीं मीं ठरवलें कीं केवळ जमीन देण्याघेण्यानें काम पुरें होणार नाहीं. भूमिहीनांना आणखी हि मदत देणें अवश्य आहे. या च दृष्टीनें जवळ जवळ एका वर्षापूर्वीं पाटण्याला मीं संपत्तिदानाची गोष्ट प्रथम मांडली. त्या बाबतींत एकदीड वर्ष मीं बरें च चिंतन केलें होतें तरी हि प्रत्यक्ष पहिलें विवरण मीं पाटण्यांत च केलें.

### संपत्तिदान 'निधि' नव्हे

संपत्तिदानाच्या कल्पनेंत निधि जमा करण्याची गोष्ट मुळीं च नाहीं, हें

प्रथम नीट समजून घेतलें पाहिजे. या यज्ञाचें हें वैशिष्टच आहे कीं यांत मिळविण्याचा प्रकार अगदीं वेगळा आहे. एका ठिकाणीं निधि जमा करण्याची जर कल्पना यांत असती तर याला संपत्ति-दान-यज्ञ म्हटलें नसतें. यांतील यज्ञ हा शब्द निरर्थक नाहीं, तर जाणूनबुजून जोडलेला आहे. हा असा यज्ञ आहे कीं ज्याच्यापासून कोणाला हि दूर राहतां येणार नाहीं. यांत आहुति देण्याची संधि प्रत्येकाला मिळूं शकेल. जें धर्म-कार्य सर्वांना लागूं असतें, जें अक्षरशः सार्वजनिक म्हणजे सर्व लोकांसाठीं असतें, असें सत्यासारखें दुसरें कोणतें ? त्याला च 'मुख्य धर्म' किंवा 'प्रथम धर्म' म्हणतात. 'नः तानि धर्मानि प्रथमानि आसन्।'

आजकाल गोळा केल्या जाणाऱ्या इतर निधींहून संपत्तिदान-यज्ञ हा सर्वस्वी भिन्न आहे. यांत आम्ही दानपत्र घेतों, पैसे घेत नाहीं. दाता स्वतः च आपल्या दानाचा विनियोग गरिबांच्या सेवेसाठीं करतो. पण गरिबांना हि ही मदत तो पैशाचा रूपांत करीत नाहीं. यांत पैशाचा दुरूपयोग होऊं शकेल, अशी शंका कोणी काढली होती. ती रास्त हि आहे. पण संपत्ति-दानांत कोणासाठीं प्रत्यक्ष पैसा दिला जाणार नाहीं. सामुदायिक कामासाठीं पैसा खर्च केला जाईल. विहिरीसाठीं कोणाला सिमेंट विकत घेऊन देतां येईल किंवा कोणाला बैलजोडी घेऊन देतां येईल. आतां ही मिळालेली बैलजोडी एखादा विकून टाकील व पैशाचा दुरूपयोग करील अशी कल्पना करणें हें फार ताणल्यासारखें होईल. आमच्या सद्भावनेमुळें त्याच्या हि हृदयांत सद्भावना उत्पन्न होईल, या च श्रद्धेनें आम्ही कार्य करीत आहोंत. ही कांहीं अंधश्रद्धा नव्हे, तर अनुभवश्रद्धा आहे.

## सामूहिक लक्ष्मी

जेव्हां आम्ही गांवोगांव जाऊन घरांघरांतून सहावा, आठवा किंवा दहावा हिस्सा दान म्हणून मागूं, तेव्हां त्यांच्याकडून पैसा कांहीं घेणार नाहीं. लोक धान्य देतील किंवा दुसऱ्या कांहीं वस्तु देतील. या ज्या वस्तु मिळतील, त्या समूहाला च मिळतील, गांवाला च मिळतील व अशा प्रकारें खेड्यांखेड्यांत सामूहिक लक्ष्मी निर्माण होईल. मी पैसा किंवा संपत्ति हा शब्द वापरीत नाहीं. कारण त्यामुळें गैरसमज होतो. मी 'लक्ष्मी' हा च शब्द

वापरतों. उदाहरणार्थ, सुतार पांच नांगर बनवून देईल, दुसरा कोणी इतर वस्तु देईल व अशा रीतीनें सामूहिक लक्ष्मी बनेल. ही च गोष्ट मी खेड्यांतील लोकांना व शहरांतील लोकांना हि सांगतों. तुमच्या संपत्तींत इतरांचा हि हिस्सा आहे हें मी त्यांना सांगतों. तुम्हीं आपल्याला आपल्या संपत्तीचे पूर्ण मालक कां समजतां ? तुम्ही हि आपलया संपत्तीचे एक हिस्सेदार च आहांत. आपला व समाजाचा विरोध आहे असें तुम्हीं कां मानतां ?

## विपरीत बुद्धि

अखेर, कारखान्यांतले मजूर व मालक या दोघांचे हितसंबंध परस्पर विरुद्ध आहेत असें कां मानावें ? बापांचें व मुलांचें वेगवेगळें संघटन होत आहे व ते परस्परांशीं झगडत आहेत असें कोणीं पाहिलें आहे काय ? एक अखिल भारतीय मुलांची संघटना व दुसरी अखिल भारतीय बापांची संघटना व्हावी व दोघांनीं आपापल्या हितरक्षणासाठीं परस्परांविरुद्ध झगडावें असें कधीं होऊं शकेल काय ? पण आज तर शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे संघ बनत आहेत व आपलें हित परस्परविरोधी आहे असें ते समजत आहेत. आणि तिकडे विद्येची लूट चालली आहे. ही सारी विपरीत बुद्धि आहे. हीं आसुरी संपत्तीचीं लक्षणें आहेत.

शारीरिक श्रम करणारे हि आपल्या संपत्तींत सहभागी आहेत, हा विचार मी श्रीमंतांना समजावून देऊं इच्छितों. आजकाल लोक प्रत्येक गोष्टींत मोठा वाटा ( लायन्स शेअर ) मागतात. पण 'सिंहाचा वाटा' हा भयंकर शब्द आहे. जो प्रजेला खातो तो च राजा होऊं शकतो, हा जनावरांचा कायदा आहे. म्हणून समाजाच्या संपत्तींतील 'सिंहाचा वाटा' जे मागतात, त्यांना मी हें विचारतों कीं, आपण जनावरांचा कायदा कां स्वीकारावा ?

## जीवनभर एक हिस्सा देण्याचा विचार

येशू ख्रिस्तानें जसें सांगितलें कीं, 'ईश्वरानें आजची भाकरी आम्हांला द्यावी. उद्यांच्या भाकरीची चिंता आम्हीं आज करतां कामा नये.' —असा नियम आम्हीं बनविला पाहिजे. खाणें हें ख्रिस्तानें पाप मानलें आणि म्हटलें कीं, 'आजचें पाप आजच्यापुरतें पुष्कळ आहे.' प्रत्येक धर्मानें हेंच सांगितलें आहे :

'अद्य: अद्य: श्व: श्व: ।' म्हणून उद्यांची चिंता सोडा व फक्त आजची करा. तुमचीं मुलेंबाळें हीं समाजाचीं च नाहींत का? व्यापारांत ज्याप्रमाणें सहकार असतो, त्याप्रमाणें मालक-मजुरांत कां नसावा? मी समतेच्या च तत्त्वावर ही गोष्ट बोलत आहें हें मला स्पष्ट केलें पाहिजे. मी शहरवाल्यांना हें च समजावून देईन कीं, खेड्यांमधून तुम्हीं भरभरून संपत्ति आणली आहे, तेव्हां खेड्यांतील लोकांचा तुमच्या संपत्तींत हिस्सा आहे असें माना. केवळ एकदां च दान देऊन सुटका करून घेऊं नका. मनुष्य जेव्हां लग्न करतो तेव्हां तो सुटतो कीं बांधला जातो? कोणत्या हि धर्मकार्यांतून सुटका करून घेण्याची माणसाची इच्छा नसते. पापकर्मांतून मात्र तो सुटका करून घेऊं इच्छितो. तो म्हणतो एकदां पाप केलें पण आतां दुसऱ्यांदा करणार नाहीं. म्हणून मी संपत्तिदान देणाऱ्यांना म्हणतों कीं, हें काय पाप-कर्म आहे कीं, त्यांतून तुम्हीं सुटूं इच्छितां? हें धर्म-कार्य समजून वारंवार करीत राहिलें पाहिजे, जन्मभर करीत राहिलें पाहिजे.

लोक म्हणतात कीं, हें फार कठिण काम आहे. पण मी म्हणतों कीं, हें कठिण नाहीं. एका माणसानें मला सांगितलें कीं मी दर महिन्याला आपणांस पंचवीस रुपये देईन व जन्मभर देत राहीन. मीं म्हटलें हें ठीक नाहीं. उद्यां तुम्ही दरिद्री झालांत तर तुम्हांला आपली प्रतिज्ञा मोडावी लागेल. परंतु निश्चित रक्कम न सांगतां आपल्या मिळकतीचा सहावा किंवा असा च हिस्सा देण्याचें ठरवाल तर त्याचें जन्मभर पालन करणें तुम्हांला शक्य होईल. मग तुम्हांला अर्धी भाकरी मिळाली, तरी तिचा सहावा हिस्सा देतां येईल व उपवास पडला, तर त्याचा हि सहावा हिस्सा देतां येईल. तेव्हां माझा विचार नीट समजावून घेतलांत, तर तुम्हांला त्याचा बोजा वाटणार नाहीं. माणसाला स्वतःच्या शरीराचें जसें ओझें वाटत नाहीं, त्याप्रमाणें धर्म-कार्याचें हि ओझें वाटतां कामा नये. धर्म-विचार हा जीवनदायी विचार असतो.

## केवळ शुद्धि च नव्हे, तर शक्ति देखील

अपरिग्रहांत शक्ति हि आहे ही गोष्ट आम्हीं ध्यानांत घेतली पाहिजे. अपरिग्रहांत शुद्धि आहे याची जाणीव आम्हांला आहे. पण त्यांत शक्ति हि आहे, ही गोष्ट आम्हीं लक्षांत ठेवली पाहिजे. त्यांत जीवन उत्तम तऱ्हेनें

चालविण्याची सांसारिक शक्ति आहे. गांधी-स्मारक निधीचे जे दहा कोटि रुपये जमले आहेत, त्यांच्याऐवजीं शंभर कोटि रुपये जमले असते, तर काय झालें असतें ? पण आमच्या या संपत्तिदानाच्या पद्धतीमुळें तर प्रत्येक घर ही च आमची बँक होते. तिच्या शक्तीला कांहीं सीमा च नाहीं. त्यांत देवाण घेवाण ही हि स्थानिक च राहते. त्यामुळें ही योजना अतिशय सोपी होते. त्यांतून सरळ सामूहिक शक्ति निर्माण होते, त्या च प्रमाणें रचना व व संघटना या हि\तयार होतात. त्याग व समय यांचें महत्त्व आम्हीं मान्य केलें आहे. पण या साऱ्या शक्ति आहेत या दृष्टीनें आम्हीं विचार केला पाहिजे व समजून घेतलें पाहिजे. आजपर्यंत आपणांला जी जमीन मिळाली आहे, तिची सरासरी किंमत शंभर रुपये एकर धरली, तर वीस लाख एकर जमिनीचे वीस कोटि रुपये होतील. मीं जर वीस कोटि रुपये जमवले असते, तर त्यांत किती भानगडी झाल्या असत्या आणि केवढें पाप झालें असतें !

## कागद मागणारा भगवान्

एका वर्तमानपत्रकर्त्यानें माझ्याबद्दल विनोदानें लिहिलें होतें कीं 'विनोबांना जमीन नको व संपत्ति हि नको, त्यांना फक्त दानपत्र पाहिजे. हा कागद मागणारा देव आहे. फुलांनीं संतुष्ट होणाऱ्या देवाला ज्याप्रमाणें तुम्ही फुलांच्या माळा वाहतां, त्याप्रमाणें यांच्या हि गळ्यांत दानपत्रांची एक माळ घालून द्या म्हणजे तुमचें कांहीं खर्च होणार नाहीं. 'खरचत नहीं गठरी; भजो रे भैय्या राम गोविंद हरि।' त्या पत्रकर्त्यानें हें विनोदानें लिहिलें होतें. पण खरोखर च तशी वस्तुस्थिति आहे. दान देणाऱ्या माणसाच्या पैशापेक्षां त्याच्या वचनाची किंमत च मला अधिक वाटते. संपत्तिदानांत आज एवढें तरी आहे कीं, त्याचा विनियोग करावयाचा कसा हें मी सांगू शकतों. पण जेव्हां या प्रकारें कोट्यवधि रुपयांचें दान मिळूं लागेल, व त्याचा विनियोग करण्याबद्दल कांहीं सांगणें शक्य होणार नाहीं, तेव्हां परभारे च वांटप होऊं लागेल. दान एकत्र करण्याचा प्रश्न च निर्माण होणार नाहीं. तेव्हां जुन्या निधींशीं या यज्ञाचें कसलें हि साम्य नाहीं, हें आम्हीं नीट समजून घेतलें पाहिजे. बाहेरून निधि एकत्र करण्याची कसली च योजना यांत नाहीं.

खादीग्राम (मुंगेर) ३-९-१९५३

## जनतेच्या प्रत्यक्ष इच्छेनें च प्रश्न सोडवावा : १४ :

माझी तर अशी इच्छा आहे कीं, ज्याप्रमाणें आतां पाऊस थेंब थेंब पडला, त्याप्रमाणें च भूदान-यज्ञ, संपत्तिदान-यज्ञ व श्रमदान-यज्ञ यांच्यांत थेंबा-थेंबानें दान मिळावें, पण प्रत्येकाकडून मिळावें. म्हणजे हें एवढें काम हि लवकर पुरें होईल.

### मानवशक्तीचा आविर्भाव हा च अवतार

याप्रमाणें दान देण्याची वृत्ति सर्वांची होऊं शकेल का, अशी शंका कांहीं लोक प्रकट करतात. मी विचारतों कीं कां होऊं नये अशी वृत्ति? जो मनन करतो, विचार समजून घेतो व त्यावर च आपलें जीवन चालवितो तो च वस्तुतः मानव होय. आम्हीं जर सत्य विचार सर्वांना समजावून सांगितला, तर दानाची प्रेरणा कुणाला कां होणार नाहीं? वाफेच्या शक्तीनें आगगाड्या चालूं शकतील अशी कल्पना हि एके काळीं कोणाला नव्हती. पण एक शास्त्रज्ञ निघाला, त्यानें वाफेच्या शक्तीचा शोध केला व नंतर वाफेचा उपयोग जगभर केला जाऊं लागला. अखेर वाफेंत काय आहे? वाफ ही कांहीं लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे का? ती अगदीं क्षुल्लक अशी वस्तु आहे. पण त्या शास्त्रज्ञाच्या शोधानंतर वाफेंत केवढी विलक्षण शक्ति आहे हें कळून आलें. त्या च प्रमाणें मनुष्यांत केवढ्या सुप्त शक्ति आहेत याचा पुरा अंदाज अजून आपल्याला लागला नाहीं. म्हणून च अशा या शंका घेतल्या जातात. पण जसजसें माणसाच्या आत्म्याचें संशोधन होत राहील, तस-तशी मानवाची एकेक नवी शक्ति आपल्या पुढें प्रकट होईल. याला च 'अवतार' म्हणतात. मानव-हृदयाच्या शक्तीचा आविर्भाव होणें म्हणजे च अवतार होय. जेथें सत्यनिष्ठा प्रकट झाली, तेथें तिनें रामचंद्राचें रूप धारण केलें. जेथें निष्काम कर्मयोग प्रकट झाला, तेथें त्यानें श्रीकृष्णाचें रूप घेतलें. जेथें करुणा साकार झाली, तेथें तिनें बुद्धाचें रूप धारण केलें. मनुष्याला अवतार मानणें हें आपल्या इंद्रियवशतेमुळें घडून येतें. इंद्रियांना पाहण्यासाठीं कांहीं पाहिजे असतें, म्हणून ते रूप निर्माण करतात. वस्तुतः राम, कृष्ण व

बुद्ध हे कांहीं अवतार नाहींत. परंतु त्यांच्या ठायीं सत्यनिष्ठा, निष्काम कर्मयोग व करुणा यांचा आविर्भाव घडून आला होता. मानवतेची अशी शक्ति ज्या ठायीं प्रकट होते, तेथें अवतार होतो. नंतर मूर्तिपूजक माणसानें त्यांत देवत्वाचें आरोपण केलें. त्यामुळें उपासना सुलभ झाली. वस्तुतः अवतार हा शरीराचा नाहीं, तर मानव-हृदयाच्या भावनेचा असतो. आध्यात्मिक संशोधन जसजसें वाढत गेलें, तसतसें उत्तरोत्तर श्रेष्ठ अवतार होत गेले. ही च समाजाच्या विकासाची प्रतिक्रिया होय. मानवाच्या आत्म्यांत आजवर जी शक्ति प्रकट झाली, तेवढी च ती राहणार आहे, हें मानणें म्हणजे संकुचिततेचें व अज्ञानाचें लक्षण आहे. आत्म्यांत अनंत शक्ति असतात. जशी परिस्थिति, गरज, व मागणी, असते त्याप्रमाणें आत्म्याची शक्ति प्रकट होत राहते.

## स्वराज्यानंतर आर्थिक क्षेत्रांत शक्तीचा अवतार

इंग्रज जेव्हां हिंदुस्थानांत आले व त्यांनीं आपलें राज्य प्रस्थापित केलें, तेव्हां एक चमत्कार करून दाखविला. त्यांनीं सारा देश निःशस्त्र बनवून टाकला. तेव्हां देशापुढें अशी समस्या निर्माण झाली कीं, एक तर देशाला नेहमीं च गुलामगिरींत रहावें लागेल, नाहीं तर शस्त्रांशिवाय संकटांचा सामना करून देशाला मुक्त करणाऱ्या शक्तीचा आविष्कार तरी करावा लागेल. परिस्थितींत जेव्हां अशी गरज निर्माण झाली, तेव्हां 'अहिंसक प्रतिकार' व 'सत्याग्रह' यांचा आविष्कार झाला. महात्मा गांधी त्याचें केवळ निमित्त बनले. मीं अनेकदां म्हटलें आहे कीं, ते झाले नसते तर त्यांच्या जागीं दुसरें कोणी झालें असतें. पण या शक्तीचा आविष्कार होणार च होता. कारण परिस्थितीची व काळाची तशी मागणी होती. जिच्यामुळें एवढ्या मोठ्या साम्राज्यशाहीशीं टक्कर घेतां आली व अखेर त्या साम्राज्यशाहीला देश सोडून जावें लागले. अशी एक प्रचंड शक्ति अहिंसेंत आहे हें लोकांनीं प्रत्यक्ष पाहिलें च आहे. यामुळें असा चमत्कार घडला कीं, पूर्वीचे जुलूम करणारे व जुलूम सोसणारे यांच्यांत प्रेमाचें नातें निर्माण झालें. जुलूम नष्ट झाला, जुलूम सहन करणें नाहींसें झालें, व दोघे मित्र बनले. अशा प्रकारें त्या शक्तीचा आविष्कार झाला व आपणांस स्वराज्य मिळालें हें आपल्याला माहीत च आहे. आजवर

स्वराज्यासाठीं अनेक देशांत प्रयत्न झाले. पण हिंदुस्थानांतील हा आविष्कार वेगळा होता. कारण यांतून मानव-हृदयाची नवी शक्ति प्रकट झाली.

आतां स्वराज्यानंतर हिंदुस्थानांत आर्थिक स्वातंत्र्य, गरिबीचें उच्चाटन व साम्ययोगाची स्थापना हें कार्य सुरू झालें आहे. तेव्हां आर्थिक क्षेत्रांत हि त्या शक्तीचा आविष्कार झाला पाहिजे आणि तसा तो होत आहे यांत कांहीं संशय नाहीं. म्हणून असें कधीं म्हणूं नका कीं आजवर जें घडलें नाहीं तें पुढें कसें होणार ? वस्तुतः यासाठीं च ईश्वरानें मला जन्म दिला आहे. जर मानव-जीवनांत करण्याचीं सारीं कामें केलीं गेलीं असतीं व माझ्यासाठीं कांहीं च करण्याचें शिल्लक ठेवलें नसतें, तर ईश्वरानें मला जन्माला कां घातलें असतें ? पण त्यानें माझ्यासाठीं एक नवा पुरुषार्थ शोधून ठेवला होता, व त्यासाठीं अंतरात्म्यांत बुडी मारून नव्या शक्तीचा आविर्भाव करण्याची जबाबदारी त्यानें माझ्यावर टाकली.

## जनतेची परोक्ष व प्रत्यक्ष इच्छा

म्हणून च आतांपर्यंत जरी प्रत्येक दात्याकडून थेंब थेंब पाण्याप्रमाणें दान मिळालेलें नसलें, प्रत्येक जण देत आहे अशी घटना घडलेली नसली, तरी आतां ती घडणार आहे. कायदा ही जनतेची इच्छा-शक्ति आहे व तिनें निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या द्वारां ती प्रकट होत आहे, असें च मी समजतों. अखेर कायदा ही हि लोकांची च शक्ति आहे. आपण च बनविलेल्या कायद्याला जर लोक वश होऊं शकतात, तर परमेश्वराचा जो प्रेमाचा कायदा आहे व ज्याचा जीवनांत आपणांस नेहमीं अनुभव येत राहतो, त्या कायद्याला लोक कां वश होणार नाहींत ? मनुष्याचा जन्म प्रेमांतून होतो, प्रेमानें च त्याचें पालनपोषण होतें व अखेरच्या क्षणींहि प्रेमाचा भुकेला हा मनुष्य प्रेम मिळाल्यानें प्रसन्न होऊन जग सोडतो. याप्रमाणें जीवनाचा आदि, मध्य व अंत प्रेमावर च आधारलेला आहे, व मानवाला तें च मधुर वाटत आलें आहे. तेव्हां मी असें विचारतों कीं, ‘कायद्यावांचून च जर माता आपल्या मुलांना पाजतात, सगळे लोक जर कायद्यावांचून च इतक्या प्रेमानें वागतात, तर या च प्रेमाचें, एक चिह्न म्हणून आपल्या गरीब बांधवांसाठीं संपत्ति देणें, आणि ती यज्ञांतील हिस्सा

व धर्म समजून कायद्याशिवाय देणें त्यांना कां सुचणार नाहीं ?' माझ्या या प्रश्नाचें उत्तर मला कोणीं च दिलें नाहीं.

मनुष्याची परोक्ष इच्छा म्हणजे कायदा. कायद्यामुळें जर काम होणार असेल, तर मनुष्याच्या प्रत्यक्ष इच्छेनें तर तें अवश्य च झालें पाहिजे व लवकर झालें पाहिजे. हें सहज झालें पाहिजे तसें च सुंदर झालें पाहिजे. याप्रमाणें मौलिक श्रद्धा ठेवणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मनांत कसली च शंका येत नाहीं. ज्या-प्रमाणें प्रकाशाला अंधार पाहण्यास च मिळत नाहीं, त्या च प्रमाणें मला हि ही शंका दिसत नाहीं. असा हा विश्वास मीं समाजाला पटवला, तर समाजाला तो चटकन् पटेल असें मला वाटतें. ही गोष्ट त्यांच्या आत्म्यांत च अंतर्भूत आहे. ती जर आत्म्याच्या स्वभावाविरुद्ध असेल, तर जबरदस्ती करून हि त्याला ती पटणार नाहीं व मारून हि पटणार नाहीं. परंतु आत्म्याच्या स्वभावांत असणारी व त्याच्या प्रकृतीला अत्यंत अनुकूल अशी जर एखादी गोष्ट केली जात असेल, तर ती त्याला समजावण्याचा च फक्त अवकाश आहे ; समजावल्यावर काम झाल्याशिवाय राहणार च नाहीं. या च श्रद्धेनें मी आपणांकडे आलों आहें आणि आनंदाची गोष्ट ही कीं, लोक दान देत आहेत. लोकांनीं जेवढें दिलें तेवढें एवढ्या थोड्या काळांत मिळविण्याची आशा करणें शक्य च नव्हतें. माझा असा विश्वास आहे कीं, गंगेचा उगम झाला आहे आणि ही जी गंगा आतां वाहत चालली आहे ती आतां थांबणें शक्य च नाहीं.

खादीग्राम
४-९-५३

---

## सख्य-भक्तीचा काळ आला आहे : १५ :

आज सप्टेंबरची १४ वी तारीख आहे. गतवर्षी या च दिवशीं मीं बिहारमध्यें प्रवेश केला. एक वर्ष पूर्ण झालें. या काळांत बिहारी बांधवांशीं माझे उत्तम संबंध जुळून आले आहेत. त्यांच्याशीं परिचय हि दृढ झाला आहे. मीं हें पाहिलें कीं बिहारमध्यें पुष्कळ सामर्थ्य आहे. पण तें जागृत करण्याची गरज आहे. आतां राजामहाराजांचे दिवस संपले आहेत हें सर्वांना माहीत आहे. बड्या जमीनदारांचे हि दिवस राहिले नाहींत. यापुढचें जग हें जनतेचें जग होणार आहे. त्या जगांत सगळ्या जनतेचा आवाज हा च प्रमाण मानला जाईल. आज सगळीकडे समतेची भूक निर्माण झाली आहे. आजच्या काळाला बरोबरीचें नातें हवें आहे. हा सख्य-भक्तीचा काळ आहे.

### सख्य-भक्ति आणि दास्य-भक्ति

अर्जुन व भगवान् श्रीकृष्ण यांच्यांत सख्य-भक्तीचें नातें होतें. दोघे बरोबरीनें काम करीत होते. भगवंतापाशीं ज्ञानाचें भांडार होतें आणि अर्जुनाचें ज्ञान परिमित होतें ; तो पराक्रमी होता खरा, पण त्याचा पराक्रम हि सीमित होता आणि भगवंतांची शक्ति मात्र असीम होती. तरी हि दोघांमध्यें समानतेचें, मित्रत्वाचें, नातें होतें. अर्जुनाच्या हृदयांत भगवंतांबद्दल निरतिशय आदर होता. तरी हि त्यांचें नातें समानतेचें होतें. या काळापूर्वी हि एक उत्तम कालखंड होता. पण तो दास्य-भक्तीचा काळ होता. त्या काळांत स्वामी-सेवकाचा भाव असे. स्वामी-सेवकांत परस्पर प्रेम असे. स्वामी सेवकांचें पालनपोषण करी व सेवक स्वामीची भक्ति करी. तो हनुमंताचा काळ होता. त्यानें जी रामाची भक्ति केली, ती दास्य-भक्ति होती.

पण आजच्या जगाला सख्य-भक्तीची भूक लागली आहे. याचा असा मात्र अर्थ नव्हे की पूज्य पुरुषांबद्दल लोकांत आदर नाहीं. पण आदर असून हि आतां बरोबरीचें च नातें राहणार आहे. जेव्हां युद्धाचा प्रसंग आला, तेव्हां अर्जुनान श्रीकृष्णाला विचारलें, 'तुम्ही मला साह्य करणार ना? तेव्हां माझें सारथ्य करावें व माझ्या अश्वांचें नियंत्रण करावें.' याप्रमाणें त्यानें

आपल्या आदरणीय पुरुषाला घोड्यांची सेवा करण्याचें काम दिलें. अशा प्रकारचा त्यांचा मित्र-संबंध होता. हनुमंताच्या काळांत मात्र समाज-रचना अशी होती कीं, कांहीं शक्तिशाली पुरुष स्वामी होते व कांहीं सेवापरायण लोक सेवक होते. स्वामी व सेवक यांच्यांत प्रेम होतें, संघर्ष नव्हता. पण त्या काळीं व्यक्ति-विकास एका ठराविक मर्यादेपर्यंत च होत होता.

रामचंद्र हे ' राजा राम ' होते. पण कृष्ण मात्र ' राजा कृष्ण ' नव्हता. तो 'गोपाल कृष्ण' होता, सर्वांचा मित्र होता. आजच्या काळांत स्वामी-सेवकाचें नातें हें प्रेमाचें असलें, तरी तेवढ्यानें माणसांची तृप्ति होत नाहीं. मध्यंतरीं असा एक काळ आला होता कीं त्यावेळचे स्वामी जुलमी निघाले व सेवकांच्या मनांत स्वामींबद्दल आदर राहिला नाहीं. आज हि स्वामी-सेवकांचे संबंध चांगले राहूं शकतात. पण आजच्या काळाची मागणी मात्र सख्य-भक्तीची आहे. स्वामी-सेवकाचें नातें हें सध्यांच्या काळाच्या दृष्टीनें अपुरें आहे.

## मित्राच्या नात्यानें दानाची मागणी

तेव्हां मी ज्यावेळीं दान मागतों, त्यावेळीं असें नाहीं म्हणत कीं, ' आपण मोठे आहांत, स्वामी, मालक आहांत. मला दान द्यावें. मी आपली सेवा करीन. आपला आमच्यावर फार मोठा उपकार होईल. '—मी तर असें सांगतों कीं, 'सर्वजण हे भाऊ-भाऊ आहेत. तेव्हां आपल्या योग्यतेप्रमाणें आपला हिस्सा द्या. ' शंकराचार्यांच्या मतें दानाचा अर्थ ' समान विभाजन ' हा च आहे. म्हणून जेव्हां कोणी मला शंभर एकरांतून फक्त दोन एकर च देतात, तेव्हां मी तें दान घेत नाहीं. मी जर सेवकाच्या भावनेनें दान मागत असतों, तर दोन एकर हि घेतलें असतें, त्यांना नमस्कार केला असता व त्यांचे उपकार मानले असते, पण आज मी मित्राच्या नात्यानें दान मागत आहे.

## सख्य-भावाच्या आधारावर समाज रचना

आजची समाज-रचना सख्यभावाचा च फक्त स्वीकार करील. आज गुरु-शिष्य हि एकमेकांचे मित्र बनतील. दोघे परस्परांवर प्रेम करतील. गुरु शिष्याला शिकवील व शिष्य हि गुरूला शिकवील. ज्याच्याजवळ जें असेल तें तो दुसऱ्याला देईल, व दोघे हि परस्परांचे उपकार मानतील. याप्रमाण

बरोबरीचें नातें ठेवून च गुरु-शिष्य राहतील, मालक-मजूर राहतील, आणि स्वामी-सेवक हि राहतील.

एक काळ असा होता कीं, तेव्हां पत्नी पतीला पतिदेव मानीत होती व स्वत:ला त्याची दासी समजत होती. तो काळ हि वाईट नव्हता, पण आज आम्हीं एक पाऊल पुढें टाकलें आहे. आजची पत्नी पतिव्रता राहील व पति हा पत्नीव्रती राहील. दोघे परस्परांना आपला देव मानतील. ज्याची योग्यता अधिक असेल त्याचा आदर होईल. पतीची योग्यता अधिक असली, तर पत्नी त्याचा आदर करील आणि पत्नीची योग्यता अधिक असेल, तर पति तिचा आदर करील. तरी हि दोघांचें नातें बरोबरीचें राहील. याला च मी 'सख्यभक्तीचें युग' म्हणतों.

त्या त्या युगाच्या मागणीप्रमाणें च आपणांस समाज बनविला पाहिजे. त्यानंतर काय करावयाचें याचा विचार मी आज करीत नाहीं. परंतु हें स्पष्टपणें समजून घेतलें पाहिजे कीं, जुन्या काळांतलीं मूल्यें जशींच्या तशीं च यापुढें राहणार नाहींत. तुलसीरामायणाच्या काळांत जीं मूल्यें होतीं, तीं आज राहिलीं नाहींत. त्या काळांत ब्राह्मण श्रेष्ठ समजला जाई. पण आजच्या काळांतील रामायणांत केवळ ब्राह्मण च श्रेष्ठ समजला जाणार नाहीं. जेथें योग्यता असेल तेथें तिचा आदर केला जाईल. पण नातें मात्र बरोबरीचें च राहील.

या काळांत हि कारखानदार व मजूर राहतील च. पण एकांत अक्कल जास्त असली, तरी मजूर असें म्हणणार नाहीं कीं, तुम्ही मालक आहांत व मी तुमचा नोकर आहें. हें नातें आतां चालणार नाहीं. आतां ते एकमेकांचे सहकारी बनतील. कारखानदाराला आपल्या बुद्धीबद्दल वेतन मिळेल व मजुराला आपल्या श्रमशक्तीबद्दल तेवढें च वेतन मिळेल. सर्वांचें च वेतन समान राहील. ज्याची योग्यता अधिक असेल, त्याचा आदर केला जाईल, पण सर्व एकमेकांचे मित्र व साथी बनतील.

आजच्या काळांतील भाऊभाऊ, गुरु-शिष्य, व पति-पत्नी यांचें नातें नव्या मूल्याप्रमाणें बनेल. त्यांत एक नवा च आनंद येईल. जुन्या काळांतील नात्यांत हि आनंद होता. पण तो आतां राहिला नाहीं. आज पत्नी साध्वी

असली तरी तिची पर्वा केली जात नाहीं. नात्यांत जेथें बिघाड होतो, तेथें नव्या काळाची मागणी पुढें आली च. आज खुद्द रामचंद्र हि पृथ्वीवर येऊन 'राजाराम' बनूं इच्छितील, तर तें आम्हांला मान्य होणार नाहीं. महात्मा गांधी हि पुन्हां आले, तर आम्ही त्यांना 'राजा गांधी' नाहीं करणार, तर महात्मा च ठेवूं. जुन्या काळीं चांगले राजे होऊन गेले खरे. पण वाईट राजे मात्र त्यांच्यापेक्षां अधिक झाले.. त्या काळीं प्रजेचा विकास एका ठराविक मर्यादेपर्यंत च होत असे. पण आजचा काळ मात्र खूप पुढें गेला आहे.

## काळाच्या विरुद्ध जाऊन कोणी टिकूं शकत नाहीं

बदलत्या काळानुसार जे लोक वागत नाहींत, त्यांना यश मिळत नाहीं, इतकें च नाहीं, तर ते मार हि खातात. प्रवाहांत मनुष्य पोहला नाहीं, तरी तो पुढें पुढें च वाहत जातो. पण तो जर प्रवाहाविरुद्ध जाऊं पाहील, तर खूप श्रम करून हि तो पुढें सरकूं शकणार नाहीं. आज मनुष्य केवढा हि मोठा असला, तरी त्याची जुनी शान, थाट, व ऐट यापुढें चालणार नाहींत. याचें एक उदाहरण माझ्यापुढें आहे. परशुराम हे थोर पुरुष होते. त्यांचा दरारा हि फार होता. एकवीस वेळां त्यांनीं पृथ्वी निःक्षत्रिय बनवून टाकली. ते अवतार च होते. पण जेव्हां रामचंद्रांचा नवा अवतार झाला, तेव्हां आतां नवा अवतार झाला आहे हें त्यांनीं जाणून घ्यावयास हवें होतें. पण त्यांनीं तें जाणलें नाहीं व रामाशीं सामना केला. त्यांचा त्यांत पराभव च झाला. पशुरामासारखा बलशाली पुरुष हि जेथें काळाच्या विरुद्ध जाऊन टिकूं शकला नाहीं, तेथें इतरांची काय कथा? जुने प्रकार चांगले हि असले, तरी नव्या काळांत ते चांगले समजले जात नाहींत.

## प्रेम समानतेचें पाहिजे

आज कार्यकर्त्यांशीं बोलतांना मीं सांगितलें कीं, 'आम्हांला सहावा हिस्सा पाहिजे' याचा अर्थ कांहीं कर वसूल करावयाचा नाहीं. जमीन, संपत्ति व उत्पादनाचीं साधनें यांवर सर्वांचा समान हक्क आहे, हा विचार मी समजावून सांगत आहें इतकें च. जो काळाची मागणी लोकांपुढें ठेवतो, तो उद्धट समजला जातो. पण त्याला तुम्ही उद्धट समजाल, तर तो उद्धट बनेल. पण

तुम्हीं जर चालू काळाची मागणी ओळखाल, तर सगळे मागणारे नम्र होतील व लहान थोरांचा आदर करतील.

लोक म्हणतात कीं, आजकाल मुलें आईबापांचा मान राखीत नाहींत. पण मूल तर जन्मापासून च आईवर पूर्ण श्रद्धा ठेवून वागत असतें. हा चंद्र आहे असें आईनें सांगितलें कीं, मूल त्यावर विश्वास ठेवतें. 'थांब, हा चंद्र आहे कीं नाहीं याची मला चौकशी करूं दे.' असें कांहीं तें आईला म्हणत नाहीं. एवढी श्रद्धा असून हि, मुलें आईबापांना मानीत नाहींत असें लोकांनीं म्हणावें हें आश्चर्य च आहे. पण आईबापांना च काळाचीं पावलें ओळखतां येत नाहींत असें मी म्हणेन. आईबापांनीं मुलांशीं बरोबरीच्या नात्यानें वागावें व त्या च वृत्तीनें प्रेम करावें. त्यांना आज्ञा करूं नये, तर सल्ला द्यावी त्यांना मारूं नये. पूर्वीं आईबाप मुलांना मारीत, पण प्रेमानें मारीत. आजच्या काळांत मात्र तें चालणार नाहीं. आतां तर आईनें म्हणावें कीं 'मी तुला शिक्षा करणार नाहीं, तर स्वतःला शिक्षा देऊन उपवास करीन.' मुलांना हि मारायचें नाहीं काय? असा प्रश्न लोक विचारतात. यावर मी असें उत्तर देतों कीं, 'जें मूल लहानपणापासून तुमच्यावर पूर्ण श्रद्धा ठेवून वागत आलें आहे, त्याला मारण्याचा प्रश्न च उत्पन्न होत नाहीं. आज मुलांना नुसतें प्रेम नको असतें, तर बरोबरीच्या नात्याचें प्रेम हवें असतें.

## ही काळाची मागणी आहे

प्रत्येकांत कांहीं वैशिष्टय व कांहीं कमीपणा असतो. मजुरांत बुद्धि कमी असली, तर हृदय अधिक चांगलें असूं शकतें. तो दुसऱ्यासाठीं जीव देण्यास हि तयार असूं शकतो. म्हणून आतां बरोबरीच्या नात्याचें प्रेम पाहिजे. नुसत्या प्रेमानें यापुढें तृप्ति होणार नाहीं. भूदान-यज्ञ जर काळाच्या मागणीच्या अनुसार नसता, तर लहान लहान लोकांनीं आम्हांला जमीन दिली नसती आणि बडयांमधील कांहीं लोकांनीं आम्हांला बाहेरचा रस्ता च दाखवला असता. पूर्वीं जे लोक देत त्यांचे उपकार मानावें लागत. पण आज तर आम्ही प्रत्येकापाशीं जमीन मागत आहोंत, कारण तुम्ही जमिनीचे मालक नाहीं, हें आम्हांला प्रत्येकाला पटवून द्यावयाचें आहे. गरिबाच्या हि घरांत सहावा मुलगा असेल, तर त्याला ते आपला हिस्सा देणार नाहींत कां? अवश्य देतील. या च प्रमाणें

आम्ही सर्वांपाशीं मागतों व आम्हांला मिळतें हि. मी तर आतां असें म्हणतों कीं जितके शेतकरी आहेत, तितकीं दानपत्रें मिळालीं पाहिजेत. जेव्हां एखादा, मनुष्य काळाची मागणी जाणतो व धर्मभावना जागृत करतो, तेव्हां त्याची गोष्ट मान्य करणें प्रत्येकाला भाग च पडतें. हा जो नव-विचार मी सांगत आहें, तो मीं माझ्या पिशवींतून काढलेला नाहीं, तर तो चालू काळांतून च निघालेला आहे. या विचाराचा प्रसार करण्याच्या दृष्टीनें काम करा, फक्त जमीन मागण्याच्या दृष्टीनें करूं नका. आतां सख्यभक्तीचा काळ आला आहे, असें तुम्हीं लोकांना समजावून द्याल, तर तुम्हांला आपल्या कार्यांत यश मिळेल.

किया जोरी १४-९-५३

---

## भेदासुराचा अंतकालीन आक्रोश : १६ :

(गेल्या सप्टेंबरला देवघरमध्यें प्रार्थना-प्रवचनाच्यानंतर आपल्या सहकार्यांसह हरिजनांना घेऊन पूज्य विनोबा वैद्यनाथ महादेवाच्या मंदिरांत दर्शनासाठीं गेले. ज्या मंदिरांत हरिजनांना प्रवेश नाहीं, त्यांत ते जात नाहींत. पण देवघरच्या प्रमुख पंड्यानें, त्या मंदिराच्या मुख्य व्यवस्थापकानें, असें कळविलें होतें कीं, या मंदिरांत हरिजनांना प्रवेश बंद नाहीं व ते आल्यास त्यांना कोणता च त्रास होणार नाहीं. हें कळल्यानंतर च विनोबांनीं मंदिरांत जाण्याचें ठरवलें. मंदिरापाशीं जातां च जी दुर्घटना घडली, ती सर्व लोकांना माहीत च आहे– ज्या प्रकारानें पंड्यांनीं विनोबांच्या सहकार्यांना मारहाण केली व खुद्द त्यांच्यावर हि प्रहार केले, तो धार्मिक व नैतिक दृष्टीनें तर निंदनीय आहे च, पण हरिजनांना मंदिरांत प्रवेश नाकारण्यानें त्यांनीं भारताच्या राज्यघटनेनुसार अपराध केला आहे. या घटनेला अनुलक्षून विनोबांनीं पुढील भाषण केलें आहे. )

काल वैद्यनाथधाममध्यें आपल्या सहकार्यांसह हरिजनांना घेऊन मी महादेवाच्या मंदिरांत दर्शनाला गेलों. महादेवाचें दर्शन तर मला घडलें नाहीं, पण त्यांच्या भक्तांच्या हातच्या माराच्या रूपानें त्याचा प्रसाद मात्र मिळाला.

या घटनेसंबंधीं लोक मला सारखे विचारीत आहेत. म्हणून मी हें निवेदन करीत आहें. प्रारंभीं च मी हें सांगूं इच्छितों कीं ज्यांनीं ही मारहाण केली, त्यांनीं ती अज्ञानानें केली. तेव्हां त्यांना कांहीं शिक्षा मिळावी असें मला वाटत नाहीं. मला या गोष्टीनें मात्र अतिशय संतोष झाला कीं, माझ्याबरोबर जे शेकडों सहकारी गेले होते, ते सर्व अतिशय शांत राहिले. एवढें च नव्हे, तर ज्यांना फार मारहाण झाली त्या माझ्या सहकाऱ्यांनीं असें सांगितलें कीं, 'त्यावेळीं आमच्या मनांत थोडा हि क्रोध उत्पन्न झाला नाहीं.' ज्या देशांत असे निर्वैर सेवक आहेत, त्या देशावर परमेश्वराची कृपा आहे असें च मी समजतों. मारहाण करणाऱ्यांनीं तर केवळ रागाच्या भरांत तें कृत्य केलें. कारण त्यांनीं मारतांना स्त्री व पुरुष हा हि भेद ठेवला नाहीं. ही घटना हा भेदासुराचा अंतकालीन आक्रोश च ठरेल असा माझा विश्वास आहे.

केवळ कायद्याच्या बळावर किंवा जबरदस्तीनें मंदिर-प्रवेश करण्याची माझी इच्छा नव्हती. उलट, जेथें हरिजनांना प्रवेश नाहीं, त्या मंदिरांत न जाण्याचा च मीं प्रघात ठेवला आहे. पण येथें जेव्हां आम्हीं विचारलें तेव्हां हरिजनांना मंदिरांत प्रवेश आहे, असें सांगण्यांत आलें. म्हणून च संध्या-काळच्या प्रार्थनेनंतर आम्ही मोठ्या श्रद्धेनें देवदर्शनाला निघालों. रस्त्यांत आम्हीं सर्वांनीं मौन पाळलें होतें. मी तर मनांत महादेवाच्या स्तुतिपर अशा वैदिक सूक्तांचें चिंतन करीत चाललों होतों. अशा परिस्थितींत जेव्हां आमच्या वर अनपेक्षित हल्ला झाला, तेव्हां माझ्यांत एक वेगळा च उत्साह निर्माण झाला. माझ्या सहकाऱ्यांनीं लागली च माझ्याभोवतीं कडे निर्माण केलें. त्यामुळें माझ्यावर म्हणून जे प्रहार केले गेले ते माझ्या सहकाऱ्यांनीं झेलले. तरी हि यज्ञ-शेष प्रसादाप्रमाणें मला हि थोडा प्रसाद चाखण्यास मिळाला च. ज्यांच्या चरणांचा मी दास म्हणवितों, त्यांच्यावर हि या च धामामध्यें अशी च जी मारहाण करण्यांत आली होती, त्या घटनेचें मला तात्काळ स्मरण झालें. मला हि तें च भाग्य प्राप्त झालें म्हणून एक अपूर्व धन्यता वाटली.

कोणाला या बाबतींत शिक्षा मिळावी अशी माझी मुळीं च इच्छा नाहीं हें मीं प्रांरभीं च सांगून टाकलें आहे. पण स्वराज्याच्या घटनेचें यांत स्पष्ट उल्लंघन झालें आहे. त्याचें परिमार्जन लहान-लहान शिक्षा देण्यानें होणार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रमांक

नाहीं. तेव्हां अशा घटनेची पुनरावृत्ति होणार नाहीं या दृष्टीनें याचा बंदोबस्त होणें अवश्य आहे. अशीं देवस्थानें सरकारनें आपल्या ताब्यांत घेतली तर तें अनुचित होणार नाहीं, असें मला वाटतें. त्यामुळें कदाचित् व्यवस्था हि अधिक चांगली होईल. मी ही कांहीं सूचना म्हणून ठेवीत नाहीं, तर हें एक प्रकट चिंतन करीत आहें.

हें युग विज्ञानाचें आहे. प्रत्येक धर्म बुद्धीच्या कसोटीवर पारखला जात आहे. हें ध्यानांत ठेवून आमचा समाज वागेल तर तें चांगलें होईल.
देवघर २०-९-५३

---

## साम्ययोगाचें समग्र दर्शन : १७ :

भूमिदान-यज्ञाच्या मागें जो विचार आहे, त्याचें नांव मीं 'साम्ययोग' ठेवलें आहे. या च साम्ययोगाच्या आधारावर आम्ही सर्वोदय-समाज निर्माण करूं इच्छितों. सर्वोदय-समाजाच्या बाबतींत आपणांला हें माहीत आहे कीं, तो बहुसंख्यांचें नव्हें, तर सर्व समाजाचें हित करूं इच्छितो. ज्या साम्ययोगाच्या आधारावर हा विचार उभा आहे, तो मी अधिक विस्तारानें विशद करूं इच्छितों. आज जगांत तीन विचारसरणी चालू आहेत, हें आपणांस माहीत आहे. एक जुना पुराणा भांडवलवाद आहे. क्षमता वाढविण्याचा आमचा हेतु आहे असें भांडवलवाद म्हणतो. दुसरा लोकशाही समाजवाद व तिसरा साम्यवाद. सर्वांना समान प्रमाणांत जीवनाच्या आवश्यक गरजांच्या वस्तु आम्ही देऊं इच्छितों, असा साम्यवादाचा दावा आहे.

### क्षमतावादी भांडवलवाद

जगांत प्रचलित असलेल्या या तीन विचारसरणींपैकीं प्रथम भांडवलवादाचा विचार करूं. भांडवलवाद हा मीं प्रथम सांगितल्याप्रमाणें क्षमतावादी आहे. त्याचें असें म्हणणें आहे कीं, कांहीं लोकांची योग्यता कमी आहे, तेव्हां त्यांना कमी च मिळालें पाहिजे. कांहीं लोकांची योग्यता अधिक असते,

तेव्हां त्यांना अधिक मिळालें पाहिजे. योग्यतेप्रमाणें श्रमाची किंमत देऊन समाजांत क्षमता उत्पन्न करण्याची त्यांची इच्छा आहे. यामुळें कांहीं लोकांचें जीवनमान खूप च उच्च पातळीवर गेलें आहे, तर बहुतेक सगळ्या लोकांचें जीवनमान दरींत पडल्याप्रमाणें खोल गेलें आहे. यावर भांडवलवादापाशीं कोणता च उपाय नाहीं. त्याचें तर सरळ सरळ असें म्हणणें आहे कीं, जे नालायक आहेत, त्यांना नालायकीवांचून दुसरी गति नाहीं आणि जे लायक आहेत त्यांनीं जगांतले सगळे सुखोपभोग घ्यावेत हें अपरिहार्य आहे. म्हणून च आज सर्वसामान्य जनता दुःखी आहे आणि भांडवलवादाचे समर्थक हि अगदीं कमी कमी होत चालले आहेत. पण अजून ती विचारसरणी चालू आहे. मात्र आज ना उद्यां ती नष्ट होणार च आहे.

## लोकशाही समाजवाद

लोकशाहींत प्रत्येकाला एकेक मत असतें. तेथें सारे काम मतांवर च चालतें. त्यांत बहुसंख्यकांचें च रक्षण होतें, अल्पसंख्यकांचें नव्हे. लोकशाही समाजवादाचें म्हणणें असें कीं, त्यांत सर्वांचें रक्षण होतें. पण त्यांतून उत्पन्न होणाऱ्या अनिष्ट गोष्टींवर कांहीं इलाज समाजवादापाशीं नाहीं. जोंवर बहुसंख्यकांच्या निर्णयानुसार च अल्पसंख्यकांच्या हिताचें रक्षण केलें जाणार तोंपर्यंत पूर्ण समाजवाद येणें शक्य नाहीं.

## वर्गसंघर्षवादी साम्यवाद

कम्युनिझम् किंवा साम्यवाद यांचें म्हणणें हें आहे कीं, आजच्या समाजांतील उच्च वर्गाचा नाश केल्याखेरीज समता निर्माण करणें शक्य नाहीं. ज्यांच्या हातांत सत्ता आहे त्यांना नष्ट केल्याशिवाय व वर्ग-संघर्षाशिवाय दुसरा कांहीं उपाय नाहीं. एवढी हिंसा ही धर्मरूप व अवश्य अशी च हिंसा आहे. पण या हि विचारसरणीनें जगांत शांतता निर्माण होऊं शकणार नाहीं हें स्पष्ट आहे. हिंसेमुळें प्रतिहिंसा ही कांहीं काळ दबून बसल्यासारखी वाटली, तरी अखेर वर उसळून येते च. एवढें च नव्हे, तर हिंसेमुळें मानवतेची प्रतिष्ठा व मानवतेचीं मूल्यें हीं क्षीण होऊन जातात.

## आत्मवादावर आधारलेला साम्ययोग

पण साम्ययोगाचें असें म्हणणें आहे कीं प्रत्येक मनुष्यांत एक च आत्मा समान रूपांत वास करीत आहे. साम्ययोग मानवा-मानवांत भेद करीत नाहीं. एवढें च नव्हे तर मानवांतील आत्मा व इतर प्राणिमात्रांतील आत्मा यांत हि मूलभूत भेद मानीत नाहीं. परंतु तो एवढें च मान्य करतो कीं, मानवी आत्म्यांत जो विकास संभवनीय आहे, तो दुसऱ्या प्राण्यांच्या आत्म्यांत संभवूं शकत नाहीं. मानवांत हि शिक्षणानें विकास होत असला, तरी सर्वांचा विकास सारखा होत नाहीं. पण प्राण्यांत शिक्षण देऊन हि विकास संभवनीय नाहीं. सृष्टिमात्रांत एक च आत्मा वसत असल्यामुळें शक्य तोंवर सर्व च प्राण्यांचें रक्षण करणें अवश्य आहे.

'साम्यवाद' व 'साम्ययोग' यांच्यांत हा भेद आहे कीं, साम्यवादाला आत्म्याची एकता मान्य नाहीं आणि साम्ययोगाला ती मान्य आहे. एवढें च नव्हे, तर या आधारानें साम्ययोग अधिक खोलवर जाऊं इच्छितो. कारण नैतिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रांत या विचाराचे क्रांतिकारक परिणाम होतात. एकदां आधारभूत असा आध्यात्मिक विचार ग्रहण केला कीं, जीवनाच्या अनेक शाखांत आपला प्रवेश होतो. आपल्या बुद्धि-शक्तीचे धनी आपण नाहीं, तर परमेश्वर धनी आहे. आपले सर्व गुण हे समाजाच्या हितासाठीं च असल्यामुळें आपल्या साऱ्या शक्ति ही ईश्वराची देणगी समजून ती समाजाला अर्पण केली पाहिजे. आपण आपल्या शरीराचे हि मालक नाहीं, तर केवळ विश्वस्त आहोंत. साम्ययोगाचें म्हणणें हें आहे कीं, कोणत्या हि रूपांतील संपत्तीचे मालक आपण नाहीं. साम्यवाद व साम्ययोग यांच्यामध्यें हा च मोठा भेद आहे.

## 'ट्रस्टीशिप' चा क्रांतिकारक विचार

आजवर लोक स्वतःस संपत्तीचे मालक समजत आले आहेत. त्यामुळें वेगवेगळ्या हितांमध्यें विरोध निर्माण होतो. पण 'विश्वस्तत्वाचा' विचार पुढें आला कीं पूर्ण वैचारिक क्रांति होते. आपापल्या गोष्टीवर आपली स्वतःची मालकी आहे असें जें आपण मानतों तें चूक आहे. आपल्यापाशीं

ज्या ज्या शक्ति आहेत, त्या समाज-सेवेसाठीं च आहेत ; व्यक्तिगत स्वार्थ साधण्यासाठीं नव्हे. आपला स्वार्थ समाजाच्या चरणीं अर्पण करणें यांत च खरा व्यक्तिगत स्वार्थ आहे. सगळ्या समाजाला आपला स्वार्थ अर्पण करणें व समाजाच्या हितासाठीं च सतत झटणें यांत च आपला खरा स्वार्थ आहे. साम्ययोगांतून हें च नैतिक वैशिष्टच निर्माण होतें.

## साम्ययोगाची अर्थनीति

साम्ययोगामुळें आर्थिक क्षेत्रांत कशी क्रांति होते हें आतां आपण पाहूं. आपणांपाशीं ज्या शक्ति आहेत, त्या आम्ही स्वतःच्या मालकीच्या समजत नाहीं. जी व्यक्ति आपल्या पूर्ण सामर्थ्यानें समाजाचें काम करील, तिला भोजनाचा हक्क प्राप्त होईल. एखाद्या आंधळ्यानें आपलें हें व्यंग असतां हि आपल्या पुऱ्या शक्तीनें बनेल तेवढें काम केलें, तर डोळस माणसापेक्षां त्याचें काम कमी भरलें तरी त्याला भोजनाचा हक्क प्राप्त होईल. शक्ति जशी कमी-जास्त असेल, तिच्या प्रमाणांत काम कमी अधिक होईल यांत शंका नाहीं. पण अन्न ही भौतिक वस्तु आहे व सेवा ही नैतिक वस्तु आहे. नैतिक वस्तूची किंमत भौतिक वस्तूनें होणार नाहीं. एखाद्या बुडणाऱ्या माणसाला वांचविण्यासाठीं केलेली दहा मिनिटांची सेवा, दिवसाच्या नेहमींच्या कामाच्या मापानें मोजली जाऊं शकेल काय ? आई आपल्या मुलाची सेवा करते, मुलगा बापाची सेवा करतो व मंत्री समाजाची सेवा करतो. पण या सर्वांच्या कामाची किंमत पैशानें मोजली जाऊं शकणार नाहीं. ज्या कार्यांत मनुष्य हृदय ओततो, त्या कामाची किंमत पैसा कशी करूं शकणार ? मुलगा आईला जें देतो, विद्यार्थी गुरूला जें देतो किंवा शेतकरी समाजाला जें देतो, त्याचें मोल असें मापतां येणें शक्य नाहीं.

नैतिक मूल्यांप्रमाण च आर्थिक क्षेत्रांत हि श्रमाचें मूल्य समान च मानलें गेलें पाहिजे. पण आज अगदीं उलट दिसून येतें. आज शारीरिक कार्यापेक्षां बौद्धिक कामाला जास्त मजुरी दिली जाते. त्याला प्रतिष्ठा हि जास्त मिळते. पण अशा तऱ्हेचा भेदभाव करणें हें अगदीं तत्त्वशून्य आहे. साम्ययोगाचा विचार हा आत्म्याच्या समतेवर आधारित असल्यामुळें आर्थिक क्षेत्रांत हि तो कांहीं भेद मानीत नाहीं. जी सेवा आई करूं शकते, ती मुलगा करूं शकत

नाहीं. जी सेवा मुलगा करूं शकतो, ती आई करूं शकत नाहीं. जी सेवा स्वामी करूं शकतो, ती सेवकाला करतां येत नाहीं. व सेवक जी करूं शकतो, ती स्वामीला जुळत नाहीं. भाऊ जी सेवा करील ती बहिणीला करतां येणार नाहीं व बहिणीचें काम भावाला येणार नाहीं. याप्रमाणें व्यक्तिभेदानुसार व शक्ति-भेदानुसार सेवेंत हि भेद होत असला, तरी सर्वांची काळजी मात्र सारखी च घेतली पाहिजे. हाताचीं सर्व बोटें सारखे काम देत नाहींत एका बोटानें जें काम होतें, तें दुसऱ्या बोटांनीं झालें नाहीं, तरी तीं सगळीं समान च असतात. या च प्रमाणें समाजांत प्रत्येकाची सेवा भिन्न भिन्न प्रकारची असली, तरी तिचें आर्थिक मूल्य मात्र समान च असलें पाहिजे.

साम्ययोगाच्या सिद्धान्तानुसार नैतिक मूल्यांत जर भेद नाहीं, तर आर्थिक क्षेत्रांत हि भेद राहतां उपयोगी नाहीं. प्रत्येकाला विकासाची पूर्ण संधि मिळावी व शिक्षणाला अवसर मिळावा. विद्यार्थी आपल्या ग्रहणशक्त्यनुसार शिक्षण घेतील. एखादा मुलगा गरीब आहे म्हणून त्याच्या शिक्षणाची सोय होऊं नये व दुसरा मुलगा श्रीमंताचा आहे म्हणून त्याच्या शिक्षणाची उत्तम सोय व्हावी, असा भेद होतां उपयोगी नाहीं. अशीं विषम समाजाचीं मूल्यें जर आपण ठेवलीं, तर सर्वांचा विकास होऊं शकणार नाहीं. समान संधि मिळाल्यानंतर ज्याची जशी योग्यता असेल, त्याप्रमाणें तो त्या त्या धंद्यांत शिरेल. मजुरी कमी जास्त मिळण्याचा परिणाम असा होईल कीं, विकास चुकीच्या दिशेनें होईल. आणि इतर क्षेत्रांविषयींचें आकर्षण व्यर्थ च वाढेल. आज हें च होत आहे. पण समान वेतनामुळें ही वृत्ति नाहींशीं होईल.

## विकेंद्रीकरण

या विचाराचा आर्थिक क्षेत्रांत असा परिणाम होईल कीं, प्रत्येक खेडें पूर्ण स्वावलंबी बनेल. अन्न, वस्त्र, दूध, तूप इत्यादि प्राथमिक गरजांच्या वस्तु प्रत्येक खेड्यांत तयार होतील व प्रत्येक खेडें स्वयंपूर्ण बनेल. हें हि पूर्ण व तें हि पूर्ण होईल. दोहोंच्या पूर्णतेमुळें समता निर्माण होईल. हें हि अपूर्ण व तें हि अपूर्ण च राहिलें तर दोहोंच्या अपूर्णतेमुळें समता निर्माण च होऊं शकणार नाहीं. नेहमींच्या आवश्यक वस्तु खेड्यांत च तयार झाल्या पाहिजेत. परमेश्वरानें सर्वांना परिपूर्ण बनविलें आहे. बुद्धि व शक्ति हीं कमी-अधिक असूं शकतील.

पण देवाची योजना इतकी विकेंद्रित आहे कीं, तिच्यामुळें सगळ्यांचा विकास होऊं शकतो. तशी च विकेंद्रित योजना आम्हांला अभिप्रेत आहे. आर्थिक क्षेत्रांत समता आली नाहीं, तर उच्चनीचत्वाचा भेद वाढत जाईल, परावलंबन उत्पन्न होईल, व एक आत्मा दुसऱ्या आत्म्याचा गुलाम बनेल. म्हणून च आम्हांला विकेंद्रित अर्थव्यवस्था पाहिजे आहे.

## साम्ययोगाची राजनीति व समाजनीति

या च प्रकारें राजकीय क्षेत्रांत हि आपलीं मूल्यें बदलत जातील. आम्हांला केवळ शोषणरहित समाज च नको, तर शासन-रहित समाजरचना पाहिजे आहे. साम्ययोगाच्या कल्पनेनुसार शासन खेड्याखेड्यांत वाटलें जाईल. खेड्याखेड्यांचें स्वतःचें राज्य होईल. मुख्य केंद्रांत नाममात्र सत्ता तेवढी राहील. याप्रमाणें होतां होतां शासनमुक्त-समाज आकारास येईल.

सामाजिक क्षेत्रांत हि जातिभेद किंवा उच्चनीच-भेद राहणार नाहीं. एखाद्यांत ब्राह्मणाचे गुण असले तर तेवढ्यामुळें इतरांपेक्षां स्वतः उच्च समजण्याचें त्याला कारण राहणार नाहीं. तसें च मेहतर, चांभार, इत्यादि लोक नीच समजले जाणार नाहींत, त्यांच्यावांचून हि समाजाचें काम अडेल.

## क्रांति : नैतिक मूल्यांत परिवर्तन

अशा प्रकारें नैतिक, आर्थिक, राजकीय, व सामाजिक; या सर्व च क्षेत्रांत परिवर्तन घडविण्याची साम्ययोगाची इच्छा आहे. याला च ‘क्रांति’ म्हणतात. आजकाल लोक हिंसेला च ‘क्रांति’ समजतात. पण जेथें मूलभूत गोष्टींत क्रांति होत नाहीं, तेथें वरवरच्या परिवर्तनाला क्रांति म्हणणें हें चूक आहे. ज्यावेळीं आपण आपल्या नैतिक जीवनांत परिवर्तन करतों, तेव्हां च खरी क्रांति होते. साम्ययोग हा नैतिक मूल्यांत परिवर्तन घडवीत आहे, असा आमचा दावा आहे. कारण त्याचें मूलतत्त्व आध्यात्मिक आहे व तो जीवनाच्या सर्व च शाखा-उपशाखांत आमूलाग्र क्रांति घडवून आणतो.

## साम्ययोगाची व्यापक दृष्टि

भूदान ही एक फाचर आहे. विचार समजण्यासाठीं मोह-ममतेंतून मुक्त होण्याचा हा प्रारंभिक विचार आहे. पण मुक्तता कशी मिळवावयाची ? जमि-

नीच्या मालकीपासून मुक्तता करण्याचें काम हातीं घेऊन च हा आरंभ केलेला आहे. दान देणें म्हणजे कोणावर उपकार करणें नव्हे. आमची शेंवटची पायरी तर ही आहे कीं, गांवची सारी जमीन ही सगळ्या गांवकऱ्यांच्या सार्वजनिक मालकीची असावी. त्यापुढें जाऊन आम्ही असें सांगूं कीं, एखाद्या प्रांतांत जमीन कमी असेल व लोकसंख्या जास्त असेल, तर त्या जास्त लोकसंख्येनें दुसऱ्या प्रांतांत वस्ती करावी. अखेर सगळी पृथ्वीमाता च पूर्ण मुक्त आहे. ज्याला जेथें रहावेसें वाटेल तेथें त्यानें रहावें व ज्याला जेथें सेवा करावीशी वाटेल, तेथें त्यानें करावी. याप्रमाणें आम्ही विश्वाचे नागरिक बनूं इच्छितों, व आर्थिक सामाजिक आणि राजकीय भेद नाहींसे करूं इच्छितों. जमीन कमी असो कीं जास्त असो, ती परमेश्वराची देणगी आहे. आम्ही तिचे मालक बनूं शकत नाहीं. हिंदुस्थानचे लोक हे हिंदुस्थानचे मालक, व जर्मनीचे लोक हे जर्मनीचे मालक, ही विचारसरणी च चुकीची आहे. या जगांतील सारी हवा, सारें पाणी, सगळा प्रकाश, व सर्व जमीन; हीं सगळीं सर्वांच्या मालकीचीं आहेत. ही च आमच्या साम्ययोगाची व्यापक दृष्टि आहे.

बाराहार २६–९–५३

---

## ज्ञान-विज्ञानाच्या साह्यानें सामूहिक अहिंसा : १८ :

आपला देश हा थोर आहे. पण तो आपोआप च थोर बनला नाहीं. तर त्याच्या पाठीमागें महान् संस्कृति उभी आहे. दीर्घकाल चाललेल्या सांस्कृतिक प्रयत्नांचा परिणाम म्हणून हा देश थोर बनला आहे. आपल्या प्राचीन संस्कृतीचा संदेश देशाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत पोंचविला गेला आहे. त्या काळीं आजच्यासारखीं जलद संदेशवाहक साधनें नसतां हि पायीं पायीं खेड्याखेड्यांतून व घराघरांतून जाऊन तोंडीं च संदेश पोंचविण्याचें काम करावें लागत असे. पण त्या विचारानें सर्वत्र स्फूर्ति निर्माण झाली, देशाच्या कोनाकोपऱ्यांत विचार जाऊन पोंचला.

## उत्तर-दक्षिणेचें मीलन

पूर्वींच्या काळीं आजच्याप्रमाणें उत्तरेचा व दक्षिण भारताचा विशेष संबंध नव्हता. उत्तरेंत बुद्ध व महावीर यांच्यासारखे थोर पुरुष निर्माण झाले आणि त्यांचा संदेश दक्षिण भारतांत हि पोंचला. बुद्ध व महावीर हे सतत प्रचार करीत हिंडत राहिले व तत्परिणामीं दक्षिण व उत्तर भारत एक बनले. त्यांच्या काळापूर्वी वैदिक ऋषींनीं आपल्या पद्धतीनें संदेश पोंचविण्याचें कार्य केलें. पण त्याला व्यापक स्वरूप देण्याचें काम बुद्ध व महावीर यांनीं केलें. वैदिक-विचारधारा उत्तरेंतून निघाली व दक्षिणेंत रामेश्वराला जाऊन मिळाली. त्यानंतर विचारांची दुसरी धारा दक्षिणेंत निघाली व उत्तरेकडे येऊन मिळाली. शंकराचार्य, रामानुजाचार्य, माधवाचार्य आदि प्रचारकांनीं उत्तरेकडून दक्षिणेंत आलेल्या संदेशांत आपलें वैशिष्टय मिळवून तो वृद्धिगत संदेश परत उत्तर भारतांत पोंचविला. आत्मज्ञानाचा जो विचार दक्षिणेंत गेला, त्यांत दाक्षिणात्यांनीं भक्तीची धारा मिळविली व भक्तीसह तो विचार उत्तर भारतांत परत नेला. परिणामीं उत्तर व दक्षिण भारत हे वैचारिक दृष्टीनें एक राष्ट्र बनलें. तशीं प्रांताप्रांतांत अनेक राज्यें होतीं. परंतु काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत विचारांची एक च सत्ता होती आणि लोकांना ती च प्रेरणा देत होती. काशीचे लोक गंगेचें पाणी घेऊन दक्षिणेंत जात व रामेश्वराच्या भगवंताच्या मस्तकावर त्याचा अभिषेक करीत. तिकडे दक्षिणेचे लोक समुद्राचें पाणी घेऊन उत्तरेंत येत व काशी-विश्वेश्वरावर त्याचा अभिषेक करीत. बुद्ध व महावीर यांनीं गंगेचें पाणी दक्षिण भारतांत पोंचविलें. त्या च प्रमाणें दक्षिण भारतांत अतिशय ज्ञानवान् भक्तिमान् आचार्य व सन्त पुरुष निघाले व त्यांनीं साऱ्या भारतांत भक्तिमार्ग पसरविला.

## आपली प्राचीन एकता

कांहीं लोकांची अशी समजूत आहे कीं इंग्रजांनीं च या देशाला एकता आणून दिली, पण ही चुकीची समजूत आहे. या देशाचें जास्तींत जास्त तुकडे कसे होतील या च दृष्टीनें इंग्रजांनीं प्रयत्न केले. तत्परिणामीं आपण हें पाहतों कीं पाकिस्तान वेगळा झाला आणि ब्रह्मदेश व लंका हे हि

वेगळे झाले. वस्तुतः भारताची एकता ही त्याच्या मूलभूत विचारांवर अधिष्ठित झालेली आहे. सगळा हिंदुस्थान हा एक आहे ही गोष्ट इंग्रजांना व इतर देशांच्या इतिहासकारांना हि पूर्ण माहीत आहे. म्हणून च मराठे व रजपूत यांच्यांत ज्या लढाया झाल्या, त्यांना गृह-युद्धें असें च नांव इतिहासांत दिलें गेलें आहे. अशीं च युद्धें युरोपांत झालीं व होत आहेत. पण त्यांना गृह-युद्धें अशा नांवानें संबोधलें जात नाहीं. हिंदुस्थानच्या दृष्टीनें पाहिलें, तर तीं गृह-युद्धें च होतीं तरी तीं राष्ट्रा-राष्ट्रांतलीं युद्धें च मानलीं गेलीं. सारांश, इंग्रज येथें येण्यापूर्वीं च सारा हिंदुस्थान एक होऊन चुकला होता. उत्तर-हिंदुस्थानापासून दक्षिण हिंदुस्थानापर्यंत परस्पर विचारांची देवाणघेवाण सतत होत गेली. याप्रमाणें बऱ्या च व्यापक प्रयत्नानंतर व विचार-प्रचारानंतर हिंदुस्थान एक बनला आहे.

आतां अशी अवस्था आली आहे कीं, विचारांचीं हीं आंदोलनें एका देशापुरतीं च सीमित राहूं शकणार नाहींत. पूर्वेकडून पश्चिमेकडे व पश्चिमे-कडून पूर्वेकडे अशीं तीं पसरत जातील. ज्याप्रमाणें येथें उत्तरेकडून दक्षिणे-कडे व दक्षिणेकडून उत्तरेकडे विचार पसरत गेले, त्याप्रमाणें आतां विज्ञानाच्या प्रगतीमुळें सगळ्या जगांतले विचार हिंदुस्थानांत येतील व हिंदुस्थानचे विचार सगळ्या देशांत पसरतील. विज्ञानाची जेव्हांपासून प्रगति झाली, तेव्हांपासून देशव्यापी आंदोलनाऐवजीं विश्वव्यापी आंदोलनें सुरू झालीं आहेत. पूर्वे-कडील देश विज्ञानहीन होते व पश्चिमेकडे विज्ञानाची बरी च प्रगति झाली होती. तेथून विज्ञान येथें आलें, तेव्हां विज्ञान-विहीनांनी वैज्ञानिकांच्या अंकित व्हावें हें प्राप्त च होतें. ज्याप्रमाणें उत्तर भारतांतून आत्मज्ञान दक्षिणेंत पोंचलें तेव्हां दक्षिण भारत उत्तरेच्या अंकित झाला व दक्षिण भारतांतून भक्तिमार्ग उत्तरेंत पोंचला तेव्हां उत्तर भारत दक्षिणेच्या अंकित झाला, त्या-प्रमाणें विज्ञानाची पश्चिमेकडे झालेली प्रगति पूर्वेकडे आल्याबरोबर पूर्वे-कडील राष्ट्रें पश्चिमेच्या अंकित व्हावीं हें हि प्राप्त च होतें. ही घटना कांहीं दुःखदायक नाहीं. एका देशाचें दुसऱ्यावर जें आक्रमण झालें, त्याच्याकडे मी दूरदृष्टीनें पाहूं लागलों कीं त्यांत अनेक दुःखद गोष्टी घडल्या असल्या तरी मला ती घटना दुःखद वाटत नाहीं.

## सामूहिक अहिंसेची निर्मिति

हिंदुस्थानच्या आध्यात्मिक संस्कृतीवर जेव्हां पाश्चात्यांच्या विज्ञानाचा रंग चढला, तेव्हां त्यांतून जो नवा विचार निर्माण झाला, त्याला मी 'सामूहिक अहिंसा' असें म्हणतों. हिंदुस्थानचें अध्यात्म व पाश्चात्यांचें विज्ञान यांच्या संयोगांतून ती निर्माण झाली. जेथें आत्म्याचें दर्शन होतें तेथें कमी अधिक प्रमाणांत अहिंसा राहत च असते. पण ती सामूहिक रूप धारण करीत नव्हती. कारण विज्ञानाच्या साधनांमुळें आज मानवसमाज एकमेकाशीं जितका निगडित झाला आहे, तेवढा तो पूर्वीं कधीं हि झाला नव्हता. त्यामुळें त्यावेळीं अहिंसेचे जे प्रयोग झाले, ते हि व्यक्तिगत च असत. पण आज जो संपर्क होतो, तो व्यक्ती-व्यक्तींत च नसतो, तर सामाजिक स्वरूपाचा होतो. एका समाजाचा दुसऱ्या समाजाशीं किंवा एक राष्ट्राचा दुसऱ्या राष्ट्राशीं, अशा च व्यापक स्वरूपांत आतां संपर्क किंवा संघर्ष घडून येत असतो.

सारांश, हिंदुस्थानचें अध्यात्म व पश्चिमेचें विज्ञान यांच्या संयोगानें सामूहिक अहिंसेचा आविष्कार झाला व आपण अहिंसेनें स्वराज्य मिळवलें. आतां या सामूहिक अहिंसेचा नवा विचार पश्चिमेकडे पोंचविण्याची पाळी पूर्वेवर आली आहे. मनूनें म्हटलें आहे:—

**एतद्देश प्रसूतस्य सकाशादग्र जन्मनः ।**
**स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ॥**

'हिंदुस्थानच्या श्रेष्ठ जनांकडून पृथ्वीवरील समस्त मानवांना चारित्र्याचें शिक्षण मिळेल'—ही जी मनूची भविष्यवाणी होती, ती महात्मा गांधींच्या कार्यामुळें सफल झाली. मी महात्मा गांधींना व्यक्ति नव्हे, तर विचाराचा प्रतिनिधि मानतों. ज्या ज्या काळांत समाजाला जो विचार अत्यंत आवश्यक असतो, त्याचा प्रचार करण्यास निमित्तमात्र म्हणून जे पुरुष पुढें येतात ते पुरुष नसून नीतिमान् विचारक असतात. पश्चिमेंत असे किती तरी महान् वैज्ञानिक निर्माण झाले. न्यूटनपासून पाश्चरपर्यंत वैज्ञानिकांची एक थोर परंपरा तेथें चालू झाली आहे. प्राचीन काळांत संतांची जशी परंपरा असे, त्याप्रमाणें आधुनिक कालांत वैज्ञानिक महापुरुषांची परंपरा चालू झाली आहे.

## विज्ञानांतून संस्कृतीची व विकृतीची निर्मिति

प्रकृतीपासून संस्कृति व विकृति या दोन्हीं उत्पन्न होतात. विकृति उत्पन्न झाली कीं, वाईट कृत्यें केलीं जातात. व संस्कृति निर्माण झाली कीं, सत्कृत्यें केलीं जातात. प्रकृति वैज्ञानिकांच्या हातीं असल्यामुळें अनेक प्रगतिपर कार्यें घडलीं. या वैज्ञानिक युगापूर्वी महारोग्यांची सेवा करण्याचा विचार तरी कोणी करूं शकलें काय? पण ख्रिश्चनांनीं हें काम अंगावर घेतलें. हा विज्ञानाचा च परिणाम आहे. विज्ञानाच्या आधारानें ख्रिश्चन लोकांनीं हिंदुस्थान, चीन, जपान, आफ्रिका आदि देशांत ठिकठिकाणीं जें सेवाकार्य केलें, त्याचें गुणगान आपण केलें च पाहिजे. विज्ञानाच्या द्वारां संस्कृतीचा जो आविष्कार झाला, त्याचा हा परिणाम आहे. पण विज्ञानाचा जेथें जेथें प्रचार झाला, तेथें तेथें राजे महाराजे व वीर पुरुष यांच्याकडून त्या त्या देशावर आक्रमण करणें, त्यांना गुलाम बनविणें, इत्यादि वाईट कामें हि झालेलीं आहेत. ही सगळी विज्ञानाची विकृति च समजली पाहिजे; मूलप्रकृतीमधून थोडी संस्कृति व थोडी विकृति निर्माण होत च असते. आणि तें च त्या संस्कृतीचें सुखदुःख अगर पापपुण्य बनत असतें. हिंदुस्थानांत दक्षिणेकडून जे सद्विचार आले, त्यांच्याबरोबर कांहीं वाईट गोष्टी हि आल्या हें आपण पाहिलें च आहे. विज्ञानाची सुद्धां ती च अवस्था झाली.

## परमेश्वरी इच्छेनें भूदान-यज्ञ

जें दृश्य हिंदुस्थानांत देशव्यापी स्वरूपांत आज दिसत आहे, तें च विश्वव्यापी स्वरूपांत उद्यां दिसणार आहे. पश्चिमेकडे पूर्वेकडून सामूहिक अहिंसेचा विचार जाण्यास अहिंसेनें आपण स्वराज्य प्राप्त केल्यापासून प्रारंभ झाला आहे. भूदान-यज्ञांत कृपण लोक हि दान देत आहेत. हा विनोबाच्या पुण्याचा प्रभाव नव्हे, तर विज्ञानाच्या प्रभावामुळें उत्पन्न झालेला हा विचार आहे. याला मी परमेश्वरी इच्छा च मानतों. लोभी व भोगपरायण लोक हजारोंच्या संख्येनें त्यागाचा संदेश ऐकण्यासाठीं येत आहेत. याचा हा च अर्थ आहे कीं परमेश्वर च चेतनाला जड व जडाला चेतन करीत आहे आणि याचें स्पष्ट दर्शन विनोबाला होत आहे.

दोन वर्षांपूर्वी २ ऑक्टोबरला सागर येथें मी असतांना फक्त वीस हजार एकर च जमीन मिळाली होती. त्या च दिवशीं मीं प्रथम संकल्प केला कीं, आपणांस पांच कोटि एकर जमीन मिळवावयाची आहे. आज दोन वर्षांनंतर आपण पाहतां च कीं, वीस हजारांची वीस लाख एकर जमीन झाली आहे. म्हणजे शतगुणित झाली आहे. दोन वर्षांपूर्वी जमीन मिळविण्याचें गणित करतांना लोक म्हणत, कीं, या गतीनें पांच कोटि जमीन मिळण्यास पांचशें वर्षें लागतील. पण आज जर ते पुन्हां गणित मांडू लागतील, तर ते च म्हणतील कीं, पांचशें वर्षांत नव्हे तर पांच च वर्षांत संकल्प पुरा होईल. ज्या गणितानें पूर्वी पांचशें वर्षांचा अंदाज केला व आज जे पांच वर्षांचा च अंदाज करीत आहेत, तें सगळें चुकीचें गणित होतें. तें मानवी गणित होतें. पण हें जें कार्य चाललें आहे तें ईश्वरी गणिताप्रमाणें चाललें आहे. यांत कृपणांकडून मोठा त्याग झालेला दिसून येईल व भित्र्या लोकांकडून मोठीं धैर्याचीं कामें झालेलीं दिसतील. कारण परमेश्वर जडाला हि चेतन बनवीत असतो.

आत्मज्ञान व विज्ञान यांच्या संयोगांतून जें निर्माण झालें आहे, त्याचा प्रकाश हिंदुस्थानच्या द्वारां साऱ्या जगांत पसरणार आहे, हें देव च बोलून चुकला आहे. नाहीं तर ज्यांच्या शब्दांमुळें कोरियांत संधि व्हावी, असे पंडित नेहरू हे कोण मोठे लागून गेले होते? परमेश्वरानें आम्हांला अहिंसेनें स्वातंत्र्य मिळवून दिलें आणि दुर्बलांना बलशाली व अहिंसक बनविलें. वर दाखविण्यासाठीं कां होईना पण दुर्बल त्यावेळीं बलशाली बनले हें निश्चित. ज्यांच्या मनांत द्वेष होता, त्यांनीं हि शांतपणें लाठीप्रहार सहन केले, आणि ज्या स्त्रिया पडद्याबाहेर कधीं पडल्या नव्हत्या, त्यांनीं दारूच्या दुकानां-समोर जाऊन निरोधन केलें. अशा तऱ्हेचीं जीं अनपेक्षित दृश्यें दृष्टीस पडलीं, तीं कांहीं हिंदुस्थानच्या स्वतःच्या सामर्थ्यांतून निर्माण झालेलीं नव्हतीं, तर ती परमेश्वराची च इच्छा होती. हा भूदान-यज्ञ हें हि ईश्वराचें च कार्य आहे.

## परमेश्वराची लीला

कम्युनिस्ट मला विचारतात कीं, 'इतिहासांत आजवर जी घटना घडली नाहीं, ती आतां घडून येईल यावर आपला खरोखर च विश्वास आहे काय?'

यावर मी उत्तर देतों कीं, 'हो, अवश्य आहे. पूर्वी कधीं ती घटना घडली नाहीं, म्हणून च आतां ती निश्चित घडेल.' मी तुम्हांला निश्चित सांगतों कीं, विनोबा एक दिवस मरणार च आहे, कारण आजवर तो मेला नाहीं. जी घटना इतिहासांत घडलेली नसते, ती घडवावी च लागते. म्हणून च परमेश्वर नित्य नव्या मनुष्यांना पाठवीत असतो व त्यांच्याकडून कार्य करवून घेत असतो. जोंवर ईश्वर आहे, तों वर च जग आहे. आणि तोंवर नित्य नवीं कार्यें व तीं पार पाडणाऱ्या नित्य नव्या पिढ्या निर्माण च होत राहणार आहेत. आपण रामायण ऐकलें च असेल. रामापाशीं कोणतीं अण्वस्त्रें होतीं? वानरांनीं व अस्वलांनीं च रावणाच्या सेनेचा संपूर्ण नाश केला ना? या च आधारानें मी सांगतों कीं, माझें हें काम आपणां सर्वांच्या हाताने झाल्यावांचून राहणार नाहीं. आपण सर्वजण केवळ मनुष्य नसून हें काम करण्यासाठीं मानवाच्या स्वरूपांत प्रकट झालेल्या देवता आहांत. म्हणून च लोक जेव्हां मला विचारतात कीं, 'या तऱ्हेचें काम, आपल्याकडून होईल अशी आपली कल्पना आहे काय ?' तेव्हां मी उत्तर देतों कीं, 'बंधूंनो, हें काम मी करीत नाहीं, माझें तेवढें बळ नाहीं, माझी तेवढी प्रतिष्ठा नाहीं. हें काम परमेश्वर च करीत आहे.'

## करीन वा मरेन

मीं अशी प्रतिज्ञा केली आहे कीं, 'मी बिहारची भूमि-समस्या एक तर सोडवीन, नाहीं तर येथें च आपला देह ठेवीन'. हा संकल्प करतांना मला कोणती च शंका वाटली नाहीं. कारण आपल्या द्वारां च हा संकल्प पूर्ण होणार आहे असा माझा विश्वास आहे.

लोक विचारतात, 'बाबा, या कार्यासाठीं आपण कोणती संघटना बनवली आहे?' मी म्हणतों, 'अरे, बाबाची शक्ति संघटनेंत नाहीं. संघटना न बनविण्यांत च बाबाची शक्ति आहे. या कार्याची स्वतंत्र अशी संघटना जर असती, तर कांग्रेसची संघटना बाबाच्या पाठीमागें वेड्यासारखी हिंडत राहिली नसती. पण या कार्याचें वेगळें संघटन नाहीं हें कॉंग्रेसला माहीत आहे. बाबा तर एकटा च हिंडत आहे. त्याचा कोणत्या च राजकीय पक्षाशीं संबंध नाहीं.

आपण हें लक्षांत घ्या कीं, माझा कोणत्या च राजकीय पक्षाशीं संबंध नाहीं, एवढें च नाहीं तर कोणत्या धार्मिक संस्थेशीं हि संबंध नाहीं. इतकें च काय पण, आमचा म्हणविला जाणारा जो सर्वोदय समाज त्याच्या सदस्यांच्या यादींत हि माझें नांव नाहीं. मी केवळ एक मनुष्य या नात्यानें व परमेश्वराचा सेवक या नात्यानें या कामांत पडलों आहे. तुमचा सहयोग मला मिळाला नाहीं, तर कांहीं च काम होणें शक्य नाहीं.

## एकतेची किमया

असें म्हणतात कीं वसिष्ठ ऋषींच्या आश्रमांत वाघ व शेळी एका च झऱ्यावर बरोबर पाणी पीत असत. या च प्रमाणें भूदानयज्ञाचा हि असा परिणाम झाला आहे कीं भिन्न भिन्न पक्षांचे लोक येथें एकत्र काम करूं लागले आहेत. तामिलनाडमध्यें जयप्रकाश व तेथील कॉंग्रेस समितीचे अध्यक्ष कामराज नादर हे पंधरा दिवस भूदान-कार्यासाठीं एकत्र हिंडले व एका च व्यासपीठावरून त्यांनीं भाषणें दिलीं. या भूदान यज्ञानें त्यांना एकत्र पाणी पाजलें. आमच्या या कामाचें हें रहस्य आहे कीं, आम्ही वाघाला अहिंसा व गाईला शौर्य शिकवूं इच्छितों. भिन्न लोकांना एकत्र आणण्याची किमया या कार्यांत आहे. म्हणून च मीं म्हटलें कीं, हा युगधर्म च हें कार्य करीत आहे. या कार्याचें भविष्य मला तुमच्या चेहऱ्यांइतकें च स्पष्ट दिसत आहे. पश्चिमेकडून विज्ञान येथें आलें. पण पूर्वेकडून सामूहिक अहिंसा बनून तें विज्ञान परत तिकडे जाणार आहे यांत मला मुळीं च शंका वाटत नाहीं. मग याला शेंकडों वर्षें कां लागेनात !

## आम्हीं भगवंताचें साधन बनावें

आम्हांला भगवंताच्या या महान् कार्याचें साधन बनावयाचें आहे. आमचें राष्ट्र-गीत तरी कोणीं केलें आहे ? एका सामान्य व्यक्तीनें च तें रचलें आहे. आपल्यांत कांहीं विशेष प्रतिभा आहे असें त्याला वाटलें नव्हतें, पण भगवंतांनीं त्याचें निमित्त बनवून त्याच्याकरवीं त्या ध्वजगीतामध्यें "विश्व-विजय करके दिखलायें तब होवे प्रण पूर्ण हमारा ' हे महान् शब्द गुंफले. अखेर विश्व-विजयाचा तरी अर्थ काय आहे ? दुसऱ्यांना गुलाम बनविण्याचा आमचा मुळीं च उद्देश नाहीं. प्राचीन काळीं आमचीं मोठ मोठीं साम्राज्यें होऊन गेलीं व त्यांच्या बलशाली सेना हि होत्या. पण तेव्हां हि

आम्हीं दुसऱ्या देशांवर कधीं आक्रमण केलें नाहीं ही इतिहासाची साक्ष आहे. तेव्हां विश्व-विजयाचा अर्थ हा च होईल कीं, ‘आमचे विचार सर्व जगांत पसरावे, आमचे सद्भाव, आमच्या शुभ कामना सर्वत्र पसराव्या; तेव्हां च आमचा पण पूर्ण होईल. आम्हांला खरें स्वराज्य लाभेल.

भागलपूर ५–१०–५३

---

## युगाचे प्रमुख गुणः–निर्भयता, समता व समाजनिष्ठा :१९:

मनुष्य जेव्हां विचारानुसार आचरण करतो, तेव्हां च विचाराचा प्रचार होतो. जेव्हां मनुष्य आचरणाच्या कसोटीवर विचार पारखून घेतो, तेव्हां वाणीचें साहय हें निमित्तमात्र च असतें. वस्तुतः आचरणाच्या द्वारें च विचार पसरत असतो. लहानपणीं मीं सार्वजनिक सेवाकार्याला प्रारंभ केला, तेव्हांपासून बत्तीस वर्षें मी चिंतन करीत होतों व आचरणाच्या कसोटीवर विचार पारखीत होतों. आज बापू असते, तर मीं तें च काम चालू ठेवलें असतें. पण ते नसल्यामुळें मला बाहेर पडावें लागलें. त्यानंतर अनुभवानें ज्या विचारांवर माझी निष्ठा बसली व ज्यांची मीं पूर्ण पारख केली त्या विचारांचा प्रचार मीं चालवला आहे. भूदान-यज्ञ हें मला निमित्त मिळालें आहे एवढें च. ही या युगाची मागणी आहे, युग-धर्म आहे. या युगधर्माच्या साह्यानें जेव्हां आपण विचारांत संशोधन करूं लागतों, तेव्हां तो हृदयांत खोलवर जाऊन पोंचतो. पण युगधर्माच्या विरुद्ध जर विचारांत संशोधन करूं लागलों, तर ती योग्याची प्रयोगशाळा बनते. त्यांतून हि कांहीं गूढ विचार निघतात यांत शंका नाहीं. पण योग्याच्या प्रयोगशाळेंतील विचारसंशोधनानें शास्त्र बनेल, मात्र त्या विचाराचा समाजांत तात्काळ प्रसार होणार नाहीं. प्रयोगशाळेंत पारखला गेलेला व काळाच्या मागणीनुसार असणारा असा जो विचार असेल, तो च समाजांत प्रसार पावेल. सारांश, विचार कार्य-साधक असला पाहिजे. असे कार्यसाधक विचार जेव्हां जगापुढें मांडले जातात, तेव्हां तो मांडणारा केवळ निमित्तमात्र असतो, त्याला कांहीं विशेष किंमत असत नाहीं.

असा च विचार लोक सहजपणें ग्रहण करूं शकतात. ज्याप्रमाणें उन्हाळ्यांत तापलेली जमीन पावसाची वाट पाहत असते व वर्षाव होतां च

पाणी शोषून घेतें, त्याप्रमाणें युगधर्मानुसार युगप्रवर्तक कार्यसाधक जेव्हां विचार पुढें मांडतो तेव्हां चिंतनशील नसणारे लोक हि तो विचार ऐकण्यास अतिशय उत्सुक होत असतात. आज हिंदुस्थानांत कोठें हि गेले तरी हें च ऐकूं येतें कीं, 'आमची नैतिक पातळी घसरत चालली आहे. लोक पूर्ण वासनाधीन बनले आहेत. अशा तऱ्हेची निंदा ही परनिंदा नव्हे, तर आत्मनिंदा च होत असते. परंतु याप्रमाणें स्वतःला भोगासक्त मानणारा समाज हि त्यागाचा संदेश ऐकण्यासाठीं उत्सुकतेनें येत असतो. हजारोंच्या संख्येनें लोक त्यागाचा संदेश ऐकण्यासाठीं येत आहेत व शांत चित्तानें तो ऐकून घेत आहेत. ज्याप्रमाणें तहानेला मनुष्य एकाग्रतेनें पाणी पिऊं लागतो, त्याप्रमाणें भोगासक्त लोक एकाग्रतेनें त्यागाचा संदेश ऐकत आहेत. कारण त्यावांचून त्यांची प्रगति हि खुंटून गेली आहे. आज भोगासक्तांना हि हें समजलें आहे कीं, भोगाबरोबर त्याग राहील तर च भोग हि उपभोगतां येईल. म्हणून जेव्हां माझ्यासारखा योगी त्यागाचा संदेश ऐकविण्यास येतो, तेव्हां लोक त्याचे उपकार च मानतात.

## आपण आत्मा आहोंत

अनादि कालापासून मानव-समाजाचा सतत विकास होत च आहे. त्या त्या युगाच्या गरजेप्रमाणें तो आपल्या एकेका गुणाचें चिंतन व विकास करीत आला आहे. आत्म्यांत असंख्य गुण आहेत. अनंत तारकांची आपणांस गणति करतां आली किंवा मातीच्या असंख्य कणांची मोजदाद करतां आली तर च आत्म्याच्या अगणित गुणांची गणति आपणांस करतां येईल. अशा अनंत गुणांनीं मंडित असा हा आत्मा आपल्याहून वेगळा नाहीं. तो आमच्या अगदीं निकट आहे. अनुभवी लोकांनीं तर सांगितलें आहे कीं आपण आत्मा च आहोंत, तेव्हां त्याच्याजवळ असण्याचा प्रश्न च उद्‌भवत नाहीं. शरीर, मन, व इंद्रियें, हीं च आमच्याहून वेगळी आहेत. शरीर दुर्बल झालें तर माणसाला तें दुर्बल झाल्याचें समजतें. तेव्हां शरीराची दुर्बलता ओळखणारा स्वतः दुर्बल नाहीं हें उघड आहे; तो शरीरापासून वेगळा आहे. जसें घर मोडकळीस आलें तर तें घराला समजत नाहीं; तें समजणारा घराहून वेगळा असतो. त्या च प्रमाणें आपण शरीर, मन, व बुद्धि, यांच्याहून सर्वस्वी वेगळें आहोंत.

कधीं कधीं आपण रात्रीं झोंपण्यास जातों व निजण्याची सर्व व्यवस्था झालेली असते, पण तरी हि तास न् तास झोंप येत नाहीं. ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे कीं, झोंपेची इच्छा करणारा कोण आहे, व झोंप न येऊं देणारा कोण आहे? आंतील वासना ऐकत नाहींत व झोंप येऊं देत नाहींत. यावरून हें म्हणावें लागतें कीं शरीर, बुद्धि, व मन, यांच्याहून आत्मा वेगळा आहे. आत्मा म्हणजे च जर बुद्धि व मन असतें, तर मीं झोंपेची इच्छा करतां च मला झोंप लागली असती. पण झोंपेची इच्छा करणारा मी आहें आणि झोंपेची इच्छा नसणारी बुद्धि माझ्याहून वेगळी आहे. यावरून हें स्पष्ट आहे कीं, मन, बुद्धि, व इंद्रियें, हीं माझ्याहून वेगळीं आहेत, पण आत्मा मात्र वेगळा नाहीं.

## प्रत्येक युगांत भिन्न गुणांचें प्राधान्य

पौर्णिमेच्या दिवशीं चंद्र पूर्ण असतो, अष्टमीच्या दिवशीं अर्धा असतो व द्वितीयेला तर त्याची नुसती कोर च असते, हें आपण नेहमीं पाहतों. प्रत्येक रात्रीं वेगवेगळा चंद्र! आणि आपापल्या परी त्याची विशेषता हि वेगवेगळी असते; ती आपलें ध्यान खेंचून घेत असते. त्याप्रमाणें आत्म्याच्या अनंत गुणांतून एकेक गुण प्रत्येक युगाला आपल्याकडे खेंचून घेत असतो व समाज त्या गुणाप्रमाणें आचरण करूं लागतो.

एके काळीं लोकांनीं स्वच्छतेला च धर्म मानलें. स्वच्छता हा च परम गुण मानला व तदनुसार आचरण करण्याची इच्छा प्रगट केली. एक काळ असा होता कीं, जेव्हां लोकांनीं काम-नियमन करण्याचा प्रयत्न केला व विवाह-संस्था आकारास आणली. त्या काळीं विवाह-संस्था कशी असावी या च गोष्टीवर सगळ्या मानव-समाजांत विचार झाला. हिंदु धर्मांत विवाहाचे आठ प्रकार आपण ऐकतों, त्यांपैकीं एक प्रकार अखेर मान्य झाला. याचा अर्थ हा च कीं, काम-नियमनाची समाजांत फार गरज वाटली व त्यामुळें समाजानें तिकडे च लक्ष दिलें. एक राजा दुसऱ्या राजाची राणी पळवून नेत असे, अशा गोष्टी आपण प्राचीन इतिहासांत वाचतों. पण आज अशा गोष्टी कानांवर पडत नाहींत. आपण थोडेसें काम-नियमन शिकलों आहोंत हा च याचा अर्थ आहे. आपण आतां पूर्ण काम-विरक्त झालों आहोंत असा मात्र याचा अर्थ नाहीं. पण काम थोडा कमी झाला आहे, त्याची युक्ति

साधली आहे एवढें च म्हणतां येईल. जुन्या महाकाव्यांत सीता-हरणासारखा विषय काव्याचा मध्यबिंदु होत असे. पण आज तशी इच्छा कोणाला होत नाहीं.

## या युगाचे तीन गुण

या प्रमाणें मानव-समाजानें स्वच्छता व काम-नियमन यांच्यासाठीं जोराचा प्रयत्न केला व त्यांतून कांहीं भल्या बुऱ्या रूढि निर्माण झाल्या. मीं अगोदर च सांगितलें आहे कीं, प्रत्येक युगांत आत्म्याच्या एकेका गुणाचा महिमा विशेष मानला जात असतो. एकेका गुणाचें नांव घेतलें तर तो आदरणीय मानला जाईल च. कारण गुण हे आदरणीय असतात च. पण ज्या गुणाचें आचरण करण्यास समाज उत्सुक असतो, तो त्या त्या युगाचा राजा मानला जातो. माझें जें अध्ययन झालें आहे त्याच्यावरून मीं असा निष्कर्ष काढला आहे कीं आज तीन गुणांची समाजाला अत्यंत गरज आहे. निर्भयता, समता, व समाजनिष्ठा; हे ते तीन गुण आहेत. मानवाला आज या च तीन गुणांची आवश्यकता भासत आहे. मानवाचे जे जे प्रयत्न चालले आहेत. ते या च तिन्ही गुणांसाठीं होत आहेत.

## निर्भयता शस्त्रास्त्रांवर अवलंबून नाहीं

आज अण्वस्त्रांच्या निर्मितीमुळें जगांतील सारे लोक भयभीत झाले आहेत. प्रत्येक राष्ट्राला दुसऱ्याची भीति वाटत आहे. अमेरिका इतका संपन्न देश आहे कीं, त्याच्या जोडीचा दुसरा देश सांपडणार नाहीं. पण संपूर्ण अमेरिकेला सोव्हिएट रशियाची भीति वाटत आहे. सगळ्या समाजावर भीतीची छाया पसरली आहे. या च प्रकारें सोव्हिएट रशियाला अमेरिकेचें भय वाटत आहे. आणि पाकिस्तानला हिंदुस्थानचें भय ग्रासीत आहे. अशा तऱ्हेनें व्यक्तीला व्यक्तीचें भय वाटतें, एवढें च नव्हे तर संपूर्ण समाजांना दुसऱ्या समाजांच्या भयानें घेरलें आहे व प्रत्येक देश अधिकाधिक संहारक अस्त्रांचा शोध करण्यांत गुंतला आहे. अशा रीतीनें ते निर्भय बनण्याचा प्रयत्न करीत आहेत! एका ठिकाणीं स्त्रियांनीं मला विचारलें ' आम्ही जर हातांत लाठी बाळगूं लागलों तर त्याबद्दल आपलें काय मत आहे ? ' मीं उत्तर दिलें, ' हातांत शस्त्र घेतल्यानें जर तुमचें भय कमी होत असेल, तर माझा शस्त्रांवर विश्वास नसला तरी तुम्हीं अवश्य शस्त्र हातीं घ्यावें असें च मी सांगेन.

कांही लोक म्हणतात कीं, ' हिंदुस्थानासारख्या संपूर्ण राष्ट्राला इंग्रजांनीं निःशस्त्र बनविलें. त्यामुळें परिणाम हा झाला कीं, हिंदुस्थानी लोकांचीं मनें भीतीनें घेरलीं गेलीं. ' पण शस्त्र नसण्यानें भय वाटतें हें मान्य केलें तर अमेरिकेसारख्या राष्ट्राला भय कां वाटावें ? सर्व अमेरिका देश आधुनिक शस्त्रास्त्रांनीं पूर्णपणें सुसज्ज आहे, तरी हि त्याला भीति वाटते च. म्हणजे भीति ही मनामध्ये असते ; आणि हातांत शस्त्र घेतलें तरी तें दुसऱ्याच्या च कामीं पडण्याचा संभव असतो. एक मनुष्य बंदूक घेऊन निजला होता. रात्रीं चोर आले. तो इतका घाबरून गेला कीं, त्याची वाचा च बंद झाली. " चोर आला ' असें ओरडण्या ऐवजीं तो ' बंदूक बंदूक ' असें ओरडूं लागला. त्याबरोबर चोरानें च त्याची बंदूक घेतली आणि त्या शस्त्राचा फायदा त्याला झाला च नाही.

लाठी किंवा बंदूक जवळ ठेवल्यानें कांहीं वेळ मनाला शांतता वाटेल. पण दुसऱ्याजवळ त्याच्यापेक्षा अधिक चांगली काठी असली कीं त्याला पुन्हां भय वाटूं लागेल. लोक वाघाला शूर समजतात व मांजरीला भित्री म्हणतात. पण उंदरासमोर मांजरींत शौर्य संचरतें आणि बंदुकीसमोर शूर वीर वाघ हि भित्रा ठरतो. वाघाची निर्भयता तर त्याच्या नखांवर व दांतांवर अवलंबून आहे. याच रीतीनें ज्यांची निर्भयता शस्त्रास्त्रांवर अवलंबून राहील ते कधीं च पूर्ण निर्भय बनूं शकणार नाहीत. निर्भय बनण्याचा त्यांचा प्रयत्न चालू असतो हें मात्र निश्चित.

एक अमेरिकन गृहस्थ माझ्याकडे आले व मला विचारूं लागले कीं, ' अमेरिकेला आपण कोणता सल्ला द्याल ? ' मीं उत्तर दिलें, ' मी अमेरिकेला कोणता सल्ला देणार ? माझी तेवढी योग्यता नाही. माझ्या देशाला मी सल्ला देऊं शकतों. पण तुम्ही विचारतां च आहांत तेव्हां सांगतों. आपण एवढीं शस्त्रास्त्रें बनवितां व म्हणतां कीं त्यामुळें लोकांना खूप काम मिळतें व बेकारी नष्ट होते. तेव्हां शस्त्रास्त्रें तयार करूं नका असें मी म्हणणार नाहीं. उलट असें म्हणेन कीं, आणखी शस्त्रास्त्रें वाढवा म्हणजे सर्व लोकांना काम मिळेल. पण तिकडे आपल्या लोकांची बेकारी नाहीशीं करण्यासाठीं रशिया

हि शस्त्रास्त्रें वाढवीत आहे ही गोष्ट ध्यानांत असू द्या. या वाढीमुळें तुम्हां दोघांची टक्कर होईल. आणि परिणामतः त्यांचीं विमानें तुमच्या विमानांचा विध्वंस करतील व तुमचीं जहाजें त्यांच्या जहाजांना बुडवतील. अशा तऱ्हेनें एकमेकांचीं जहाजें बुडवण्यापेक्षां क्रिसमसच्या दिवशीं स्वतः च आपलीं जहाजें बुडवून टाकावीं. यामुळें सर्वांना काम हि मिळेल व जगांत शांतता हि राहील. आमचीं जहाजें त्यांनीं व त्यांचीं आम्ही बुडवावयाचीं हें परावलंबी जीवन कशाला हवें ? '

ही जी शस्त्रास्त्रांची प्रचंड वाढ चालली आहे, तिचें मला मुळीं च भय वाटत नाहीं. मी तर असें म्हणतों कीं, जितकें लढावयाचें असेल, तितकें सगळें लढून घ्या. कारण आजचीं युद्धें हीं जर लहान लहान युद्धें असतीं, तर अहिंसेला अवसर च मिळाला नसता. आतां तर जागतिक युद्ध च होणार आहे. याचा अर्थ हा कीं, निर्भय होण्यासाठीं मनुष्यानें जे प्रयत्न चालवले आहेत, त्यांची निरर्थकता सिद्ध होईल आणि मनुष्य हा शस्त्रास्त्रांनीं कधीं च निर्भय होऊं शकणार नाही ही गोष्ट सर्वांच्या पूर्ण ध्यानांत येईल. आणि यानंतर च शस्त्रास्त्रांचा पूर्ण त्याग करून मनुष्य निर्भय बनेल.

प्राचीन राज्यशासनांत एक महत्त्वाचा शब्द आढळून येतो. राज्यांत काय काय असणें अवश्य आहे—हें सांगतांना असें म्हटलें आहे कीं, "राज्यांत सर्वांना 'अभय' मिळालें पाहिजे." म्हणजे प्रत्येकाला निर्भय वाटलें पाहिजे. माझ्यावर अन्याय होऊं शकणार नाहीं असें प्रत्येकाला वाटलें पाहिजे आणि अन्याय झाला तरी धर्म व न्याय हा माझ्या च बाजूचा आहे असा त्याला विश्वास वाटला पाहिजे. मला भीतीचें कांहीं हि कारण नाहीं असें प्रत्येकाला वाटलें पाहिजे. ज्या देशांत निर्भयता राहील, तेथें च खरें स्वराज्य आहे असें म्हटलें जाईल.

## चेतनांना समस्यांची गरज च आहे

एके काळीं येथें 'इंग्रजांचें राज्य' आहे असें म्हटलें जात होतें. आतां 'दिल्लीचें राज्य' आहे असें म्हटलें जातें. पण जेव्हां प्रत्येकजण 'माझें राज्य आहे' असें म्हणेल तेव्हां च खरें 'स्वराज्य' येईल. जगाला आज हें च हवें आहे. आज जगांत जे सारे प्रयत्न चालले आहेत, ते जगाला निर्भय बनविण्या-

साठीं च चालले आहेत. ज्या दिवशीं जग निर्भय बनेल, त्या च दिवशीं त्याला समाधान प्राप्त होईल व सगळे प्रश्न मिटतील. पण एक प्रश्न मिटला तर दुसरा पुढें येईल. एका काळांत शांतता निर्माण झाल्यानें सदाची च शांतता स्थापन होईल असें कधीं च होत नसतें. मानव-समाजानें सदा चिंतनशील रहावें ही च परमेश्वराची इच्छा आहे. म्हणून च मनुष्यांसमोर नित्य नव्या समस्या उभ्या ठाकत असतात आणि त्यासाठीं मनुष्याला नित्य नवीं आंदोलनें करावीं लागत असतात. नव्या नव्या समस्या निर्माण होणें हें च मनुष्याच्या चैतन्याचें लक्षण आहे. जर सार्‍या समस्या संपून गेल्या तर मनुष्य जड बनून जाईल. जड पाषाणापुढें कसली च समस्या नसते. पण मनुष्य चेतन आहे. म्हणून त्याच्यासमोर सदा समस्या येत राहतील. पण तरी हि सध्याच्या काळांत निर्भयतेची अतिशय आवश्यकता आहे हें निश्चित.

## आज सर्वांना समतेची भूक आहे

या काळाचा दुसरा आवश्यक गुण समता हा आहे. एके काळीं सद्भावनेनें वेगवेगळे वर्ग बनविले गेले होते. प्रत्येक वर्गाला त्याच्या योग्यतेप्रमाणें शिक्षण मिळण्याची व्यवस्था हि केली गेली होती. आज तें सारें पाहून आम्हांला दुःख होतें व त्याकाळीं लोक योग्य प्रकारें विचार करीत नव्हते, असें वाटतें. पण वस्तुतः अशी गोष्ट नाही. त्या काळीं मनुष्यांच्या गुणांची योग्यता पाहिली गेली. ते लोक असा विचार करीत कीं, मूर्ख मनुष्याला शिक्षणाची गरज च नाही. त्याला उद्योगाला लावले की ठीक होईल. त्याला जर बुद्धीच्या कामाकडे लावले तर तें काम त्याच्याकडून होणार नाहीं व शरीरश्रमाचें हि काम होणार नाहीं. तेव्हां कांहीं लोकांवर राज्याचा भार सोपवला गेला, कांहींच्या हातीं देशाचें रक्षण. कांहींनीं व्यापार करावा व कांहींनीं शरीर-श्रम. तीन वर्णांची सेवा करणें हें शूद्राचें भाग्य समजलें जाई. आज आम्हांला असें वाटतें कीं, अशी समाज-व्यवस्था करण्यामागें त्यांचा सद्धेतु नव्हता. पण हें वाटणें बरोबर नाहीं. ज्या काळीं विज्ञानाची प्रगति नव्हती, तेव्हां हे वर्ण बनवावे लागले. पण जेव्हां विज्ञानाची

झपाट्यानें प्रगति होऊं लागली, तेव्हां संधि मिळाल्यास प्रत्येक मनुष्याचा विकास होऊं शकतो, आतां वेगवेगळे वर्ण किंवा वर्ग पाडण्याची गरज नाही, ही गोष्ट लोकांच्या ध्यानांत आली.

आजच्या काळांतील अगदी साधारण माणसाला हि स्वच्छतेची जाणीव आहे. प्रत्येकजण अवश्य तेवढी स्वच्छता राखतो असें नाहीं. पण आजच्या काळांतल्या सामान्य माणसाची हि स्वच्छता प्राचीन काळांतील माणसापेक्षा अधिक आहे. त्या काळीं स्वच्छेतेचीं आजच्यासारखीं साधनें उपलब्ध नव्हतीं. ते लोक तूप जाळून हवा शुद्ध करीत. पण आज तसें कोणी करीत नाहीं. .आज स्वच्छतेचीं साधनें सहज मिळूं शकतात. पूर्वीं मेहतरांचा विभाग वेगळा व ब्राह्मणांचा वेगळा असे. कारण स्वच्छतेचीं साधनें त्यांच्यापाशीं पुरेशीं नसत. पण आज विज्ञान वाढल्यामुळें या भेदांची गरज राहिली नाही. आज विज्ञानाच्या वाढीमुळें ज्या औषधांचें ज्ञान आपणास झालें आहे, त्यांचें त्यावेळीं ज्ञान नव्हतें. अशा प्रकारें त्यांच्यासमोर वेगळ्या समस्या होत्या व आपल्यापुढें वेगळ्या आहेत.

मी आपल्याला दुसरा दृष्टान्त देतों. जुन्या लोकांनीं असा नियम केला होता कीं, वेद फक्त ब्राह्मणांनीं च म्हणावे, दुसऱ्या कोणी वाचतां म्हणतां उपयोगी नाहीं. हा नियम कशासाठीं होता ? त्या काळीं छापखाने नव्हते व वेद कण्ठस्थ च करावे लागत. सगळ्यांना च त्याचें स्पष्ट व बिनचूक उच्चारण करणें शक्य नव्हतें व त्यामुळें वेदांचें उच्चारण अशुद्ध होण्याचा संभव होता. म्हणून त्यावेळीं एका विशिष्ट वर्गाकडे च वेदाध्ययनाचें काम सोपवलें गेलें. यांत त्यांचा कोणता च वाईट हेतु नव्हता. पण आतां आपल्याजवळ छापखान्याची सोय आहे. तेव्हां त्यांत वेद शुद्ध रीतीनें छापलें जाऊं शकतात व कोणी हि त्यांचा अभ्यास करूं शकतो. एवढें च नव्हे, तर जो शुद्ध, स्वच्छ पाठ करील त्याचें रेकॉर्ड हि घेतां येतें व तें ऐकून घरोघर शुद्ध रीतीनें वेदपठण करतां येतें. प्राचीन काळांतल्या अडचणी आतां राहिलेल्या नाहीत. म्हणून आतां शिक्षण घेण्यांत कोणत्या हि प्रकारचा प्रतिबंध असतां उपयोगी नाही. जुन्या काळांतील विषमता त्या काळीं आवश्यक होती. पण आतांच्या विज्ञानाच्या युगांत असे वर्गाचे भेद ठेवण्याची गरज राहिलेली नाही. आज

सर्वांना समतेची भूक आहे. समतेविरुद्ध कोणी बोलेल, तर तें समाजाला आवडत नाहीं. समता प्रस्थापित करण्यासाठीं जें आंदोलन होईल, त्यामुळें मात्र लोकांत उत्साह निर्माण होईल. कारण आज समतेची च मागणी आहे.

## समाज-निष्ठा ही युगाची मागणी आहे

या युगाचा तिसरा गुण समाज-निष्ठा हा आहे. व्यक्तिगत विकासासाठीं सोयी असल्या पाहिजेत आणि विज्ञानामुळें त्या करणें आज सहज शक्य आहे. प्राचीन काळीं गुरु मिळणें कठिण होतें. त्यामुळें सर्वांना शिक्षण देणें शक्य नव्हतें. परंतु आज शिक्षण देण्याचीं व्यापक साधनें आपल्या हातीं आलेलीं असल्यामुळें आतां व्यक्तिगत विकासाबद्दल चिंता करण्याचें कारण उरलें नाहीं. पण आजच्या माणसानें आपला व्यक्तिगत विकास करून घेऊन आपलें विकसित व्यक्तितव समजाला अर्पण करावें या गोष्टीची मात्र आतां गरज निर्माण झाली आहे. मनुष्य एकांतांत प्रार्थना करूं लागला कीं, त्याला प्रेरणा मिळते हें खरें आहे. पण आजच्या युगांत सामूहिक प्रार्थनेनें जेवढी प्रेरणा मिळते, तेवढी व्यक्तिगत प्रार्थनेनें मिळत नाहीं. हृदय-परीक्षणासाठीं मात्र व्यक्तिगत प्रार्थनेची जरूर आहे.

ध्यानयोगाचा एक काळ होता. नंतर संत आले व त्यांनीं सांगितलें कीं, 'जेथें अनेक लोक एकत्र येऊन प्रार्थना करतात तेथें च परमेश्वर वसत असतो.'

"नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ।
मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥"

या वचनाचा प्रचार करून वैष्णवांनीं सामूहिक भक्तीला चालना दिली. वैष्णवांनीं सामूहिक रीतीनें समाजनिष्ठेची मागणी करण्यास प्रारंभ केला. त्यापूर्वीं एकांत प्रार्थनेचें च महत्त्व होतें. आजच्या युगांत हि योगी अरविंद हे पाँडीचेरींत एका जागीं बसून मनानें वर वर जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण मध्यंतरीं वैष्णवांनीं सामूहिक भक्तिमार्ग सुरू केला होता. ते आधुनिक युगाचे पूर्वाचार्य च जणूं होते. आज मला सामूहिक भक्तियोगाचें जेवढें आकर्षण वाटतें, तेवढें ध्यान-योगाचें वाटत नाहीं.

महात्मा गांधींनीं सामूहिक अहिंसेचा प्रयोग केला. ज्या अहिंसेचा प्रयोग बुद्ध व महावीर यांनीं केला, तिला च महात्मा गांधींनीं सामूहिक रूप दिलें. लाखों लोकांचें उत्थान झालें. वारा जोरानें जेव्हां वाहतो तेव्हां पिसें च नव्हे, तर पानें हि वर उडतात. पण वादळ थांबलें कीं, पानें खाली पडतात आणि हवेंत सदैव उडणारी पिसें मात्र उडत च राहतात. महात्मा गांधींच्या नंतर आम्ही सर्व सुस्त बनलों. पण हें भूदान निघालें व तें वाढत च चाललें आहे. आम्हांला एक लक्ष दानपत्रें मिळालीं, ही कांहीं लहानशी घटना नव्हे. ही या युगाची मागणी आहे, हें च याचें कारण आहे. आज जर आम्ही सांगूं लागलों कीं, 'त्याग करा, लंगोटी लावून रहा,' तर कोणी ऐकणार नाहीं. पण 'समाजासाठीं त्याग करा' असें सांगूं लागलों, तेव्हां आपली सर्व जमीन दान देणारे शेतकरी हि आम्हांला मिळाले. लहान लहान शेतकरी दान देत आहेत व राजे महाराजे हि या कार्यांत गुंतले आहेत.

'गांवची सारी जमीन ही गांवाची च आहे' असें जर तुम्ही गांवांत जाऊन समजावूं लागलांत, तर तें ऐकून घेण्यास आज लोक तयार आहेत. हें आंदोलन जर आपण धीरानें चालवलें, तर संपूर्ण खेडीं आपणांस दान म्हणून मिळतील. उत्तर प्रदेशांत 'मंगरोठ' व आपल्या येथें 'सेन्हा' हीं संपूर्ण खेडीं अशीं च दान मिळालीं आहेत. आपण नीट समजावून सांगाल, तर किती तरी खेडीं पुढें येऊन आपली जमीन देतील. कारण आजची मागणी ही समाजनिष्ठेची आहे. व 'समाजाला जितकें देऊं शकाल, तितकें दिलें पाहिजे' या गोष्टीची लोकांना भूक आहे. समाजाकडून च अशी मागणी आली, तर मोह सुटला नाही तरी ती मागणी पुरी करण्याची इच्छा च होते. बिहारमध्यें जमीन मागण्यास आरंभ झाला, तेव्हां कोणी हि नकार दिला नाहीं. सर्व देत आहेत. सर्वांचीं मनें उच्च पातळीवर पोंचलीं आहेत, असा कांहीं याचा अर्थ नव्हे. पण जेथें जमिनीची मागणी केली जाते, समाजनिष्ठेची गोष्ट जेथें येते, तेथें माणूस ती सहज मान्य करतो. त्याला यामुळें प्रेरणा मिळते.

## तिन्हीं गुणांचा विकास करा

मीं जे तीन गुण सांगितले, त्यांचा जर आपण विकास केला, तर आपणांस भरभरून मिळेल. आपल्याला निर्भय बनावयाचें आहे, कोणी धमक्या देऊन किंवा भीति घालून जर कांहीं करवूं म्हटलें, तर त्याचें कोणी हि ऐकूं नये.

हातांत काठी घेऊन जर कोणी शाळेंत शिकवूं लागला, तर मुलांनीं तें चालू देतां उययोगी नाहीं. छडी ही जुन्या काळांत आतां जमा झाली आहे. मी आपल्याला हें सांगतों कीं, कोणी भीति दाखवून जर तुम्हांला जमीन देण्यास भाग पाडूं लागला, तर मुळी च जमीन देऊं नका. मी तुम्हांला निर्भय बनवूं इच्छितों.

याप्रमाणें विषमता नाहीशी झाली पाहिजे. भागलपुरांत एक प्रोफेसर मला भेटण्यास आले. ते सांगूं लागले कीं, 'आमच्याकडे समता नाही. कोणाला पगार कमी तर कोणाला जास्त अशी स्थिति आहे.' मी उत्तर दिलें कीं, 'सरकार समता ठेवूं शकत नाही. कारण तें सरासरीच्या नियमानें चालतें.' सर्व कुटुंबांनीं एकत्र रहावें असें जें मी सांगतों, त्याचा असा अर्थ नाहीं कीं, सर्वांनी एकत्र च खावें प्यावें. खाणें पिणें तर घरोघर वेगळें होईल. पण जमीन व इतर जी संपत्ति आहे ती एकत्रित केली पाहिजे. सगळ्या गांवानें च एकत्र रहावें अशी माझी इच्छा आहे. पण आज एकदम सगळें गांव एकत्र होऊं शकणार नाहीं. पण चार चार, पांच पांच कुटुंबें मात्र एकत्र राहूं शकतील. शेती, व्यापार व उद्योग एकत्र करण्याचा प्रयत्न त्यांना जरूर करता येईल.

समाजाच्या सेवेंत लीन होणें यांत च व्यक्तीचा मोक्ष आहे. व्यक्तीच्या अहंकाराचें विसर्जन हा मोक्षाचा अर्थ आहे. जेथें अहंकार नष्ट होतो, तेथें व्यक्ति समाजरूप व ब्रह्माण्डरूप होऊन जाते. तिला मोक्ष च प्राप्त होतो!

मुंगेर
२०-१०-'५३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ९७९६
शाखा स्थळ

## वाणिज्य धर्म आहे, संग्रह धर्म नव्हे : २० :

भूदान यज्ञाची पूर्ति करण्यासाठीं मी यथावकाश संपत्तिदानयज्ञ व श्रमदानयज्ञ सुरू केले. संपत्तिदानयज्ञावाचून भूदानयज्ञ सफल होऊं शकत नाहीं हें स्पष्ट आहे. पण याशिवाय संपत्ति-दान-यज्ञाचें एक स्वतंत्र कार्य हि आहे. भूदानयज्ञ सफल करण्यासाठीं च संपत्तिदानयज्ञाची जरूर आहे असें नव्हे, तर संपत्तीचें समान विभाजन करणें हें हि त्याचें महत्त्वाचें कार्य आहे. या दृष्टीनें त्याचा अधिक सूक्ष्म विचार होणें अवश्य आहे.

### संग्रह हें पाप आहे कां ?

संपत्तिदानयज्ञावर लिहितांना दादा धर्माधिकारींनीं संपत्तीचा संग्रह करणें हें च पाप मानलें आहे. त्यावर कलकत्त्याच्या एका गृहस्थानें शंका उपस्थित केली आहे. त्यांच्या म्हणण्याचा सारांश असा आहे कीं, ‘ वाणिज्य हा वैश्यांचा धर्म मानला गेला आहे. त्यांत संग्रहाची तर गरज च असते. त्या संग्रहाचा उपयोग विश्वस्तवृत्तीनें त्यानें करावा अशी अपेक्षा ठेवणें हें योग्य आहे. पण संग्रहाला च अधर्म मानणें किंवा पाप समजणें हें कितपत उचित होईल ?’—ही शंका जरूर विचारण्यासारखी च आहे. पापपुण्याची व्याख्या ही उत्तरोत्तर अधिकाधिक सूक्ष्म होत जात असते. आज जो धर्म मानला जातो तो पुढील काळांत अधर्म मानला जाणें शक्य आहे. देशकालभेदांनीं हि व्याख्या बदलत असतात. या सगळ्या व्याख्या क्षणभर सोडून दिल्या तरी, धर्माधर्म व पापपुण्य यांच्या द्विविध व्याख्या होणें हें अटळ आहे. एका अंतिम परिशुद्ध व्याख्येच्या पोटांत देशकालभेदानुसार अनेकविध व्याख्या सामावतील. गणित हें एक परिनिष्ठित शास्त्र आहे. तरी हि त्यांत देखील शुद्ध गणित व व्यावहारिक गणित असे दोन प्रकार असतात च. धर्मनिर्णयाची हि अशी च स्थिति आहे.

### वाणिज्य-धर्म आणि संग्रह

गीतेंत वाणिज्य हा वैश्यांचा धर्म सांगितला आहे. पण संग्रह हा धर्म मानलेला नाही. वाणिज्यामध्यें संग्रह जो होतो, तो प्रचलित समाजरचनेचा

परिणाम आहे. पण कोणत्या हि अवस्थेंत वाणिज्यांत संग्रह झाला च पाहिजे हें मान्य करणें शक्य नाहीं. याचा अर्थ असा च होतो कीं, वैश्याला हि अपरिग्रहाची दृष्टि ठेवून च आपला वर्ण-धर्म चालवला पाहिजे. वाणिज्यांत अनैतिक प्रकारांना तर कोणी च मान्यता देत नाही. कोणत्या हि उपायांनीं धन मिळवून त्याचा विश्वस्तवृत्तीनें विनियोग करा, असें तर कोणी च म्हणू शकत नाहीं. जेथें अनैतिक उपाय निषिद्ध मानले गेले, तेथें संग्रहाला हि निश्चित मर्यादा आली च.

## व्याजाचा निषेध

आज जे नैतिक उपाय मान्य आहेत त्यांची हि मान्यता उत्तरोत्तर बदलेल व ती बदलली हि पाहिजे. उदाहरणार्थ, व्यापारांत आज व्याजाला मान्यता मिळालेली आहे. आज मिळालेल्या मान्यतेप्रमाणें एवढें म्हणतां येईल कीं, व्याज अतिरिक्त प्रमाणांत घेतां कामा नये. इस्लामनें व्याजाचा आत्यंतिक निषेध केलेला आहे. समाजाला आज ना उद्यां तें च मान्य करावें लागेल. तो दिवस लवकर यावा व तो लवकर आणण्याचा प्रयत्न हि व्हावा. एकदां व्याजाचा निषेध मान्य झाला कीं, संग्रहाचें प्रमाण पुष्कळ च कमी होईल.

व्याज घेतां उपयोगी नाही, एवढें च नाहीं तर किशोरलालभाईनीं असें लिहिलें आहे कीं, कपात हि मान्य केली पाहिजे. म्हणजे आपल्याजवळ बरा च पैसा जमला असेल व त्याचा कांहीं तात्काळ उपयोग आपल्याला करावयाचा नसेल आणि दुसऱ्याला तसा उपयोग करावयाचा आहे म्हणून त्याला आपण आपले पैसे देणार असलों, तर कांहीं मुदतीनंतर जेव्हां तो आपले पैसे परत करील, त्यावेळी सोळा आणे परत करण्याची जबाबदारी त्याच्यावर टाकतां उपयोगी नाही. त्यानें रुपयांत पंधरा आणे परत केले तरी तो ऋणमुक्त झाला असें च मानलें पाहिजे. विशेषतः ग्रामोद्योगांसारख्या जनतेच्या हितकार्यांत गुंतलेल्या पैशांत कमीजास्त कपात मान्य करणें हा धर्म च होईल. हा विचार मान्य झाला, तर संग्रहाचें प्रमाण आणखी घटेल.

## नफा नाहीं व तोटा नाहीं

याशिवाय आणखी असा विचार केला पाहिजे कीं, वाणिज्य हा वर्णधर्म आहे कीं मान्य उपायांच्या द्वारां नफा मिळविण्याचें तें एक साधन आहे ?

तो जर वर्ण-धर्म असेल, तर त्यांत विशेष नफा हि होऊं नये व तोटा हि होऊं नये. अर्थात् सेवा-धर्मी वणिजाला त्याच्या मेहनतीचें मोल मात्र मिळालें पाहिजे. याप्रमाणें जास्त नफा हा अधर्म च समजला जाईल. आणि तोटा झाला, तर तो हि अधर्म मानला जाईल. कारण त्यांत गैरसावधपणा इत्यादि दोष असतील व त्यामुळें वर्णाच्या अस्तित्वावर च आघात होईल. पण अधिक नफ्याची मात्र आशा च करतां उपयोगी नाही. हा विचार जर नीट ध्यानांत आला, तर संग्रहाचें प्रमाण नुसतें कमी होईल असें नाहीं, तर तें शून्यवत् होईल. व्यावहारिक गणितांत शून्याला थोडीशी किंमत असते, त्याचप्रमाणें त्या नफ्याची किंमत होईल.

## उत्पादक व वितरक यांचें महत्त्वमापन

वैश्य-वर्णाच्या धर्माबद्दल विचार करतांना हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, वैश्यांतील अधिक लोक शेती किंवा गोरक्षण यांच्यांत च गुंतलेले असतात. कारण देशाच्या व समाजाच्या त्या च प्राथमिक गरजा असतात. वाणिज्य हा गौण प्रकारचा वैश्य-धर्म ठरेल, कारण उत्पादनानंतर च विनिमय होऊं शकतो. मुख्य कार्य उत्पादन हें च मानलें जाईल. मग उत्पादनाच्या मुख्य कार्यांत लागलेल्या शेतकऱ्यांपेक्षा विनिमयाच्या गौण वैश्य-धर्मांत गुंतलेल्या लोकांनीं जास्त वेतनाची अपेक्षा कशी करावी ? जास्त च झालें, तर मुख्य-गौण हे भेद विसरून शेतकऱ्याच्या बरोबरीचें वेतन ते मागूं शकतील. स्वामी-सेवकाची परिभाषा मान्य असेल, तर शेतकरी हे स्वामी असल्यामुळे सेवक असणाऱ्या वणिजांना जास्त वेतन कसें मिळणें शक्य आहे ? यावर कोणी जर असें म्हणेल कीं, शेतकऱ्यापेक्षा वणिजाला बुद्धीचा अधिक उपयोग करावा लागतो, तेव्हां त्याला वेतन अधिक मिळालें पाहिजे, तर ही गोष्ट सिद्ध च होऊं शकणार नाही. म्हणजे उत्पादनापेक्षा विनिमयासाठीं अधिक बुद्धि लागते असें निश्चयानें कोणी म्हणूं शकणार नाही. आणि असें म्हटलें तरी जास्त बुद्धि असली कीं, पचन शक्ति हि अधिक असते हें जोंवर सिद्ध होत नाहीं तोंवर वणिजाला अधिक वेतन मिळालें पाहिजे ही गोष्ट मान्य होणार नाहीं. 'बुद्धीचा अधिक उपयोग केल्यानें पचनशक्ति मंद होते, म्हणून अधिक हलका आहार घ्यावा लागतो व तो महाग असतो' असें जर म्हणणें असेल, तर जेथें तशी

प्रत्यक्ष परिस्थिति राहील, तेथें तें मान्य करणें शक्य आहे. त्या ठिकाणीं तेवढें अधिक वेतन देतां येईल. पण त्याला वेतन म्हणणें हि चुकीचें ठरेल. तो एक दया-धर्माचा प्रकार होईल व मंद पचनशक्तीच्या प्रत्येक व्यक्तीला तो लागू पडेल. अशा व्यक्ति शेतकऱ्यांत हि आढळतील.

असा सगळा विचार केला कीं, संग्रह हें पाप आहे असें म्हणण्याखेरीज गति च नाही. व्याख्या ती च मान्य करावी लागेल. म्हणून हिंदु-धर्मानें चार वर्ण व प्रत्येक वर्णांतील चार आश्रम मिळून सोळा अवस्थांपैकीं फक्त 'वैश्य-गृहस्थ' या अवस्थेंत मर्यादित संग्रह करण्याची अनुज्ञा दिली आहे. त्या संग्रहाचा अधिकार 'शेतकरी-वैश्य-गृहस्थाला' जेवढा राहील, त्यापेक्षा अधिक 'वणिज-वैश्य-गृहस्था' ला राहील असें मानण्याचें कांही च कारण नाहीं.

## विश्वस्तवृत्ति : सार्वकालीन धर्म

परंतु आजच्या परिस्थितींत अनेक व्यवसाय केंद्रित झालेले असल्यामुळें अपरिग्रहधर्माची प्रतिष्ठापना करण्याच्या दृष्टीनें एक पाऊल पुढें टाकण्याच्या हेतूनें विश्वस्तवृत्तीचा विचार समोर उभा राहतो. केंद्रित व्यवस्थेमध्यें वैश्य-गृहस्थाचा विश्वस्त-वृत्ति हा विशेष धर्म बनून जातो. येथें कदाचित् कोणी असा प्रश्न विचारील कीं, विकेंद्रित किंवा स्वयंपूर्ण व्यवस्थेमध्ये विश्वस्त-वृत्तीची आवश्यकता संपून जाईल कीं काय? ती संपून जाणार च नाही पण तिचें स्वरूप बदलेल. श्रेष्ठ बुद्धि, श्रेष्ठ शक्ति, श्रेष्ठ अधिकार, श्रेष्ठ अनुभव इत्यादि कारणांमुळें विश्वस्त-वृत्तीची गरज सर्वदा व सर्वत्र च राहील. एवढें च नव्हे तर भिन्न भिन्न समाज व राष्ट्रें यांच्यामध्ये सुद्धा ती राहील व परस्परावलंबी होईल. म्हणजे बाप मुलाचा विश्वस्त होईल व मुलगा बापाचा, गृहस्थ ब्रह्मचाऱ्याचा व ब्रह्मचारी गृहस्थाचा, विश्वस्त होईल. वैश्य क्षत्रियाचा व क्षत्रिय वैश्याचा विश्वस्त बनेल. सरकार जनतेचें व जनता सरकारची विश्वस्त बनेल. स्वदेश परदेशाचा व परदेश स्वदेशाचा विश्वस्त होईल. म्हणजे अंतिम अवस्थेंत विश्वस्त-वृत्ति ही वृत्ति या रूपानें उडून जाईल व विश्वास गुणाच्या रूपानें राहील.

२०-१०-'५३

## निर्वैर-प्रतिकाराचा युगधर्म : २१ :

बिहारमध्ये प्रवेश करतां च मी घोषित केलें कीं, मी भगवान् बुद्धांच्या चरणचिह्नानुसार च चालण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांनीं जें धर्मचक्रप्रवर्तन सुरू केलें, तें च चालू युगानुसार पुढें चालविण्याचा हा माझा प्रयत्न आहे. भगवान् बुद्धांनीं जो विचार दिला, त्याचें महत्त्व या हि काळांत आहे व त्यामुळें या युगाचें हि कल्याण होणार आहे. कारण तो एक धर्मविचार आहे.

### निर्वैरतेची व अन्याय-प्रतिकाराची परम्परा

बुद्धांनीं सांगितलें होतें कीं, 'तुम्ही लाख प्रयत्न केले, तरी वैरानें वैराची शांति कधीं च होणें शक्य नाही' ही च त्यांच्या धर्मविचाराची मूल प्रेरणा आहे. त्याच्या अगोदरहि ही प्रेरणा जरी येथें चालू च होती, तरी भगवान् बुद्धांच्या वाणींतून ती एक विशेष रूप घेऊन अवतरली आणि भगवान् बुद्ध त्या प्रेरणेचें आश्रयस्थान बनले. अडीच हजार वर्षांपासून ते या विजय-मंत्राची प्रेरणाशक्ति बनून जगाला शांति-संदेश देत राहिले आहेत.

पण हिंदुस्थानांत केवळ ही च एक विचारधारा चालू होती असें नाहीं. याहून भिन्न असा अन्यायाच्या प्रतिकाराचा एक विचार-प्रवाह येथें चालू होता. समाजशास्त्रज्ञांनीं तो चालू केला होता. त्या समाजशास्त्रज्ञांनीं किंवा स्मृतिकारांनीं हा विचार समोर ठेवला व सांगितलें कीं, 'कोठें हि अन्याय झाला तरी त्याचा प्रतिकार केला च पाहिजे.' हिंदुस्थानच्या इतिहासांत हा दुसरा एक विचार-प्रवाह हि चालत आला आहे.

या प्रकारें येथें दोन विचार-धारा चालत आल्या आहेत :—(१) वैरानें वैर वाढत च जातें, म्हणून निर्वैरच राहिलें पाहिजे व (२) समाजांत कोठें हि अन्याय होत असला, तरी तेथें त्याचा प्रतिकार केला च पाहिजे. अन्याय कधीं हि सहन करतां कामा नये.

हे दोन्ही विचार समानांतर चालत आले आहेत. देशसेवक व महापुरुष या दोघांवर हि त्यांचा प्रभाव पडत आलेला आहे. अन्यायाचा प्रतिकार करणें मान्य केल्यावर हि अशी विचारप्रणालि निर्माण झाली कीं, जो आपणांसमोर हातांत शस्त्र घेऊन उभा राहील, त्याच्याशीं लढण्यासाठीं हातीं शस्त्र घेण्याविषयीं यत्किंचित् हि शंका वाटतां उपयोगी नाही. या प्रणालीचें म्हणणें हें कीं, "आपण स्वतः शस्त्र घेऊन मुद्दाम कोणावर आक्रमण करतां कामा नये. पण लोकांना त्रास देणाऱ्या जुलमी व्यक्तीविरुद्ध त्यांचा प्रतिकार करण्यासाठीं, तसें च आत्मरक्षणासाठीं व सत्यरक्षणासाठीं आपण अवश्य शस्त्र हातीं घेतलें पाहिजे.' अन्याय-प्रतिकाराच्या या विचार प्रणालींत विक्रमादित्य, राणा प्रताप, शिवाजी यांच्या सारखे महापुरुष निर्माण झाले. अन्यायाचा प्रतिकार शस्त्रानें हि केला पाहिजे असें त्यांनीं मानलें, पण त्यांनीं आपणहून कोणावर आक्रमण मात्र केलें नाहीं. हिंदुस्थानच्या इतिहासांत ही एक फार मोठीं गोष्ट आहे कीं, या देशानें आपल्या उत्कर्षकालांत हि दुसऱ्या देशावर आक्रमण केलें नाहीं. येथें मोठमोठे राजे होऊन गेले, मोठमोठ्या सत्ता नांदून गेल्या, पण आपल्या उत्कर्षकालीं देखील——हातीं पूर्ण सत्ता असतांना हि——येथील कोणत्या हि राजानें बाहेरच्या कोणत्या हि देशावर आक्रमण केलें नाहीं. क्षात्रधर्माची ही च मर्यादा मानली गेली आहे. अन्याय-प्रतिकाराचें हें च लक्षण आहे कीं, आपण अन्यायाचा प्रतिकार करणें हें अवश्य आहे असें मानणें. तसें आपण दुसऱ्यावर आक्रमण करणें हा हि अन्याय च आहे असें हि मानणें. हा एक धर्मविचार होता.

दुसरा विचार होता कीं, 'वैरानें वैर मिटत नाहीं.' आज कोणी शस्त्रबलानें सुसज्ज असेल, तर आम्ही अधिक शस्त्रांनीं सुसज्ज होऊन त्याचा प्रतिकार करतों. या प्रकारें पुढें जात जात आम्ही 'सर्वंकष युद्धा' पर्यंत ('टोटल वॉर' पर्यंत) येऊन पोचलों आहोत. यांत संपूर्ण राष्ट्रच्या राष्ट्र युद्धासाठीं सुसज्ज केलें जातें. वैराने वैर मिटू शकत नाहीं हा विचार मान्य करण्याची जी परंपरा हिंदुस्थानांत चालत आलेली आहे, ती संतांची परंपरा आहे. कबीर, तुलसीदास आदींची वृत्ति निर्वैर होती. म्हणजे संतांची परंपरा आहे निर्वैरवृत्तीची व वीरांची परंपरा आहे अन्याय-प्रतिकाराची.

निर्वैरता व अन्याय-प्रतिकार हे दोन्ही हि धर्म आहेत. शिवाजी व तुकाराम हे दोघे हि एका च काळीं होऊन गेले. तुकाराम हे भगवान् बुद्धांच्या परंपरेंतील संत होते तर शिवाजी वीरांच्या परंपरेंतील होता. दोघांना हि परस्परांविषयीं आदर होता. तुकारामांचें संकीर्तन ऐकण्यासाठीं शिवाजी भक्तिभावानें जात असे, पण शिवाजीच्या अन्याय-प्रतिकाराच्या कार्यांत तुकारामांनीं कांहीं भाग घेतला नाही. ते म्हणत कीं, हें माझें काम नाहीं. शिवाजी हि राजसत्ता सोडून तुकारामांच्या भजन-संप्रदायांत सामील झाला नाही. 'शिवाजीचा अन्याय-प्रतिकार हा ठीक चालला आहे नां ?' असें जर तुकारामांना विचारलें असतें, तर 'ठीक आहे' असें च उत्तर त्यांनीं दिलें असतें. त्यांना पुन्हा जर विचारलें असतें कीं, 'तें जर ठीक आहे, तर तुम्ही तें काम कां करीत नाहीं ?' तर तुकारामांनीं उत्तर दिलें असतें कीं, 'तो माझा धर्म नाही. समाजाची सध्याची अवस्था अशी आहे कीं, शिवाजी जें काम करीत आहे, तें आम्ही थांबवूं शकत नाहीं.' याप्रमाणें समाजांत दोन परंपरा चालत आल्या आहेत.

## गांधीजींचा प्रतिकार-विचार

नंतर इंग्रज हिंदुस्थानांत आले व त्यांनीं सर्व शस्त्रें काढून घेतलीं. म्हणून हिंदुस्थानापुढें अशी समस्या उभी राहिली कीं, एक तर कायमचा अन्याय सहन करावा लागेल किंवा प्रतिकाराचा एखादा नवीन प्रकार शोधावा लागेल. इतक्यांत परमेश्वर-कृपेनें गांधीजी अवतरले. त्यांनीं संतांच्या परंपरेचा धागा प्रतिकाराशीं जोडून दिला. त्यांनीं म्हटलें कीं, 'आम्ही निर्वैर वृत्ति ठेवूं व प्रतिकार हि करूं.' हा एक फार मोठा विचार जगाला प्राप्त झाला, ज्यांत निर्वैरता व प्रतिकार या दोहोंचें मिश्रण झालें. या विचारामुळें आपल्याला पुढील मार्ग स्पष्ट दिसूं लागला ; नाही तर समाजांत बुद्धि-भेद निर्माण झाला असता. तोंपर्यंत मात्र कांहीं लोक एका बाजूला व कांही दुसऱ्या बाजूला असे तट पडले होते व त्यामुळें समाजाचे तुकडे झाले होते. पण या नव्या युक्तीमुळें दुधांत साखर पडली. दूधसाखरेचें मिश्रण एकत्र च आपण पिऊं शकत होतों. निर्वैरतेमुळें प्रतिकाराची शक्ति वाढली व प्रतिकारामुळें निर्वैरतेची. हा फार मोठा उपकार या देशावर झाला. यांत गांधीजींचा उपकार तर आहे च पण त्याहून हि अधिक इंग्रजांचे उपकार आहेत. कारण

त्यांनीं जर हिंदुस्थानला निःशस्त्र बनविलें नसतें, तर लाखों लोकांनीं गांधीजींचें म्हणणें मान्य केलें नसतें. त्यांना केवळ आमच्यासारखे दोन शिष्य तेवढे मिळाले असते. परंतु देशभर तो विचार पसरला व त्यावर भलें-बुरें आचरण हि झालें. निर्वैरतेचें पूर्ण आचरण करणें कठिण झालें, म्हणून आमच्याकडून कांहीं थोडें बहुत तुटकें फुटकें आचरण घडलें. परंतु त्यामुळें हा मार्ग चालू झाला.

## आर्थिक क्षेत्रांत अहिंसेचा प्रयोग आवश्यक

आतां विज्ञानाचें युग चालू झालें आहे. विज्ञानामुळें लढाईला भयंकर स्वरूप प्राप्त झालें आहे. प्राचीन काळीं लढाया इतक्या भयंकर नसत. त्याकाळीं लढाईमुळें तोटचापेक्षा फायदा च अधिक होई. परंतु विज्ञानाच्या या युगांत लढाईचा भयंकरपणा इतका विलक्षण वाढला आहे कीं, लढाईमुळें लाभ अगदी थोडा व हानि फार मोठी अशी अवस्था झाली आहे. तेव्हां आतां जर निर्वैर प्रतिकार सुरू झाला, तर समाजाच्या समस्या सुटतील व लढाईच्या हानीपासून समाजाचें रक्षण होईल. याप्रमाणें आज इंग्रजांची करामत, गांधीजींचें निमित्त, व विज्ञान-युगाचा अवतार, या तिन्हींमुळें भगवान बुद्धांच्या शिकवणुकीचा प्रयोग करण्याची उत्तम संधि मिळाली आहे. आपण जर तो प्रयोग आचरणांत आणला, तर तो विचार जगभर प्रसार पावेल.

गांधीजींनीं या शस्त्राचा प्रयोग राजकीय स्वातंत्र्यासाठीं केला होता. पण त्यामुळें तें शस्त्र खरोखर कार्यक्षम आहे असें सिद्ध होऊं शकत नाहीं. कारण आपल्याला जें स्वातंत्र्य मिळालें, त्याच्या कारणांत जगांतील इतर हि शक्ति संमिलित होत्या. जगांतील शक्ति आपल्या स्वातंत्र्याला अनुकूल होत्या. म्हणून जगाला असें म्हणण्याची संधि मिळाली कीं, महायुद्धामुळें ज्या अनेक शक्ति निर्माण झाल्या, त्यांच्या प्रभावामुळें आपणांस स्वातंत्र्य प्राप्त झालें. आम्ही हि हें मान्य करतों कीं, त्यावेळीं जगांत ज्या शक्ति कार्य करीत होत्या त्यांचा व अहिंसेचा हा परिणाम आहे. पूर्णपणें अहिंसेचा च हा परिणाम आहे असें आम्ही हि म्हणूं शकत नाहीं. आजच्या युगांत एक देश दुसऱ्या देशाला फार काळ अंकित ठेवूं शकत नाही. प्राचीन काळीं रोमन साम्राज्य बाराशें वर्षें टिकलें. पण त्यानंतरचीं साम्राज्यें इतकीं दीर्घकाल टिकलीं नाहींत. कारण लोक जागृत होत चालले होते. आतां तर विज्ञानाचें युग आहे, शिक्ष-

णाचा प्रसार होत आहे. त्यामुळें साम्राज्य जास्त काळ टिकणें शक्य नाहीं. इंग्रजांचें हि साम्राज्य फार काळ टिकलें नाहीं. त्यांच्याजवळ विज्ञानाचें साधन होतें. तरी हि मोठ्या मुष्किलीनें त्यांचें साम्राज्य दीडशें वर्षें टिकलें. रोमन साम्राज्यापेक्षा त्यांच्यापाशीं किती तरी पटीनें जास्त सामर्थ्य होतें, तरी हि तें दीर्घकाल टिकलें नाहीं. या वैज्ञानिक युगांतील एका वर्षाची किंमत प्राचीन काळच्या दहा वर्षांबरोबर आहे.

हा रेडिओ-वायरलेसचा काळ आहे. विज्ञानानें देश जवळ आणले आहेत, काळाची गति वाढली आहे. म्हणून राजकीय स्वातंत्र्य मिळविणें ही सोपी गोष्ट होती. परंतु अहिंसेच्या साह्यानें आर्थिक समता स्थापित करण्याचें काम जर आतां आपण करूं शकलों, तर मात्र ती फार मोठी गोष्ट होईल. त्यामुळें निर्वैरतेचें किंवा अहिंसक प्रतिकाराचें सामर्थ्य अतिशय वाढणार आहे.

वैज्ञानिक युगांत राजकीय स्वातंत्र्य मिळविणें ही सोपी गोष्ट असते. कारण जगांतील शक्ति त्याला अनुकूल असतात. त्यामुळें अहिंसक शक्तीची तेवढ्या प्रमाणांत जाणीव आम्हांला झाली नाही. ती जाणीव पूर्णपणें झाली असती, तर गांधीजींच्या हयातींत च हिंदुस्थानचे दोन तुकडे झाले नसते. स्वराज्यप्राप्तीनंतर हिंदु-मुसलमानांत जे झगडे झाले व ज्यांत लाखों लोकांची हानि झाली, त्यांपैकीं कांहीं हि झालें नसतें. म्हणून च मी म्हणतों कीं, अहिंसेच्या सामर्थ्याची पूर्ण जाणीव आम्हांला झालेली नाही. आमची अहिंसा ही अगतिकतेची अहिंसा होती. पण आतां आपल्या हातीं सत्ता आलेली आहे. आतां आपल्याला हिंसेचा उपयोग करावयाचा असल्यास तो करतां येतो किंवा अहिंसेचा करावयाचा असल्यास तो हि आपण करूं शकतों. अशा परिस्थितींत आपण जर देशाची आर्थिक समस्या अहिंसेनें सोडवूं शकलों, तर जगांत शस्त्र-सामर्थ्यापेक्षा निःशस्त्र प्रतिकार हा अधिक शक्तिशाली आहे हें सिद्ध होईल व जगाला नवा मार्ग दिसेल. म्हणून आपणांस नीट विचार केला पाहिजे.

## दया हें धर्माचें मूळ, पण समता ही धर्माची पूर्णता

मी जमीन मागत आहे, भीक नव्हे. मी सहावा हिस्सा मागत आहे, आपल्या दयेला आवाहन करीत नाहीं. गरिबांवर दया करा असें कांहीं मी सांगत नाहीं. दया व करुणा यांना हि स्थान आहे. त्या हि धर्मांत येतात.

मी आपल्या मार्गाला 'करुणा-मार्ग' असें च नांव दिलें आहे. पण मी लोकांना मात्र सांगतों कीं, समता मान्य करा. आणि हवा, पाणी व सूर्यप्रकाश यांच्याप्रमाणें च जमीन ही हि परमेश्वराची च देणगी आहे, म्हणून तिच्यावर कोणाची हि मालकी नाही, तिच्यावर सर्वांचा समान अधिकार आहे—हें तत्त्व म्हणजे समतेचें तत्त्व मान्य करून जमीन द्या. दयेचा आधार समता हा च आहे हें मान्य करून जमीन द्या. मी जर नुसत्या दयेच्या च गोष्टी केल्या, तर त्याबरोबर हक्काला मान्यता मिळूं शकणार नाहीं. (पण मी तर हा एक प्रकारचा सत्याग्रह च करीत आहे. व कोणी कांहीं हि दिलें, तरी त्याचा तो उपकार मानावा लागेल) मी तर ज्याच्याजवळ जमीन मागतों, त्याच्या घरासमोर उभें राहून विचारतों कीं, 'तुम्ही समता मान्य करतां ना? मी आपला मुलगा आहे. मला माझा हिस्सा द्या.' दया ही एक गोष्ट आहे व समता ही अगदी वेगळी गोष्ट आहे.

तुलसीदासांनीं म्हटलें आहे कीं, 'दया हें धर्माचें मूळ आहे.' पण तो धर्माचा आरंभ आहे, पूर्णता नव्हे. एखाद्या मालकाचें आपल्या नोकरावर प्रेम असतें, आजारांत त्याला तो मदत देतो, त्याच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करतो. हें सर्व तो करीत असला तर त्याला 'दयाळू मालक' हें नांव अवश्य मिळेल, त्यानें धर्माचरण केलें, असें हि म्हटलें जाईल. पण कोणी जर त्याला सांगितलें कीं, आपल्या अर्ध्या आसनावर त्या नोकराला बसव, तर तें मात्र तो मान्य करणार नाहीं. आपण आपल्या बैलाला हि चांगलें खाऊंपिऊं घालतों, पण त्याला आपल्याजवळ घेऊन बसत नाहीं. चांगलीं व दयाळू माणसें बैलांची खूप काळजी घेतात, पण बैल व आपण समान आहोंत ही गोष्ट मात्र ते मान्य करीत नाहींत. बैलावर दया करण्यास आम्ही तयार आहोंत, पण त्याची व आपली समता आहे हें मान्य करण्यास मात्र आम्ही तयार नाहीं. याचप्रमाणें कांहीं लोक म्हणतात कीं, आम्ही आपल्या नोकराला पांच एकर जमीन देऊं. यावर मी असें म्हणतों कीं, 'हें ठीक आहे, पण एवढ्यानें भागणार नाहीं, जमिनीवर सर्वांचा हक्क आहे, केवळ तुमचाच नाहीं, ही गोष्ट तुम्हांला मान्य करावी लागेल.' जे ही गोष्ट मान्य करीत नाहीत व दयाळू हि नाहीत, ते माझी मागणी मान्य करीत नाहीत. पण

जे दयाळू असतात, ते म्हणतात कीं, "आपली मागणी मीं मान्य करतों. पण समतेचें तत्त्व मानीत नाहीं. जगांत प्रत्येकाची बुद्धि ही कमी जास्त असते. मग समता कशी स्थापन होईल?"

मी यावर त्यांना म्हणतों कीं, 'भगवंतानें जर प्रत्येकाला कमी अधिक बुद्धि दिली आहे, तर प्रत्येकाला एक मत देण्याचा अधिकार कां दिला जावा? नेहरूंनाहि एका च मताचा अधिकार व त्यांच्या चपराशालाहि एका च मताचा याच्यामागें निव्वळ मूर्खपणा आहे कीं, कांहीं तत्त्व आहे? प्रत्येकाला हें माहीत आहे कीं, नेहरू व त्यांचा चपराशी यांची बुद्धि कांहीं सारखी नाही आणि त्यांना मताचा अधिकार मात्र समान आहे. याचा अर्थ एवढाच कीं, तुम्हाला वेदान्त समजो वा न समजो, आत्म्याची समता तुम्हीं मान्य केलेली आहे. मनुष्यामनुष्यांत फरक असतां हि प्रत्येकाला एका मताचा अधिकार देण्याचा अर्थ हाच आहे कीं, आत्म्याची समता तुम्हांला मान्य आहे. हा मूलभूत पाया एकदा मान्य केला कीं, यावरच तुम्हांला इमारत बांधावी लागेल. पाया एक प्रकारचा व वरची इमारत दुसऱ्या प्रकारची, हें होणें शक्य नाहीं. तुम्ही प्रत्येकाला समान मताधिकार देऊन समता मान्य केली, याचाच अर्थ हा कीं, आजच्या युगाची च समानतेची मागणी आहे. एकदां तुम्ही ही मागणी मान्य केली कीं, हळू-हळू ती जीवनांत उतरविण्याचा तुम्ही प्रयत्न करा आणि तोंपर्यंत दया करा.

## वामनाचीं तीन पावलें

दया हा प्राथमिक धर्म आहे, ती धर्माची पूर्णता नव्हे. दया हें धर्माचें फळ नव्हे, तर मूळ किंवा आरंभ आहे. धर्म जेव्हां पूर्ण पक्व होईल तेव्हां त्याला समतेचें फळ येईल. गीतेनें स्थितप्रज्ञ, संन्यासी, योगी, भक्त इत्यादि सर्व महापुरुषांच्या लक्षणांत समता मानलेली आहे, कारण समता हें धर्माचें लक्षण आहे. आत्मा समान आहे. म्हणून च आम्ही हळूहळूं आपलें जीवन समतेच्या लक्ष्याकडे नेलें पाहिजे. म्हणून जे जमीन देतात, त्यांना मी सांगतों कीं, तुम्ही गरिबांच्या सेवेचें व्रत आतां घ्या. जमीन देणें हा नुसता आरंभ आहे. गरिबांची सेवा करतां करतां तुम्ही खूप गरीब बनून जाल. स्वेच्छेनें तुम्ही गरिबी पत्कराल, तर खऱ्या समतेपर्यंत जाऊन पोंचाल. जमीन देणें, गरिबांच्या सेवेचें व्रत घेणें व स्वतः गरीब बनणें, हीं वामनाचीं तीन पावलें आहेत. जेव्हां सगळे गरीब बनतील, तेव्हां च गरीबी नष्ट होईल. तेव्हां सर्वांची च पातळी समान होईल.

## सौम्य आणि उग्र सत्याग्रह

समाजांत दया चालू आहे, तरीहि लोकांना वाटतें कीं, विषमता कायम ठेवून आपण दया करूं शकूं. परंतु ही दया आतां पुरी पडणार नाही. आतां समतेची गरज आहे. समता आणण्यासाठीं च भूदान-यज्ञ चालला आहे. निर्वैर-प्रतिकार व सत्याग्रह यांचें हें एक अंग आहे. आम्ही सतत हिंडत आहोंत. पावसांतहि हिंडत च राहतों. लोकांकडून सहाव्या हिश्श्याची मागणी करतों. कोणी फार कमी दिलें तर घेण्यास नकार देतों. हा सारा सत्याग्रह च चालला आहे. कांहीं लोक मला विचारतात कीं, 'या सर्वाचा कांहीं परिणाम झाला नाहीं, तर आपण काय कराल?" मी उत्तर देतों कीं, मी याप्रकारें विचार च करीत नाहीं. पण कांहीं परिणाम झाला नाही, तरी सत्याग्रह हें असें महान् शस्त्र आहे कीं, त्याच्यासमोर कोणी टिकू शकत नाही. कारण त्यांत निर्वैरता व प्रतिकार हे दोन्ही आहेत व त्यामुळें त्याचें सामर्थ्य वाढलें आहे.

आज आमचा सौम्य सत्याग्रह चालला आहे. पण पुढें तो उग्र रूपहि धारण करूं शकेल. जेव्हां मी असें बोलूं लागतों, तेव्हां कांहीं लोक म्हणतात कीं 'आतां तर तुम्ही धमक्या देऊं लागला आहांत.' पण एखादा मुलगा आपल्या दारुबाज बापाला म्हणूं लागला कीं, 'तुम्ही दारु सोडा, नाहीं तर मी जेवण सोडून देईन.'—तर त्या मुलानें आपल्या बापाला धमकी दिली असें मानलें जाईल कां? जर आपल्या मुलाच्या वाईट गोष्टी बंद करण्यासाठीं एखाद्या आईनें खाणेंपिणें सोडलें तर तिनें आपल्या मुलाला धमकावलें असें होईल कां? जेथें निर्वैरता व प्रतिकार हीं दोन्ही असतात, तेथें धमकाविलें जात नाहीं, तर जागविलें जातें, ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे. मुलाला कशा तऱ्हेनें जागवावें लागतें? आई दोनचार वेळां त्याला 'बेटा ऊठ' म्हणून सांगते. तेवढ्यानें तो उठला नाही, तर त्याला हालवून ती जागी करते. याप्रमाणें एकापेक्षा एक पुढच्या क्रिया केल्या जातात. शब्दानंतर जो स्पर्श केला जातो, तो धमकाविण्यासाठीं नव्हे, तर तो प्रेमाचा स्पर्श असतो. लहान रूपांतील प्रेम जेव्हां असफल ठरतें, तेव्हां तें मोठ्या रूपांत प्रकट होतें. जें काम पांच रुपयांनी होत नाहीं, त्यासाठीं जरी दहा रुपये दिले, तरी तें एक च काम असतें. पण पांच रुपयांनीं काम झालें नाहीं म्हणून सहा थपडा

मारल्या, तर मात्र तें धमकावणें ठरेल. पण पांच रुपयांऐवजीं सहा किंवा दहा रुपये त्या च कामासाठी दिलें, तर तें धमकावणें नव्हे, तर त्याच मार्गावर थोडें पुढे नेणें होय. आपली जडता नाहीशीं करण्यासाठीं अधिकाधिक चैतन्य प्रकट करावें लागतें. समोरचा जितका अधिक जड, तेवढें अधिक चैतन्य प्रकट करावें लागतें. समोर जेवढा अधिक दाट काळोख असेल, तेवढा अधिक प्रकाश लागेल. कोणाकडून कांहीं हिसकून घेण्याची किंवा धमकावण्याची कल्पना हि माझ्या मनांत नाही. मला तर आत्म्याला जागृत करावयाचें आहे. जागवण्यासाठीं हिंडावें लागतें, मागावें लागतें, व्याख्यान द्यावें लागतें. यासाठीं मला सत्याग्रह करण्याची जरूर वाटली तर तो हि मी करीन. कारण तो जागवण्याचा च एक प्रकार आहे.

सत्याग्रह ही प्रेमाची प्रक्रिया आहे. म्हणून ज्यांच्यासमोर मी सत्याग्रह करीन, ते माझे उपकार च मानतील. आपला मुलगा सुधरावा म्हणून आई उपवास करीत असली, तर तिच्या मुलाला वाटेल कीं, आई उपवास करीत आहे, म्हणजे माझ्यावर उपकार च करीत आहे. याचप्रमाणें समोरच्या माणसाला सत्याग्रह म्हणजे धमकी वाटूं नये. समोरच्या माणसाला ती धमकी वाटूं लागली, तर तो खरा सत्याग्रह च नव्हे. जेव्हां समोरच्या माणसाला सत्याग्रह म्हणजे धमकी वाटणार नाही, उलट प्रेम अधिक मोठ्या रूपांत प्रकट होत आहे, असें वाटेल, तेव्हां च त्याला खरा सत्याग्रह असें म्हणतां येईल.

बेगूसराय
१-११-'५३

---

## विज्ञानाच्या आधारावर नवे समाज-शास्त्र : २२ :

आपल्या या पुण्यपावन प्रदेशांत सोळा महिन्यांपासून सूर्यनारायणाच्या नियमितपणानें व सूर्यनारायणाच्या साक्षीनें माझी ही पदयात्रा चालू आहे. या काळांत खेडचाखेडचांचें जें दर्शन मला घडलें तो एक अद्‌भुत् अनुभव आहे. मीं हें पाहिलें कीं, जे निरक्षर आहेत, ज्यांना शास्त्राचें मुळीं च ज्ञान नाहीं

आणि ज्यांना इतिहास हि माहित नाही, ते हि मोठ्या उत्सुकतेनें भूदानाचे विचार ऐकण्यास येतात. खेड्यांतील या लोकांना हा विचार चांगला समजतो व त्यांना तो पटतो हि. कधीं कधीं तर असें हि होतें कीं, कांहीं जण माझ्याकडे येऊन अशी तक्रार करतात कीं, आमच्याकडे जमीन मागण्यास कोणी येत च नाही. बिहारच्या सर्वसामान्य जनतेंत भूदानाबद्दल साधारणतः एवढी उत्सुकता आहे. पण शहरांतील लोकांना मात्र हा विचार अजून समजावयाचा राहिला आहे.

## क्रांतीचे अग्रदूत ग्रामीण

बुद्धि व हृदय यांचें विभाजन करून पाहिलें, तर देशाची बुद्धिमत्ता शहरांत व हृदय खेड्यांत आहे असें मानलें पाहिजे. जेव्हां एखादा विचार बुद्धींत प्रवेश करतो व तेथून हृदयापर्यंत पोचतो, तेव्हां च नागरिकांना तो ग्रहण होतो. याच्या उलट, खेड्यांतील लोकांच्या हृदयांत एखादा विचार पोंचला व तद् द्वारां त्यांच्यांत त्याचा प्रवेश झाला म्हणजे च त्यांना तो ग्रहण होतो. ग्रहणशक्तीचे हे दोन वेगवेगळे प्रकार आहेत. म्हणून खेड्यांतील लोकांना या विषयाची जेवढी माहिती झाली आहे, तेवढी शहर-वासियांना झालेली नाही, या गोष्टीचें मला आश्चर्य वाटत नाहीं. रस्ता बन-विण्याचें काम मोटर चालविणारा नव्हे, तर कुदळीनें खणणारा च करूं शकतो. जेव्हां तो रस्ता तयार करतो तेव्हां त्या रस्त्यावरून मोटरवाले भरधांव गाड्या नेतात. त्या रस्त्याचा उपयोग करण्यांत ते अग्रगामी बनतात. ही च गोष्ट शहर व खेडें यांना लागू पडते. क्रांतीचा मार्ग तयार करणारे हे ग्रामीण च असतात हा जगाचा अनुभव आहे. त्यानंतर क्रांतीची पूर्णता नागरिकांच्या द्वारां होत असते. क्रांतीचा मूलभूत विचार प्रथम एखाद्या चिंतनशील ज्ञानी माणसाला सुचतो व नंतर तो सर्व जनतेंत पसरतो. त्यानंतर नागरिक तो विचार पारखून घेतात व मग ग्रहण करतात. त्यानंतर सरकार हि तो स्वीकारतें व त्याच्या अनुसार कायदे हि बनतात. म्हणून जें होत आहे त्याबद्दल मला दुःख किंवा आश्चर्य मुळीं च वाटत नाहीं.

## भूमि-समस्या सुटल्यावाचून राहणार नाहीं

मी पायी पायी हिंडत आहे. धीरानें सर्व काम करीत आहे, हें हि उघड आहे. धीरानें चाललों नसतों, तर एव्हांना माझ्या पायाचे तुकडे

पडले असते. तरी हि प्रतिदिन माझा उत्साह वाढत च चालला आहे. कारण विचाराचें सम्यक् दर्शन मला होत आहे. एवढें च नव्हे तर आतां दिनकरजींनीं गाण्यांत तें व्यक्त हि केलें आहे. त्यांना दूरचें स्पष्ट दिसत आहे. कवीचें हें लक्षण च मानलें गेलें आहे; "कविः क्रान्तदर्शी", फरक एवढा च आहे कीं, त्यांना जें कविदृष्टीनें दर्शन घडलें तें मला चिन्तनशील व्यक्ति या नात्यानें झालें. जमीन किती मिळत आहे, या गोष्टीची मी मुळीं च चिंता करीत नाहीं. पण लोक विचार किती प्रमाणांत ग्रहण करीत आहेत हें मात्र मी अवश्य पाहतों.

## मानसशास्त्र व विज्ञान यांवर आधारलेली समाजरचना

मनुष्याचें जीवन अनेक शाखांनीं पूर्ण आहे. जीवनाच्या अनेक शाखा आहेत व एकेका शाखेचें अध्ययन करणारे किती तरी असतात. एकेका शाखेवर शास्त्रें रचलीं गेलीं आहेत व दिवसेंदिवस या शास्त्रांची संख्या वाढत च चालली आहे. पण कदाचित् सर्वांत कठिण, महत्त्वपूर्ण व विकसनशील असें जर कोणतें शास्त्र असेल, तर तें समाज-शास्त्र होय. समाजशास्त्रांत अनेक शास्त्रें समाविष्ट आहेत. पण प्राचीन काळापासून आजपर्यंत विविध देशांच्या परिस्थित्यनुसार हें शास्त्र वेगवेगळ्या प्रकारें रचलें गेलें आहे. या युगांतील सर्वांत मोठी शक्ति विज्ञान ही आहे. जुन्या काळीं वेगवेगळ्या देशांत जें समाज-शास्त्र आकारास आलें, तें मानसशास्त्रावर आधारलेलें होतें. "माझ्या-प्रमाणें च दुसऱ्यांना हि काम, क्रोध, लोभ, मोह इत्यादींचा अनुभव येतो, तेव्हां त्या भावनांचें समाधान कशा प्रकारें करावें? ज्यामुळें अनर्थ न होतां सगळ्यांना सुख लाभेल, अशा कोणत्या रीतीनें या भावनांवर नियंत्रण ठेवावें?" —मानसशास्त्राच्या आधारानें असा विचार करून च समाजरचना आजवर बनविली गेली आहे.

पण विज्ञानाच्या या युगांत मात्र दुसरें च दृश्य दिसूं लागलें आहे. विज्ञान हें मनाच्या वर व मनापलीकडे आहे. समोरच्या वस्तूंचे गुणधर्म माझ्या इच्छेवर अवलंबून नाहीत. साखरेची गोडी, मिठाचा खारटपणा किंवा वर्तुळाचें वर्तुळत्व हीं माझ्या इच्छेवर, वासनेवर किंवा रुचीवर अवलंबून नाहींत. ते स्वतंत्र गुण आहेत. त्यांचा माझ्यावर जो परिणाम होतो

त्याला मी जबाबदार आहें. पण त्यांचें अस्तित्व अगदीं स्वतंत्र आहे. विज्ञानानें हें दाखवून दिलें आहे कीं, आपणांस सृष्टीच्या नियमानुसार च वर्तन केलें पाहिजे. सृष्टींतील नियम तर अनेक आहेत. पण एक मूलभूत नियम असा आहे कीं, "जसें पेराल, तसें उगवेल." आंब्याची कोय लावली तर आंब्याचा वृक्ष च उगवेल व बाभळीची बी लावली, तर बाभळीचें झाड येईल. हा नियम बदलूं शकत नाहीं. वस्तुतः हा नियम आपल्याला पूर्वींपासून च माहीत होता. पण विज्ञानानें मोठ्या प्रमाणावर तो सिद्ध करून दाखवला आहे. म्हणून सृष्टीमधील हा नियम आपण सृष्टीपुरता च सीमित ठेवूं शकत नाही. या च अनुभवावर समाजशास्त्राची हि रचना केली पाहिजे. आजवर वाईटानें च वाईटाचा प्रतिकार करण्याचे अनेक प्रयत्न केले गेले. पण आतां विज्ञान सांगतें कीं, त्यामुळें वाईटपणा वाढत च जातो, कमी होऊं शकत नाही. विज्ञानामुळें लोकांना या विचाराचा प्रत्यक्ष अनुभव येऊं लागला आहे.

या रीतीनें या युगांत विज्ञानानें सामूहिक प्रयत्न जागवले आहेत. जी सामूहिक भावना सीमित होती, ती आतां विश्वव्यापी बनली आहे. आपल्या देशाच्या इतिहासांत किती तरी मोठीं साम्राज्यें व मोठे सम्राट् होऊन गेले. पण त्यांना हि जगाच्या इतर विभागांत काय चाललें आहे याची माहिती नव्हती. पण आजच्या एखाद्या लहान शाळकरी मुलाला देखील जगांत काय काय घटना घडत आहेत याची माहिती आहे व परदेशांच्या राजकारणाविषयीं हि त्याला कुतूहल आहे. ही परिस्थिति पूर्वी नव्हती. कारण तेव्हां विज्ञानाचा एवढा प्रसार झाला नव्हता. व्यक्तीचे अनुभव तेव्हां व्यक्ती पुरते च सीमित राहत असत. पण आतां मात्र ज्या वस्तू तयार होतील, त्या सामूहिक प्रमाणावर बनविल्या जातील, अशी स्थिति विज्ञानानें निर्माण केली आहे. आतां हिंसेचीं शस्त्रें बनविलीं जातील, तर तीं विशाल प्रमाणावर बनविलीं जातील व अहिंसेचें संघटन केलें जाईल, तर तें हि विस्तृत प्रमाणावर च होईल. क्रूरतेचीं कर्में केलीं जातील तर तीं मोठ्या प्रमाणावर व दयेचीं कृत्येंहि मोठ्या च प्रमाणावर होतील.

## विज्ञान-युगांत सामूहिक प्रयोग

भगवान् बुद्धांसारख्यांचा आवाज जगभर पसरण्यास शेकडों वर्षें लागलीं. पण आज आमच्यासारख्या साधारण माणसांचा हि आवाज जगभर तात्काळ पोंचवला जातो. म्हणून यापुढें जें जें काम, चिंतन, अगर प्रयोग होतील, ते सारे सामूहिक रीतीनें केले जातील. म्हणून च मीं म्हटलें आहे कीं, 'हिंदुस्थानांत प्रकट झालेल्या आत्मज्ञानानें व्यक्तिगत क्षेत्रांत कांहीं संशोधन केलें. आतां त्याच्यावर पश्चिमेकडून अवतरलेल्या विज्ञानाचा प्रभाव पडला आहे आणि दोहोंच्या मिश्रणानें सामूहिक अहिंसेची निर्मिति होत आहे.' आपण पाहतां च कीं, सध्याच्या काळांत शास्त्रांचे प्रयोग फार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. पाकिस्तानचे लोक अमेरिकेची मदत मागत आहेत व अमेरिका ती देत आहे. त्याचा परिणाम सबंध आशियावर एकसारखा च होत आहे. कांहीं लोक त्यावर विचार करीत आहेत, तर कांहीं काळजींत पडले आहेत. साऱ्या आशियाई देशांना असें वाटत आहे कीं, या घटनेचा सगळ्या आशियाच्या जीवनावर परिणाम होऊं शकेल. आशियाचे तुकडे होण्याचा संभव आहे व त्या तुकड्यांमध्ये संघर्ष उत्पन्न होणें हिं शक्य आहे. मला मात्र या गोष्टीची चिंता वाटत नाही. या काळांत ज्या योजना किंवा ज्या संघटना होतील, त्या बिस्तृत प्रमाणावर होणार हें अपेक्षित च आहे असें मला वाटतें. त्यामुळें पूर्वीच्या काळीं ज्याप्रमाणें जमातींमध्ये कलह होत असत, तसें आतां होणार नाहीत. एका देशाची दुसऱ्या देशाशीं लढाई होणार नाही, तर एका राष्ट्रसमूहाचें दुसऱ्या राष्ट्रसमूहाशीं युद्ध होईल. विज्ञान हें बोलून च चुकलें आहे कीं, वाईटाचें फळ वाईट च होणार व चांगल्याचें फळ चांगलें च मिळणार ; याचा विस्तृत प्रमाणावर प्रयोग करून पहा व प्रत्यक्ष अनुभव घ्या.

म्हणून लोक जसजसें जागतिक युद्धाच्या गोष्टी करूं लागतात, तसतसें माझें मन उत्साहित होत जातें. लोक अतिशय वेगानें अहिंसेकडे धांवत सुटले आहेत, असें च मला वाटूं लागतें. विज्ञानाचें व हिंसेचें जर लग्न लागलें, तर मात्र मानवजातीचा निःसंशय संहार होईल. म्हणून विज्ञानाशीं अहिंसेचा च संबंध जोडण्याची वृत्ति ही च योग्य राहील. हिंसेचे लहान लहान प्रयोग चालू राहिले, तर त्यांचा अंत च होणार नाही. पण विशाल प्रयोग झाले,

तर त्याचा परिणाम त्वरित होईल. एक तर मनुष्य हिंसेपासून पूर्ण परावृत्त तरी होईल किंवा त्याचा संपूर्ण नाश तरी होऊन जाईल. मानवांत बुद्धि आहे व तो आपली जात समूळ नष्ट होऊं देणार नाही असा माझा विश्वास आहे. हे हिंसेचे प्रयोग लवकर च संपुष्टांत येतील. पण नंतर जी अहिंसा अवतरेल ती विशाल प्रमाणांत येईल. म्हणून सध्या चाललेल्या घटना मला महत्त्वाच्या वाटत नाहीत.

## महायुद्ध : सृष्टि-शक्तीचा परिणाम

आपल्या प्रधानमंत्र्यांनीं पांच सहा महिन्यांपूर्वी म्हटलें होतें कीं, 'हिंदुस्थान–पाकिस्तानचे संबंध आतां सुधारत आहेत.' आतां ते म्हणतात कीं, 'तें दृश्य बदलत चाललें आहे व तें वेगळ्या च दिशेनें जात आहे.' याचा अर्थ काय ? अर्थ हा च कीं, मनुष्याच्या बुद्धीनें गोष्टी घडत नाहीत, तर सृष्टिदेवता कांहीं कार्य करीत आहे. ज्याप्रमाणें भूकंपाचा प्रथम कांहीं हि अंदाज नसतो, त्याचप्रमाणें महायुद्धाचें हि भविष्य कोणाला अगोदर सांगतां येत नाहीं, हिंदुस्थानच्या पंतप्रधानांना हि नाही व अमेरिकेच्या अध्यक्षांना हि नाही. भूकंप हा जसा सृष्टि-शक्तीचा परिणाम असतो, त्याचप्रमाणें महायुद्ध हा हि विश्व-सृष्टि-शक्तीचा परिणाम असतो. तें मानव-बुद्धीनें होत नसतें. जेव्हां मानव-बुद्धि कुंठित होते, तेव्हां च महायुद्ध निर्माण होतें. म्हणून मनुष्य शस्त्रास्त्रें बनवीत राहतो व तीं बनवून युद्धांत मृत्युमुखीं पडतो. मानवांचा ज्यांत संहार होईल असें युद्ध कोणाला च नको असतें. अशी इच्छा असणारा राक्षस जगांत उत्पन्न झाला नाही. पण सृष्टि-चक्र चाललें आहे व तदनुसार घटना घडत आहेत.

## विज्ञान गतिप्रद व आत्मज्ञान दिशासूचक

गति देणें हें विज्ञानाचें कार्य आहे. पण कोणत्या दिशेला जावयाचें हें विज्ञान सांगूं शकत नाहीं. तें आत्म-ज्ञान च सांगूं शकतें. विज्ञान गति देतें व आत्म-ज्ञान दिशा दाखवितें. मोटरमध्ये गति देण्याचें साधन वेगळें असतें व दिशा देण्याचें साधन वेगळें असतें. नाव चालवितांना हि वेग देण्याचें व दिशा देण्याचें साधन वेगवेगळें असतें. याप्रमाणें गति-प्रद व दिशासूचक यंत्रांमध्ये वेगवेगळी शक्ति असते. विज्ञान हें गति-प्रद आहे, दिशासूचन कर-

ण्याची शक्ति त्यांत नाही. ती आत्म-ज्ञानामध्ये च आहे. माझा असा विश्वास आहे कीं, जेथें विज्ञानाचा आत्मज्ञानाशीं संबंध येत आहे, तेथें प्रयोग केल्यानें प्रथम कांहीं हानि सोसून मनुष्य योग्य मार्गावर येईल व समाज-शास्त्र उत्तम प्रकारचें निर्माण होईल. तोंपर्यंत मात्र मनुष्य अस्थिर व शंकाकुल अवस्थेंत राहील.

## जगांत कोणताहि देश स्वतंत्र नाही

जनतेला खऱ्या शक्तीचा व स्वातंत्र्याचा प्रत्यय यावा, सर्वांना खरी स्वतंत्रता मिळावी अशी माझी इच्छा आहे. आज जगांत कांहीं देश स्वतंत्र तर कांहीं गुलाम मानले जातात. पण दोन्ही हि गुलाम च आहेत. मला तर कोणता हि देश स्वतंत्र दिसत नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभीं व शेवटीं हिटलरच्या सत्तेखालील जर्मनी देश स्वतंत्र मानला गेला होता. सेनापतीचा हुकूम होतां च दहा दहा पंधरा पंधरा लाख लोक सज्ज होऊन दुसऱ्यांवर चालून गेले. त्याचप्रमाणें सेनापतीनें जेव्हां अशी आज्ञा दिली कीं, 'शस्त्रें खाली ठेवा व शत्रूला शरण जा' तेव्हां लाखों लोक शस्त्रें खाली ठेवून शत्रूला शरण गेले. मी याला स्वातंत्र्य समजत नाहीं. जेथें एखाद्या संपूर्ण देशांतील लोक दहा वीस माणसांच्या आज्ञेनें शस्त्रें उचलतात किंवा खाली ठेवतात, तेथें स्वातंत्र्य नांदतें असें मी मानीत नाहीं.

## सरकार हें सरासरी बुद्धीचें

आज वेगवेगळ्या देशांत लोकांनीं निवडून दिलेल्या लोकांचें राज्य चाललें आहे. पूर्वीं राजे निवडले जात नसत तर ते स्वयंभू असत. पण आज मात्र राज्यकर्ते निवडले जातात. परंतु सूरदासांनीं या बाबत जो आक्षेप पूर्वीं घेतला होता, तो आज हि लागू आहे. आज त्यांत कांहीं च फरक झालेला नाही. सूरदासांनीं म्हटलें होतें :—

'उधो करमन की गति न्यारी।
मूरख-मूरख राजे कीन्हें, पंडित फिरत भिखारी ॥'

आज हि जे निवडून दिलेले लोक राज्य करीत आहेत, ते उत्तम बुद्धीचे नाहीत, तर सरासरी बुद्धीचे आहेत. डेअरीमधील दूध उत्कृष्ट गाईच्या

दुधाइतकें चांगलें नसतें, तसें वाईट गाईच्या दुधाइतकें वाईट हि नसतें. त्याचप्रमाणें सर्वांच्या मतांनीं जेथें लोक निवडले जातात. तेथें निवडलेले लोक उत्कृष्ट बुद्धीचे नसतात, तर सरासरी बुद्धीचे असतात. जनतेला सर्वोत्तम बुद्धि ओळखतां येत नाही. म्हणून च सत्ताधारी लोक क्रांति करूं शकत नाहीत. लोकांना जिकडे जावेसें वाटतें, त्या दिशेकडे ते लोकांना घेऊन जातात. ते आज्ञाधारक असतात. अमेरिकेच्या लोकांना दारू हवी होती. म्हणून तेथील सरकार दारूबंदी करूं शकलें नाहीं. कारण सरकार हें सेवक असतें, गुरु नसतें ; तें लोकांना पुढें घेऊन जाऊं शकत नाही, तर तें लोकांबरोबर च चालत राहतें. म्हणून तें मार्गदर्शकाप्रमाणें कार्य करूं शकत नाहीं. तेथें स्थितप्रज्ञाच्या हातीं सत्ता नसते. तर सर्वसामान्य जनांच्या प्रज्ञेप्रमाणें ज्यांची प्रज्ञा असते, त्यांच्या च प्रज्ञेनें कारभार चालतो. म्हणून च जगांत सत्ताधाऱ्यांची सत्ता चालू शकते. लोक त्यांना आपले प्रतिनिधि मानतात व त्यांची सत्ता मान्य करतात. आपण जनशक्ति निर्माण करूं शकतों असें त्यांना वाटत नाही. आजच्या जनतेचें रक्षण आजच्या च साधनांनीं कसें करतां येईल, एवढा च विचार ते करतात. याचा परिणाम असा होतो कीं, सर्वत्र शासन चालविलें जातें व अनुशासन किंवा शिस्त शिकविली जाते. अनुशासन किंवा शिस्त हा सर्व गुणांचा राजा मानला जातो. मी हि तो गुण आहे असें मानतों. पण आज जी शिक्षणावर हि सरकारची सत्ता चालत आहे, तो प्रकार मला सर्वांत अनिष्ट वाटतो.

## विचाराची स्वतंत्रता

मीं हें कितीदां तरी सांगितलें आहे कीं, 'न्यायाधीशावर सरकारची सत्ता असतां कामा नये ही गोष्ट ज्याप्रमाणें मान्य केली गेली आहे, त्याप्रमाणें शिक्षणावर हि सरकारची सत्ता न राहतां शिक्षणतज्ज्ञांची असावी, ही हि गोष्ट मान्य झाली पाहिजे. आज च विद्यार्थ्यांसमोर बोलतांना मीं सांगितलें कीं, आज जगांत ज्या अनिष्ट गोष्टी चालल्या आहेत, त्यांच्यापासून विद्यार्थ्यांनीं तरी दूर रहावें. सत्ताधाऱ्यांना जो विचार पसंत पडतो, तो च ते इतरांवर लादण्याचा प्रयत्न करतात. त्यांना समाजाला जो आकार द्यावयाचा असतो, तो देण्यासाठीं शिक्षण हें साधन म्हणून ते वापरतात. आपल्याला

खरोखर च देशाला चांगलें रूप द्यावयाचें असेल, तर शिक्षणावर सरकारची सत्ता राहतां उपयोगी नाही. शिक्षण हें गांवांतील लोकांच्या हातीं च राहिलें पाहिजे. तर च विचारांची स्वतंत्रता कायम राहील. पण विचारांच्या स्वातंत्र्याची गोष्ट निघाली कीं, साम्राज्यवादी घाबरून जातात. ही भीति एवढी आहे कीं, राज्यसत्ता नाहीशी झाली पाहिजे हें तत्त्व मान्य करणारे कम्युनिस्ट देखील राज्यसत्ता बलवान करूं इच्छितात आणि विचारांचें स्वातंत्र्य नाकारतात. कम्युनिस्टांची जर ही स्थिति, तर राजसत्ता कायम रहावी असें ज्यांचें मत आहे, त्यांचें तर विचारावयास च नको. सत्ताधारी हे सर्व देशाला एका विशिष्ट विचारप्रणालींत बांधून टाकूं पाहतात, ही फार अनिष्ट गोष्ट आहे. या गोष्टीचा परिणाम असा झाला आहे कीं, कोणत्या हि देशांत विचाराचें स्वातंत्र्य राहिलें नाहीं. असें च विचारस्वातंत्र्य जर नाहीसें होत गेलें व सत्ता कांहीं विशिष्ट लोकांच्या च हातीं राहिली, तर जगापुढील संकट कायम च आहे असें म्हणावें लागेल.

## केंद्रित व विकेंद्रित आयोजन

आज कांहीं थोडे लोक दिल्लींत बसून संबंध देशाची योजना बनवीत आहेत. ते बुद्धिमान् आहेत व निःस्वार्थ वृत्तीनें विचार करीत आहेत, हें मान्य केलें, तरी पांच लाख खेड्यांचें आयोजन थोड्याशा लोकांच्या हातीं रहावें ही च गोष्ट अनिष्ट आहे. प्रत्येक खेडें जर स्वतःसाठीं योजना तयार करील, तर त्यांत दोष राहिले, तरी त्यांचा उपसर्ग दुसऱ्या खेड्यांना होणार नाही. व सर्वांच्या बुद्धीचा विकास होईल. पण जर या केंद्रित प्लॅनिंग कमिशनच्या योजनेंत दोष राहिले, तर त्यामुळें सगळ्या च खेड्यांचें नुकसान होईल. शिवाय या पद्धतीमुळें सगळ्या लोकांच्या बुद्धीचा विकास होण्याची संधि हि मिळणार नाही. आतां जें समाजशास्त्र तयार करावयाचें आहे त्यांत, व सामूहिक अहिंसेंत, सत्तेच्या विकेंद्रीकरणाची फार गरज आहे. त्याच्या-वाचून शोषण थांबणें शक्य नाहीं. प्रत्येकाला स्वातंत्र्य मिळावें ही जर आमची इच्छा असेल, तर सत्तेचें पूर्ण विकेंद्रीकरण झालें पाहिजे. तुम्ही हें विचारूं शकाल कीं, याला तरी कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं ? होय, मर्यादा तर अवश्य राहील. कांहीं अशा गोष्टी राहतील कीं, ज्यांच्याविषयीचा विचार

करणें हें ग्रामीणांच्या शक्तीपलीकडचें असेल. अशा गोष्टींबद्दलचा निर्णय करण्याची जबाबदारी त्यांच्यावर न टाकणें हें च उचित होईल. तरी हि खेडचावर सत्ता ग्रामीणांची च चालली पाहिजे. खेडचाचें शिक्षण त्यांच्या च हातीं असलें पाहिजे. खेडचांत कोणता माल यावा, कोणता बाहेर पाठविला जावा, गांवांतील दुकानें कशा प्रकारें चालवावीं,--इत्यादि गोष्टींबद्दल केंद्राकडून सूचना केल्या जाव्या. पण याबद्दल विचार करून निर्णय घेण्याचें काम गांववाल्यांवर च सोपवलें पाहिजे. तेव्हां च खरें स्वराज्य येईल, तेव्हां च अहिंसेचा व्यापक प्रयोग करतां येईल आणि देशांत शांतता नांदेल.

## संकट बाहेरचें नाहीं, तर आंतलें च

कांहीं लोक असा विचार करतात कीं, हिंदुस्थानवर संकट आलेलें दिसत आहे, तेव्हां देशाला बलशाली बनविलें पाहिजे. पाकिस्तान अमेरिकेकडून लष्करी मदत घेत आहे. मला तर हें सांगावयाचें आहे कीं, आपण असा विचार करतां कीं, फार उन्हाळा वाढला तरी धोका आहे व फार थंडी वाढली तरी धोका आहे. पण तुम्ही हें ध्यांनात घेत नाहीं कीं, पोट बिघडलें आहे म्हणून धोका आहे. पोट जर ठीक झालें, तर उष्णता किंवा थंडी किती हि वाढली तरी कांहीं धोका राहणार नाही. पांच महिन्यापूर्वीं हिंदुस्थानवर कांहीं संकट येणार आहे असें तुम्हांला वाटत नव्हतें. मग आज च कां तसें वाटतें ? कसलें संकट आलें आहे ? तें पूर्वीं च असेल तर आज हि असणार च, आणि पूर्वीं नसलें तर आज हि असणार नाही. एका मोठचा देशाला लहान लहान घटनांमुळें संकट आल्यासारखें वाटावें ही विलक्षण गोष्ट आहे. आपल्या देशांत स्पृश्यास्पृश्यतेचा भेद आज हि कायम आहे. माझ्यासारखे लोक हि जेव्हां देवदर्शनाला जातात, तेव्हां त्यांना मारहाण केली जाते, ही काय कमी भयंकर गोष्ट आहे ? आज भूमिहीनांची कोणी पर्वा करीत नाही, ही काय कमी भयंकर गोष्ट आहे ? आणि ज्या जातिभेदाच्या रूढीवर राजा राममोहन रायांपासून गांधीजींपर्यंत सर्वांनीं प्रहार केले, तो जातिभेद आज निवडणुकींमुळें वाढत च चालला आहे, ही काय कमी भयंकर गोष्ट आहे ? वस्तुतः देशापुढील संकटाचीं हीं च सर्व कारणें आहेत. पण बाहेरून कांहीं आघात झाला कीं, आम्हांला वाटतें संकट चालून आलें आहे. पण आपण

बारकाईनें या गोष्टीचा विचार केला पाहिजे. आपला देश जेव्हां परतंत्र होता, तेव्हां आपल्या देशावर एक प्रकारचें संकट होतें हें मान्य आहे. स्वराज्य-प्राप्तीनंतर हि संकट कायम च राहिलें. पण आपल्याला आंतून जेवढें संकट आहे, तेवढें बाहेरून नाहीं. हें आंतलें संकट जर आपण नाहीसें केलें, तर देश बलवान् बनेल. कोणत्या हि कारणांमुळें कां असेना, पण लोकांना देश बलवान् बनविण्याची गरज वाटूं लागली आहे ही गोष्ट मला आनंदाची वाटते.

## नीति पराश्रयी नव्हे, स्वतंत्र असावी

कांहीं लोक म्हणतात कीं, पाकिस्तान अमेरिकेकडून मदत घेत आहे तर आपण रशियाकडून घ्यावी. म्हणजे आपला देश कसा बनवावयाचा हें आपण पाकिस्तानवर अवलंबून ठेवणार. त्यांनीं सैन्य वाढवलें कीं, आम्ही वाढविणार. त्यांना जागतिक युद्ध हवें असलें, तर तें आम्हांला हि हवें असणार. त्यांनीं आपला देश दुसऱ्याच्या हातीं सोपवला कीं, आम्ही हि आपला देश दुसऱ्याच्या हातीं सोंपविणार की काय ? ते जसें नाचवतील तसें आम्ही नाचणार. म्हणजे या सगळ्या गोष्टींचा अखेर अर्थ तरी काय ? कांहीं लोक म्हणतात कीं, रशियाची मदत आपण कशाला घ्यावी ? आपण अमेरिकेकडून च मदत घेऊं व अमेरिका ती अवश्य देईल हि. दोनीं मांजरींच्या भांडणांत न्याय देण्यासाठीं वानर जरूर येईल व दोघींना योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न करील, ही कथा जुन्या लोकांनीं उत्तम प्रकारें लोकांना समजावून दिली आहे. तरी हि आपण तसें च वागणार कीं काय ? कांहीं लोक म्हणतात कीं, दुसऱ्याकडून मदत घेतां कामा नये. हिंदुस्थाननें स्वतां च आपली शक्ति वाढवली पाहिजे. या सगळ्याचा अर्थ एवढा च कीं, गरिबांच्या हिताच्या आखलेल्या साऱ्या योजना बंद करून सगळा पैसा लष्करावर खर्च करावयाचा. गरिबांचें बलिदान करावयाचें हा च यांतून निष्कर्ष निघतो. एका सभेंत मीं असें सांगितलें होतें कीं, गरिबांचें बलिदान च करावयाचें आहे, तर प्रथम त्यांना बलवान् बनवा. बलवान्-बळीचें दान करणार कीं निर्बलाचें ? बळी देणाऱ्यांना हें माहीत असतें कीं, बळी देण्याचा बकरा प्रथम धष्टपुष्ट बनवावा लागतो. नाही तर तें बलिदान न होतां अ-बलिदान

होईल. मग गरिबांना बलवान् कसें बनवावयाचें ? सैन्यावर पैसा खर्च करून कां ? त्यासाठीं बुद्धि ठिकाणावर ठेवून काम केलें पाहिजे. महाप्रलयाच्या वेळीं मार्कंडेय ऋषींनी ज्याप्रमाणें एकटचानें पाण्यांत पोहून (आपली बुद्धि ठिकाणीं ठेवून ) सगळ्या पृथ्वीला वांचवलें, त्याप्रमाणें जो माणूस आपली बुद्धि शाबूत ठेवील, तो च या प्रसंगीं जगाला वांचवूं शकेल. जो बुद्धि घालवून कांहीं तरी च करूं लागेल, तो कोणतें हि काम सफल करूं शकणार नाहीं.

## ग्रामीणांनी ग्रामोद्योगाचा संकल्प करावा

यासाठीं च आज प्रत्येक खेडें किल्लयाप्रमाणें बनविणें हें अतिशय अवश्य आहे. स्वदेशी चळवळीच्यावेळीं ज्या वस्तूंवर बहिष्कार पुकारला होता, त्या वस्तू आतां उजळ माथ्यानें खुल्या बाजारांत आल्या आहेत. कापड हि अमेरिकेकडून येत आहे व तें स्वस्त असल्यामुळें लोक तें विकत हि घेत आहेत. अखेर देशाची प्रतिष्ठा म्हणून कांहीं चीज आहे की नाही ? पण आम्ही जर एवढे भिकारी बनलों आणि असा विचार करूं लागलों कीं, आजचा दिवस कसा तरी निभला कीं झालें, तर अशा वृत्तीने आम्ही आपली उन्नत्ति कधीं च करूं शकणार नाहीं. भूदान-यज्ञाचा विचार खेडचापर्यंत पोचविण्यास जेव्हां मी जातों, तेव्हां मी सांगतों कीं, 'स्वराज्याचें पार्सल आलें आहे खरें. पण त्याचा बरा च भाग दिल्लींत अडकला आहे व कांहीं पाटण्यांत. खेडचापर्यंत कांहीं तें पोंचलें नाहीं. मी खेडचांतील लोकांना समजावून सांगतों कीं, उठा, उभे व्हा, आणि आमच्या येथें जो कच्चा माल होतो, त्याचा पक्का माल आम्ही खेडचांत च बनवूं व शहरांतून त्या वस्तु आणणार नाही,' अशी प्रतिज्ञा करा. किती हि स्वस्त मिळालें तरी मुसलमान ज्याप्रमाणें डुकराचें मांस खात नाही व हिंदु गाईचें खात नाही, त्याचप्रमाणें खेडचांत होणारा माल च आम्ही विकत घेऊं, तो माल शहरांतून घेणार नाही, असें गांववाल्यांना वाटलें पाहिजे.

## शहरवाल्यांनीं परदेशी माल बंद करावा

शहरवाले विचारतील कीं, आमची तुम्हांला काळजी नाही कां ? यावर माझें उत्तर असें आहे कीं, तुमची हि मला काळजी आहे. म्हणून च तर शहरांतील माल घेऊं नका असें मी ग्रामीणांना सांगत आहे. असें झालें

तर च शहर व खेडें हीं दोन्ही सामर्थ्यशाली बनतील. सूत कांतण्याची गिरणी, धान्य दळण्याची चक्की व साखरेचा कारखाना काढणें म्हणजे खेड्यांतील कच्च्या मालाचें पक्क्या वस्तूंत रूपांतर करण्याचें काम शहरवाले च करीत आहेत. परंतु या बरोबर परदेशांतून जो माल येतो तो अडविण्याचें काम ते करीत नाहीत. हा लाउड स्पीकार व हा चष्मा परदेशांतून येतो. ताप मोजण्यासाठीं जें थर्मामीटर दररोज लागतें, तें परदेशांतून च येतें. म्हणजे या मार्गांनीं शहरांवर परदेशांचा हल्ला होत च आहे. आणि इकडे खेड्यांतील लोक बेकार झाले आणि त्यांचा हि हल्ला शहरांवर होऊं लागला कीं, बिचारे शहरवाले दोन्ही हल्यांमध्ये पार चिरडले जातील. तेव्हां त्यांनीं आपल्या उद्योग-धंद्यांची अशी आंखणी केली पाहिजे कीं त्यामुळें परदेशी माल येणें बंद झालें पाहिजे व गरजेच्या वस्तु खेड्यांत च तयार झाल्या पाहिजेत.

## उद्योगांची वाटणी

भूदानाबरोबर च लोकांना मी हें हि सांगतों कीं, पुरुषांकडून होणारे स्त्रियांचें शोषण हि बंद झालें पाहिजे. इंग्रजींत 'पति' वाचक शब्दाचा जो 'हजबंड' शब्द आहे, त्याचा अर्थ शेती करणारा असा आहे व 'पत्नी' वाचक शब्द जो 'वाइफ' त्याचा अर्थ 'विणणारी' असा आहे. पूर्वींच्या-काळीं आपल्याकडे हि अशी च विभागणी होती. ताणा भरण्याचें काम स्त्रियांकडे असे. पण स्त्रियांचा हा विणाईचा धंदा पुरुषांनीं हस्तगत केला आहे. पूर्वीं स्त्रिया सुईनें शिवण करीत. पण मग सुई गेली व 'सिंगर' मशीन आलें. सुई गेली तरी हरकत नाही. पण तें सिंगर मशीन पुरुषांच्या हातीं गेलें, ही वाईट गोष्ट झाली. आतां आपण स्त्रियांना कोणता धंदा देणार? परदेशांत खाणावळीचा धंदा हि सार्वजनिक स्वरूपाचा झाला आहे. म्हणजे स्वयंपाकाचें काम हि स्त्रियांच्या हातून गेलें. सारांश, स्त्रियांचे असें कांहीं विशेष धंदे आहेत व ते त्यांच्यासाठीं च राखून ठेवले पाहिजेत. नाही तर स्त्रीशक्तीचा पुरा फायदा मिळणार नाही.

आज मध्यम वर्गीय लोकांची स्थिति तर अधिक च वाईट आहे. ते प्रत्येक काम मोलानें करवून घेतात. त्यामुळें त्यांच्या स्त्रियांना कांहीं काम च राहिलें नाही. शिवाय त्या सगळ्या कमाई हि करीत नाहीत. म्हणून च

पुरुष म्हणतो कीं, मी कमावणारा एक आहे आणि खाणारीं तोंडें दहा आहेत. पण मी यावर असें विचारतों कीं, खाणारीं तोंडें दहा आहेत, तर काम करणारे हात हि वीस नाहींत का ? देवानें एक हात आणि दोन तोंडें दिलीं असतीं तर कसें झालें असतें ? पण देवानें तसें केलें नाहीं. त्यानें आम्हांला एक तोंड व दोन हात दिले आहेत. तरी हि आम्ही जर असें म्हणूं लागलों कीं, 'कमावणारा एक व खाणारे दहा,' तर त्याचा अर्थ असा होईल कीं, 'आम्ही दोन हातांचा व दहा तोंडांचा रावण च बनविला आहे.' सारांश, या तऱ्हेनें आपण स्त्रियांना बेकार बनवीत आहोंत. स्त्रिया कायम रहाव्या असें तर वाटत आहे, पण उदरभरणाचें कोणतें हि साधन त्यांच्या हातीं मात्र आम्ही ठेवीत नाहीं. म्हणून च मी जेव्हां भूदानाचा विचार समजावून देतों तेव्हां हें हि समजावून देतों कीं, उद्योगांचें वाटप झालें पाहिजे व सत्तेचें विभाजन झालें पाहिजे.

## सत्ता असतां हि भांडण न होण्यांत महत्त्व

ग्रामपंचायतींच्या निवडणुकींत पक्षांचे भेद राहूं नयेत असा ठराव प्रजा-समाजवादी पक्षानें केला. काँग्रेसनें तो मान्य केला व असें ठरविलें आहे कीं आतां गांवच्या निवडणुकींत पक्षांमधील भांडणें होणार नाहींत. पण मी असें विचारतों कीं, खेड्यांत खरोखर कांहीं सत्ता असती आणि तरी हि पक्षांमध्यें, भांडण न करण्याचा हा निश्चय केला असता, तर त्यांत कांहीं विशेष झालें असें म्हणतां आलें असतें. पण आज खेड्यांत कसली च सत्ता नाहीं. खेडें झाडण्यास आज प्रजासमाजवादी हि तयार नाहींत व काँग्रेसवाले हि नाहींत. म्हणून च ते म्हणतात कीं, तेथील निवडणुकींत आम्ही भांडणें करणार नाहीं. यासाठीं च मला खेड्याखेड्यांत ग्रामोद्योग सुरू व्हावयास पाहिजे आहेत.

एका खेड्यांत 'ग्रामोद्योग संघा' तर्फे तेलघाण्या चालू होत्या. पण एका माणसानें तेथें तेलाची गिरणी सुरू केली व सगळ्या तेलघाण्या बंद झाल्या. ते लोक माझ्याकडे आले व मी हि त्या गांवांत गेलों. लोक म्हणतात कीं, आपल्या राज्यघटनेमध्यें असें लिहिलें आहे कीं, 'कोणी कोठें हि उद्योग सुरू करूं शकतो.' पण मी विचारतों कीं, 'लोकांना बेकार बनविण्याची परवानगी राज्यघटनेनें दिली आहे का ? एक बंधु मणिपूरला गेले होते.

ते सांगत होते कीं, मणिपूरचे सर्व धंदे नाहींसे होत चालले आहेत. हें सारें आहे तरी काय ? खेड्यांना सत्ता द्या आणि मग प्रजासमाजवादी व कॉंग्रेसवाले जर म्हणाले कीं, आम्ही निवडणुकींत भांडणें करणार नाहीं, तर यांना आतां अक्कल आली आहे असें मी समजेन.

## साम्ययोगी समाज

भूदानयज्ञाच्या द्वारां मी राजकीय, औद्योगिक व सामाजिक क्षेत्रांत समता आणूं इच्छितों व हा त्याचा च प्रयत्न आहे. लोक म्हणतात कीं, सरकारनें आमच्या गांवीं शाळा काढावी. पण मला हें पसंत नाहीं. सरकारनें एक पाठ्यपुस्तक मान्य केलें कीं, तें च जिल्हाभरच्या शाळांत चालूं होईल. अशा प्रकारें शिक्षणाचें यंत्रीकरण होईल. मी 'सर्वोदय' अशा च व्यवस्थेला म्हणतों कीं, जिच्यांत खेड्यांखेड्यांत शिक्षणाचें व ग्रामोद्योगाचें आयोजन केलें जाईल, खेड्यांखेड्यांत जमिनीचें वांटप होईल व तिच्या रक्षणाची हि योजना केली जाईल, खेड्याखेड्यांत खेड्याचें च दुकान राहील आणि खेड्यांत कोणता माल रहावा व कोणता बाहेर पाठविला जावा हें ठरविण्यासाठीं एखादी ग्रामसमिति राहील. साम्ययोगी समाजरचनेचा हा च आरंभ आहे. ही खेड्यांतील लोकांच्या च नव्हे, तर सर्वांच्या च कल्याणाची गोष्ट आहे. म्हणून शहरवासियांनीं हि यांत भाग घेतला पाहिजे. आजवर शहरी लोकांनीं ग्रामीणांकडून भरभरून घेतलें आहे, आतां त्यांची देण्याची पाळी आली आहे.

पाटणा
१०-१-५३

---

# सज्जन आणि सत्याग्रह : २३ :

दोन तीन दिवसांपासून वर्तमानपत्रांत एका मनोरंजक विषयाची वार्ता येत आहे. अमेरिकेनें हायड्रोजन बॉंब बनविला आहे. त्याचा त्यांना प्रयोग करून पहावयाचा आहे. त्या विज्ञानाची प्रगति कोठवर झाली आहे व बनविलेली वस्तु कार्यक्षम आहे कीं नाहीं हें त्यांना प्रयोगानें आजमावयाचें

आहे. तिकडे ब्रिटनचे लोक म्हणत आहेत कीं, हा प्रयोग अटलांटिक महासागरांत होतां उपयोगी नाहीं. इकडे आमचे पंडित नेहरू म्हणाले कीं, 'असा प्रयोग करणें हें च चुकीचें आहे. या नुसत्या प्रयोगानें च आपत्ति ओढवेल. कोठें हि प्रयोग केला, तरी त्याचे अनिष्ट परिणाम शेंकडों मैल दूरवर पोंचतील. त्याचे ज्ञात-अज्ञात, व्यक्त-अव्यक्त परिणाम कोणकोणते होतील हें कोणाला माहीत आहे ?'

यावर मी मनांत विचार करतों कीं, प्रयोग करावयाचा नसेल, तर मुळांत तो उद्योग तरी कां करावा ? तो उद्योग जर योग्य होता, तर त्याचा प्रयोग हि योग्य मानावा लागेल. प्रयोगावांचून उद्योग पूर्ण कसा होईल ? परंतु शस्त्रबलाला मान्यता देणारे हि त्याची अशी कांहीं मर्यादा मानतात च. हायड्रोजन बाँबचा प्रयोग रहित केला पाहिजे, एवढी मर्यादा आपण मानली पाहिजे, असा या सगळ्यांच्या म्हणण्याचा अर्थ दिसतो.

## हिंसेला मर्यादा घालण्याचे अयशस्वी प्रयोग

याप्रमाणें हिंसा मान्य असणारांनीं हि हिंसेच्या प्रयोगांना मर्यादा घालण्याचे प्रयत्न कितीदां तरी केले आहेत. ( अर्थात् केवळ अपरिहार्य म्हणून त्यांनीं मर्यादा मानलेली आहे. ) महाभारतांत युद्धाचे नियम बनविलेले आपण पाहतों. तरी हि युद्ध-काळांत कांहीं नियमांचें उल्लंघन केलें गेलें च. नियम बनविणाऱ्यांत दोन्ही बाजूंचे धुरंधर व न्यायनिपुण लोक होते. इकडे भीष्मद्रोणांसारखे तर तिकडे धर्मराज अर्जुनांसारखे. आणि दोघांमध्यें भगवान् श्रीकृष्ण होते. पूर्वजांनीं निश्चित केलेले कांहीं नियम उभय पक्षांनीं मान्य केलें. पण प्रसंग येतां च त्या नियमांचें पालन करणें त्यांना हि शक्य झालें नाहीं.

गदायुद्धांत कमरेखालीं प्रहार करतां कामा नये, असा एक नियम होता. पण युद्धाच्यावेळीं तसा प्रहार केला गेला. एका सज्जनानें च तो प्रहार केला, दुसऱ्या सज्जनानें त्याचें समर्थन केलें व तिसऱ्या सज्जनानें त्याची प्रशंसा केली. त्यावांचून विजय मिळणें शक्य नाहीं असें मानलें गेलें होतें. म्हणून हा नियम पाळणें हें मूर्खपणाचें आहे असें त्याच्या समर्थकानें म्हटलें. या च प्रमाणें एकट्यावर अनेकांनीं प्रहार न करणें, रात्रीं युद्ध न करणें, असे अनेक नियम बनविले

गेले व ते प्रसंगीं मोडले गेले. हिंसेंत आणखी अनेक दोष असले तरी एक मोठा दोष हा असतो कीं, स्वतःला मर्यादा घालण्याची अक्कल हिंसेंत नसते. हिंसा ही केवळ शक्ति आहे, तेव्हां तिच्यांत बुद्धि कोठून असणार? बुद्धीची देवता तर वेगळी च आहे.

## हिंसेनें दोघांचा हि अंत

म्हणून एकदां आपण हिंसेला मान्यता दिली कीं त्याबरोबर च तिच्या मर्यादा हि घालून देतों. आणि शक्य तोंवर त्याचें पालन हि करतों, एवढें च होऊं शकतें. महाभारताला आपण इतिहास म्हणतों. एक महाभारत वाचलें कीं दुसरा कोणता इतिहास वाचण्याची गरज च उरत नाहीं. अनुभवाच्या आधारावर रचलेलें एवढें व्यापक समाजशास्त्र त्यांत दिलें गेलें आहे. तो कांहीं घटनांवर आधारलेला इतिहास नव्हे, तर सनातन इतिहास आहे. त्याच्या प्रारंभीं व शेंवटीं भगवान् व्यासांनीं असें लिहिलें आहे कीं, मोहावरण दूर करण्यासाठीं हा इतिहासप्रदीप मीं पेटविला आहे. सनातन इतिहास हा नेहमीं च मनुष्याच्या हृदयांत पेटत असतो. तो सारा परिणामांसह महाभारतांत दर्शविला गेला आहे. त्या युद्धांत दोन्ही पक्षांत महापुरुष होते, तरी हि युद्धावर कसला अंकुश राहिला नाहीं. त्या युद्धांत कौरव मारले गेले व पांडव हि मारले गेले. पण एवढ्यानें च तें युद्ध संपलें नाहीं. जेव्हां यादव हि मारले गेले, तेव्हां तें युद्ध समाप्त झालें. अशा प्रकारें सर्वांची समाप्ति करण्यावांचून त्या युद्धानें दुसरें कांहीं हि साधलें नाहीं. त्यांत जे जिंकले व जे हरले, त्या दोघांचा हि नाश झाला, कोणी उरलें नाहीं. त्या युद्धांत च भगवद्गीतेसारखें महान् तत्त्वज्ञान सांगितलें गेलें आहे. त्यांत ही गोष्ट दाखविली आहे कीं, शक्तीच्या पाठीमागें लागण्यानें मनुष्याचें कल्याण होत नसतें.

## बुद्धीला शरण जा

आतां विज्ञानाचें युग आहे. यांत उत्कृष्ट कारागीर व लोकसेवेचीं आणि लोक-संहाराचीं हि उत्तमोत्तम साधनें निर्माण झालीं आहेत. ही सारी शक्ति च आहे. म्हणून च तिचा सदुपयोग किंवा दुरुपयोग दोन्ही हि होऊं शकतात. चांगल्या किंवा वाईट उपयोगाला बुद्धीचा च आधार असतो. म्हणून च आपण बुद्धीला शरण गेलें पाहिजे. भगवंतांनीं सांगितलें आहे कीं, "बुद्धौशरणमन्विच्छ।"

## हिंसावादी सज्जनांचा सत्याग्रहाशीं संघर्ष

तुलसीदासांनीं म्हटलें आहे, "दंड जतिनकर" म्हणजे संन्याशाच्या हातीं दंड असला पाहिजे. याचा अर्थ असा कीं, जे ज्ञानी-विज्ञानी आहेत, त्यांच्या हातीं समाज-नियमनाची शक्ति सोंपवून द्यावी, ही गोष्ट त्यांनीं सुचविली होती. पण दण्डशक्तीला स्वतःला बुद्धि नसते. आपण संन्याशाच्या च हातीं जावें व दुसऱ्या कोणाच्या हातीं जाऊं नये ही बुद्धि दण्डशक्तींत नसते. ही क्षमता दण्डशक्तींत नाहीं कारण ती जड आहे. म्हणून जे लोक धर्मशील व भोगविलासी नसतां हि ऐश्वर्याचा दावा करतात त्यांच्याकडून आम्हांला सर्वांत जास्त त्रास होतो. परोपकारासाठीं च आम्हीं सत्ता ग्रहण केली आहे असें ते म्हणतात. आम्ही अनासक्त व विकारहीन होऊन संहाराची आज्ञा देतों, असें ते म्हणतात. विकारहीन होऊन संहाराबद्दलची आज्ञा देण्याचा हा दावा जुन्या काळांत थोडा तरी संभवनीय होता ; कारण तेव्हां विज्ञानाची एवढी वाढ झाली नव्हती. म्हणून हिंसाशक्तीला रोकणें त्या काळीं थोडें तरी शक्य होतें. त्यामुळें त्या काळीं संहारांत हि गीतेमधील अनासक्ति संभवं शकत होती. पण आज विज्ञानाची फार वाढ झाली आहे व ती आम्ही थांबवूं शकत नाहीं. म्हणून हिंसाशक्तीचा तटस्थ वृत्तीनें उपयोग करण्याचें सामर्थ्य व वाटेल तेव्हां ती आवरून घेण्याचें सामर्थ्य आज सज्जनांत हि राहिलें नाहीं. सारांश हिंसाशक्तीचा स्वामी बनून हवा तसा व तेवढा च तिचा उपयोग करणें हें या विज्ञानयुगांत शक्य नाहीं.

ही गोष्ट जेव्हां स्पष्ट दिसते तेव्हां आपल्यापुढें हा प्रश्न उभा राहतो कीं, ज्या सज्जनांना ही गोष्ट स्पष्ट झालेली नाहीं व जे हिंसेला इच्छेनें वा अनिच्छेनें उत्तेजन देत आहेत, त्यांचा प्रतिकार कसा करावयाचा ? दुर्जनांचा प्रतिकार कसा करावयाचा हा प्रश्न आज आमच्यापुढें नाहीं, तर भोग-वृत्तिरहित व ऐश्वर्यवादी अशा सज्जनांचा प्रतिकार कसा करावयाचा ? हा प्रतिकार केवळ विचारशक्तीनें च करणें शक्य आहे ही गोष्ट स्पष्ट आहे. पण त्यासाठीं अंतःकरणाची उत्कटता अवश्यक आहे. दुःख सहन करण्यानें च हें शक्य आहे. यासाठीं निरन्तर अन्तःशोधनानें व नम्रभावनेनें केवळ धर्म समजून दुःख सहन करणें अवश्य आहे. याला च या युगांत मीं 'सत्याग्रह' हें नांव दिलें आहे.

## शाब्दिक नाहीं, सक्रिय विरोध करा

आज 'सत्याग्रह' या शब्दानें हा एवढा अर्थ प्रकट होईल कीं नाहीं हें मला माहीत नाहीं, परंतु संपूर्ण विचारनिष्ठा आणि दुःख सहन करण्याला च धर्म समजणें, एवढा भाव 'सत्याग्रह' या शब्दांत आहे हें मानलें पाहिजे. ती एक अत्यंत शुद्ध रचनात्मक प्रेममय व विधायक अशी शक्ति राहील. तिच्या च प्रयोगानें जे सज्जन वाट चुकले आहेत असें आम्ही समजतों, त्यांचा प्रतिकार करतां येईल.

यावर असा प्रश्न उपस्थित होईल कीं, यामुळें सामान्य जनतेंत गैरसमज उत्पन्न होईल. कारण ज्यांचा प्रतिकार आपणांस करावयाचा आहे, ते सज्जन तटस्थ आहेत व समाजाचा त्यांच्यावर विश्वास असण्याचा संभव आहे. अशा परिस्थितींत आम्हीं जर त्यांचा शाब्दिक विरोध केला, तर लोकांत भ्रम उत्पन्न होणें शक्य आहे. लोक आमचें म्हणणें ऐकतील कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. म्हणून केवळ शाब्दिक विरोध करतां उपयोगीं नाहीं. पण आपल्याला जी गोष्ट योग्य वाटते, ती आचरण्याचा प्रयत्न आपल्या संपूर्ण शक्तीनें आपण केला पाहिजे.

प्रारंभीं भूदान-यज्ञ ही एक लहानशी गोष्ट होती. आतां तिचें स्वरूप मोठें झालें आहे. तरी हि त्याच्या तुलनेंत मीं जी गोष्ट आतां समोर मांडली, ती फार च लहानशी आहे. म्हणून सत्तेची अभिलाषा सोडण्याचें आम्हीं ठरविलें पाहिजे. हिंसेची भक्ति ज्याप्रमाणें आपण सोडली, त्या च प्रमाणें सत्तेची व दण्डशक्तीची भक्ति सोडून आम्हीं समाजशक्ति निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. भूदान-यज्ञ हें या प्रयत्नाचें एक साधन मात्र आहे. पुढें दुसरीं हि साधनें हातीं येतील. मी जेव्हां या दृष्टीनें विचार करूं लागतों, तेव्हां माझें मन शांत होतें. भूदान-यज्ञांत उत्तरोत्तर जी कठिणता अनुभवास येत आहे, तिच्यामुळें मला शांति प्राप्त होत आहे.

गया

३०-३-५३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम.......................... वि: ..................
क्रमांक .......................... नों: दि: ..................

## सत्ता-निरपेक्ष सेवा : २४ :

सेवेचें नांव घेतां घेतां शेंवटीं लोक सत्ता-परायण बनतात. प्रारंभीं ते सत्तेला केवळ सेवेचें साधन समजतात. पण मग हळूं हळूं सत्ता ही त्यांची देवता बनून जाते. सत्ता एकदां देवता बनली कीं, तिच्या रक्षणाचा प्रश्न आपोआप च पुढें येतो. आणि हिंसेवर च त्यासाठीं अवलंबून रहावें लागतें. विज्ञानाच्या या युगांत या हिंसेचे परिणाम अतिशय अनिष्ट होऊन बसले आहेत. या गोष्टीची जाणीव कांहीं विचारवंतांना आतां होऊं लागली आहे. पण यांतून आतां सुटका कशी करून घ्यावी याचा मार्ग मात्र कोणाला सुचत नाहीं. मीं असें सुचविलें आहे कीं, लोकांच्या मोठमोठ्या समस्या जनशक्तीच्या म्हणजे अहिंसाशक्तीच्या साह्यानें सोडविण्याचा आपण प्रयत्न केला, तर सत्तापरायणतेपासून आपली मुक्तता होऊं शकेल. म्हणून भूदान यज्ञाच्या या आंदोलनाकडे पाहण्याची दृष्टि आम्हीं अधिक सखोल बनविली पाहिजे. सत्ता-निरपेक्ष सेवा कशी असावी, सेवेच्या द्वारां शक्ति कशी निर्माण करावी व समाजाला केवळ सुरक्षित नव्हे तर स्वरक्षित कसें बनवितां येईल, यांचा शोध आम्हीं घेतला पाहिजे. या सर्वांचा आधार भूदान-यज्ञ आहे. हें एक महान् कार्य आहे. एवढी व्यापक दृष्टि ठेवून भूदान-यज्ञाचें कार्य केलें पाहिजे. नाहीं तर, भूदान-यज्ञांत कोणत्या हि उपायांनीं जमीन मिळवावी व कार्यकर्त्यांनीं त्यासाठीं नाना प्रकारचीं दडपणें लोकांवर आणावीं, असें हि होण्याचा संभव आहे. असें कार्य अहिंसाशक्तीचें नव्हें, तर हिंसेचें च होईल. शस्त्राचा उपयोग जरी त्यांनीं केला नाहीं, तरी भिवविणें व धमक्या देणें म्हणजे हिंसा करणें च आहे. आणि अशामुळें भूदानयज्ञाचें सार्थक होणार नाहीं.

### निवडणुकींपासून अनुचित लाभ

प्रजासमाजवादी पक्षाच्या एका नेत्याशी चर्चा चालली होती. ते म्हणाले कीं, 'आजकाल लोकांना निवडणुकींविषयीं अतिशय उत्साह वाटत असलेला दिसून येतो, भूदानयज्ञ हें एक आवश्यक कार्य आहे, हें सर्वजण

मान्य करतात. पण निवडणुकींविषयीं वेगवेगळ्या पक्षाच्या लोकांना जो उत्साह वाटतो, तसा तो त्यांना या कार्याविषयीं वाटत नाहीं. भूदान-यज्ञाविषयीं ते विचार करूं लागले, तर त्यांच्या मनांत असें येतें कीं, ' या कार्याच्या द्वारां आपण जनसंपर्क वाढवला, तर त्यामुळें निवडणुकींत त्याचा फायदा आपणांस अवश्य मिळेल. ' कांहीं लोक या दृष्टीनें विचार करतात हें मला मान्य आहे. पण एखाद्या चांगल्या कार्याचा उपयोग करावयाचा असला, तर तें चांगलें कार्य चांगल्या दृष्टीनें जर केलें जात असेल, तर तशा उपयोगाला कांही हरकत नाहीं. याप्रमाणें भूदान-यज्ञाच्या कार्यांतून दुसरीं हि चांगलीं कामें संभवूं शकतात.

## निवडणुकीपेक्षां अहिंसक जनशक्तीची निर्मिति अधिक शक्तिशाली

निवडणुकींत फार मोठी शक्ति आहे असें सामान्यतः लोकांना वाटत असतें. पण अहिंसक जनशक्ति निर्माण करण्यांत याहून जास्त शक्ति आहे, असें जेव्हां लोकांना कळून येईल, तेव्हां त्यांची विचाराची दिशा च बदलून जाईल. या गोष्टीवर थोडा अधिक विचार केला पाहिजे. पश्चिमेकडून या देशांत आलेला हा निवडणुकींचा प्रकार दोन चार वर्षं च नव्हे, तर पुष्कळ काळ चालेल. तेव्हां त्यांत कांहीं सुधारणा पाहिजे कीं नाहीं याचा विचार केला पाहिजे. आज ज्या तऱ्हेनें काम चाललें आहे त्यामुळें फायदा होईल कीं नाहीं, हें पाहिलें पाहिजे. आपल्या देशांतील परिस्थित्यनुसार त्यांत परिवर्तन करणें आवश्यक आहे. पण आपण तसें केलें नाहीं व केवळ पाश्चात्य प्रकाराचें च अनुकरण केलें, तर तें ठीक होणार नाहीं. दुसऱ्या देशाची गोष्ट स्वीकारण्यांत कांहीं वाईट नाहीं, पण ती घेतांना आपल्या देशांच्या परिस्थित्यनुसार फरक केला पाहिजे.

## निवडणुकींमुळें जातिभेदांत वाढ

आपल्या समाजांत जातिभेद रुजलेला आहे. राजा राममोहन रॉय पासून तों महात्मा गांधीपर्यंत अनेक चिंतनशील महापुरुषांनीं त्यावर प्रहार केले. त्यामुळें जातिभेदाची ही संस्था पुष्कळ खिळखिळी झाली आहे. पण आजकाल जातिभेद अधिक च पक्का होत चालला आहे असें दिसून येतें. याचें कारण काय ? कारण स्पष्ट आहे कीं, निवडणुकींत जातिभेद आणला जातो व

त्यामुळे तो अधिक पक्का होतो. निवडणुकीचे आणखी दोष म्हणजे त्यामुळें परस्पर द्वेष उत्पन्न होतो. आणि पैसा व वेळ व्यर्थ खर्च होतो. आज निवडणुकींना गरजेपेक्षां अधिक महत्त्व दिलें गेलें आहे.

एखाद्या महत्त्वाच्या गोष्टीला हि अतिशय अवास्तव महत्त्व दिलें गेलें, तर मनुष्य समाज गोंधळून जातो. स्वराज्यप्राप्तीपूर्वी राजकारणांत जें सामर्थ्य होतें तें स्वराज्यप्राप्तीनंतर सामाजिक व अर्थविकासक कार्यांत कसें आणतां येईल या दृष्टीनें विचार केला पाहिजे. या दृष्टीनें आजच्या निवडणुकीच्या पद्धतींत काय परिवर्तन करणें शक्य आहे याचा जरा विचार करा. अशा दृष्टीनें परिवर्तनाच्या प्रकारांत संशोधन झाल्यास, आजवर झालेल्या कामावर बोळा फिरतांना जो दिसत आहे, तेवढ्यांतून तरी आपली सुटका करून घेतां येईल.

## सामूहिक कार्यक्रम आवश्यक

या बाबतींत मीं पुष्कळ विचार केला आहे व बोललों हि आहे. यासाठीं सखोल चिंतनाची गरज आहे. मी असें च चिंतन करतों कीं त्यांतून मला पुढचा मार्ग दिसूं लागतो. मला जे विचार सुचतात, त्यांतून आजच्या परिस्थितींत जें शक्य आहे तेवढ्या च बद्दल मी थोडेसें सांगतों. पहिली गोष्ट ही कीं, निवडणुकीचें क्षेत्र मर्यादित झालें पाहिजे. जेथें जनसेवेचें च कार्य करण्याची जबाबदारी आहे, तेथें राजकीय पक्षाचा व्यर्थ अभिनिवेश आणतां उपयोगी नाहीं. या निवडणुकी कोणत्या हि पक्षातर्फे लढविल्या जाऊं नयेत. म्युनिसिपॉलिटच्या व लोकलबोर्ड आदींच्या निवडणुकी पक्षांतर्फे लढविल्या जातां कामा नये. या सूचनेवर जर लोक विचार करतील, तर यापासून पुष्कळ लाभ होईल ही गोष्ट त्यांना कळून येईल. म्युनिसिपॉलिटी, लोकलबोर्डें, ग्रामपंचायत आदि संस्थांत जनसेवेचीं कामें करावयाचीं असतात. त्यांत वेगवेगळ्या राजकीय पक्षांचा संबंध येत हि नाहीं व येतां हि कामा नये. हिंदुस्थानासारख्या विस्तीर्ण व मागासलेल्या देशांत ही च दृष्टि ठेवली पाहिजे. मीं 'मागासलेला' हा शब्द या अर्थानें वापरला आहे कीं, येथील जीवनमान फार खालीं गेलें आहे व येथें शिक्षण हि फार च थोडें आहे. अशी स्थिति असल्यामुळें वेगवेगळ्या राजकीय पक्षाच्या लोकांनीं सर्वांना साधारण असा

एक कार्यक्रम आखावा व त्यावर च जोर द्यावा, या गोष्टीची आज गरज आहे. प्रत्येक पक्षाचा जो स्वतंत्र राजकीय वाद, विचार, अगर दर्शन, असेल, तें त्यानीं सोडावें असें मी सांगत नाहीं. परंतु माझी ही इच्छा मात्र आहे कीं, लोकांचें हित इच्छिणाऱ्या, लोकसत्तेवर विश्वास ठेवणाऱ्या व शांतीच्या गोष्टी करणाऱ्या भिन्नभिन्न राजकीय पक्षांनीं सर्वांना मान्य असणारा असा एखादा सामूहिक कार्यक्रम ठरवावा.

## विचार-मंथन व्हावें पण आचार-संघर्ष नको

असा सामूहिक कार्यक्रम कांहीं मिळत नाहीं असें जर कोणी म्हणूं लागलें, तर हे सारे दुर्जनांचें संघ आहे असें च म्हणावें लागेल. पण हे सारे सज्जन आहेत, दुर्जन नाहींत असें मी मानतों. सज्जनांमधें अशा प्रकारचे समान कार्यक्रम असूं शकतात. तर च ते सज्जनतेचा दावा करूं शकतील. मीं असें मानतों कीं हे सारे सज्जन आहेत, म्हणून यांच्यामधें आचरणाचा कोणता तरी समान कार्यक्रम उपलब्ध झाला पाहिजे, ज्यांत सर्वांचें एकमत राहील व ज्यावर सर्वजण जोर देतील अशी व्यवस्था होऊं शकली, तर आज जो आचारांचा संघर्ष चाललेला आढळून येत आहे, तो होणार नाहीं. लोकांसमोर वेगवेगळीं मतें मांडल्यानें त्यांचा बुद्धिभेद होतो. आपल्या येथील लोक अगोदरच अकर्मण्य आहेत. त्यांत अशा प्रकारचा बुद्धिभेद उत्पन्न केला गेला तर ही अकर्मण्यता अधिक च वाढेल. भिन्न भिन्न पक्ष एकमेकांच्या मतांचें सतत खंडन करीत राहतील तर लोकांची कोणती च स्थिर श्रद्धा राहणार नाहीं. म्हणून च सर्वांना समान असेल, असा कार्यक्रम शोधला पाहिजे. त्यामुळें सध्यांच्या निवडणुकींत जी कटुता उत्पन्न होत आहे, ती कमी होईल. हें काम अतिशय अवश्य आहे. सारांश, विचार-मंथन होत रहावें पण आचार-संघर्ष मात्र होऊं नये अशी माझी इच्छा आहे.

## योग्य मूल्यमापन व्हावें

म्युनिसिपॉलिटचा, लोकलबोर्डें व विद्यापीठें यांत राजकीय पक्ष असतां कामा नये. तेथें राजकारणावर हवी तेवढी चर्चा व्हावी पण जी योजना करावयाची ती मात्र सर्वमान्य विचारानें व्हावी, तेथें राजकीय पक्ष नसावे.

या च प्रमाणें म्युनिसिपॉलिटया इत्यादि संस्थांच्या निवडणुकी राजकीय पक्षांच्या द्वारां न व्हाव्या. लोकांना हा विचार मान्य झाला तर तसा कायदा हि होऊं शकेल. या संस्थांच्या निवडणुकींत जे उमेदवार म्हणून उभे राहतील, ते जनतेचे सेवक या नात्यानें च उभे रहावेत व लोक ज्याला निवडून देतील तो चांगला सेवक मानून च निवडला जावा. आज निवडणुकींत जी कटुता व जो संघर्ष उत्पन्न होतो, लोकांना त्याविषयीं जो अवास्तव उत्साह वाटतो व महत्त्वाकांक्षी लोकांना त्यांत जी संधि मिळते, त्या सर्व अनिष्ट गोष्टींपासून आपण मुक्त होऊं

आम्हांला थोडें तारतम्य व थोडा विवेक शिकला पाहिजे. कोणत्या गोष्टीला केवढं महत्त्व द्यावयाचें याचें लोकांना भान राहिलें पाहिजे. मग निवडणुकींत लोकांना आजच्यासारखा अवास्तव उत्साह वाटणार नाहीं आणि सामाजिक कार्यांत व लोकशक्तीच्या कामांत मात्र लोकांना विशेष उत्साह वाटूं लागेल. आज हिंदुस्थानांत मूल्यमापनावांचून काम चाललें आहे. कोणत्या गोष्टीला केवढें महत्त्व द्यावयाचें हें आम्हांला कळत च नाहीं. पण ही जाणीव जर झाली, तर भूदानाचें महत्त्व सगळ्यांना कळून येईल व सगळे त्यांत एकत्र होतील आणि त्यामुळें एक शक्ति निर्माण होईल.

सर्व लोक जर संकल्प करतील तर दोन चार वर्षांत च हें कार्य पुरें होईल. पण आजचें चुकीचें मूल्यमापन जेव्हां थांबेल व कोणत्या गोष्टीला किती महत्त्व द्यावयाचें याची जाणीव लोकांना होईल. तेव्हां च हा संकल्प होऊं शकेल.

गया
२१-२-५४

———

## वेदान्त व अहिंसा यांचा समन्वय : २५ :

( बोधगयेंत 'समन्वयाश्रमा' च्या स्थापनेच्या वेळीं केलेलें भाषण )

वेदान्त व अहिंसा हे परस्परांच्या अविरुद्ध आहेत. दोन्ही एकमेकांचें कार्यकारण आहेत. वेदान्तांतून अहिंसा सरळ निष्पन्न होते आणि अहिंसेला वेदान्तावांचून दुसरा भक्कम पाया मिळत नाहीं. वेदान्ताचा आधार सोडून अहिंसेचें किती हि समर्थन केलें तरी तें सैल व विस्कळित राहील. तिला जेव्हां वेदान्ताचा आधार प्राप्त होईल तेव्हां च तें समर्थन पायाशुद्ध व दृढ बनेल. ही सारी प्रक्रिया गीतेंत एका श्लोकांत संक्षेपानें सांगितली आहे.

**"समं पश्यन् हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ।**
**न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् ।।"**

याचा अर्थ हा कीं, जो मनुष्य सर्वत्र परमेश्वराचें अस्तित्व समान रूपांत पाहतो, हा झाला वेदान्त. याचा परिणाम म्हणून तो हिंसा करूं च शकत नाहीं; कारण हिंसा करण्यासाठीं जें शस्त्र उचलावयाचें, तें स्वतःच्या विरुद्ध च उचलल्यासारखें होईल. म्हणून जो आत्महिंसा करणार नाहीं त्याला परम गति मिळेल. परमेश्वराचें सर्वत्र समान दर्शन हा येथील मूल आधार वेदान्ताचा च आहे. त्या आधारावर अहिंसेची जीवननिष्ठा आणि तिचा अंतिम परिणाम परम गति याप्रमाणें केवळ एका श्लोकांत साऱ्या विश्वासाठीं आदिपासून अंतापर्यंत ( पायापासून शिखरापर्यंत) योग्य तो समन्वय गीतेच्या या अद्‌भूत श्लोकांत दाखविला गेला आहे.

### सत्य आणि वेदान्त

बापू वेदान्ताऐवजीं सत्य हें तत्त्व घेत व त्याला अहिंसा जोडून देत. ते म्हणत कीं, 'सत्य व अहिंसा हें एक च द्विदल तत्त्व आहे. दोन्ही मिळून एक च तत्त्व आहे. याप्रमाणें त्यांना 'सत्य' हा शब्द पसंत होता. मीं विचार केला कीं, सत्याचें संशोधन जितक्या प्रखरतेनें वेदान्तांत झालें आहे तितकें तें दुसऱ्या कोणत्या हि ठिकाणीं झालें नाहीं. म्हणून 'सत्य' शब्दाचा

अर्थ 'वेदान्त' हा च होतो. वेदान्त म्हणजे वेद-सार, तत्त्वज्ञानाचें सर्वसार म्हणजे च सत्य होय. वेदान्तांत हें हि सांगितलें आहे कीं, सत्य हा च अंतिम शब्द आहे व त्यांत च सारा जीवन-विचार निहित आहे. सारांश, ज्याला बापू सत्य म्हणत, तें च हिंदुस्थानच्या व सर्व जनतेच्या भाषेंत वेदान्त आहे.

सत्य हा शब्द परमतत्त्वसूचक आहे व वेदान्त हा समन्वयाचा सूचक आहे. म्हणजे सत्याच्या दर्शनाचे अनेक पैलू आहेत. ते सारे सत्याचे पैलू जेथें एकत्र होतात, तेथें कोणत्या हि एका अंगाचा आग्रह राहत नाहीं. याला च 'वेदान्त' म्हणतात. आचार्य गौडपादांनीं स्पष्ट च सांगितलें आहे कीं,

"स्वसिद्धान्तव्यवस्थासु द्वैतिगो निश्चता दृढम्।
परस्परं विरुद्ध्यन्ते तैरयं न विरुद्ध्यते॥"

म्हणजे, "तुम्हीं आपापसांत किती हि वाद केलांत, तरी तुम्हीं माझ्याशीं वाद करूं शकत नाहीं. कारण तुम्हां सर्वांचा समावेश माझ्या उदरांत झालेला आहे."

## समन्वयाचें कार्य

तेव्हां सर्वांगीण व समग्र सत्यदर्शन व त्याबरोबर च अहिंसा--या दर्शनाला वेदान्त म्हणतात. आम्हीं आपल्या जीवनांत व दर्शनांत या च दोन तत्त्वांचा समन्वय केला पाहिजे. समन्वय करण्याचे जे प्रयत्न आजवर झाले, त्यामुळें आपणांस दिशा मिळाली आहे. तरी हि त्यांत परिपूर्णता येत नाहीं किंवा कदाचित कधीं येणार हि नाहीं. समन्वय करण्याचा एक फार मोठा कार्यक्रम भगवंतांनीं आज हि आमच्यासाठीं योजून ठेवला आहे. हा भूदान-यज्ञ आम्हांला कशाप्रकारें कोठें घेऊन जाणार आहे, याचा हि अजून कांहीं हि अंदाज लागत नाहीं. पण एकेक पाऊल आम्हांला पुढें टाकावें च लागत आहे. या दृष्टीनें सांस्कृतिक केंद्राची ही कल्पना, जिला 'समन्वय-आश्रम' किंवा 'समन्वय-मन्दिर' असें कोणतें हि नांव दिले जावो, पुरेशी आहे.

## आपण शून्य बनावें

या कार्यासाठीं आपणां सर्वांचा अंतःकरणपूर्वक सहयोग मला पाहिजे आहे. सहयोगाचा व्यवहारांत जसा अर्थ केला जातो, तसा त्याचा अर्थ मला अभिप्रेत नाहीं. माझी अशी इच्छा आहे कीं, आम्ही आपल्या हृदयांत हा च

भाव वाळगावा कीं, हें सारें परमेश्वराचें अस्तित्व आहे आणि आम्ही जे सर्व आहोंत ते केवळ शून्य आहोंत. त्याच्या च उदरांत त्याच्या च लीलेनें आम्हांला हीं भिन्न रूपें प्राप्त झालीं आहेत. शून्याला हि रूप असतें व त्याचा आकार हि दाखविला जातो. तें हि निराकार नसतें. त्या च प्रमाणें आम्हांला हि आकार आहे, तरी हि आम्ही शून्य बनलें पाहिजे.

बोधगया

१८-४-'५४

---

## मंदिर-प्रवेश-बंदीपेक्षां हि हा मोठा अपराध : २६ :

एका बंधूनें म्हटलें होतें कीं, 'जमीन हें उत्पादनाचें फार मोठें साधन आहे म्हणून तिच्यावर कोणाची हि मालकी असूं शकत नाहीं, ही गोष्ट थोडी-बहुत समजते.' यावर मीं म्हटलें कीं, 'जमीन हें केवळ उत्पादनाचें साधन नाहीं, तर तें परमेश्वराच्या भक्तीचें हि साधन आहे. ही गोष्ट मीं आपल्या अनुभवावरून सांगितली. कारण मीं स्वतः च याचा अनुभव घेतला आहे. ईश्वरभक्तीचीं जीं जप, तप, ज्ञान आदि साधनें आहेत, त्यांचा थोडाबहुत अनुभव मला हि आहे. पण त्या सर्वांच्या द्वारां जेवढी ईश्वरभक्ति होते, म्हणजे मनुष्याच्या विकार-शमनासाठीं त्या सर्व साधनांची जेवढी मदत मिळते, त्याहून अधिक मदत, जमिनीवर परिश्रम केल्यानें व मोकळ्या हवेंत कुदळ घेऊन काम करण्यानें होते.

म्हणून काशी विश्वेश्वराच्या मंदिरांत हरिजनांना प्रवेश नाकारण्याचा जो अपराध आहे, त्याहून अधिक अपराध, ज्या व्यक्तीची शेती करण्याची इच्छा व क्षमता आहे, तिला या जमिनीचा मालक दुसरा कोणी आहे असें सांगून ती जमीन देण्यास नकार देणें, हा आहे असें मला वाटतें. आणि ते मालक देखील असे कीं, जे न सांगतां सवरतां हें जग सोडून चालते होणार आणि जमीनी मात्र कायम च राहणार--आतां यापुढें हें असें चालणार नाहीं.

एकवार हरिजनांना मंदिर-प्रवेश मिळाला नाहीं तरी चालेल. कारण ईश्वराची भक्ति करण्याचीं व त्याचें दर्शन घेण्याचीं दुसरीं हि साधनें आहेत. पण भूमिहीन लोकांना भूमीची सेवा हें ईश्वर-भक्तीचें सर्वोत्कृष्ट साधन आहे. त्या साधनापासून कोणाला हि वंचित ठेवतां कामा नये.

बोध गया :—
१८-४-५४

---

## भूदान-यज्ञांत आपला भाग न देणें हा देशद्रोह : २७ :

गोकुळ-वृंदावनांत भगवान् श्रीकृष्णांनीं गोवर्धन पर्वत उचलण्याची योजना पुढें मांडली तेव्हां सर्व गोपाळ बालकांना त्यांनीं सांगितलें कीं, हा पर्वत उचलण्यांत तुमच्या सर्वांचे हात व तुमच्या काठ्या लागल्या पाहिजेत. तेव्हां त्या सगळ्या गोपाळबालांनीं आपापल्या काठ्या पर्वताला लावल्या. पण पर्वत का कुठें काठ्यांनीं उचलतां येतो? तरी हि सगळ्यांनीं आपले हात व काठ्या लावल्या. कवि सांगतात, 'जेव्हां श्रीकृष्णांनीं हें दृश्य पाहिलें, तेव्हां शेंवटीं त्यांनीं आपल्या बोटानें पर्वताला स्पर्श केला. मग काय? गोवर्धन पर्वत एकदम उचलला गेला. तेव्हांपासून श्रीकृष्णाचें नांव 'गोवर्धन-धारी' असें पडलें.

### नारायण-शक्तीचा अविष्कार

सारांश, कोणतें हि काम भगवंताच्या नांवानें च होत असतें. त्यांच्या च अंगुलीचा स्पर्श झाला कीं, गोवर्धनासारखे पर्वत उचलले जातात. पण जेव्हां एखाद्या कार्याला सर्व लोकांचे हात लागतात व जन-समुदायाचें सामर्थ्य मिळतें, तेव्हां च त्यांत नारायण-शक्तीचा आविर्भाव होतो. नरांच्या समुदायामध्यें जी नवी शक्ति उत्पन्न होते, तिला च 'नारायणशक्ति' असें म्हणतात. जेव्हां पांचजण एकत्र येतात, तेव्हां प्रत्येकाची एकेक शेर मिळून पांच शेर

शक्ति होत नाहीं, तर पन्नास शेर बनते. याचा दाखला विज्ञानांत मिळतो. समूहांत किंवा समुदायांत एक सर्वस्वी नवी शक्ति प्रकट होत असते. ही नवी शक्ति ईश्वरी शक्ति, नारायण-शक्ति असते व ती च कार्य पार पाडते. पण सर्वांचा सहयोग ज्यावेळीं प्राप्त होतो, तेव्हां च ती शक्ति उत्पन्न होत असते.

## भूदान-यज्ञांत भाग न देणें हा देशद्रोह

ज्या कार्यांत सर्वांचा सहयोग मिळतो, त्याला च 'यज्ञ' म्हणतात. देशावर कांहीं संकट आलें कीं, यज्ञ केला जातो. आज आपल्या देशावर असें संकट आलें आहे. एखादें नवें संकट आलें आहे असें मात्र मला वाटत नाहीं, तर हें आंतलें च संकट आहे. मजूर व मालक यांच्यांत भेद आहे, कोटयवधि लोकांजवळ कसलें हि साधन नाहीं, हरिजन व इतर यांच्यांत स्पृश्यास्पृश्यता माजली आहे, अनेक धर्मभेदांचीं भांडणें हि चालू आहेत—आज हीं सारीं संकटें आपल्या देशाला व्यापून राहिलीं आहेत. अशा परिस्थितींत देशाला वाचंविण्यासाठीं एखादा यज्ञ सुरू झाला व तो एका व्यक्तीनें किंवा पांच पन्नास लोकांनीं पार पाडला तर त्यांतून कांहीं हि निष्पन्न होणार नाहीं. गांवच्या होळींत ज्याप्रमाणें घराघरांतून लांकूड द्यावें लागतें, त्या च प्रमाणें अशा यज्ञांत प्रत्येकाला आपली आहुति अर्पण करावी लागते. मी हें स्पष्ट सांगूं इच्छितों कीं, या यज्ञांत जो जो आपला हिस्सा देणार नाहीं, तो तो देशद्रोही म्हणून सिद्ध होईल. देशाची या काळांतील मागणी ही आहे कीं भूमिहीनांचा प्रश्न सोडविण्यासाठीं, हा पर्वत उचलण्यासाठीं प्रत्येकाकडून दान-पत्र मिळालें पाहिजे.

बोधगया

१८-४-'५४

———

## जीवन-दान                                                    : २८ :

( श्री. जयप्रकाश नारायणांनीं भूदान-कार्यासाठीं आपलें जीवन-दान देण्याचा संकल्प घोषित केला व तेथून च जीवन-दान-यज्ञाचा प्रारंभ झाला. त्यानंतर विनोबाजींनीं जयप्रकाशजींना एक पत्र लिहून खालील शब्दांत आपलें जीवन-दान घोषित केलें. )

श्री जयप्रकाश,

काल आपण जें आवाहन केलें त्याच्या उत्तरादाखलः—भूदान-यज्ञ-मूलक, ग्रामोद्योग-प्रधान, अहिंसक क्रांतीसाठीं मी आपलें जीवन समर्पण करीत आहें.

सर्वोदयपुरी गया                                                    —विनोबा
२०-४-'५४

---

## राजनीतीचें लोकनीतींत परिवर्तन                                      : २९ :

हें विज्ञानाचें युग आहे. विज्ञानाची गति अतिशय शीघ्र असते. आपण जर मंद गतीनें समाज-सुधारणेचें कार्य केलें, तर काळ आपली वाट पाहणार नाहीं. यासाठीं आपल्या कार्याची गति वाढविणें हें अतिशय आवश्यक आहे. यावेळच्या बोधगयेच्या सर्वोदय संमेलनांत जी एक नवी घटना घडली, तिनें साऱ्या देशावर आपला प्रभाव पाडला आहे. तो 'जीवन-दाना' चा स्रोत होता. भूदानांतून संपत्ति-दान, श्रम-दान, हे सर्व निर्माण झाले. पण त्यांची पूर्तता मात्र जीवनदानांत च झाली. याचा प्रभाव सर्व देशभर पडेल. त्यामुळें भूदान-यज्ञाच्या कामाची गति वाढेल.

## षष्ठांश दान व स्वामित्व विसर्जन यांत विरोध नाहीं

समाजांत परिवर्तन घडविण्याची गोष्ट भूदानाच्या मुळांत च अंतर्भूत आहे. भूमीचा प्रश्न हा साऱ्या आशियाचा च प्रश्न आहे. हा दुसऱ्या अनेक देशांत हि आहे, पण हिंदुस्थानचा मात्र तो प्रमुख प्रश्न आहे. हा च प्रश्न हातीं घेऊन आपण कार्य करीत आहोंत. हें भूदानाचें बाह्य स्वरूप आहे. पण त्याचें आंतलें स्वरूप अधिक महत्त्वाचें आहे. लोकांना याचें जेवढें आकलन होईल, तेवढा उत्साह या कामांत निर्माण होईल. समाजाची संपूर्ण व्यवस्था बदलणें हें भूदानाचें आंतलें रूप आहे. पण लोकांना याचें आकलन होत नाहीं. त्यांना वाटतें भूदानानें गरिबांना मदत मिळेल, तेव्हां हें एक चांगलें काम आहे ; म्हणून आपल्याकडून होईल तेवढें साह्य आपण पुरविलें पाहिजे. या दृष्टीनें हि लोकांनीं भूदानाला मदत केली आहे.

आतां च मीं 'ग्रामधर्मा' वर व्याख्यान देतांना कांहीं मूलभूत गोष्टी समजावून सांगितल्या. भूमीवर कोणाची हि मालकी नाहीं, ही एक त्यांपैकीं गोष्ट आहे. लोक म्हणूं लागले कीं, 'ही तर नवी च गोष्ट आहे. बाबा मालकी मान्य करतात म्हणून च जमिनीचा सहावा हिस्सा मागतात असें आम्ही समजत होतों. तसें नसतें, तर त्यांनीं सगळी च जमीन मागितली असती.' आज तीन वर्षांपासून मी वारंवार ही च गोष्ट सांगत आहे कीं, हवा, पाणी, व सूर्यप्रकाश यांच्याप्रमाणें च जमीन ही हि परमेश्वराची देणगी आहे. म्हणून त्या सर्व गोष्टी सर्वांच्या च आहेत व सर्वांच्या उपयोगासाठीं आहेत. हवा-पाण्याचा जसा कोणी मालक नाहीं, त्याप्रमाणें च जमिनीचा हि कोणी मालक नाहीं. परमेश्वर च तिचा मालक आहे. म्हणून आम्हीं सर्वांनीं मिळून सर्वांना वाटून च तिचा उपयोग केला पाहिजे. जमिनीचा सहावा हिस्सा मी दान म्हणून मागत आलों आहे यांत जमिनीवर कोणाची हि मालकी नाहीं आणि, यांत कोणता हि विरोधाभास नाहीं.

## उपनिषदाच्या आधारावर नवी रचना

सत्य-विचाराच्या आधारावर च समाजाची रचना करण्याची माझी इच्छा आहे. 'भगवंतानें आम्हांला जी बुद्धि, शक्ति, व लक्ष्मी दिली आहे ती समाज-सेवेसाठीं च आहे. तिचा स्वतंत्र उपभोग घेणें हें उचित नाहीं. समा-

जाला समर्पण केल्यानंतर च आपण तिचा उपभोग घेऊं शकतों.' ही च मूलभूत भावना आम्हांला प्रसृत करावयाची आहे व तिच्यावर च समाजाची रचना करावयाची आहे. हा विचार कांहीं नवा नाहीं. आपल्या उपनिषदांत हि ही गोष्ट लिहिली आहे.

'ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत्।
तेन त्यक्तेन भुंजीथाः------------॥'

याचा अर्थ हा कीं हें सर्व जगत् ईश्वरमय आहे व त्याला समर्पण करून मग च सर्व गोष्टींचा उपभोग घेतला पाहिजे. याहून अधिक चांगला संदेश कोणत्या हि शास्त्रांत दिला गेला नाहीं. कम्युनिझममध्यें हि ही भावना आहे, पण ती थोड्या प्रमाणांत आहे. कारण तो ईश्वराचें अस्तित्व मानीत च नाहीं. म्हणून त्याच्यांत दानाची कल्पना नाहीं, तर हिसकावून घेण्याचें तत्त्व आहे. तो ईश्वराला समर्पण करीत नाहीं, हें च कम्युनिझमचें न्यून आहे. बाकी ईशावास्यांत जें तत्त्व परिशुद्ध व निर्दोष स्वरूपांत व्यक्त झालें आहे, तें च कम्युनिझममध्यें आहे. आजवर या तत्त्वाचें चिंतन झालें. पण त्यावर समाजाची रचना करण्याचा विचार झाला नाहीं. आजच्या समाजांत वैयक्तिक मालकी-हक्काला मान्यता मिळालेली आहे. आपलें सरकार, राज्य घटना, व कायदे, हे सर्व या च आधारावर बनविले गेले आहेत. पण हा विचार मुळापासून च बदलण्याची आमची इच्छा आहे. सध्यांच्या राजनीतींत हि बदल करण्याची आमची इच्छा आहे. येथवर कीं, 'राजनीति' शब्दाऐवजीं 'लोकनीति' हा शब्द आम्ही प्रस्थापित करूं इच्छितों.

## नित्यदानाची आवश्यकता

भगवान् शंकराचार्यांनीं दानाची व्याख्या 'दानं संविभागः' अशी केली आहे. म्हणजे दान हें दुसऱ्यावर उपकार करणें नव्हे, तर आपल्या वस्तूंचें समान विभाजन करणें होय. ही कांहीं शंकराचार्यांनीं काढलेली नवी गोष्ट नव्हे, तर ही परिभाषा सगळ्या वेदान्तदर्शनांत आहे. सर्वत्र दानाचा अर्थ समविभाजन हा च मानला गेला आहे. तरी हि आज आम्ही सर्व मागत नाहीं, फक्त सहावा हिस्सा मागतों. आणि असें असून हि कोठें कोठें आम्हांला संपूर्ण गांवें हि मिळालीं आहेत. ओरिसांत सोळा-सतरा खेडीं, उत्तर प्रदेशांत

दोन तीन, गया जिल्ह्यांत दोन तीन, व पलामू जिल्ह्यांत १५-१६; अशीं ग्रामदानें मिळालीं आहेत. एवढी मोठी क्रांति करण्यासाठीं आपल्याला एकेक पाऊल टाकीत गेलें पाहिजे. प्रथम लोकांनीं विचार पसंत करावा व मग मान्य करावा. प्रारंभीं जमिनीचा सहावा हिस्सा मिळाल्यानें च आपला प्रश्न सुटेल. पांच कोटि एकर जमीन मिळाली तर आपलें काम भागेल. पुढें मग आणखी मागतां येईल.

पण एकदां दान दिल्यानें सुटका होणार नाहीं हें लक्षांत ठेवा. जसें एकदां जेवून सुटका होत नाहीं, तर पुन्हां पुन्हां ठराविक वेळीं शरीर चालविण्यासाठीं जेवावें लागतें, तसें च समाजांत जोंवर भोगक्रिया चाललेली आहे, तोंवर दान क्रिया हि नित्य चालली पाहिजे. दानांत धर्म आहे व तें नित्य करीत राहण्याचें कार्य आहे. धर्म व दान नेहमीं च करीत राहिलें पाहिजे. एखाद्या फंडाला दान देणें हें नित्य कर्तव्य नाहीं. पण भूदानाचें काम हें नित्य कर्तव्य आहे. जोंपर्यंत धर्माचरणाची आवश्यकता आपण मानीत रहाल, तोंपर्यंत भूदान देणें हें आपलें कार्य आहे. तो आपला प्राण च जणूं बनला पाहिजे. सहावा हिस्सा हें प्रारंभीचें दान आहे. शेंवटीं तर सगळी च जमीन दिली पाहिजे. सगळी जमीन गांवाची झाली पाहिजे. सोयीसाठीं तिचें वांटप केलें गेलें, तरी तें कायमचें समजलें जाणार नाहीं. पंधरा वीस वर्षांनीं पुन्हां वांटप होईल. त्यावेळीं प्रत्येक कुटुंबांत ज्याप्रमाणें घट किंवा वाढ झाली असेल त्याप्रमाणें वांटप केलें जाईल.

अशा प्रकारें दान व मालकी यांच्यांत कांहीं च विरोध नाहीं. आत्मा अमर आहे व शरीराहून भिन्न आहे. मी शरीर नाहीं. शास्त्रकार सांगतात कीं शरीराला चांगलें पुष्ट बनवून मग कापलें पाहिजे. देहाला त्याच्या आधारापेक्षां हि बलवान् बनवून मग कापलें पाहिजे. याप्रमाणें दान च नाहींसें होण्याइतकी परिस्थिति येईपर्यंत दान-प्रवृत्ति चालू च राहिली पाहिजे. तशी परिस्थिति आली कीं दानाचें सार्थक होईल. तुलसीदासांनीं म्हटलें आहे कीं, मग याचना करण्याची गरज च उरत नाहीं. तेव्हां सहाव्या हिश्श्याचें दान नेहमीं चालू राहील. दान पूर्ण नाहींसें होईपर्यंत तें चालू च राहील. ही आमूलाग्र परिवर्तन करण्याची रीत आहे.

## समाज-शास्त्रांत भारत युरोपच्या पुढें

पाश्चात्यांची अशी धारणा आहे कीं, 'समाजांत आमूलाग्र परिवर्तन सत्तेच्या द्वारां च होऊं शकतें. राजनीतींत एक पक्ष राज्य करतो तेव्हां दुसरा पक्ष विरोधांत असतो. याप्रमाणें ते दोघे एकमेकांना परिशुद्ध करीत राहतात. याप्रकारें च सत्तेचें परिवर्तन होईल.'—आम्ही हि या च प्रकाराची नक्कल करीत आहोंत. परंतु पाश्चात्यांचें समाजशात्र हें फार च मागसलेलें आहे हें तुम्हांला माहीत नाहीं. आज हिंदुस्थानांत महाराष्ट्र, बंगाल, गुजरात, तामिलनाड, आदि प्रांत आहेत. या च प्रमाणें युरोपांत हि भिन्न भिन्न भाषाभाषी देश आहेत. आपल्या देशांत भाषावर प्रांतरचनेची मागणी केली जात असली, तरी आपला वेगळा देश करण्याची कोणाची इच्छा नाहीं. दिल्लीपासून फटकून राहण्याची कोणाची इच्छा नाहीं. याच्या उलट युरोपांत स्वित्झर्लंड, जर्मनी, बेल्जिअम्, फ्रान्स आदि लहान लहान देश आहेत. आज हि जातिवाद त्यांच्यांत चालू च आहे. साऱ्या युरोपाचें राजकीय विभाजन जातिवादावर च आधारलेलें आहे. तेथील देशांच्या विभाजनाच्या नैसर्गिक अशा सीमा नाहींत. फ्रान्स व जर्मनीमध्यें एखादा पर्वत नाहीं. तरी हि माणसांनीं 'सीग्फ्रीड लाइन' 'मॅजिनो लाइन' अशा सारख्या कृत्रिम भिंती बांधून आपआपले देश वेगळे करून टाकले आहेत. फ्रेंच व जर्मन भाषांत इतकें साम्य आहे कीं पंधरा दिवसांत त्या शिकतां येतात. पण ते तसें करणार नाहींत व एक मोठा देश हि बनविणार नाहींत. पण आपल्या येथें मात्र तशी स्थिति नाहीं. भाषावार प्रांतांची मागणी शेतकऱ्यांच्या सोयीसाठीं केली जात आहे. आपलें वेगळें राज्य किंवा वेगळें सैन्य असावें अशी कोणाची च येथें इच्छा नाहीं. यावरून हें स्पष्ट आहे कीं, समाजशास्त्राच्या रचनेंत युरोप हिंदुस्थानपेक्षां पुष्कळ च मागे आहे.

दुसरें उदाहरण हें कीं, स्त्रियांना मताधिकार द्यावा कीं नाहीं याबद्दल येथें कोणाला शंका उत्पन्न होत नाहीं. आपल्याकडील स्त्रिया पुष्कळ मागासलेल्या आहेत हें मी मानतों. आम्हांला त्यांचें उत्थान व प्रगति केली पाहिजे. तरी आम्ही त्यांना मताधिकार मात्र निःसंकोचपणें दिला आहे. याच्या उलट युरोपांतील कांहीं देशांत अजून हि स्त्रियांना मताधिकार मिळालेला नाहीं.

दोन तीन, गया जिल्ह्यांत दोन तीन, व पलामू जिल्ह्यांत १५-१६; अशीं ग्रामदानें मिळालीं आहेत. एवढी मोठी क्रांति करण्यासाठीं आपल्याला एकेक पाऊल टाकीत गेलें पाहिजे. प्रथम लोकांनीं विचार पसंत करावा व मग मान्य करावा. प्रारंभीं जमिनीचा सहावा हिस्सा मिळाल्यानें च आपला प्रश्न सुटेल. पांच कोटि एकर जमीन मिळाली तर आपलें काम भागेल. पुढें मग आणखी मागतां येईल.

पण एकदां दान दिल्यानें सुटका होणार नाहीं हें लक्षांत ठेवा. जसें एकदां जेवून सुटका होत नाहीं, तर पुन्हां पुन्हां ठराविक वेळीं शरीर चालविण्यासाठीं जेवावें लागतें, तसें च समाजांत जोंवर भोगक्रिया चाललेली आहे, तोंवर दान क्रिया हि नित्य चालली पाहिजे. दानांत धर्म आहे व तें नित्य करीत राहण्याचें कार्य आहे. धर्म व दान नेहमीं च करीत राहिलें पाहिजे. एखाद्या फंडाला दान देणें हें नित्य कर्तव्य नाहीं. पण भूदानाचें काम हें नित्य कर्तव्य आहे. जोंपर्यंत धर्माचरणाची आवश्यकता आपण मानीत रहाल, तोंपर्यंत भूदान देणें हें आपलें कार्य आहे. तो आपला प्राण च जणूं बनला पाहिजे. सहावा हिस्सा हें प्रारंभीचें दान आहे. शेंवटीं तर सगळी च जमीन दिली पाहिजे. सगळी जमीन गांवाची झाली पाहिजे. सोयीसाठीं तिचें वांटप केलें गेलें, तरी तें कायमचें समजलें जाणार नाहीं. पंधरा वीस वर्षांनीं पुन्हां वांटप होईल. त्यावेळीं प्रत्येक कुटुंबांत ज्याप्रमाणें घट किंवा वाढ झाली असेल त्याप्रमाणें वांटप केलें जाईल.

अशा प्रकारें दान व मालकी यांच्यांत कांहीं च विरोध नाहीं. आत्मा अमर आहे व शरीराहून भिन्न आहे. मी शरीर नाहीं. शास्त्रकार सांगतात कीं शरीराला चांगलें पुष्ट बनवून मग कापलें पाहिजे. देहाला त्याच्या आधारापेक्षां हि बलवान् बनवून मग कापलें पाहिजे. याप्रमाणें दान च नाहींसें होण्याइतकी परिस्थिति येईपर्यंत दान-प्रवृत्ति चालू च राहिली पाहिजे. तशी परिस्थिति आली कीं दानाचें सार्थक होईल. तुलसीदासांनीं म्हटलें आहे कीं, मग याचना करण्याची गरज च उरत नाहीं. तेव्हां सहाव्या हिश्श्याचें दान नेहमीं चालू राहील. दान पूर्ण नाहींसें होईपर्यंत तें चालू च राहील. ही आमूलाग्र परिवर्तन करण्याची रीत आहे.

## समाज-शास्त्रांत भारत युरोपच्या पुढें

पाश्चात्यांची अशी धारणा आहे कीं, 'समाजांत आमूलाग्र परिवर्तन सत्तेच्या द्वारां च होऊं शकतें. राजनीतींत एक पक्ष राज्य करतो तेव्हां दुसरा पक्ष विरोधांत असतो. याप्रमाणें ते दोघे एकमेकांना परिशुद्ध करीत राहतात. याप्रकारें च सत्तेचें परिवर्तन होईल.'—आम्ही हि या च प्रकाराची नक्कल करीत आहोंत. परंतु पाश्चात्यांचें समाजशात्र हें फार च मागसलेलें आहे हें तुम्हांला माहीत नाहीं. आज हिंदुस्थानांत महाराष्ट्र, बंगाल, गुजरात, तामिलनाड, आदि प्रांत आहेत. या च प्रमाणें युरोपांत हि भिन्न भिन्न भाषाभाषी देश आहेत. आपल्या देशांत भाषावर प्रांतरचनेची मागणी केली जात असली, तरी आपला वेगळा देश करण्याची कोणाची इच्छा नाहीं. दिल्लीपासून फटकून राहण्याची कोणाची इच्छा नाहीं. याच्या उलट युरोपांत स्वित्झलंड, जर्मनी, बेल्जिअम्, फ्रान्स आदि लहान लहान देश आहेत. आज हि जातिवाद त्यांच्यांत चालू च आहे. साऱ्या युरोपाचें राजकीय विभाजन जातिवादावर च आधारलेलें आहे. तेथील देशांच्या विभाजनाच्या नैसर्गिक अशा सीमा नाहींत. फ्रान्स व ज़र्मनीमध्यें एखादा पर्वत नाहीं. तरी हि माणसांनीं 'सीग्फ्रीड लाइन' 'मॅजिनो लाइन' अशा सारख्या कृत्रिम भिंती बांधून आपआपले देश वेगळे करून टाकले आहेत. फ्रेंच व जर्मन भाषांत इतकें साम्य आहे कीं पंधरा दिवसांत त्या शिकतां येतात. पण ते तसें करणार नाहींत व एक मोठा देश हि बनविणार नाहींत. पण आपल्या येथें मात्र तशी स्थिति नाहीं. भाषावार प्रांतांची मागणी शेतकऱ्यांच्या सोयीसाठीं केली जात आहे. आपलें वेगळें राज्य किंवा वेगळें सैन्य असावें अशी कोणाची च येथें इच्छा नाहीं. यावरून हें स्पष्ट आहे कीं, समाजशास्त्राच्या रचनेंत युरोप हिंदुस्थानपेक्षां पुष्कळ च मागे आहे.

दुसरें उदाहरण हें कीं, स्त्रियांना मताधिकार द्यावा कीं नाहीं याबद्दल येथें कोणाला शंका उत्पन्न होत नाहीं. आपल्याकडील स्त्रिया पुष्कळ मागासलेल्या आहेत हें मी मानतों. आम्हांला त्यांचें उत्थान व प्रगति केली पाहिजे. तरी आम्ही त्यांना मताधिकार मात्र निःसंकोचपणें दिला आहे. याच्या उलट युरोपांतील कांहीं देशांत अजून हि स्त्रियांना मताधिकार मिळालेला नाहीं.

चाळीस वर्षांपूर्वी इंग्लंडांत पुरुषांविरुद्ध स्त्रियांचें आन्दोलन झालें. विधान-सभेंत अंडीं फेकलीं गेलीं. तेव्हां कोठें कांहीं काळानंतर त्यांना मताधिकार प्राप्त झाला. आपल्या देशांत असा कांहीं संघर्ष झाला नाहीं. याप्रकारें हें स्पष्ट आहे कीं, जगांतील इतर देशांपेक्षां आम्ही समाजशास्त्रांत पुढें आहोंत.

## आजची निवडणुकीची सदोष पद्धति

असें असतां हि आम्ही लोक डोळे मिटून पाश्चात्यांची पद्धति च स्वीकारीत आहोंत ही आश्चर्याची गोष्ट आहे. याचा परिणाम काय होईल या गोष्टीचा आम्ही विचार च करीत नाहीं. जेव्हां आमच्याकडे 'पांचामुखीं परमेश्वर' या न्यायानें एकमतानें काम चालत असे, तेव्हां पश्चिमेकडे चार विरुद्ध एक, तीन विरुद्ध दोन अशा बहुमतानें ठराव पास होत असत. न्यायालयांत खुनाचा खटला चालू असला कीं, तेथें हि तीन-विरुद्ध दोन अशा बहुमतानें आरोपीला फांसावर लटकविलें जातें. फांशीच्या ऐवजीं एखादी कमी शिक्षा कां देऊं नये असा विचार हि केला जात नाहीं. बहुमताचा हा जो विचित्र विचार आम्हीं पाश्चात्यांकडून घेतला आहे, तो अतिशय अनिष्ट आहे.

सर्वोदय संमेलनांत नेहरूंनीं स्वतः च सांगितलें कीं, 'निवडणूक-पद्धतीचा आम्हीं जरी श्रद्धेनें स्वीकार केला असला, तरी तिच्यांत पुष्कळ दोष आहेत ते आम्हांला सुधारले पाहिजेत. तेव्हां पाश्चात्यांकडून आपण जें जें ग्रहण करतों, तें नीट विचार करून च ग्रहण केलें पाहिजे. जगांतील सगळ्या देशांच्या मानगुटीला हें निवडणुकीचें भूत बसलें आहे व त्यामुळें फार हानि झाली आहे. पण हिंदुस्थानवर मात्र याचा परिणाम फार च दुःखद झाला आहे. राजा राममोहन रॉय पासून महात्मा गांधीपर्यंत अनेकांनीं ज्या जातिभेदावर प्रहार केले, त्यानें या निवडणुकीमुळें पुन्हां डोकें वर काढलें आहे.

## क्रांति पक्षातीत च असतें

सत्तेच्या किंवा पक्ष-राजकारणाच्या द्वारां क्रांति कधीं होत नाहीं. ती जनमनांत च होत असते. म्हणून ती पक्षातीत च असली पाहिजे. म्हणून च एकमेकांसमोर आपापलीं हृदयें उघडीं करून दाखविलीं पाहिजेत. पण

आजकाल पहावें तर एका पक्षाचे लोक दुसऱ्या पक्षाचें वृत्तपत्र हि वाचीत नाहींत. ज्याप्रमाणें वैष्णव पंथी शैवपंथीयांची कोणती हि गोष्ट स्वीकारीत नाहींत, त्या च प्रमाणें हे पक्ष एकमेकांचा सतत विरोध करीत राहतात. आपल्या पक्षाचें पुस्तक हें च त्यांचें वेदवाक्य बनतें. ते दुसऱ्यांचें साहित्य वाचीत च नाहींत. त्यामुळें त्यांचे विचार संकुचित होतात. या वादांमुळें पक्षसंकुचितता च नव्हे, तर हृदयसंकुचितता हि उत्पन्न होते. व ती तर अधिक अनिष्ट असते. अशा परिस्थितींत क्रांति स्थगित होऊन जाते. हवा पसरण्यासाठीं अवकाश पाहिजे असतो याचें च लोकांना विस्मरण होतें. विचार-प्रचारासाठीं हृदयें मोकळीं असलीं पाहिजेत. पक्षांच्या सभेंत विशिष्ट जातीचे व संघाचे च लोक येतात व ते क्रांतीला रोकून धरतात. पण आतां भूदानाच्या या कार्यानें लोकांच्या मनांत आजवरच्या पक्षविशिष्ट राजकारणाबद्दल संशय निर्माण केला आहे. तेव्हां यापुढें लोक क्रांतीचें स्वरूप समजूं शकतील, ही फार मोठी गोष्ट होणार आहे.

कोणतें हि मोठें आंदोलन हें जनशक्तीच्या च आधारानें होतें. पक्ष बनविण्यानें विचार समजण्यास मदत होते कीं पक्ष नसण्यानें मदत होते, याचा जरा शांत बुद्धीनें विचार तर करा. विनोबांनीं एखादा पक्ष भूदानासाठीं निर्माण केला असता, तर हें आंदोलन चालूं शकलें असते का? पण आज मी निःसंकोचपणें घराघरांत जाऊं शकतों. सहस्रकर भगवंताला जागविण्यासाठीं नारदाप्रमाणें गांवोगांव व घरोघरीं मी हिंडत आहें; याच्या उलट पक्षनिष्ठ लोकांची दृष्टि व मनें संकुचित बनून जातात. भूदान हें पक्षातीत आंदोलन आहे. म्हणून च सर्वजण हें चांगलें कार्य आहे असें म्हणतात. पक्षातीत पद्धतीनें च क्रांतीचा उगम होतो, सत्तेच्या द्वारां नव्हे. जनशक्तीनें क्रांति होऊं शकते ही गोष्ट जर सिद्ध झाली, तर राजकीय विचारांत मौलिक परिवर्तन घडून येईल. आणि केवळ आपल्या देशाला च नव्हे, तर जगाला हि एक नवा मार्ग लाभेल. ही सर्व शक्ति व स्वयंशक्ति समाजांत पुरेपूर भरलेली आहे. पण आतां त्या शक्तीचे झरे वियुक्तपणें वाहूं लागले आहेत ही अतिशय सुदैवाची गोष्ट आहे.

खरोखर आजच्या पक्षभेदांमुळें समाज छिन्न-भिन्न झाला आहे. सतत राजकारणांत च राहणारे जयप्रकाश हि या च निश्चित मतावर आले आहेत, ही लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे. त्यांच्या या परिवर्तनामागें सखोल विचार व चिंतन आहे. प्रत्यक्ष दर्शनामुळें च त्यांचा निश्चय झाला व त्यांनीं जीवनदान दिलें.

### शासन-मुक्त–समाजाकडे

अखिल भारतीय सर्व सेवा संघानें असा संकल्प केला आहे कीं, सर्व हिंदुस्थानांत दोन वर्षांत आम्ही पंचवीस लक्ष एकर जमिनीचें दान मिळवूं. जनतेनें हा संकल्प उचलून घेतला. त्याची पूर्ति करण्यासाठीं हजारों लोक लागले व तो संकल्प पूर्ण झाला. सर्व-सेवा-संघाजवळ कसली हि सत्ता, कायदा किंवा अनुशासन नाहीं. पण लोकांना त्यांचा संकल्प सत्य व अर्थपूर्ण वाटला, म्हणून त्यांनीं तो पुरा केला. या घटनेनें लोकांच्या मनांत असा विश्वास निर्माण केला कीं, सत्तेच्या आधारावांचून हि एखादी संस्था असा संकल्प करूं शकते व तो पूर्ण हि होऊं शकतो. तो सफल करण्यासाठीं लोक एकजुटीनें कार्य करतात. यामुळें या हि आशेचा संभव निर्माण झाला आहे कीं, शासनमुक्त समाजाची व पक्षातीत राज्याची स्थापना करणें शक्य आहे. यासाठीं स्वतंत्र जनशक्तीची निर्मिति मात्र केली पाहिजे. तिचें च साधन म्हणून भूदानयज्ञाचें हें आंदोलन सुरू केलें आहे.

मे १९५४

---

## अहिंसेचे तीन आधार–संयम, अस्तेय, असंग्रह : ३० :

आज वैशाखी पौर्णिमेचा दिवस आहे. आज सगळ्या जगांत व विशेषत: आशिया खंडांत भगवान् बुद्धांची जयंति साजरी केली जात आहे. भगवान् बुद्धांनीं जगाला जो संदेश दिला, तो त्यांनीं आपल्या जीवनांतून निर्माण केला होता. हिंदुस्थानचा ज्याकाळीं इतर जगाशीं विशेष संबंध

नव्हता, त्याकाळीं त्यांनीं तो संदेश दिला. त्यावेळीं जगाला त्या संदेशाची तितकी आवश्यकता हि नव्हती. पण आज मात्र जगाला त्याची गरज आहे. त्यांचा संदेश हा आहे कीं, 'वैरानें वैर मिटणार नाहीं, क्रोधानें क्रोध नाहींसा होणार नाहीं व असत्यानें असत्य नष्ट होणार नाहीं.' वैरानें वैर वाढेल च व क्रोधानें क्रोध भडकेल. म्हणून वैराचा सामना प्रेमानें, क्रोधाचा शांतीनें आणि असत्याचा सत्यानें च केला पाहिजे.

## आज जगाला बुद्ध-संदेशाची तहान

आज जगाला या बुद्ध-संदेशाची फार गरज आहे. आज जगांत असमाधान व अशांति हीं सर्वत्र पसरलीं आहेत. सगळें जग शांतीच्या शोधांत आहे. पण त्याला ती मिळत च नाहीं. साऱ्या जगांत अस्थिरता व परस्पर भीति हीं वाढत च आहेत. कमी अधिक शक्तीचे देश एक दुसऱ्याला भीत आहेत लहान लहान देश तर भीतीनें आकुल झाले आहेत च. पण अमेरिका व रशिया यांच्यासारखीं मोठमोठीं राष्ट्रें हि भीतीनें व्याप्त झालीं आहेत. आजवर जगांत एवढी भीति कधीं उत्पन्न झाली नव्हती. विविध देशांना एकमेकांच्या अस्तित्वाचा च जेव्हां पत्ता नव्हता, तेव्हां भीतीचा प्रश्न च उत्पन्न होत नसे, पण आज जगांतल्या एखाद्या कोपऱ्यांत एखादी क्षोभकारक घटना घडली कीं, साऱ्या जगावर तिचा परिणाम होतो. ही परिस्थिति विज्ञानामुळें उत्पन्न झाली आहे, अखेर विज्ञानाचा परिणाम हा च होईल कीं, एक तर हिंसा व वैर वाढवून मानव-जात लवकर स्वतःला नष्ट तरी करून टाकील किंवा मानवांना अक्कल सुचेल व हिंसेच्या दुष्ट चक्रांतून मानवाची पूर्ण मुक्तता तरी होईल. मधली स्थिति आतां राहणें शक्य नाहीं. म्हणून च भगवान् बुद्धांचा निर्वैरतेचा संदेश आज अत्यावश्यक होऊन बसला आहे.

## वैराचीं कारणें नष्ट केलीं पाहिजेत

पन्नास वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत बुद्ध-जयंति होत नसे. पण आतां ती सुरू झाली आहे. याचें हें च स्पष्ट कारण आहे कीं, भगवान् बुद्धांच्या संदेशाची आज फार गरज आहे, ही गोष्ट आम्हांला समजूं लागली आहे. त्यांचा हा उपदेश कांहीं नवा नाहीं. गीतेंत हि म्हटलें आहे कीं 'निर्वैरः सर्वभूतेषु'

निर्वैर बनण्याचा आदेश वेदांनीं हि दिला आहे. भगवान् बुद्धांपूर्वीच्या संतांनीं हा आदेश आपल्या जीवनांत हि उतरविला होता. तरी हि जगाची स्थिति बदलली नाहीं. कारण व्यक्तिगत जीवनांत एखादा निर्वैर बनला तरी लोक त्याचा आदर करीत, पण त्याची ती गोष्ट व्यावहारिक पातळीवरची समजत नसत. 'निर्वैर झालें पाहिजे' या तत्त्वाचा ते अस्वीकार करीत नव्हते खरे, पण आचरणांत मात्र तें उतरविलें जात नसे.

गोष्ट अशी आहे कीं, जोंवर वैराचीं कारणें नाहींशीं होणार नाहींत, तोंवर वैर हि मिटणें शक्य नाहीं. एखाद्याला अतिशय तहान लागली पण त्याला स्वच्छ पाणी पिण्यास मिळालें नाहीं, तर तो घाणेरडें पाणी हि पिऊन टाकतो. त्याची मागणी स्वच्छ पाण्याची च असते, पण तें मिळालें नाहीं, तर घाणेरडें पाणी पिण्यास हि तो तयार होतो. त्या च प्रमाणें जगाला वैराची भूक नाहीं. समाजाला आग लागावी अशी कोणाची हि जाणून बुजून इच्छा नसते. पण जगापुढें कांहीं समस्या असतात. त्या शांतीनें सुटणार असल्या, तर शांतिमय मार्गानें जाण्यास लोक तयार असतात. पण त्या समस्या शांतीनें सुटत नसल्या, तरी हि लोकांनीं शांत रहावें हें शक्य नाहीं. म्हणून च जगाचे अत्यंत कठिण प्रश्न सोडविले जावे, शांतिमय शक्ति निर्माण व्हावी व शांतीची स्थापना व्हावी, अशी कांहीं तरी युक्ति शोधली पाहिजे. असें केल्यावांचून अहिंसेच्या शक्तीवर जगाचा विश्वास बसणार नाहीं. म्हणून च मीं भूदान-यज्ञाचा प्रारंभ केला आहे.

विज्ञानानें आज आपणाला लहान राहूं दिलें नाहीं, मोठें बनवून टाकलें आहे. निर्वैरतेच्या मार्गानें कठिण प्रश्न सोडविण्याचा भूदान-यज्ञ हा एक प्रयत्न आहे. शांतीच्या शोधासाठीं हें आंदोलन चालू झालें आहे. शांतींत भरून राहिलेल्या शक्तीचा हा शोध आहे. म्हणून च आम्ही गांवोगांव जातों, लोकांना प्रेमानें समजावून सांगतों व भूमिहीनांसाठीं जमीन मागतों. या मार्गानें भूमिहीनांना जर जमीन मिळाली, तर शांति कायम राहील. पण 'शांति ठेवा, निर्वैर रहा' असें च जर नुसतें आम्ही सांगूं लागलों, तर शांति कशी राहील? आजवर आपण दुसऱ्यांकडून हिसकावून घेत होतों, संकुचित भावनेनें वागत होतों. पण ही संकुचित भावना आतां विज्ञानाला

शोभत नाहीं. विज्ञानानें ही संकुचितता नाहींशीं करून टाकली आहे. बुद्धि व्यापक झाली आहे, पण हृदय मात्र अजून हि संकुचित च आहे. म्हणून 'दानानें निर्वैरता निर्माण होईल.' ही शिकवण आतां प्रत्येक व्यक्तीला मिळाली पाहिजे, त्यावांचून भगवान् बुद्धांचा संदेश शब्दांत च राहील, आचरणांत येणार नाहीं.

## तीन आधार: संयम, अस्तेय, असंग्रह

भगवान बुद्ध, महावीर, व इतर ज्ञानी पुरुषांनीं अहिंसेबरोबर च इतर हि गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांनीं सांगितलें आहे कीं, अहिंसेच्या बरोबर च अस्तेय, अपरिग्रह व संयम या हि गुणांची गरज आहे. त्यावांचून अहिंसा व समाजरचना ह्या टिकणार नाहींत हें निश्चित मत होतें. मी यावर जसजसा विचार करूं लागतों, तसतशी यांत त्यांची दूरदृष्टि च मला दिसून येते. आम्हीं जर संयमाचें पालन केलें नाहीं व भोगविलासांत डुंबत राहिलों, तर जगापुढें बिकट प्रश्न उभा राहील व मनुष्य मनुष्याची हत्या करूं लागेल. आज युद्धांत वाटेल तेवढा मनुष्यसंहार होत च आहे. पण उद्यां जर एखादा डॉक्टर सांगूं लागला कीं, मनुष्याचें ताजें मांस अतिशय पौष्टिक असतें, तर माणसें माणसांचें च ताजें मांस खाऊं लागतील. भोगविलास वाढेल, तर संख्यासुर उत्पन्न होईल. पुराणांत अनेक असुरांचा उल्लेख आहे. मानवांची संख्या अतिशय वाढली, तर माणूस च माणसाला खाऊं लागेल. कांहीं प्राणी आपलीं पिल्लें खातात हें तुम्हीं ऐकलें च असेल. मी म्हणतों कीं, मनुष्य भोगविलासांचा जर त्याग करणार नाहीं, तर ही च परिस्थिति उत्पन्न होईल. म्हणून अहिंसा जीवनांत आणावयाची असली, तर संयम आवश्यक आहे.

दुसरें तत्त्व अस्तेय, म्हणजे चोरी न करणें. आम्ही हें तत्त्व कांहीं मर्यादेपर्यंत पाळीत आहोंत. जो चोर कायद्यानें चोर ठरतो त्याला आम्ही तुरुंगांत टाकतों. पण जी चोरी कायद्यांत येत नाहीं, ती नाहींशी करण्याचा आम्ही प्रयत्न करीत नाहीं. फार मोठा पगार, अवास्तव फायदा, व्याज, दलाली, ही सर्व चोरी च आहे. म्हणून आम्ही यांपासून हि मुक्त झालें पाहिजे. संग्रहावर मर्यादा घातली पाहिजे. संग्रह हि वाढवावा व अहिंसा हि चालवावी हें कधी होणें शक्य नाहीं. लोक विचारतील कीं, रेडिओ, लाउडस्पीकर

हा हि संग्रह च नाहीं का ? नाहीं; साऱ्या समाजाचें ऐश्वर्य त्यामुळें वाढत असेल तर ती हिंसा नव्हे. दुसऱ्यांना लुटून जर आम्ही आपल्या घरीं संग्रह केला, तर मात्र ती हिंसा होईल. समाज धनवान् झाला तर ती आनंदाची च गोष्ट आहे. पण आपण 'धनवान्' कुणाला म्हणाल ? समजा सारा समाज बिडी-सिगरेट पीत आहे, प्रत्येक व्यक्ति दररोज एक रुपयाची बिडी किंवा सिगरेट ओढीत आहे, तर मात्र ती चांगली गोष्ट होणार नाहीं. बिडी-सिगरेटची खूप समृद्धि झाली म्हणजे ऐश्वर्य आलें असें मी म्हणणार नाहीं. चांगल्या गोष्टींची वाढ झाली, तर च जीवन समृद्ध होतें. दुसऱ्याला जी वस्तु मिळत नाहीं, ती जर मीं घेतली तर तो संग्रह होईल, गुन्हा होईल. सामान्यतः आपण नेहमीं आपला च विचार करतों, दुसऱ्यांच्या गरजांकडे लक्ष च देत नाहीं. म्हणून च असंग्रह, अस्तेय व संयम या तीन गोष्टी अहिंसे-बरोबर जोडल्या गेल्या तर च ती टिकूं शकते.

## पृथ्वीच्या रक्षकाला सहावा हिस्सा

शास्त्रांचें असें सांगणें आहे कीं, जमिनीच्या रक्षकाला सहावा हिस्सा दिला पाहिजे. मी म्हणतों कीं, आज पृथ्वीचें रक्षण शेत-मजूर च करीत आहेत. त्यांच्यावर च सगळा भार आहे. ते च जगाचे नाथ व विश्वाचे तात आहेत. हें नांव त्यांना गांधीजींनीं दिलें होतें. म्हणून मजुरांना जमि-नीचा सहावा हिस्सा मिळणें योग्य आहे. "इहैव तैर्जितः स्वर्गो येषां साम्ये स्थितं मनः।' ज्यांनीं या जीवनांत साम्ययोग साधला त्यांनीं च या जीवनांत संसार जिंकला आहे. तुलसीदासांनीं म्हटलें आहे.

'को जाने को जैहै जमपुर, को सुरपुर परधाम को।
तुलसिहि बहुत भलो लागत, जग-जीवन राम्-गुलाम-को ॥'

कोण स्वर्गांत जाणार व कोण नरकांत जाणार हें कुणाला माहीत आहे ? म्हणून ते या च जीवनांत भगवंतांचा सेवक बनून राहूं इच्छितात.

## जीवनदानासाठीं आवाहन

या आंदोलनामुळें हा च लोक स्वर्ग लोक बनून जाणार आहे. विज्ञानाची अहिंसेशीं जर आम्हीं जुळणी केली, तर या च जगांत आपण स्वर्ग आणूं शकतों.

हा भूदान-यज्ञ सर्वांसाठीं आहे. त्याचें नांव च 'सर्वोदय' आहे. पण हा सर्वोदय केव्हां घडून येईल? ज्याप्रमाणें यति-संघ, भिक्षु-संघ व भगवान् बुद्धांचे अनुयायी आपल्या कार्यासाठीं जीवन समर्पित करून बाहेर पडले, त्याप्रमाणें जीवन-दानी जेव्हां या कार्यासाठीं निघतील तेव्हां च हें कार्य पूर्ण होईल. भगवान् बुद्धांना व महावीरांना हें माहीत होतें कीं, हजारोंच्या संख्येनें जीवन समर्पित करणारे भिक्षु-संघाचे सेवक बाहेर पडतील, तेव्हां च विचाराचा प्रसार होईल. भगवान् बुद्ध म्हणत "न निकेते रमतिन्ते ;" जे ज्ञानी असतात त्यांना घरांत आनंद वाटत नाहीं. त्यांना हिंडण्यांत च उत्साह वाटतो. ते सतत संचार करीत राहतात, सेवा करतात, राग-द्वेष, निंदा-स्तुति, मान-अपमान सर्व भगवंताला अर्पण करून कार्य करीत राहतात. त्यांच्या च प्रमाणें आज हि लोकसेवेसाठीं 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' नव्हे तर 'सर्व हिताय, सर्व सुखाय' लोक-सेवक जेव्हां बाहेर हिंडू लागतील, तेव्हां च हें कार्य होईल. समाजरचना अहिंसात्मक असावी अशी इच्छा असेल, तर जीवनदानी संचारार्थ निघाले पाहिजेत.

जीवनदानाचा आरंभ बोधगयेंत च झाला. ज्या बोधिवृक्षाखालीं तथागतांना ज्ञान प्राप्त झालें, त्या च वृक्षाखालीं गांधीजींना मानणारे त्यांचे भक्तगण एकत्र झाले होते. त्यांना एक प्रेरणा मिळाली आणि जीवनदानाला प्रारंभ झाला. याचा आरंभ आपले प्रिय नेते जयप्रकाशजी यांनीं केला. नवा समाज निर्माण करण्यासाठीं हें आंदोलन सुरू झालें आणि त्यांत हा प्रवाह सुरू झाला. यापुढें अहिंसेवर समाज-रचना निर्माण करण्याचें कार्य वेगानें चालेल. मला हें स्पष्ट दिसत आहे कीं, शोषणहीन व शासनमुक्त मानव-समाज बनावा ही भगवंताची च इच्छा आहे. माझें हें आवाहन आहे कीं, ज्याच्या जीवनांत कांहीं तत्त्वनिष्ठा आहे, ज्याच्या शरीरांत प्राण वसत आहे, ज्याच्या बुद्धींत विवेक आहे, त्यानें या कार्यांत उडी घ्यावी व भगवंताचा आशीर्वाद घ्यावा.

मोहनिया

१६-५-५४

---

## चोरी आणि शिक्षा 

मला एक महत्त्वाचा प्रश्न विचारला गेला कीं, 'आजकाल चोऱ्या, खून, दरवडे आदि वाढत च चालले आहेत. त्यांच्यावर काय उपाय करावा ?' हा प्रश्न ऐकून मला आश्चर्य वाटत नाहीं. पण आजच्या परिस्थितींत इतके कमी गुन्हे कसे घडतात या गोष्टीचें मात्र मला आश्चर्य वाटतें. इतके कमी गुन्हे होण्याचें कारण हें च आहे कीं, येथील खेडयाखेडयांतील अशिक्षित लोकांच्या रक्तांत संस्कृति मुरलेली आहे. म्हणून च येथील लोकांचा सहज स्वभाव शांतिमय, सौम्य व संयमशील आहे.

### अहिंसेचें सामर्थ्य

दहा बारा वर्षांपूर्वीची गोष्ट. बंगालांत दुष्काळामुळें लाखों लोक मृत्युमुखीं पडले. त्यावेळीं आम्ही तुरुंगांत होतों. तेथें कांहीं लोक म्हणत कीं, 'आमच्या देशाची अवस्था इतकी खालावली आहे कीं, लाखों लोक कांहीं न करतां च मरून गेले. अशा परिस्थितींत दुसऱ्या देशांतील लोकांनीं चोऱ्या केल्या असत्या किंवा हल्ले करून धान्याचीं दुकानें लुटलीं असतीं.—'हें ऐकून मी अस्वस्थ झालों. मला रात्रभर झोंप आली नाहीं. मी विचार करूं लागलों कीं, 'आम्ही खरोखर च अधःपतित झालों आहोंत का? मला आंतून च उत्तर मिळालें, 'छे, असें मुळीं च नाहीं. आपल्या देशांतील संतांनीं व ऋषिमुनींनीं असें सांगितलें आहे कीं, आपण तर मरत च आहोंत, मग जे जिवंत आहेत, त्यांना व्यर्थ त्रास कां द्यावा ? हा आपल्या देशाचा महान् गुण आहे, ही आपली थोर महात्मता आहे. प्राचीन काळांपासून च आम्हांला ही मर्यादा शिकविली गेली आहे. बंगालांत जे मेले ते ईश्वराचें नांव घेऊन च मेले असावें. ही दुर्बलता नव्हे. यांत अहिंसेचें, सत्याग्रहाचें सामर्थ्य लपलें आहे. आम्ही मेलों तरी हरकत नाहीं, पण दुसऱ्यांना पीडा देणार नाहीं. सहन करणें ही ज्यांना सहज गोष्ट वाटते, त्यांच्यांत अहिंसात्मक प्रतिकाराची शक्ति सहज निर्माण होऊं शकते.

## चोरीची शिक्षा

आजकाल कांहीं लोक काम न मिळाल्यामुळें आपल्या भुकेल्या मुलाबाळांना खाऊं घालण्यासाठीं चोऱ्या करतात. पण त्यांना पकडून न्यायाधीशासमोर उभें केलें जातें व दोन तीन वर्षांची शिक्षा दिली जाते. वस्तुत: यामुळें त्याच्या बायकामुलांना च शिक्षा भोगावी लागते, त्याला मात्र तुरुंगांत अन्न मिळतें. मला जर कुणीं न्यायाधीश बनविलें, तर मी वेगळ्या प्रकारची शिक्षा देईन. पूर्ण चौकशी केल्यानंतर एखाद्या माणसानें चोरी केल्याचें सिद्ध झालें तर मी त्याला सांगेन, 'तूं चोरी केली आहेस, तेव्हां तुला तीन एकर जमिनीची शिक्षा दिली जात आहे, तीन वर्ष तुरुंगाची नाहीं. त्या जमिनीवर चांगले परिश्रम करून आपल्या कुटुंबाचें पोषण तुला केलें पाहिजे.' मला तर वाटतें कीं, अशा प्रकारची शिक्षा दिली गेली, तर पुढें चोऱ्या होणार नाहींत.

आजच्या समाजांत एक अजब न्यायाचा मासला दिसतो. क्षुल्लक चोऱ्या करणारांना 'चोर' म्हटलें जातें. आणि मोठ्या चोऱ्या करणाराला --संग्रह करणाराला--मान दिला जातो. जेथें किल्याकुलपें वाढतात, तेथें च चोऱ्या हि वाढतात, ही गोष्ट सहज समजण्यासारखी आहे. अमेरिकेचे प्रथम राष्ट्रपति जॉर्ज वॉशिंग्टन यांनीं आपल्या दैनंदिनींत एक वाक्य लिहिलें आहे. 'फेन्स इज् ए टेम्प्टेशन टु जंप' म्हणजे कुंपण दिसलें कीं, त्यावरून उडी मारण्याचा मोह होतो च. समाजांत चोऱ्या होऊं नयेत अशी जर आपली इच्छा असेल, तर समाजाची शुद्धि होणें अवश्य आहे. त्यासाठीं जमिनीचें वांटप केलें पाहिजे, व सर्वांना काम मिळवून दिलें पाहिजे. ग्रामोद्योगांवांचून सर्वांना काम देणें अशक्य आहे. म्हणून मी एकट्या रामाचें नांव घेत नाहीं, तर 'सीतारामा' चें घेतों. सीता म्हणजे जमिनीचें वितरण व राम म्हणजे ग्रामोद्योग.

याशिवाय आमच्या विचारांची शुद्धि झाली पाहिजे. संग्रह करणें हें पाप आहे, शरीरश्रम टाळणें हें पाप आहे, हा विचार रूढ झाला पाहिजे. जो थोडें काम करून जास्त पैसा घेतो, तसें च जो कांहीं हि श्रम न करतां एखाद्याच्या घरून हजार रुपये घेऊन जातो, त्याला मी 'चोर' म्हणतों. तेव्हां, न्यायाधीश, प्रोफेसर आदि लोक हि चोर च समजले जातील. कारण ते

जास्तींत जास्त तीन चार तास काम करतात व पगार मात्र पुष्कळ च जास्त घेतात.

तेव्हां आपला घाम गाळून पोट भरणारे मजूर व शेतकरी हे सोडले तर आपल्या सर्वांची गणति लुटणाऱ्यांमध्यें च होते, हें आम्हीं नीट समजून घेतलें पाहिजे. म्हणून कांहीं तरी उत्पादक परिश्रम केल्यावांचून जेवणार नाहीं असें व्रत प्रत्येकानें घेणें अवश्य आहे.

पकडिहार
१९-६-५४

---

## क्रांतीचा त्रिकोण : ३२ :

मी तीन वर्षें सतत हिंडत आहें आणि तरी हि माझा फिरण्याचा उत्साह सारखा वाढत च आहे. भूदानयज्ञाला पायाभूत असें एक महान् तत्त्वज्ञान आहे, म्हणून च हें करणें मला शक्य झालें. ज्याला ज्याला त्या तत्त्वज्ञानाचें दर्शन घडतें, त्याला त्याला त्यांतून अखंड उत्साहामृत मिळत राहतें. ही येथील झाडें अनेक वर्षांपासून येथें उभीं आहेत. त्यांना आंतून रसाचा पुरवठा होत असल्यामुळें उन्हाळ्यांत हि तीं वाळत नाहींत. एवढें च नव्हे, तर वरून सूर्याच्या उष्णतेचा जितका अधिक मारा होतो, तेवढी त्यांना अधिक हिरवी हिरवी पालवी फुटत जाते. याचा अर्थ हा कीं, जेथें आंतून जीवनरस मिळतो, तेथें बाहेरच्या तापानें त्रास होत नाहीं. त्या च प्रमाणें आंतून तत्त्वज्ञानाचा रस सारखा मिळत राहिला कीं, तपस्येनें उत्साह वाढतो आणि कोणता हि त्रास जाणवत नाहीं.

### आचार्य नरेंद्र देवांचा आक्षेप

उत्तर प्रदेश भूदान समितीचे एक सदस्य आचार्य नरेंद्र देव यांनीं नुकतें च असें म्हटलेलें मीं वाचलें कीं, भूदानाचें कार्य तर चांगलें आहे, पण त्याच्या मागें कांहीं तत्त्वज्ञान असल्याचें दिसत नाहीं.' याचें उत्तर मी काय देऊं? एवढें च सांगतों, कीं याच्या मागें तत्त्वज्ञान नसतें तर बाबाचे पाय तीन वर्षांत

थकून गेले असते. पण बाबाचे पाय थकले नाहींत, एवढें च नव्हे, तर त्यांच्यांतील जोर वाढत च चालला आहे. जेव्हां एखाद्या सामान्य विचाराच्या आधारानें मनुष्य काम करतो, तेव्हां कांहीं काळानें त्याच्या कामाचा वेग मंद होतो. पण जेथें विचारांची गहनता असते, तेथें कामाची गति वाढते, नित्य नवी स्फूर्ति मिळते, जीवनाला नवीन पालवी फुटते. भूदान-यज्ञापासून संपत्तिदान निघालें, श्रमदान निघालें, व आतां तर जीवनदान च निघालें आहे. या साऱ्या भूदानयज्ञाच्या नवीन नवीन शाखा आहेत. याचा इतका विस्तार होईल कीं, जेवढीं रचनात्मक कार्यें आहेत, तेवढीं तर यांत समाविष्ट होतील च, परंतु समाज-जीवनाचीं जीं इतर नैतिक अंगोंपांगें आहेत, तीं हि यांत अंतर्भूत होतील. भूदानाच्या पाठीमागें सामर्थ्यशाली तत्त्वज्ञान नसतें, तर हें सर्व होऊं च शकलें नसते.

आचार्य नरेंद्र देवांनीं असें नाहीं म्हटलें कीं, 'हृदयपरिवर्तनाची प्रक्रिया निरर्थक आहे.' पण त्यांनीं असें मात्र म्हटलें कीं, 'आम्ही वर्ग-संघर्ष मानणारे आहोंत, तेव्हां हृदय-परिवर्तनानें हें कार्य होऊं शकेल असें आम्हांला वाटत नाहीं.' याचा अर्थ हा च कीं, त्यांनीं आपलें निश्चित मत बनविलें आहे. हें निश्चित मत त्यांनीं कोणत्या तरी विचारावर किंवा अनुभवावर च आधारलें असलें पाहिजे. पण सृष्टींत नित्य नवे अनुभव येत असतात. क्रांतीच्या नित्य नव्या प्रक्रिया चालू च असतात. अखेर, जिच्या नित्य नव्या प्रक्रिया होत राहतील, ती च क्रांति होय. जिची प्रक्रिया पूर्वनिश्चित असेल, ती क्रांति च राहूं शकत नाहीं.

## क्रांतीचा त्रिकोण

माझें असें म्हणणें आहे कीं, वर्ग-संघर्षानें च क्रांति होते असें विचारांती ज्याला मान्य झालें आहे, त्यानें अनुभवाला थोडा अधिक अवसर दिला, तर हृदय-परिवर्तनानें किंवा विचार परिवर्तनानें हि क्रांति होऊं शकते, हा हि अनुभव त्याला येऊं शकेल. मोहग्रस्ताचें हृदय-परिवर्तन करावें लागतें व सज्जनांचें विचार-परिवर्तन करावें लागतें. दोन्ही मिळून क्रांतीची प्रक्रिया पूर्ण होते. आमचा कार्यक्रम असा च दुहेरी आहे. एका बाजूनें आम्ही विचार समजावून देत राहतों व दुसऱ्या बाजूनें आमचें तप चालू राहतें. समजावून देण्यानें विचार-

परिवर्तन होतें व तपानें हृदय-परिवर्तन घडून येतें. या दोहोंच्या बरोबर यांचा च परिणाम म्हणून आणखी हि एक गोष्ट येते. ती म्हणजे परिस्थिति-परिवर्तन. अशा प्रकारें क्रांतीचा एक त्रिकोण बनतो. परिस्थिति-परिवर्तनासाठीं काय केलें पाहिजे, असा प्रश्न कुणी विचारील. कायद्यानें हें परिवर्तन होऊं शकेल, असें कांहींचें मत आहे. पण कायदा बनविण्यासाठीं काय केलें पाहिजे? सत्ता हातीं कशी घ्यावयाची? तर आम्ही लोकांना समजावून देऊन त्यांचें विचार-परिवर्तन घडवून आणूं व अशा तऱ्हेनें सत्ता हातीं घेऊं. लोकशाहींत हें च उत्तर शक्य आहे. म्हणजे विचार-परिवर्तनाचा च मार्ग अखेर उरतो.

## असहयोगाचें शस्त्र

पण आमच्यापाशीं तर विचार-परिवर्तनाबरोबर च हृदय-परिवर्तनाचा म्हणजे तपस्येचा हि मार्ग आहे. तपस्येचे अनेक प्रकार संभवतात. गांवोंगांव पायीं हिंडणें हा हि तपस्येचा एक प्रकार आहे. या मार्गानें आम्ही जनतेला हें समजावून देऊं शकतों कीं, त्यांनीं पापाचे वांटेकरी बनूं नये. आज ठिकठिकाणीं बेदखलीचे प्रकार चाललेले आहेत. बेदखली मधील अन्याय आपण जमीनदारांना पटवून देऊं शकतों. पण त्यांनीं तो पटवून घेतला नाहीं, तर असहयोग आहेत च. लोक त्यांना कोणत्या हि कामांत सहयोग देणार नाहीत. आमच्या क्रांतीच्या प्रक्रियेंत असहयोग व सत्याग्रह तर येतात च पण त्यांत कायदा हि देऊं शकतो. मी तर हें हि मान्य करतों कीं, लोक जर अतिशय निराश झाले, तर रक्तरंजित क्रांति हि होऊं शकेल. पण चौथा हि एक मार्ग आहे. चोहोंकडून कार्यकर्ते या कामाला वेगानें लागले आणि लोकांना जर विचार योग्य रीतीनें त्यांनीं समजावून सांगितला, तर भूदानानें च समस्या सुटूं शकेल. लोकांचा जो परिचय मला झाला आहे, त्यावरून ही गोष्ट असंभवनीय नाहीं असें मी निश्चित सांगूं शकतों. या च आशेवर आम्ही कार्य करीत आहोंत.

## मी कायद्याच्या आड आलों नाहीं

पण समजा ही आशा सफल झाली नाहीं, तर तीव्र मार्ग च उरतील. यांपैकीं 'रक्तरंजित क्रांती' चा मार्ग मुळीं मार्ग च नव्हे व ती क्रांति हि असूं शकत नाहीं. तेव्हां विचार करण्यासारखे दोन च मार्ग उरतात, एक कायद्याचा

व दुसरा असहयोगाचा. आम्हीं कायदा कांहीं अडवला नाही. कायदा जरूर बनावा, पण कायद्याचें नुसतें ढोंग मात्र बनतां कामा नये. कायदा कार्यक्षम झाला पाहिजे. कोणत्या हि पक्षाचा सत्ता काबीज करण्याचा व कायदा बनविण्याचा मार्ग आम्ही अडवीत नाहीं. या आंदोलनामुळें कायदा बनविण्यास साह्य च झालें आहे हें प्रत्येक पक्ष कबूल करील.

कायद्याचा प्रश्न निघाला कीं 'सीलिंग' चा प्रश्न येतो. आणखी हि अनेक अडचणी उत्पन्न होतात व त्यांत च सगळा वेळ जातो. व तोंपर्यंत लोक आपापल्या जमिनी वांटून टाकतात. आतां नुकता च हैदराबादला या बाबतींत कायदा झाला. त्याप्रमाणें शंभर किंवा सव्वाशें एकर जमीन एका माणसाला ठेवतां येते. तीन वर्षांपूर्वीं जेव्हां मी तेलंगणांत होतों, तेव्हांपासून या कायद्याच्या गोष्टी चालू होत्या. जमीनदारांनीं तेव्हांपासून च आपापसांत जमीन वांटून टाकली आहे. धनवान लोक हुषार हि असतात. ज्यांच्यापाशीं धन व जमीन असते, त्यांना बुद्धि हि असते. तेव्हां कायदा असा बनविला पाहिजे कीं, ज्यामुळें आपल्या पदरीं मूर्खपणा येणार नाहीं.

## प्रेम ही परिणामकारी शक्ति आहे

आतां राहिला असहयोग व सत्याग्रह. हा मार्ग न्यायाचा व धर्माचा आहे. यांत कोणत्या हि प्रकारचा द्वेष नाहीं. द्वेषामुळें सत्याग्रह व असहयोग यांचें सामर्थ्य घटतें. द्वेषयुक्त असहयोग म्हणजे ओली दारू होय. प्रेम ही च कार्यक्षम दारू आहे. सत्याग्रहाचें सामर्थ्य प्रेमांत च आहे. जेवढें प्रेम अधिक तेवढा सत्याग्रहाचा हक्क अधिक. मी तर असें म्हणेन कीं ज्या गोष्टीमुळें द्वेष उत्पन्न होतो, त्याची सत्याग्रहामधें मुळीं च गणना होत नाहीं. कांहीं लोक सत्याग्रह म्हणजे धमकी समजतात. मी म्हणतों कीं, मग प्रेमाला च धमकी समजलें पाहिजे. सध्यांच्या युगांत बंदूक व नोट यांनीं धमकीचें कार्य होतें. सध्यां ज्याप्रमाणें बंदुकीची सत्ता चालू आहे त्याप्रमाणें भांडवलदारांनीं पैशांची हि जादू घातली आहे. ते जर शेतकऱ्याजवळ जाऊन त्याला दहा रुपयांची नोट दाखवतील तर घाबरून शेतकरी तूप लोणी देऊन टाकील.

परंतु बंदूक व पैसा यांच्या ऐवजीं प्रेमाची शक्ति ही साधारणपणें सहयोगाच्या रूपांत व विशेष प्रसंगीं असहयोगाच्या स्वरूपांत प्रकट होत असते.

आई मुलाला कधीं प्रेमानें खाऊं घालील, तर त्याला सन्मार्गावर आणण्यासाठीं कधीं थप्पड हि मारील. पण मुलाला हें माहीत असते कीं ही थप्पड प्रेमाची आहे. थप्पड मारण्याची गोष्ट निघाली आहे, तेव्हां मी सांगतों कीं, एखाद्याचें धान्य बेकायदेशीर रीतीनें दुसऱ्याच्या घरांत भरलें असलें, तर तें लुटून आणणें हें हि अहिंसेंत बसतें. शुकदेवांनीं श्रीकृष्णांच्या चोरीचीं हि गाणीं गाइलीं आहेत. गांधींच्या काळांत 'डुंगळी चोर' म्हणजे 'कांदा चोर' हा हि गौरवाचा विषय बनला होता. या साऱ्या प्रेमाच्या च गोष्टी आहेत. असें प्रेम प्रकट करण्यासाठीं घरोघर जाऊन विचार समजावून दिला पाहिजे. असें जर केलें गेलें तर बरे च लोक जमीन देतील. जर देणार नाहींत, तर आपल्या-पाशीं दुसरीं शस्त्रें पडलेलीं आहेत च. मात्र आमचीं शस्त्रें अशीं आहेत कीं तीं दुसऱ्यांना पीडा देत नाहींत, तर त्यांची हृदय-शुद्धि घडवितात.

## कार्यकर्त्यांनीं आत्मवादी बनावें

भूदान-यज्ञाच्या प्रक्रियेंत कोणकोणत्या गोष्टी येतात याचें विवरण मीं आतां केलें. पण एवढ्यानें आपल्या विचारांची स्पष्टता पूर्ण होणार नाहीं. आमच्या कार्यकर्त्यांनीं आत्मवादी बनलें पाहिजे. आम्ही जर आत्मवादी बनणार नाहीं, तर भूदानाचें सारें तत्त्वज्ञान च नष्ट होऊन जाईल. आत्मवादी याचा अर्थ हा कीं, प्रत्येकाच्या हृदयांत आत्मा आहे, म्हणून प्रत्येकाचें हृदय-परिवर्तन होणें शक्य आहे, या गोष्टीवर विश्वास असणें. मनुष्यांची हृदयें परस्पर सहानुभूतीनें भरलेलीं असतात. येथें एखाद्याला विंचू चावला, तर आपण कांहीं स्वस्थ बसणार नाहीं. कारण मनुष्याच्या हृदयांत अशी संवेदना आहे कीं, जिची तार दुसऱ्या मनुष्याच्या हृदयांत सहज जाऊन पोंचते. या गोष्टीवर ज्याची श्रद्धा नाहीं, त्याच्या दृष्टीनें हृदय-परिवर्तन व भूदान हीं दोन्ही हि निरर्थक आहेत. प्रत्येकांत आत्मा आहे. या गोष्टीवर जर आमची श्रद्धा असेल, तर हृदय-परिवर्तन, विचार-परिवर्तन व दोहोंच्या सामर्थ्यानें परिस्थिति-परिवर्तन, ही त्रिकोणात्मक प्रक्रिया चालू राहील. भूदानयज्ञाच्या मुळांत हा सारा विचार भरलेला आहे. आपण शब्दांच्या वादविवादांत व खंडनमंडनांत पडतां उपयोगीं नाहीं. पण आपण स्वतः विचार मात्र स्पष्टपणें जाणून घेतले पाहिजेत.

वृंदावन २६–६–५४

## दागिन्यांनीं भगिनींना दडपलें आहे **: ३३ :**

कांहीं भगिनींनीं विहिरी बांधण्यासाठीं आपल्या दागिन्यांचें दान दिलें आहे, या गोष्टीचा मला आनंद वाटतो. दागिन्यांमुळें भगिनी अगदीं भित्र्या बनल्या आहेत. पुरुषांनीं त्यांना आपल्या बँका बनवून टाकल्या आहेत. ते आपलें सगळें धन त्यांच्यावर एकत्रित करतात. धन ज्याप्रमाणें पेटींत बंद करतात, त्याप्रमाणें स्त्रियांना पुरुषांनीं पडद्यांत बंद करून ठेवलें आहे. संस्कृतांत तर स्त्रियांचा गौरव करण्यासाठीं त्यांना 'भीरु' हें विशेषण बहाल केलें आहे. ही भीरुता दागिन्यांमुळें च उत्पन्न झाली आहे. म्हणून स्त्रिया जेव्हां आपल्या दागिन्यांचें दान देतात, तेव्हां त्यांपासून विहिरी बांधल्या जातील या गोष्टीचा च मला आनंद होतो असें नव्हे, तर आतां या भगिनी आपली भीरुता सोडून देतील या विचारानें अधिक आनंद होतो.

एकदां दागिने दान दिल्यानंतर ते पुन्हां आपण घालणार नाहीं असा निश्चय तुम्हीं केला पाहिजे. दागिन्यांना कचरा समजून ते द्या. त्यांचें दान नव्हे, तर त्याग करा. कारण दान हें चांगल्या वस्तूंचें होतें, कचऱ्याचें नव्हे. कचऱ्याचा तर त्याग च करावयाचा असतो. हे दागिने तुम्हांला दडपणारे आहेत, म्हणून ते द्या. आम्हांला दागिने मिळाले नाहींत, तर आमचें काम मुळीं च अडणार नाहीं. पण स्त्रिया जर दागिने देऊं लागल्या, तर देशाचें काम तर होईल च, पण त्यानें आंतलें कार्य हि होईल. कारण यामुळें स्त्रिया शक्तिशाली बनतील व आपली भीरुता सोडून देतील. याप्रमाणें दुहेरी काम साधेल.

———

## क्रांतीसाठीं भगिनींनीं वैराग्य-संपन्न बनावें : ३४ :

सर्वोदय-कार्यक्रमांत भगिनींच्या कार्यक्रमाचें एक विशेष स्थान आहे असें मी मानतों. तो कार्यक्रम योग्य प्रकारें चालवला गेला, तर त्यामुळें समाजांत पुष्कळ बदल घडवून आणतां येईल. म्हणून मी त्याला विशेष महत्त्व देतों.

मीं हें कितीदां तरी म्हटलें आहे कीं, पुरुषांना शिक्षणाची जेवढी गरज आहे, तेवढी च स्त्रियांना हि आहे. आज हिंदुस्थानांत च नव्हे, तर साऱ्या जगांत च स्त्रियांचें क्षेत्र मर्यादित होऊन गेलें आहे. कांहीं नैसर्गिक व कांहीं सामाजिक रूढींमुळें व नियमांमुळें कांहीं बंधनें निर्माण झालीं आहेत. समाजांत जाऊन कार्य करणाऱ्या भगिनींना उत्तम शिक्षण पाहिजे. हें भोगाचें किंवा सुखाचें शिक्षण नसावें तर जीवनाचें शिक्षण असावें. माझा असा विश्वास आहे कीं, जेव्हां शंकराचार्यांसारख्या किंवा त्यांच्याहून हि श्रेष्ठतर अशा स्त्रिया आत्म-ज्ञानी व वैराग्य-संपन्न होऊन कार्य करण्यास निघतील, तेव्हां च देशांत क्रांति होऊं शकेल. हिंदुस्थानचा उद्धार करण्याची भगवंताची इच्छा असेल, तर अशा स्त्रिया अवश्य निघतील, असा माझा विश्वास आहे.

### हिंदु-समाजांतील स्त्रियांच्या मार्गांतील अडचणी

हिंदुसमाजांतील स्त्रिया फार मागासलेल्या आहेत. त्यांच्या मार्गांत सामाजिक व कायद्याच्या अडचणींशिवाय आध्यात्मिक विचाराच्या हि अडचणी आहेत. एके काळीं स्त्रियांना वेद-पठनाचा अधिकार नाहीं असें मानलें जात होतें. आज तर पुरुषांना हि तो अधिकार नको आहे. आज त्याला कांहीं मूल्य च राहिलें नाही. पण जेव्हां त्या अधिकाराला मूल्य होतें, तेव्हां स्त्रियांना तो अधिकार नव्हता. स्त्रियांना आजन्म ब्रह्मचर्याचा अधिकार नाहीं असें मोठमोठे धर्मज्ञ व शास्त्री मानतात. जेव्हां या गोष्टी समोर येतात, तेव्हां स्त्रियांना केवढ्या आध्यात्मिक अडचणी आहेत हें स्पष्ट होतें. याचा परिणाम हा होतो कीं, पित्याच्या घरून आपणांस दुसऱ्याच्या घरीं जावयाचें आहे ही

शिकवण व हा आदर्श प्रत्येक मुलीसमोर ठेवला जातो. या च दृष्टीनें मुलींना सगळें शिक्षण दिलें जातें. मानसिक शिक्षण हि या च प्रकारें दिलें जातें. स्वतंत्र व पराक्रमी स्त्रियांची कल्पना च हिंदुस्थानांत केली जात नाहीं.

स्त्री ही पतीच्या किंवा पुत्राच्या द्वारां सेवा करील असें च मानलें जातें. ही सेवा कमी प्रकारची आहे असें मी मुळीं च समजत नाहीं. परंतु स्त्रियांना स्वतंत्र रीतीनें पराक्रमाचा अधिकार असला पाहिजे असें मात्र मला वाटतें. एका हिंदु टीकाकारानें तर असें लिहिलें आहे कीं, "पुरुषार्थ" हा शब्द च सुचवितो कीं पराक्रम हा पुरुषासाठीं आहे व स्त्रीनें पुरुषांत च लीन झालें पाहिजे. माझ्या मनाला हें पटत नाहीं. यांत आत्म्याच्या गौरवाची हानि आहे. स्त्री-स्वरूपांतील शक्ति सीमित व पुरुष-स्वरूपांतील शक्ति असीमित, असा आत्म्यांमध्यें भेद कसा संभवेल ?

## स्त्रियांना अध्यात्मज्ञान प्रथम दिलें पाहिजे

स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतींत बोलायचें तर त्यांना अध्यात्मज्ञान प्रथम दिलें पाहिजे असें माझें मत आहे. आपल्याकडे पूर्वींच्या काळीं स्त्रिया अध्यात्म-परायण असत. महाभारतांत जनक-सुलभा यांचा संवाद आलेला आहे. सुलभेनें जनकाला ज्ञान दिल्याचा उल्लेख आहे. या च प्रमाणें इतर हि अशा च कथा आहेत. एके काळीं हिंदुस्थानांत स्त्रियांचा एवढा गौरव असे. पण आज मात्र ती स्थिति राहिली नाहीं. आज त्यांची प्रथम गरज अध्यात्म-ज्ञानाची आहे. 'मी देहापासून वेगळी आहें ; आत्मा अविनाशी आहे ; इंद्रियांवर संयम ठेवला पाहिजे; परमेश्वर माझ्यांत च वसत आहे ; या च जन्मांत ईश्वर-दर्शन सुलभ आहे ; सारे जीव हीं माझीं च रूपें आहेत--- या साऱ्या गोष्टी त्यांना शिकविल्या पाहिजेत. याप्रमाणें स्त्रिया अध्यात्म-विचारांत प्रवीण झाल्या पाहिजेत. आत्मज्ञानावर च सारें शिक्षण आधारलें पाहिजे. स्त्री-शिक्षणांत सत्य-निष्ठा व जीवन-तपस्या यांची फार गरज आहे. त्यामुळें च आजच्या समाजाच्या विरुद्ध जाण्याची हिंमत स्त्रीमध्यें उत्पन्न होईल. ज्याच्यांत अध्यात्मज्ञान आहे, त्याला साऱ्या जगानें दडपण्याचा प्रयत्न केला, तरी तो दडपला जाणार नाहीं. अध्यात्म-विद्येच्या द्वारां आपण फार मोठी क्रांति करूं शकूं असा माझा विश्वास आहे. पुस्तकांचें काहीं साह्य होतें हें

निश्चित. गीता-उपनिषदें यांच्यासारखे उत्तमोत्तम ग्रंथ साह्य करण्यास तयार च आहेत. आधुनिक काळांतील हि ग्रंथ चांगले आहेत. पण मला पुस्तकांसंबंधीं कांहीं सांगावयाचें नाहीं. मूल विचारांबद्दल माझा आग्रह आहे. तो एकदां प्राप्त झाला कीं, पुढच्या गोष्टी उत्तम प्रकारें चालू होतील.

## स्त्रियांसाठीं स्वतंत्र उद्योग च पाहिजेत

उद्योगांचा विचार करूं लागलें कीं, कांहीं उद्योग स्त्रियांसाठीं च राखून ठेवले पाहिजेत असें माझें मत आहे: ज्याप्रमाणें शहरवासियांनीं ग्रामवासियांचे उद्योग-धंदे हिसकून घेतले आहेत, त्या च प्रमाणें पुरुषांनीं स्त्रियांचे उद्योग-धंदे हिसकून घेतले आहेत व त्यांना केवळ भोगाचें साधन बनवून टाकलें आहे. ही परिस्थिति केवळ खेड्यांत च आहे असें समजूं नका. ज्याला 'फॅशनेबल सोसायटी' म्हणतात, तेथें हि ही च स्थिति आहे. तेथें तर मोटार गाड्या बाळगाव्या त्याप्रमाणें स्त्रिया बाळगल्या जातात; त्यांच्यावर कोणत्या च कामाची जबाबदारी नसते, तर केवळ भोगविलासासाठीं त्या ठेवल्या जातात. पण हा प्रकार साऱ्या समाजाला च छिन्न-भिन्न करणारा व निर्वीर्य बनविणारा आहे.

एके काळीं विणण्याचा उद्योग हा खास स्त्रियांचा मानला जात होता. पण आज अशी स्थिति आहे कीं, पुरुष विणतात व स्त्रिया केवळ कांड्या भरण्याचें काम करतात. शिवणाच्या बाबतींत हि असें च झालें आहे. शिवण्याचीं यंत्रें आल्यानंतर पुरुषांनीं तीं आपल्या हातीं घेतलीं. याप्रमाणें एकेक धंदा स्त्रियांच्या हातून जात चालला. आज अशी अवस्था आली आहे कीं, सर्व कामें पुरुष च करतात व 'स्त्री ही आम्हांवर भार आहे,' असें पुरुष म्हणतात. स्त्रीला तिचा असा कोणता हि स्वतंत्र उद्योग राहिला नाहीं, हें च तिच्या पराधीनतेचें कारण आहे. ती उत्तम स्वयंपाक करूं शकते. केवळ जिभेचे चोचले पुरविणारे खाद्य पदार्थ बनविणें च नव्हे तर आरोग्यदायी व आजाऱ्यांना आवश्यक असे पदार्थ हि करण्यांत ती प्रवीण होऊं शकते. भाजीपाल्यांचा बगीचा हि स्त्रिया चांगल्या प्रकारें लावूं शकतील. याशिवाय दूध दोहणें, गाईची सेवा करणें, स्वच्छतेचीं कामें करणें हें सारें तिला सहज शक्य आहे.

## स्वतंत्र ज्ञान-प्राप्तीची क्षमता

याबरोबर च कोणत्या हि एका भाषेचें उत्तम ज्ञान स्त्रीला असलें पाहिजे, मग ती मातृभाषा असो, प्रांत-भाषा असो की राष्ट्रभाषा असो. त्यांच्या-जवळची ज्ञानाची पुंजी **कमी असतां कामा नये.** ज्ञान तर त्यांना परिपूर्ण असें च असलें पाहिजे. 'परिपूर्ण' याचा अर्थ स्वतंत्र ज्ञानप्राप्तीची शक्ति व ज्ञान-प्राप्तींत स्वावलंबन. परंतु याचा असा मात्र अर्थ नव्हे कीं, मुलींनीं सारखें शिकत च रहावें व सेवा-कार्य मात्र करूं नये. सेवा-कार्य शिकण्यासाठीं त्यांना अनुभवी स्त्रियांकडे पाठविलें पाहिजे व त्या च बरोबर जिला मी परिपूर्ण विद्या म्हणतों, ती हि शिकवली पाहिजे. जेव्हां त्यांचा अनुभव पूर्ण होईल., तेव्हां त्यांना एकटें च कोणत्या हि क्षेत्रांत कार्य करण्यास पाठवावें.

## लोकशक्ति वाढविण्यांत स्त्रियांचा सहयोग

स्वराज्यानंतर कांहीं काम तर सरकारला च केलें पाहिजे. पण सरकार जीं बरीं च कामें करूं शकणार नाहीं, तीं आपण केलीं पाहिजेत. स्त्रियांना पडद्यांतून बाहेर काढण्याचें एक काम आहे. पण तें कोण करणार? कुंकू लावण्याची प्रथा बंद करावयाची आहे. पण ती कशी बंद होईल? मुलींचें लग्नाचें वय वाढवावयाचें आहे. तें कसें वाढविलें जाणार? त्या च प्रमाणें आजाऱ्यांची शुश्रूषा व शिक्षण हीं कामें करावयाचीं आहेत. तीं कोण करणार? हीं सगळीं कामें कोण करणार? सरकार कांहीं तीं करूं शकत नाहीं. तीं आपल्याला च करावीं लागतील. लोकशक्तीच्या आधारावर व धर्मनिष्ठेच्या द्वारां आपणांस च हीं कामें करावयाचीं आहेत. मला अशी आशा आहे कीं, आपल्या देशांत सूर्यासारख्या तेजस्वी व प्रतापी स्त्रिया निघतील. त्यांच्या किरणांचा प्रकाश सगळीकडे फांकेल व देशांतील तिमिराचा नाश होईल.

आज जें शिक्षण दिलें जात आहे, तें गुलाम बनविणारें, सुखासीनतेचें व उपभोगाचें शिक्षण आहे. खेड्यांतील स्त्रिया च मला अधिक स्वतंत्र वाटतात. शहरांतील अशा कांहीं शिक्षित स्त्रिया मीं पाहिलेल्या आहेत, कीं सुखासीनते-मुळें त्या आपल्या पतीच्या सर्वस्वी अंकित झाल्या आहेत. त्यामुळें त्यांची उन्नति होत नाहीं व त्यांच्या पतींची हि उन्नति होत नाहीं. आपल्याला

समाजांतील वाईट रूढि नष्ट केल्या पाहिजेत. ग्राम-सेविका विद्यालयांकडून मी या गोष्टींची अपेक्षा करीत आहें. आदर्श जर सतत उच्च ठेवला गेला व त्याच्याकडे पोंचण्याचा अखंड प्रयत्न करीत राहिलें, तर प्रत्यक्षांत थोडें खालीं राहण्यानें कांहीं बिघडणार नाहीं. आपलें काम मात्र सतत प्रयत्नानें चालू ठेवलें पाहिजे.

पूसारोड
२६-८-५४

---

## हें ईश्वरी कार्य पुरें झाल्यावांचून राहणार नाहीं : ३५ :

मीं कशासाठी हिंडत आहे हें आपणां सर्वांना माहीत च आहे. जमीन आतां लवकर च वांटली गेल्यावांचून राहणार नाहीं ही गोष्ट आतां बिहारच्या वातावरणांत पसरलेली आहे. ज्याला जमिनीवर परिश्रम करण्याची इच्छा आहे व जो जमीन मागत आहे, त्याला जमीन मिळणार नाहीं, असा एक हि मनुष्य राहणार नाहीं. मी पूर-पीडित विभागाबद्दल बोलत आहें. मीं तेथें अडीच महिने घालवले. तेथें कार्यकर्त्यांनीं कांहीं विशेष काम केलें नव्हतें. कधीं कधीं तर आमच्या जेवण्याची व्यवस्था होणें हि कठिण होई. मी बिहारांत साडे तीन वर्षें हिंडत आहें. पण असे प्रसंग मात्र या पूरपीडित प्रदेशांत च आले, दुसरीकडे कुठें हि नाहीं. अशी परिस्थिति असतां हि जेव्हां आम्ही त्या विभागांत पोंचलों, तेव्हां शेंकडों लोक एकत्र जमले.

### पूरपीडितांचा हा उत्साह

एका जागीं तर लोकांनीं आम्हांला सांगितलें कीं, दोनशें नांवा तेथें आल्या होत्या. शेंकडों स्त्री-पुरुष त्यांतून आले होते. स्त्रिया आपलीं मुलें मांडीवर घेऊन बसल्या होत्या. खालीं ओली जमीन व वरून पावसाचा मारा होत होता. तरी हि शेंकडों स्त्री-पुरुष उभे राहून मोठ्या उत्साहानें व शांततेनें प्रार्थनेंत भाग घेत होते. त्यांना जमीन तर मिळाली नाहीं, पण 'जमिनीवर गरिबांचा हक्क आहे' हा संदेश मात्र त्यांना मिळाला. 'ज्याप्रमाणें हवा,

पाणी व सूर्य प्रकाश ही परमेश्वराची देणगी आहे व त्यांचा मालक कोणी होऊं शकत नाहीं, त्या च प्रमाणें जमीन ही हि परमेश्वराची देणगी आहे व तिचा हि मालक कोणी होऊं शकत नाहीं. ज्याला जमिनीची सेवा करावयाची आहे, त्याला जमीन मिळेल.' तेथें हि आम्हांला दान-पत्रें मिळालीं. इतका विलक्षण उत्साह मीं तेथे पाहिला.

याप्रमाणें बिहारचें संपूर्ण वातावरण या उत्साहानें भरलेलें आहे आणि प्रत्येकाला समाधान वाटत आहे. मी बिहारांत दोन वर्षांहून अधिक काळ हिंडत आहें. आतां मला फक्त दोन च महिने येथें रहावयाचें आहे. मीं जितक्या जमिनीची मागणी केली आहे, तितकी या दोन महिन्यांत पुरी न होण्याला कांहीं च कारण नाहीं. कार्यकर्ते जीव लावून काम करतील तर खेड्याखेड्यांतून जमीन मिळेल.

## दान-पत्र परत करण्याच्या आंदोलनाची फलश्रुति

मध्यंतरीं मीं एक नवें च आंदोलन सुरू केलें. तें म्हणजे दान-पत्र-परतीचें आंदोलन.कांहीं दान-पत्रांच्या पाठीमागें मीं लिहिलें कीं, 'पुरेसें दान नाहीं, म्हणून परत.' याच्या खालीं मीं आपली सही हि केली. ज्याच्या-जवळ पन्नास बिघे आहेत, त्यानें अर्धा बिघा दान दिलें म्हणून तें मीं परत केलें. कांहीं तरी द्या, असें लोकांनीं म्हटलें म्हणून त्यानें तें दिलें होतें. पण दान परत केल्यावर संध्याकाळीं तो गृहस्थ माझ्याकडे आला. त्याच्या चेहऱ्या-वर घोर पश्चात्तापाची भावना दिसत होती. त्याची दृष्टि अपराध्यासारखी दिसत होती. थोडें बोलणें होतां च त्यानें सहावा हिस्सा दान दिला व तो निघून गेला. एखादा दुसरा अपवाद वगळल्यास ज्यांचीं दान-पत्रें परत केलीं गेलीं, ते सगळे आपल्या दानांत योग्य तो फरक करून च गेले. मीं हें आंदोलन मुजफ्फरपुरांत सुरू केलें व चालू च ठेवलें. दानपत्र परत करण्याचा मला काय हक्क होता? पण माझा प्रेमाचा हक्क लोक मान्य करतील च असें मला वाटलें. बाबा सहावा हिस्सा मागताहेत तेव्हां लोक तो देतील च असें मला वाटलें. पण माझ्या त्या आंदोलनाचा तेथील लोकांवर फार प्रभाव पडला, ही कांहीं लहानशी घटना नाहीं.

## कलियुगांत सत्य-युग

एके ठिकाणीं अशी घटना घडली कीं, एका माणसानें सहावा हिस्सा जमीन दिली. मीं म्हटलें, 'सगळी चांगली जमीन द्या.' त्यावर तो म्हणू लागला, 'मी आपल्याला भाऊ समजून हिस्सा दिला आहे, तेव्हां केवळ चांगली जमीन तुम्हीं कशी मागतां?.' जणू कांहीं भाऊ भाऊ गोष्टी करीत आहेत असें वाटलें. यावर मी पुन्हां म्हटलें, 'ठीक आहे. दोन्ही प्रकारच्या जमिनींचा हिस्सा मी घेईन. पण एक गोष्ट तुम्हांला करावी लागेल. ज्या भावाला तुम्ही जमीन देत आहांत त्याच्यापाशीं कसलें हि साधन नाहीं. तेव्हां त्याला आपल्या पायावर उभें करण्याची व्यवस्था तुम्हांला च करावी लागेल. जी पडित जमीन असेल ती लागवडीला आणून द्या म्हणजे झालें.' त्यानें माझें म्हणणें तात्काळ मान्य केलें. हें जें संभाषण मी तुम्हांला ऐकवीत आहें, तें कलियुगांत झालेलें आहे, सत्ययुगांत नव्हे,. आपल्या विषयींच्या एवढ्या विलक्षण सद्‌भावनेचा आम्ही फायदा करून घेणार नाहीं, तर आमच्यासारखे हतभागी आम्ही च, असें म्हटलें पाहिजे.

## ईश्वर याच्यामागें उभा आहे

त्या पूरग्रस्त विभागांत मला किती जमीन मिळाली हें वृत्तपत्रांत एकानें वाचलें व त्यानें लिहिलें कीं, 'अगदीं च थोडी जमीन मिळाली.' पण ही थोडीशी जमीन कोणत्या परिस्थितींत मिळाली, याचा त्यानें कांहीं च विचार केला नाहीं. वस्तुतः त्या ठिकाणच्या लोकांनीं दान दिलें तरी कसें याचें च आश्चर्य वाटतें. ते लोक दान घेण्याच्या अवस्थेंत होते, दान देण्याच्या नव्हे. मीं त्यांना हें च समजावून सांगितलें कीं, अशा संकट-समयांत च धर्म-भावना दृढ होणें अवश्य आहें. दानपत्रांचें कांहीं विशेष महत्त्व नाहीं. पण तेथें जी विलक्षण सद्‌भावना मला आढळून आली, तीमुळें माझी निश्चित खात्री झाली कीं, या कार्याच्या मागें परमेश्वर उभा आहे. मी नेहमी हें च सांगत असतों. एकानें मला लिहिलें आहे कीं, "विनोबा ईश्वराला चार हात दूर ठेवून जरा आर्थिक गोष्टी बोलतील, तर तें अधिक चांगलें होईल.' मी म्हणतों कीं, ईश्वर वैकुंठवासी आहे असें ज्यांना वाटतें ते त्याच्यापासून चार हात च दूर राहिले नाहींत तर त्याला या जगाच्या बाहेर च त्यांनीं ठेवलें आहे.

पण जो ईश्वर प्रत्येक घटव्यापी आहे, त्याला दूर ठेवणें कसें शक्य आहे ? मला तर निश्चितपणें असें वाटूं लागलें आहे कीं या कार्यामागें ईश्वर आहे आणि तो असला म्हणजे मला कसली हि चिंता वाटतां उपयोगी नाहीं. वस्तुतः मला कसलीं चिंता वाटत च नाहीं. रात्रीं उत्तम झोंप लागते. स्वप्नें हि क्वचित् च पडतात. या कार्यामागें ईश्वर आहे, याची च ही साक्ष आहे. तेव्हां आपल्याला फक्त ईश्वराचें साधन बनावयाचें आहे. भगवंताचें नांव घेऊन कामाला सिद्ध झालें पाहिजे. आपणांस नुसतें निमित्तमात्र बनावयाचें आहे, दुसरें कांहीं नाहीं. या आंदोलनाची गति कशी वाढेल याबद्दल आमच्या गोष्टी चालतात. आम्ही मनुष्य च आहोंत तेव्हां विचार करावा च लागतो. आम्ही जर हें कार्य करूं शकलों नाहीं, तर नालायक ठरूं, ही गोष्ट मला मान्य आहे. पण आंदोलन यशस्वी होणार हें निश्चित. ईश्वर माझ्याकरवी नाहीं तर दुसऱ्याच्या करवीं हें कार्य पुरें करील. आम्हांला केवळ निमित्त बनावयाचें आहे. वैद्यनाथ बाबूंचें उदाहरण समोर आहे. ते सगळा वेळ या च कामाला देतात. तेव्हां मला आशा आहे कीं, जमिनीची माझी मागणी पूर्ण होणार आणि या जिल्ह्याचें पूर्णिया हें नांव हि सार्थ होणार.

इसलामपुर ( पूर्णिया )
२-११-५४

---

## पहिलें भांडवलवादी आपलें शरीर : ३६ :

एकदां आमच्या एका सहकाऱ्यानें म्हटलें, 'बाबांचें कार्य म्हणजे भांडवलवादाशी लढण्याचा मोर्चा च आहे. भांडवलवादाशी त्यांचा विरोध आहे.' त्याचें म्हणणें ठीक आहे, पण पहिला भांडवलवादी शत्रु म्हणजे आपलें शरीर च आहे. तें भांडवलवादी व्यवस्थेंत वाढलें आहे. शरीराला कांहीं संवयीं जडलेल्या असतात. त्या सोडणें व आपल्या हातानें काम करणें अवश्य आहे. पहिला मोर्चा आपल्या घरावर च आणला पाहिजे. त्यांत यशस्वी झालों, तर च भांडवलवाद नष्ट करणें शक्य होईल. भांडवलवाद

अनेक प्रकारचा असतो. भांडवलवादाचा अर्थ आहे भांडवल जमा करणें. हें काम विकेंद्रित पद्धतीनें नव्हे, तर केंद्रित पद्धतीनें केलें जातें.

आपणांस 'कम्युनिस्ट' म्हणविणारे हि हल्ली पुरेपूर भांडवलवादी आहेत. त्यांना उत्पादनांत भांडवलवाद व वितरणांत समता पाहिजे असते. ते अशा मोहांत आहेत कीं, उत्पादन मात्र केंद्रित असावें व वितरण समाजानें करावें. वस्तुतः कम्युनिझम् ही भांडवलवादीची च प्रजा आहे, त्याची च प्रतिक्रिया-स्वरूप आहे. कम्युनिझम् हा स्वतंत्र विचार नाहीं. त्यांत जीवनाचें स्वतंत्र दर्शन नाहीं. भांडवलवादामुळें युरोपांत जी दुरवस्था उत्पन्न झाली, तिची प्रतिक्रिया म्हणून साम्यवाद उत्पन्न झाला. तो सिंथेसिस नसून 'भांडवल-वादाच्या 'थीसिस' च्या विरुद्ध उत्पन्न झालेला 'अंटी थीसिस' आहे. ज्यांत जीवनतत्त्व पूर्ण आहे तो च 'सिंथेसिस' होऊं शकेल. म्हणून च साम्यवादानें उत्पादनासाठीं भांडवलवाद मान्य केला आहे. पण आपलें काम प्रतिक्रियात्मक विचारानें होणार नाहीं. आपणांस तर जीवनाचा पाया बनवावयाचा आहे. त्याच्या आधारावर संपूर्ण समाज उभा करावयाचा आहे.

चितरा
१५-१२-५४

---

## भारताला येशू ख्रिस्त मान्य आहे : ३७ :

आजचा दिवस हा अतिशय पवित्र दिन आहे. आज साऱ्या जगांत महात्मा येशू ख्रिस्ताचा स्मरण दिन साजरा केला जातो. तसें तर ईश्वरी सृष्टीचे सारे च दिवस शुभ दिन असतात. सूर्य नारायण उगवतो तो शुभ-दिन घेऊन च येतो. माणसाच्या व्यक्तिगत जीवनाच्या दृष्टीनें पाहिलें, तर ज्या दिवशीं त्याला एखादा शुभ संकल्प स्फुरतो, किंवा जेव्हां तो शुभ आचरण्याचा प्रारंभ करतो तो दिवस शुभ मानला जातो. पण परमेश्वराच्या नित्य प्रकाश-मय दिवसांशिवाय व व्यक्तिगत शुभ संकल्पांच्या दिवसांशिवाय मानवाला त्याच्या अत्युच्चतेचें दर्शन घडविणारे असे कांहीं दिवस समाज-जीवनांत

विशेष पवित्र मानले जातात. म्हणून महा-पुरुषांच्या स्मृतीनिमित्त जगभरचे लोक थोडा काळ कां होईना पण आपली पातळी उंचावण्याचा प्रयत्न करतात, थोडें आत्मचिंतन करतात व थोडा पूजा-पाठ हि करतात. या प्रकारची रूढि सगळ्या देशांत, सर्व धर्मांत, व साऱ्या समाजांत चालू असते.

## ख्रिस्ताचा पवित्र स्मृति-दिन

आम्हीं धर्मांत हि भेद-भाव निर्माण केला आहे. समाज एकमेकांशीं झगडतात. देश एकमेकांशी शत्रुत्व करतात. पण या सर्वांची क्षुद्रता दर्शविणारे कांहीं महात्मे सगळ्या जगभर निर्माण झालेले आहेत. त्यांना कोठल्या हि देशाचे, पंथाचे, संप्रदायाचे, किंवा समाज-विशेषाचे, समजलें जात नाहीं. अशा महापुरुषांत च महात्मा येशू ख्रिस्ताची गणना आहे. ते स्वतःला मानव-पुत्र म्हणवून घेत. मानव-पुत्र याचा अर्थ हा कीं, तो आपल्याला कोणती हि संकुचित उपाधि, पदवी किंवा श्रेणी लावून घेण्यास तयार नसतो, तर साऱ्या मानव समाजाचे च आपण प्रतिनिधि आहोंत असें तो समजतो. मानवाच्या बलाचा व निर्बलतेचा येशू ख्रिस्त हा प्रतिनिधि आहे. म्हणून महात्मा येशूनें सगळ्या मानव जातीच्या शुद्धीसाठीं फार मोठें प्रायश्चित घेतलें. जेथें जेथें ख्रिस्ती धर्म प्रचलित आहे, तेथें तर त्याचें स्मरण होतें च, पण जगाच्या इतर हि भागांत त्याचें स्मरण पवित्र मानलें जातें.

## येशू ख्रिस्त भारताला मान्य आहे

भारतभूमींत तर हा दिवस विशेष पवित्र मानला जातो. येशू ख्रिस्ता-नंतर कांहीं काळानें मलबारच्या किनाऱ्यावर ख्रिस्ती मिशन आलें होतें ही गोष्ट सर्वांना माहीत नाहीं. तेव्हांपासून च ख्रिस्ती धर्माचे अनुयायी या भूमीवर आहेत. ख्रिस्ती धर्माशी इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज इत्यादि राज्यांची राजनीति निगडित झाली आहे ही दुर्दैवाची गोष्ट आहे. या राजनीतीमुळे येथे अनेक अनिष्ट घटना घडल्या व तत्परिणामीं ख्रिस्ती धर्माची जेवढी प्रतिष्ठा येथें असावयास हवी होती, तेवढी राहिली नाहीं. वस्तुतः एक प्रकारें ख्रिस्ती-धर्माविरुद्ध च प्रतिक्रिया येथें निर्माण झाली. याबरोबर च ख्रिस्ती धर्माविरुद्ध मिथ्या भावना येथें उत्पन्न झाली, व पूर्वग्रह बनले ही

दुःखाची गोष्ट आहे. पण आतां ती परिस्थिति नाहींशी होत चालली आहे व बरीचशी नाहींशी झाली हि आहे. आतां ख्रिस्ती धर्म हा हि एक हिंदुस्थानचा च धर्म आहे असें मानण्याची पूर्व तयारी होऊं लागली आहे.

माझे ख्रिस्ती मित्र म्हणतात. सर्व हिंदुस्थाननें येशू ख्रिस्ताला मान्यता द्यावी. साऱ्या देशाच्या वतीनें मी हें जाहीरपणें सांगूं इच्छितों कीं, येशू ख्रिस्त सर्व हिंदुस्थानाला मान्य आहे व त्यांचा संदेश आम्हांला शिरोधार्य आहे. तो पूर्णत्वानें आचरणांत आणण्यास आम्ही उत्सुक आहोंत. आम्ही त्यांना आपल्या च परिवारापैकी एक समजतों. येशू ख्रिस्ताच्या शिकवणीचा जेवढ्या व्यापक प्रमाणांत सामूहिक प्रयोग महात्मा गांधींच्या नेतृत्वांत भारतानें केला, तेवढा दुसरीकडे कोठें केला गेला कीं नाहीं हें आम्हांला माहीत नाहीं, हा आमचा अभिमान-रहित व नम्र दावा आहे. महात्मा येशूचा संदेश शिरोधार्य करण्याची बुद्धि परमेश्वरानें आम्हांला दिली व त्यामुळें आमचें हित च झालें, ही गोष्ट आम्ही अभिमानानें नव्हे, तर नम्रतेनें च सांगतों. मी तर असें म्हणतों कीं आजचा हा पवित्र दिवस हिंदुस्थाननें व जगानें हि अंतःपरीक्षणाचा दिवस मानावा.

## विज्ञानामुळें मनुष्य येशूची शिकवण मानील

आज जगाची स्थिति अत्यंत व्याकुळ झाली आहे. ज्या देशांनीं अधिकांत अधिक व्यापक प्रमाणांत, एकमेकांविरुद्ध हिंसेचें आयोजन केलें, ते महात्मा येशूचे च अनुयायी म्हणवितात, ही गोष्ट अतिशय दुःखानें सांगणें भाग पडतें.

ही परिस्थिति जास्त दिवस टिकेल असें मला वाटत नाहीं. आणि 'देवाचें स्वर्गांतील राज्य या पृथ्वीवर अवतरेल' ही येशू ख्रिस्ताची भविष्य-वाणी लवकर च खरी ठरेल असें मला वाटतें. शस्त्रास्त्र-वाढींत च आपलें व जगाचें संरक्षण आहे असें समजणारे देश येशू ख्रिस्ताच्या शिकवणुकीमुळें नव्हे, तर विज्ञानाच्या अनुभवानें च ही गोष्ट मान्य करतील.

एकीकडे शस्त्रास्त्रांची वाढ करीत रहावयाचें व दुसरीकडे 'बॅलन्स ऑफ पावर' ( शक्तीचें संतुलन ) कायम ठेवून शांततेसाठीं प्रयत्न करीत रहावयाचें. ही अवस्था या विज्ञान-युगांत जास्त दिवस चालू शकणार नाहीं. शांततेचा हा अशान्त उपाय जास्त काळ चालणार नाहीं. शस्त्रास्त्रांना एका

मर्यादेंत ठेवणें ही गोष्ट विज्ञान च अशक्य करून टाकील. मनुष्यांना विचार करण्याची एक संधि विज्ञान अवश्य देईल. बायबलच्या पठणानें जें कार्य झालें नाहीं, अनेक धर्मोपदेशकांचीं रविवारचीं प्रवचनें ऐकून जें कार्य झालें नाहीं, तें कार्य विज्ञान-युग च करून टाकील. हिंसक शस्त्रांच्या परित्यागांत च मानवतेचा व मानव-समाजाचा विकास आहे ही बुद्धि अखेर मनुष्याला सुचेल. या दोन्ही गोष्टी विज्ञान करून दाखवील. शरीराचें रक्षण व आत्म्याचा विकास हीं दोन्ही कार्यें एका च गोष्टीनें साधतील. शस्त्रास्त्रांचा परित्याग करून परस्पर प्रेमानें व सहयोगानें दुसऱ्यांसाठीं जगण्यास जेव्हां मनुष्य शिकेल, देण्यांत च जेव्हां त्याला सुखाचा अनुभव येईल, तेव्हां च तो हा भवसागर तरून जाईल——हें विज्ञानानें प्रत्यक्ष सिद्ध होईल.

## अभिक्रम दुसऱ्यांच्या हातीं सोपवूं नये

येशू ख्रिस्तानें म्हटलें आहे कीं, आपल्यावर प्रेम करणारावर जर आपण प्रेम केलें, तर त्यांत विशेष तें काय आहे? हें तर जनावरें हि करतात, मग त्यांत मानवाचें वैशिष्टच तें कोणतें? जो आमच्यावर प्रेम करील, त्याच्यावर आम्ही प्रेम केलें व जो आमचा द्वेष करील, त्याचा आम्ही द्वेष केला, तर याचा अर्थ असा होईल कीं, आम्हीं कसें बनावें हें आम्ही दुसऱ्याच्या हातीं सोंपवलें आहे. याला 'अभिक्रम' म्हणतात. 'अभिक्रम' किंवा 'इनीशिएटिव्ह' असें ज्याला इंग्रजींत म्हणतात, तो शब्द मीं गीतेंतून घेतला आहे. अमेरिकेकडून मदत घेऊन पाकिस्तान आपलें लष्करी सामर्थ्य वाढवीत आहे. पण शांति, अहिंसा, व शस्त्र-त्याग ज्यांना हवा आहे, त्या आम्ही भारतीयांनीं शस्त्रशक्ति वाढविण्याचा विचार केला, तर तो योग्य होणार नाहीं. पंडित नेहरूंच्या नेतृत्वामुळें आम्हांला अशी बुद्धि होत नाहीं, ही परमेश्वराची कृपा च मानली पाहिजे. पण समजा, तशी दुर्बुद्धि झाली व अगतिक होऊन आम्ही हि शस्त्र-सामर्थ्य वाढवूं लागलों, तर याचा अर्थ हा च होईल कीं, हिंदुस्थानला कसें वळण द्यावयाचें हें आम्हीं पाकिस्तानच्या हातीं सोपवलें आहे. हा दृष्टान्त मीं अगदीं सहज च दिला. आज प्रत्येक देश दुसऱ्याचीं शस्त्रास्त्रें पाहून आपली शस्त्रवाढ करण्याच्या प्रयत्नांत गुंतला आहे. ज्याची आम्हांला भीति वाटते, त्याला आमची हि भीति वाटत आहे. याप्रमाणें

आम्ही एकमेकांना भीत आहोंत. अगतिकतेच्या जाणिवनें आम्ही उलटचा दिशेनें जात आहोंत आणि गंमत ही कीं, त्या दिशेनें जाणें योग्य नाहीं हें कबूल हि करीत आहोंत.

## अहिंसा हा केवळ परम नव्हे, तर निकटचा धर्म

महात्मा गांधी ज्यावेळीं परलोकवासी झाले तेव्हां जगभरच्या लोकांनीं –मोठ्यांनीं व सामान्य माणसांनीं हि––आपली समवेदना प्रकट केली. या लोकांमध्यें, जगावर संकट आणणारा व हिंसाशक्तींत अधिकांत अधिक वाढ करणारा प्रसिद्ध सेनापति मॅक्आर्थर हि होता. त्यानें म्हटलें कीं, 'आपणाला जर मानवतेचें रक्षण करावयाचें असेल, तर कधीं ना कधीं, समजुतीनें व प्रेमानें मानवतेचें रक्षण करण्याच्या उपायाबद्दल आपल्याला विचार करावा च लागेल.' हें मान्य करून हि अनेक लोकांना असें वाटतें कीं, हा उपाय आज करून पाहण्याजोगा नाहीं. '**अहिंसा परमो धर्मः**' हें तत्त्व सर्वांना मान्य आहे. पण हा धर्म अगदीं निकटचा आहे हें मात्र त्यांच्या लक्षांत येत नाहीं.

हिंसेच्या साह्यानें रक्षण करूं पाहणारे हि आज असें म्हणतात कीं, "आम्हांला हिंसेसाठीं हिंसा नको आहे. हिंसेसाठीं हिंसा करणें हें राक्षसी वृत्तीचें द्योतक आहे. हिंसेसाठीं हिंसा हवी असणारा मानवी समाजांत कुणी च असणें शक्य नाहीं. पण अगतिकतेमुळें च तिचा आश्रय घ्यावा लागतो. **कारण समोरचा माणूस जेव्हां शस्त्रबल वाढवूं लागतो, तेव्हां आपल्याला दुसरें काय करणें शक्य आहे ?"** **पण या अगतिकतेला किंवा पुरुषार्थ-हीनतेला** मी 'निर्वीर्यता' च म्हणेन. ही महात्मा येशूला कधीं च मान्य होऊं शकणार नाहीं. ते महापुरुष होते. त्यांना भीति ही वस्तु ठाऊक च नव्हती. ते नैष्ठिक ब्रह्मचारी होते व प्राणीमात्रावर त्यांचें प्रेम होतें. 'जो माझा द्वेष करील त्याला हि मी प्रेमानें जिंकेन." असें त्यांनीं जाहीरपणें सांगितलें होतें. ही केवढी सामर्थ्यशाली गोष्ट आहे ! कोणता हि दुर्बल माणूस असें बोलूं शकणार नाहीं किंवा असा विचार हि करूं शकणार नाहीं. बलवानाला च हें करणेंशक्य आहे. आज जर आम्हीं शांतपणें विचार केला, तर आम्हांला हें समजून येईल कीं, विज्ञानाच्या या युगांत हिंसेनें समाजाचे प्रश्न सोडविण्याची गोष्ट बोलणें हा अत्यंत मूर्खपणा आहे. म्हणून येशू ख्रिस्ताचा

संदेश अंमलांत आणण्याची संधि जगाला लवकर च मिळेल, आणि हें कार्य विज्ञान च घडवून आणील असा माझा दृढ विश्वास आहे.

## ख्रिश्चन व मुसलमान यांनीं ब्रह्मविद्या मान्य करावी

या भरत भूमींत जगांतल्या सर्व जाति व सर्व लोक प्रेमानें राहत आले आहेत हें तिचें थोर भाग्य आहे. येथले लोक विचार व चिंतन यांत भेद करीत नाहींत. येथील जनतेला 'राष्ट्रवाद' हि मान्य करणें जड च जातें. 'आंतरराष्ट्रवाद' मात्र तिला चटकन् समजूं शकतो. येथल्या एखाद्या माणसाला असें समजावून दिलें गेलें कीं, 'तूं बिहारी आहेस, तेव्हां बिहारचा च अभिमान बाळग. बाहेरच्या लोकांशीं वेगळा व्यवहार ठेव. थोडा थोडा भेद ठेवीत जा.'—तर येथल्या शेतकऱ्याला हि तें समजणार नाहीं. परंतु 'प्राणिमात्रावर प्रेम कर. केवळ मनुष्यावर च नव्हे, तर सर्वांवर प्रेम करणें हा धर्म आहे.'—ही गोष्ट मात्र त्याला तात्काळ समजेल. म्हणून भारतानें येशू ख्रिस्ताची शिकवण मान्य केली आहे असें मला वाटतें. ही सगळी पार्श्वभूमि जर आमच्या ख्रिश्चन बांधवांना मान्य असेल, तर ख्रिश्चन धर्माला च पूर्णता प्राप्त होईल, असें नव्हे तर हिंदु व मुसलमान हे धर्म हि परिपूर्ण होतील. यामुळें सर्व धर्मांना परिपूर्णता लाभेल व सर्व धर्मांचा सुंदर संगम घडून येईल. यासाठीं भारताच्या बाहेर ज्यांची परंपरा आहे अशा ख्रिश्चन व मुसलमान बांधवांनीं भारताला आपल्या धर्माचें व जीवनाचें अंग मानलें पाहिजे. माझ्या म्हणण्याचा अर्थ हा आहे कीं, त्यांनीं आपल्या शेजाऱ्यावर प्रेम करावें, आपल्या शत्रूवर हि प्रेम करावें. कां? असें विचाराल, तर हिंदुस्थानची ब्रह्मविद्या च याचें उत्तर देईल. येथले ख्रिश्चन व मुसलमान जर त्या ब्रह्मविद्येला मान्यता देतील, तर त्यांना बळ मिळेल. जो प्रचार त्यांना हवा आहे, तो सहज होईल.

इस्लाम धर्मांत एक प्रकारचा बंधुभाव आहे हें सर्वांना मान्य आहे. सेवा-कार्य करण्याची प्रवृत्ति हें ख्रिश्चन धर्माचें वैशिष्टच आहे हें हि सर्वांना मान्य आहे. या दोन्ही गोष्टी आम्हांला आत्मसात् करावयाच्या आहेत. भारतांतील हिंदु या नात्यानें मी असें सांगूं इच्छितों कीं, ख्रिश्चन व मुसलमान हे दोन्ही धर्म मला मान्य आहेत. पण त्यांना मान्यता दिल्यानें माझें हिंदुत्व संपुष्टांत येत नाहीं, तर उलट तें फुलतें व प्रकाशतें. कारण इस्लाम धर्मांतील

बंधुभाव व ख्रिश्चन धर्मांतील सेवा-वृत्ति यांच्यामुळें येथील ब्रह्मविद्या ही अधिक च सामर्थ्यशाली बनेल. येथला इस्लाम धर्म हा वैशिष्ट्यपूर्ण राहील व ख्रिश्चन धर्म हि तसा च बनेल. भारतभूमीच्या रंगामुळें त्यांना एक वेगळें च सामर्थ्य प्राप्त होईल, एक आगळी च आकर्षक प्रभा प्रकाशेल.

## सर्व धर्मांनीं शाकाहार मान्य करावा

मला असें वाटतें कीं, आपल्या अन्नासाठीं कोणत्या हि पशूची हत्या न करणें व पशु हें आपलें भक्ष्य न समजणें—या उद्देशाच्या रोखानें यापुढें समाजानें वाटचाल केली पाहिजे. पशूंचें आपण रक्षण करूं शकलों नाहीं, तरी निदान त्यांना आपलें भक्ष्य बनवितां कामा नये. येथल्या ब्रह्मविद्येंतून निर्माण झालेला भारताचा हा विशेष संदेश आहे. म्हणून फलाहार, शाकाहार हा सर्व माणसांसाठीं उत्तम आहार आहे, ही गोष्ट भारतांतील सर्व धर्मांनीं मान्य करावी. आज जगांत पुरेसें अन्न नाहीं हें मी जाणतों. अन्नाची पुष्कळ च कमतरता आहे. पण मानवाच्या विकासासाठीं, व परिपूर्णतेसाठीं आणि सर्व धर्मांची एकरसता होण्यासाठीं मानवानें मांसाहारी राहतां कामा नये ही गोष्ट अवश्य आहे. यावर मी आज जास्त कांहीं सांगणार नाहीं. आज ही गोष्ट मीं अशासाठीं सांगितली कीं, भारताला ख्रिश्चन धर्म मान्य आहे, तेव्हां ख्रिश्चन धर्मानें हि भारतत्व मान्य करावें. दोहोंच्या संयोगानें अशी परिपूर्णता निर्माण होईल कीं, तिच्यांत मानवतेचें सर्वांगीण दर्शन घडेल.

## मालकी मानणें ही नास्तिकता

ख्रिश्चन धर्म अंमलांत आणण्याचें भाग्य हिंदुस्थानला प्राप्त झालें आहे असा माझा दावा आहे. माझा दुसरा नम्र दावा हा आहे कीं, या भूदान-यज्ञांत येशू ख्रिस्ताचा मला आशीर्वाद मिळाला आहे असें माझा आत्मा सांगतो. बुद्धभूमि असणाऱ्या गयेंत हि मीं म्हटलें होतें कीं, 'भगवान् बुद्धांचा आशीर्वाद मला मिळाला आहे.' अखेर येशू ख्रिस्तानें हि ही च शिकवण दिली आहे कीं, शेजाऱ्याच्या जीवनाहून आपलें जीवन वेगळें समजणें व त्याची चिंता ही आपली च चिंता न मानणें, ही कांहीं मानवता नव्हे. म्हणून च आज जमिनी-वर व संपत्तीवर जो मालकी हक्क मानला जात आहे तो आम्ही नष्ट करूं इच्छितों. अशा प्रकारचा मालकी हक्क स्थापित करणें हें अभक्तीचें,

अश्रद्धेचें व नास्तिकतेचें लक्षण आहे. ईश्वर या शब्दाचा च अर्थ प्रभु किंवा मालक असा आहे. इस्लाम धर्मांत त्याला 'मालक' म्हणतात, ख्रिश्चन धर्मांत 'गॉड्' व आपल्याकडे 'प्रभु' म्हणतात. तिन्हींचा हि अर्थ स्वामी हा च आहे. मग आपण जर मालकी हक्काचा दावा केला तर तें पाखंड होईल.

आतां ही गोष्ट चालणार नाहीं. मालकी कायम ठेवून दुसऱ्यांवर थोडी दया करण्यानें किंवा थोडें प्रेम करण्यानें यापुढें या विज्ञान युगांत चालणार नाहीं. आतां पूर्ण प्रेम च केलें पाहिजे. नानक म्हणतो,

**पूरा प्रभु आराधिआ, पूरा जाका नाउ ।**
**नानक पूरा पाइआ, पूरे के गुन गाऊ ॥**

अर्धवट प्रेम करणें हें मान्य होणार नाहीं हें कबिरानें हि म्हटलें आहे :

**कहे कबीर मैं पूरा पाया, सब घर साहिब दीठा ।**

येथें कबिरानें 'साहिब' हा शब्द योजला आहे. या शब्दाच्या द्वारा त्यानें ईश्वर, प्रभु, गॉड किंवा धनी, यांचें स्मरण केलें आहे. त्याला पूर्ण दर्शन घडलें होतें. आम्हांला हि पूर्ण दर्शन घडेल, तर पूर्णपणें प्रेम करतां येईल. विज्ञानाच्या युगांत अर्धवट दर्शन चालणार नाहीं. कांहीं लोक म्हणतात कीं, 'विज्ञानाचें युग अश्रद्धा आणील.' पण मला तर उलट च वाटतें. खरी श्रद्धा विज्ञानामुळें च पूर्ण होईल, सध्यां अर्धवट असणारा भक्ति-मार्ग पूर्णत्वाप्रत पोंचेल. पण जेव्हां आपण व्यक्तिगत मालकीचें विसर्जन करून सामूहिक मालकी मान्य करूं, तेव्हां च हें घडून येईल. आजचा 'कम्युनिस्ट' हा शब्द हि ख्रिस्ताच्या अनुयायांकडून च आलेला आहे. ते 'कम्युन' बनवून राहत असत, म्हणजे एकत्र राहत असत. व्यक्तिगत मालकीला तेथें थारा नसे. ही गोष्ट ख्रिस्ताच्या अनुयायांना च नव्हे तर हिंदुस्थानला हि मान्य आहे. भारतभूमीचा हा च दावा आहे.

एका तमीळ भक्ताची कहाणी आहे. तो एका बंद अशा अगदीं लहानशा खोलींत राहत असे. बाहेर पाऊस बरसत होता. कोणी तरी दरवाजा ठोठावूं लागलें, आणि विचारलें कीं, थोडी जागा देऊं शकाल का? त्यानें

उत्तर दिलें, हो, या कीं. इथें एक च माणूस निजूं शकतो खरा, पण दोन बसूं शकतील.' दोघे तेथें बसले. थोड्या वेळानें तिसरा माणूस आला. पाऊस बरसत च होता. त्या भक्तानें म्हटलें. 'या, इथें एक च निजूं शकतो दोघे बसूं शकतात, पण तिघे उभे राहूं शकतील.' त्यानें त्या तिसऱ्या माणसाला आंत घेतलें व तिघे हि उभे राहिले. अशा हजारों कहाण्या हिंदुस्थानांत, ऐकायला मिळतात.

## भाग्यशाली भरतभूमि

या भरत-भूमीवर असंख्य सत्पुरुषांचा अखंड वर्षाव होत आला आहे हे परमेश्वराचे महान् उपकार आहेत. त्यांच्यामुळें ही भूमि पवित्र झाली आहे. ज्या काळांत हिंदुस्थानची अगदीं निकृष्ट स्थिति झाली होती–पार-तंत्र्यामुळें जो निकृष्ट काल मानला जाईल व ज्या काळीं इंग्रजांचें येथें राज्य होतें–त्या निकृष्ट काळांत हि या पुण्यभूमीनें असंख्य सत्पुरुष निर्माण केले. ज्यांचा संदेश साऱ्या जगाला मान्य करावा लागला असे सत्पुरुष या भूमीनें निर्माण केले. हिंदुस्थानांत इस्लाम, खिरस्ती व पारशी हे धर्म आले, ही हि परमेश्वराची मोठी कृपा च आहे. या च प्रकारें येथील बुद्धधर्माचा विचार इतर देशांत पसरला. बुद्धधर्माचे प्रचारक हातांत तलवार घेऊन निघाले नव्हते. राज्य-सत्ता स्थापण्याची हि गोष्ट त्यांनीं कधीं केली नाहीं. त्यांनीं केवळ ज्ञानाचा च प्रसार केला. हिंदुस्थानच्या संपूर्ण इतिहासांत––आणि हा लहान नाहीं, तर ज्ञात इतिहास हि पांच हजार वर्षांचा आहे––त्यानें बाहेरच्या देशांवर आक्रमण केल्याचें कोठें आढळत नाहीं, ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. अशा देशाला खिरस्ताचा संदेश म्हणजे त्याची पैतृक संपत्ति च आहे.

खिरस्ताच्या अहिंसेचा विचार येथें इतका पसरला ही मला आश्चर्याची घटना वाटत नाहीं. जेथील लोक ईश्वरभक्तींत रमलेले आहेत––हिंदुस्थानांत कोठें हि जा, ईश्वराच्या नामस्मरणानें लोक मुग्ध झालेले दिसतील––तेथें खिरस्ताचा स्वीकार केला जाणें ही कांहीं आश्चर्याची गोष्ट नव्हे. पण आचरणांत आमच्याकडून कांहीं दोष घडून आले यांत शंका नाहीं. मी त्याबद्दल प्रभूची क्षमा-याचना करतों. (कांहीं काळ विनोबाजी अगदीं शांत राहिले) ......ज्यानें त्याला सुळावर चढवलें त्या माणसाला हि येशू

ख्रिस्तानें क्षमा केली, तेव्हां तो आम्हांला अवश्य क्षमा करील. . . . . . प्रभु अत्यंत क्षमाशील आहे. . . . . . (विनोबांचा कंठ दाटून आला व ते मिनिटभर स्तब्ध राहिले) . . . . . . तो आम्हांला कां बरें क्षमा करणार नाहीं ? आम्ही पुण्यवान् आहोंत असें आमचें मुळीं च म्हणणें नाहीं. उलट आम्ही अत्यंत पापी आहोंत. तरी हि येशू ख्रिस्ताचा हा शुद्ध विचार, हा संदेश, आम्हांला सहज ग्रहण करतां येण्यासारखा आहे. ख्रिस्ताचा जन्म गोशाळेंत झाला. आपल्या भाषेंत 'ह्युमॅनिटी' या शब्दाचा योग्य अनुवाद करणें कठिण आहे. त्याला योग्य शब्द सांपडत नाहीं असें मात्र त्याचें कारण नाहीं तर 'ह्युमॅनिटी' या शब्दानें लहानसा विचार व्यक्त होतो. येथें त्याऐवजीं 'भूतदया' हा शब्द योजला जातो. भूदतयेंत मानव-दया हि अंतर्भूत च असते, म्हणून ख्रिस्ताच्या संदेशाचा स्वीकार करण्यासाठीं आमचें हृदय सदैव खुलें च आहे. . . . . . (विनोबांचा कंठ पुन्हां दाटून आला व ते सद्गदित झाले.) . . . . आणि आजच्या या पवित्र दिनीं आम्ही त्यांचें पुण्यस्मरण करीत आहोंत.

## मानव-पुत्र ख्रिस्ताच्या मार्गावर

भूदानयज्ञाचें कार्य हें ख्रिस्ताच्या च पावलावर पाऊल टाकून चाललें आहे तेव्हां सर्वांनीं ह्याचें अनुसरण करावें असें जाहीरपणें मलबारमधील ख्रिश्चन देवळांतून सर्वांनीं सांगितलें, या गोष्टीमुळें मला अतिशय आनंद होत आहे. त्यांनीं योग्य असें च सांगितलें आहे. माझा तर असा दावा आहे कीं, या यज्ञामुळें ख्रिस्ताचा संदेश घराघरांत पोचेल. 'नांवाचें कांहीं महत्त्व नाहीं' असें ख्रिस्ताचें सांगणें होतें. कुणाला हिंदु म्हणतात, कुणाला मुसलमान, तर कुणाला ख्रिश्चन. या नांवांत काय आहे ? इस्लामाचा अर्थ शांति हा आहे. इस्लामनें चंद्र हा आदर्श मानला आहे. ज्या मनुष्याच्या आचरणांत दया नसते व शांति नसते, त्याला मुसलमान कसें म्हणतां येईल ? ज्याच्या आचारांत दया आहे, तो मुसलमान नसला, तरी त्याला मुसलमान म्हटल्याशिवाय कसें राहतां येईल ? म्हणून च ख्रिस्तानें म्हटलें आहे कीं, 'जो भुकेल्याला जेवू घालतो, त्यानें ईश्वराला जेवू घातल्यासारखें च होतें. जो तहानेल्याला पाणी पाजतो, त्यानें ईश्वराला पाणी दिल्यासारखें च होतें. थंडींत कुडकुडणाऱ्याला जो कपडा देईल, त्यानें ईश्वराला च कपडा दिल्यासारखें

होतें.' खिरस्त धर्म पंथ व संप्रदाय जाणत च नव्हता. येशू खिरस्त मानव-पुत्र होते असें मीं प्रारंभीं च सांगितलें. मी हि मानव-पुत्र या च नात्यानें हें कार्य सुरू केलें आहे. यामुळें च सारी मानवता प्रफुल्लित होईल. आज याहून जास्त सांगण्याची गरज नाहीं व माझी तशी योग्यता हि नाहीं. ईश्वराजवळ ही च प्रार्थना आहे कीं, त्यानें माझ्या वाणींत करुणा, दया, व प्रेम, ही ओसंडून द्यावी, म्हणजे त्याचें हें काम सफल होईल.

राजगंज २५-१२-५४

------

## महायुद्धाचीं मूळें आमच्या च जीवनांत आहेत : ३८ :

आपला हा देश फार मोठा आहे. येथल्या कोणत्या हि मुलाला विचारलें की, तुझे देशबांधव किती आहेत, तर तो छत्तीस कोटीचा आंकडा सांगेल. चीन देशाशिवाय इतर कोणत्या हि देशाच्या नागरिकांच्या तोंडून एवढा मोठा आंकडा ऐकूं येणार नाहीं. युरोपांतील देशाच्या लोकांना विचारलें, तर कोणी एक कोट, कुणी दोन कोट तर कुणी चार कोटींचा आंकडा सांगेल. याप्रमाणें लहान लहान आंकडे च तेथें सांगण्यांत येतील. पण आपण मात्र केवढें मोठें आहोंत, आपलें वैभव केवढें मोठें आहे! हें सारें काय आहे याचा आपण अधिक विचार केला पाहिजे. कारण ज्याप्रमाणें असंख्य नद्या समुद्रांत विलीन होतात आणि समुद्र सगळ्या नद्यांना उदारपणें आश्रय देतो, कुणाचा हि अव्हेर करीत नाहीं त्याप्रमाणें भरत-भूमीनें जगांतील साऱ्या जातींचें प्रेमानें स्वागत केलें व सर्वांना आश्रय दिला.

मी एक दृष्टान्त देतों. पारशी लोक इराणांतून येथें आश्रयार्थ आले. येथल्या सहृदय लोकांनीं त्यांना आश्रय दिला. त्यांच्या ज्या रीति होत्या, त्याप्रमाणें ते आपली उपासना चालवीत. आपला भक्तिमार्ग चोखाळीत. त्यांत आम्ही कसला हि बाध आणला नाहीं. आज पारशी जमात या च देशाला आपला देश मानते व तिला येथें सुरक्षित वाटतें.

मी एक गंमतीची गोष्ट सांगतों. येथें जे पारशी आले ते देवांची निंदा व असुरांची प्रशंसा करीत. तरी हि येथील लोकांनीं त्याबद्दल कसला हि गैरसमज करून घेतला नाहीं. येथें मात्र देवांची स्तुति व असुरांची निंदा केली जाते. पण पारशी लोकांत असुरांची स्तुति व देवांची निंदा करण्यांत येते. कारण त्यांच्या भाषेंत असुर शब्दाचा अर्थ च भगवान् असा आहे. शब्द उलटा असला, तरी अर्थ तो च आहे. भगवंताला ते मोठा असुर म्हणजे 'अहुर-मज्द' असें म्हणतात. आणि देवांना 'भ्रांत' मनुष्यांना पीडा देणारा भूत किंवा पिशाच म्हणतात. अशा प्रकारच्या देवांची त्यांनीं निंदा केली आहे. परंतु येथील लोकांनीं योग्य अर्थ ग्रहण करून उलटे दिसणारे शब्द सहन केले ही फार मोठी गोष्ट आहे. पारशी जमात येथें आक्रमकांच्या रूपांत आली नाहीं. ते लोक जेव्हां येथें आले,तेव्हां आश्रय मागण्यासारखें असें कोणतें च बल त्यांच्या-पाशीं नव्हतें. पण तरी हि ते आश्रयासाठीं आले व येथील लोकांनीं त्यांना आश्रय दिला. त्यांच्या भरण-पोषणाची जबाबदारी भारतानें स्वीकारली. सारांश, येथील जनता ज्ञानी लोकांच्या विचारांचें च अनुसरण करीत राहिली आहे. म्हणून च आमचा विकास झाला.

हल्लीं येथें नाना प्रकारचे 'वाद' चालतात. वादांचे प्रकार किती तरी आहेत. 'बिहार-बंगाल' चा वाद सध्यां चालू आहे. तरी हि भारता-पासून विभक्त होऊन आम्हांला आपलें वेगळें राष्ट्र पाहिजे अशी मागणी बिहार-वाले हि करीत नाहींत व बंगालवाले हि करीत नाहींत. आपण सारे भारतीय आहोंत, भारतवासी आहोंत आणि एका च अखंड राज्यांत राहूं इच्छितों. जे दुसरे वाद चालतात, ते अगदीं फुटकळ स्वरूपाचे आहेत. त्यांच्या मागें अभिमानाची भावना नाहीं. आजकाल या वादांत हि थोडी अभिमानाची व कटुतेची भावना उत्पन्न झाली असली,तरी युरोपांतील देशांत जी अभिमानाची व कटुतेची वृत्ति आढळून येते तशी येथें आढळत नाहीं. दोन देशांना विभक्त करणारा असा कोणता हि पर्वत किंवा डोंगर फ्रान्स व जर्मनीच्या मध्यें नाहीं पण अशा पर्वताची आवश्यकता त्यांना वाटूं लागली आहे. दोन्ही देश अगदीं जवळ जवळ आहेत. त्यांची लिपि व धर्म हि एक आहेत, त्यांच्या भाषा हि सारख्या आहेत. त्यांच्यांत रोटीबेटी व्यवहार हि होऊं शकतो. तरी हि फ्रान्स हा आपला वेगळा देश आहे असें फ्रेंच लोकांनीं मानलें व जर्मनी हा आपला

वेगळा देश आहे असें जर्मनांनीं मानलें. फ्रान्स, जर्मनी व इंग्लंड यांच्यांतील लढाया या राष्ट्रीय लढाया मानल्या जातात. आपसांतील यादवी युद्धें असें नांव त्यांना दिलें जात नाहीं. पण हिंदुस्थानांत मराठ्यांच्या ओरिसा-वाल्यांशीं किंवा रजपुतांशीं ज्या लढाया झाल्या, तीं यादवी युद्धें मानलीं गेलीं आहेत. येथें ज्या लढाया झाल्या तीं आपसांतील यादवी युद्धें मानलीं जातात, ही खरोखर अभिमानाची गोष्ट आहे. परकीयांनीं यांना यादवी युद्धें म्हणून च संबोधिलें व येथील लोकांनीं हि तसें च मानलें.

रशिया वगळला तर उरलेल्या युरोपइतका मोठा हिंदुस्थान देश आहे. युरोपांत जशा अनेक भाषा आहेत, तशा च येथें हि आहेत. एवढें च नव्हे, तर युरोपांत एक च लिपि आहे, तर येथें अनेक लिप्या आहेत. आणि तेथें एक च धर्म आहे, तर येथें अनेक धर्म आहेत. एवढें मोठें अंतर व भेद असतां हि आम्ही सगळे आपणांस एका देशाचे च रहिवासी मानतों, तर तेथील लोक आपणांस एका खंडाचे रहिवासी मानतात. तेथील कांहीं देश आमच्याकडील प्रांताच्या एखाद्या भागाइतके च आहेत. तरी हि ते स्वतःला वेगवेगळीं राष्ट्रें मानतात, कारण त्यांची भाषा वेगवेगळी आहे. हिंदुस्थानांत असा प्रकार अनुभवास येत नाहीं. येथील समाजशास्त्रामधें व्यापक बुद्धि आहे. म्हणून च रवींद्रनाथांनीं आपल्या काव्यांत म्हटलें आहे कीं, 'हा महा-मानवांचा सागर आहे.' यांत अनेक लोक समाविष्ट झाले व आणखी हि कित्येक होतील. आपल्या देशांत विविधता असून हि एकता नांदत आहे.

## ही एकता इंग्रजांमुळें नव्हे

ही एकता इंग्रजांनीं निर्माण केलेली नव्हे. या देशाचे अधिकांत अधिक तुकडे व्हावे अशी च इंग्रजांची इच्छा होती व त्या प्रमाणें त्यांचे प्रयत्न हि होते. लंका वेगळी करणें त्यांना शक्य झालें व त्यांनीं तसें केलें. ब्रह्मदेश हि वेगळा करणें शक्य झालें व त्यांनीं तो वेगळा केला. आम्ही देखील त्या गोष्टीला विरोध केला नाहीं. कारण जवळच्या देशांना वेगळें रहावेसें वाटत असेल तर त्यांनीं वेगळें रहावें असें आम्ही मानीत होतों. वस्तुतः इंग्रजांनीं आणखी हि किती तरी भेद वाढवले. हिंदु-मुसलमानांत पूर्वी-पासून च कांहीं भेद होता, त्यांत हि इंग्रजांनीं भर घातली. आणि त्याचा

च परिणाम म्हणजे आज हिंदुस्थानचे दोन तुकडे झालेले दिसत आहेत. जिच्या-मुळें हा देश आम्ही एक मानतों, ती आमची संस्कृति आहे. पण इंग्रजांनीं मात्र हिंदुस्थान व पाकिस्तान अशीं दोन राष्ट्रें बनविलीं.

कांहीं लोकांची अशी समजूत आहे कीं, इंग्रजांमुळें येथें इंग्रजी भाषेचा प्रसार झाला व सर्व प्रांतांतील लोक ती शिकल्यामुळें एकमेकांशीं बोलूंचालूं शकले व त्यामुळें च हिंदुस्थानांत एकता निर्माण झाली. परंतु ही समजूत अगदीं चुकीची आहे. आपल्यांत वेदांच्या काळापासून च एकतेची भावना स्थिर झाली होती. तरी तेव्हां आजच्यासारखीं दळणवळणाचीं साधनें नव्हतीं. त्या काळीं ऋषींच्या सांगण्याप्रमाणें सिंधुनदीपासून तों हिमालयांतील गुहांपर्यंत एक च देश मानला गेला होता. येथें एका संस्कृतीचा विकास झाला. देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत असंख्य लोक यात्रा करीत. असंख्य सत्पुरुष हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत सद्विचारांचा प्रचार करीत असत. म्हणून आपला देश एक बनला आहे. असा हा वारसा आम्हांला मिळाला आहे म्हणून च आपण एवढे श्रीमान् आहोंत.

## इतिहासानें सोपवलेली जबाबदारी

पण मोठा वारसा सांभाळण्यासाठीं हि अक्कल पाहिजे असते. ही जर अक्कल आमच्यांत नसेल, तर देशाची विराट जनसंख्या व विस्तार ही जी आमची शक्ति आहे, ती च आमची निर्बलता ठरेल. तेव्हां देशाच्या इति-हासानें आपल्यावर अशी मोठी जबाबदारी टाकली आहे कीं, येथें ज्या समस्या उत्पन्न होतील, त्या प्रेमानें व शांततेच्या मार्गानें सोडविल्या पाहिजेत. ही जबाबदारी आम्ही जर सांभाळूं शकलों नाहीं, तर देशाची विशालता ही आमची निर्बलता ठरून परिणामस्वरूप आपलें स्वातंत्र्य हि टिकणार नाहीं. इतिहास आम्हांला हें शिकवीत आहे कीं, या देशावर इतरांनीं जीं आक्रमणें केलीं त्यांचें कारण हें आहे कीं, येथील लोकांना आपल्या विविधतेची आंतरिक जाणीव झाली नाहीं. यामुळें भेद वाढत गेले, जातीय भावना वाढल्या, एकमेकांशीं विरोध सुरू झाले व अखेर हिंदुस्थानला अनेक शतकें दास्यांत खितपत पडावें लागलें.

## शांति व प्रेम यांचा मार्ग अनिवार्य

म्हणून आपल्या देशासाठीं शांतीचा व प्रेमाचा मार्ग हा अनिवार्य होऊन बसला आहे. आपण शांतीनें व प्रेमानें च आपल्या समस्या सोडवाव्या, अशी परमेश्वरानें च योजना करून ठेवली आहे हें आपलें सुदैव च आहे. मी हें आपलें सुदैव यासाठीं म्हणतों कीं, जर आम्हीं शांतीनें व प्रेमानें आपले प्रश्न सोडविले नाहींत, तर आमचें सामर्थ्य व आमची संपत्ति हीं वाढूं शकणार नाहींत, अशी योजना परमेश्वरानें करून ठेवली आहे. हिंदुस्थाननें आपलें लष्करी सामर्थ्य वाढविण्याचें ठरवलें, तर तो अगदीं निर्बल बनून जाईल, गुलाम होईल. त्याला अमेरिका किंवा रशिया यांपैकीं कुणाला तरी शरण जाणें भाग पडेल. आणि मग आपलें स्वातंत्र्य टिकणार नाहीं. म्हणून च शांतीनें व प्रेमानें आपले प्रश्न सोडविणें हें आपल्या देशाला अपरिहार्य होऊन बसलें आहे हें मी आपलें सद्भाग्य च समजतों.

आपल्या समस्या शांति व प्रेमानें यांच्या साह्यानें च सोडविणें हें जसें आपल्या देशाला अनिवार्य होऊन बसलें आहे, त्या च प्रमाणें जगानें हि आपल्या समस्या शांति व प्रेम यांच्या मदतीनें च सोडविणे हें विज्ञानाच्या दृष्टीनें हि अनिवार्य होऊन बसलें आहे. आजचीं शस्त्रास्त्रें हीं मनुष्याच्या हातीं राहिलेलीं नाहींत. शस्त्र-शक्तीमध्यें किती ही दोष असले, तरी जोंवर तीं मनुष्याच्या नियंत्रणाखालीं राहील, तोंवर तिच्यापासून थोडा बहुत लाभ हि होऊं शकेल. पण आज मात्र विज्ञानाचा विकास एवढा मोठा झाला आहे कीं, शस्त्र-शक्ति ही आतां मनुष्याच्या हातीं राहिलेली नाहीं. समजा, एखाद्यानें बिडी पिऊन न विझवतां फेकून दिली व त्यामुळें त्याच्या घराला आग लागली तर ती विझ-विण्याचें सामर्थ्य त्याच्यामध्यें राहणार नाहीं. त्यानें जाणूनबुजून जरी नसली, तरी निष्काळजीपणामुळें कां होईना पण आग लावली असते च. त्याच्यांत सहजपणें आग लावण्याची शक्ति असते व तो घराला आग लावूं शकतो, पण ती आग विझविण्याची शक्ति मात्र त्याच्यांत नसते. विज्ञानाच्या या युगांत लागल्या जाणाऱ्या आगींमुळें कांहीं घरें च नाहींत, तर देशच्या देश बेचिराख होऊन जातात. मानवतेचा व मानवजातीचा समूळ उच्छेद करण्याची शक्ति विज्ञानानें निर्माण केली आहे. म्हणून च आपल्या समस्या शांतीनें

व प्रेमानें सोडविणें हें जगाला आतां अवश्य होऊन बसलें आहे. तसें च एका देशांत जी पद्धति चालू आहे ती च प्रत्येक देशांत चालू केली पाहिजे असा आग्रह हि कधीं धरतां उपयोगी नाहीं. आमची वृत्ति ही आग्रही नाहीं. प्रत्येक देशाचे भिन्न-भिन्न गुण असतात. म्हणून प्रत्येक देशांत एका च प्रकारची राज्यव्यवस्था किंवा समाजरचना असली पाहिजे असा आग्रह आम्हीं धरतां कामा नये. प्रत्येक देशानें आपापल्या विशेष परिस्थितिनुसार वेगळी समाजरचना करावी, अशी अनाग्रही वृत्ति जर आम्हीं ठेवली, तर जगांत शांति नांदेल, नाहींतर साऱ्या जगावर अशांततेचें संकट कोसळेल. आज हिंदुस्थानला जें आंतरराष्ट्रीय रूप प्राप्त झालें आहे, हिंदुस्थानची जी प्रकृति व जी ऐतिहासिक जबाबदारी आहे, त्या सर्वांमुळें शांतीचा मार्ग हा आपल्याला अनिवार्य होऊन बसला आहे. तसें च विज्ञानाच्या आजच्या प्रगतीमुळें शांतीचा मार्ग हा जगाला हि अनिवार्य होऊन बसला आहे. आपल्या विशिष्ट परिस्थितिमुळें जसा तो आपल्याला अनिवार्य आहे त्या च प्रमाणें विज्ञानामुळें साऱ्या जगाला हि तो अनिवार्य च आहे. आतां आपले प्रश्न सोडविण्यासाठीं शांतीचा मार्ग च स्वीकारणें भाग पडणार आहे. आग लागूं नये याबद्दल आम्हीं सावधगिरी बाळगली पाहिजे आणि लागली च तर ती चटकन् विझवतां आली पाहिजे.

## लोहियांचे भारतीय परंपरेचे उद्गार

इंदुरमध्यें जेव्हां गोळीबार झाला, तेव्हां माझ्यानें राहवलें गेलें नाहीं. मीं म्हटलें कीं, स्वराज्यांत असा गोळीबार होणें इष्ट नाहीं. स्वराज्यांत आंदोलन चालविणाऱ्यांवर हि जबाबदारी आहे कीं, त्यांनीं स्वतःवर नियंत्रण ठेवावें व हिंसा होऊं देऊं नये. सरकारच्या अधिकाऱ्यांनीं हि ही वृत्ति ठेवावी कीं, गोळीबाराचा प्रसंग आणतां कामा नये. यासाठीं च त्रावणकोर-कोचीनमध्यें जेव्हां गोळीबार झाला, तेव्हां राममनोहर लोहियांची निषेधाची वाणी गरजली. तेथें सोशॅलिस्टांचें सरकार असून हि त्यांनीं आपला स्पष्ट निषेध व्यक्त केला. त्यावर मग बरी च चर्चा झाली. त्यांच्या बाजूनें व विरुद्ध बाजूनें जीं कांहीं भाषणें केलीं गेलीं, त्यांच्यांत मी पडूं इच्छीत नाहीं परंतु त्रावणकोर-कोचीनमध्यें त्यांच्या च पक्षाचें सोशॅलिस्ट सरकार असतां हि त्यांच्या

अंतःकरणांतून निषेधाचे जे स्वयंस्फूर्त उद्गार बाहेर पडले, ते भारतीय उद्गार आहेत अशी माझी भावना आहे. त्यांच्याविषयीं माझी पूर्ण सहानुभूति आहे.

## हिंसेसंबंधीं एक चुकीचा समज

हिंसेनें सगळे प्रश्न सोडविले जाऊं शकतात व तात्काळ सोडविले जाऊं शकतात असा जो आज-काल समज होऊन बसला आहे, तो अगदीं चुकीचा आहे. प्रश्न सोडविला गेला असा नुसता आभास च असतो. या आभासामुळें च प्रश्न सुटला असें जर आम्ही समजूं लागलों, तर तें चुकीचें ठरेल. समजा एखाद्या ठिकाणीं घाण झाली आहे व झाडण्यास आरंभ केला, तर फार उशीर होईल या कल्पनेनें त्या घाणेरड्या जागेवर च जाजम पसरलें व स्वच्छ झालें या कल्पनेनें लोक त्यावर बसून सभा सुरू झाली आणि जाजमाखालून एखादा विंचू निघून कुणाला चावला व त्या गोंधळामुळें सभा समाप्त झाली! सारांश, केरसुणीनें नीट झाडण्यास वेळ लागेल या विचारानें खालची घाण नुसत्या जाजमानें झाकून टाकण्यानें खरी स्वच्छता होत नाहीं. खऱ्या स्वच्छतेसाठीं कांहीं परिश्रम घ्यावे लागतात. संस्कृतमध्यें एक सुभाषित आहे. मुलानें गव्हाचा एक दाणा पेरला. दोन-चार दिवस वाट पाहिली पण कांहीं उगवलें नाहीं. अखेर पांचवें दिवशीं थोडासा अंकुर फुटलेला दिसतां च मुलाला वाटलें कीं, एवढासा अंकुर येण्यास इतका उशीर कां लागावा? तेव्हां अंकुर चटकन् वाढण्यासाठीं त्यानें तो वर ओढला. पण दुसरे दिवशीं पाहतो तों, अंकुर क्षीण होऊन गेला होता. वरती ओढून कधीं अंकुर वाढत असतो का? त्यासाठीं कांहीं काळ लागतो व तेवढा तो जाणें अवश्य च असतें. यांत वेळ कमी लागण्यासाठीं जर प्रयत्न झाले, तर ते उलटे च प्रयत्न ठरतात. त्यामुळें सगळें च बिघडून जातें. म्हणून हिंसेनें प्रश्न चटकन् सोडवितां येतात हा समज अतिशय चुकीचा आहे.

## देहप्रधान शिक्षणाचे परिणाम

आजकाल लोकांचा हिंसेवर इतका विश्वास बसला आहे कीं, हिंसेनें च सारे प्रश्न सुटूं शकतात, असें ते मानूं लागले आहेत. पण ही समजूत साफ चुकीची आहे. घरांत हि आईबाप मुलाला थप्पड मारतात. याचा अर्थ असा कीं, आपल्या प्रेमापेक्षां व आपल्या समजावण्याच्या शक्तीपेक्षां त्यांचा मार देण्यावर

अधिक विश्वास असतो. शाळेंत हि असें च होत असतें. मुलगा शाळेंत उशिरां आला तर त्याला नियमितपणा शिकविण्यासाठीं मास्तर छडी मारतो. व नंतर मुलगा शाळेंत नियमित येऊं लागतो. तेव्हां तो म्हणतो, 'पहा बरें, काम झालें कीं नाहीं? त्याच्या शरीराला छडीचा स्पर्श झाल्याबरोबर त्याच्यांत सद्‌गुणांची प्रेरणा झाली. म्हणून सद्‌गुणांच्या प्रेरणेसाठीं छडी केवढी उपयुक्त आहे!'— असें याबद्दल म्हटलें जातें. पण हें म्हणजे व्याजासाठीं मूळ मुद्दल गमाविण्यासारखें च आहे. छडी मारल्यामुळें मुलगा शाळेंत नियमित जातो खरा, पण त्याबरोबर च तो भीति हि मनांत रुजवीत असतो. जो तुला मारील, त्याला तूं भी, हें शिक्षण त्याला मिळतें. याप्रमाणें निर्भयता टाकून तो नियमितता शिकतो, एवढा च याचा अर्थ झाला.

आपण च सांगा कीं, निर्भयतेचें मूल्य जास्त कीं नियमिततेचें? यांत एक पैसा मिळवला व रुपया मात्र गमावला, असें च झालें. मुलगा चार दिवस शाळेंत नियमानें जाईल. पण वरचें दडपण सारखें राहिलें नाहीं, तर तो नियमितता हि विसरून जाईल हा संभव आहे. तेव्हां ही नियमितता हि टिकणारी नाहीं आणि तिच्याबरोबर च भीति मात्र आली. अशा प्रकारचें शिक्षण हें अनिष्ट आहे. आज हा मुलगा भीतीमुळें शिक्षकाच्या किंवा आई-बापांच्या म्हणण्याप्रमाणें वागेल. पण उद्यां तो एखाद्या जुलमी माणसाच्या म्हणण्याप्रमाणें हि वागूं लागेल. असें शिक्षण हें मुलाला देहप्रधान बनविणारें आहे. यांत त्याला हें शिकविलें जातें कीं, शरीराला कांहीं भय उत्पन्न झालें कीं, भय देणाऱ्याला शरण गेलें पाहिजे. या शिक्षणाचा अर्थ हा कीं, यामुळें आम्ही आपले सद्‌गुण संकटांत टाकतों. अखेर जुलमी माणसांजवळ तरी अशी कोणती सत्ता असते? ही च ना कीं, ते मारूं शकतात व धमकावूं शकतात? या शिक्षणामुळें सारें च नागरिक-शास्त्र व्यर्थ होऊन जाईल.

तेव्हां एखादी समस्या सुटण्यास उशीर लागला, तर हिंसेनें ती लवकर च सुटेल, असा जो आम्ही विचार करतों, तो केवळ एक भ्रम आहे. अनादिकाला-पासून लोक या भ्रमांत गुंतून राहत आले आहेत. दहा हजार वर्षांपासून हिंसेचे प्रयोग चालत आले आहेत. एका हिंसेंतून दुसरी हिंसा निर्माण होणें, ही च हिंसेची प्रक्रिया आहे, हा अनुभव येऊन चुकला आहे. तरी हि मनुष्य

आज हि असें समजतो कीं, हिंसेच्या लढाईंत आपण जे हरलों, ते हिंसेच्या क्रियेंत च दोष आहेत म्हणून नाहीं, तर आमची हिंसाशक्ति प्रतिपक्षापेक्षां कमी पडली म्हणून हरलों. शस्त्रास्त्रांच्या लढाईंत हरणाऱ्यांना हिंसेंत कांहीं शक्ति नाहीं असें वाटत नाहीं, तर आपण पुरेसे हिंसक नव्हतों, तेव्हां आतां हिंसा-शक्ति अधिक वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असें ते समजतात. आणि मग हरलेला पक्ष शस्त्रास्त्रें वाढविण्याचा प्रयत्न करतो व जिंकतो आणि नंतर जो हरतो तो शस्त्रास्त्रें वाढविण्याच्या उद्योगाला लागतो.

## युद्धाची गंगोत्री आमच्या च घरांत

याप्रमाणें एकमेकांचें पाहून हिंसा-शक्ति वाढवितां-वाढवितां आज आम्ही सर्वंकष युद्धापर्यंत (टोटल वॉर) येऊन ठेपलों आहोंत. आज एका व्यक्तीची दुसरीशी किंवा एका जमातीची दुसऱ्या जमातीशी अशी लढाई होत नाहीं तर एका राष्ट्र-समुहाची दुसऱ्या राष्ट्रसमूहाशीं लढाई होत असते. पण या युद्धाचे उगमस्थान, या युद्धाची गंगोत्री कोठें आहे ? ॲटम बॉंब किंवा हायड्रोजन बॉंबपर्यंत जी शस्त्रास्त्र वाढ झाली आहे, तिचा आरंभ कोठून झाला आहे? हा आरंभ परमप्रिय असे आईबाप व गुरु यांच्याकडून झाला आहे, हें अगदीं स्पष्ट आहे. आपल्या मुलांना सद्‌गुणी बनविण्यासाठीं ज्यांनीं मारण्या-ठोकण्याचा मार्ग स्वीकारला, ते च ॲटम व हायड्रोजन बॉंबची गंगोत्री होत. 'माझें सांगणें तुम्हाला पटलें, तर तसें वागा, नाहीं तर वागूं नका'–अशी शिकवण जर आईबाप व गुरु यांनीं कटाक्षानें दिली, तर च देश वांचेल. या च प्रकारच्या शिकवणुकीनें आम्ही विचार-प्रधान बनूं. जी गोष्ट मान्य होईल, ती च स्वीकारली पाहिजे व जी पटणार नाहीं, तिचा स्वीकार करतां कामा नये.

पण आजकाल तर सारें उलटें च चाललें आहे. मुलांना सगळीकडे मार मिळत आहे. मुलांना तर असें शिकविलें पाहिजे कीं, जी गोष्ट तुम्हांला पटत नाहीं, ती तुम्ही करूं नका. कुणी तुम्हांला मारलें, ठोकलें तरी त्याचें म्हणणें मान्य करूं नका व मार खात रहा. शांतीनें असा मार खात राहण्याची ही शक्ति, ही तितिक्षा म्हणजे च निर्भयता होय. शस्त्रांवर अवलंबून राहणें हें निर्भयतेचें नव्हें, तर भित्रेपणाचें लक्षण आहे. म्हणून च भीतीच्या आहारीं

जाऊन कांहीं करतां कामा नये हें तत्त्व आम्हीं शिक्षण प्रणालींत ग्रथित केलें पाहिजे. आम्हीं मुलांना दोन गोष्टी शिकविल्या पाहिजेत (१) आम्ही कुणाला भिणार नाहीं व कुणाला भिवविणार नाहीं आणि (२) आम्ही कुणाकडून दडपले जाणार नाहीं व कुणाला दडपणार हि नाहीं. ही च गोष्ट गीतेंत हि सांगितली आहे. '**नायं हन्ति न हन्यते ।**'—हा मारत नाहीं व मरत हि नाहीं.

## पहिली गरज अभयाची च

म्हणून मी असा मार्ग चोखाळूं इच्छितों कीं, ज्यामुळें समस्या तर सुटाव्या, पण अशांति किंवा मनःक्षोभ तर निर्माण होऊं नये व वृत्तींत भय उत्पन्न होऊं नये. आपल्या इतिहासज्ञांना ही गोष्ट माहीत होती. म्हणून आपल्या समाजशास्त्रांत 'अभय' हा शब्द आढळतो. पण आज मात्र त्याच्याऐवजीं 'कायदा व सुरक्षा' हे शब्द आले आहेत. भीतीमुळें कां होईना, पण आज लोक 'कायदा व सुरक्षा' यांना मान देतात. याप्रमाणें आम्हीं व्यवस्थादेवीला च सर्वश्रेष्ठ देवीचा मान दिला आहे. आम्ही तिला म्हणतों कीं, 'देवी, तूं परमदेवी आहेस. तूं च आमचें रक्षण करतेस. तूं च आमचा आधार आहेस.' या देवीवर लोकांची इतकी श्रद्धा बसली आहे कीं, नास्तिक लोक हि तिला मान देतात. कम्युनिस्ट लोक म्हणतात कीं, 'आम्ही ईश्वर मानीत नाहीं.' यावर मी त्यांना विचारतों कीं, 'तुम्ही ईश्वर मानीत नाहीं खरें. पण ईश्वराच्या बापाला मात्र तुम्ही मानतां—व्यवस्था देवाला तुम्ही मानतां ना?'

कांहीं लोक तर असें हि म्हणतात कीं व्यवस्था करतां करतां कांहीं लोकांना पूर्ण नामशेष करून टाकावें लागणार आहे.

याप्रमाणें कांहीं माणसें साफ उडवून टाकल्यानंतर अशी व्यवस्था निर्माण होईल कीं, तिच्यांतून संघर्ष च नाहींसा होऊन जाईल. संघर्ष हें या लोकांचें परम सत्य आहे. 'संघर्ष नाहींसा झाला तर, मग काय होईल?' असें जेव्हां मी त्यांना विचारतों, तेव्हां ते उत्तर देतात, 'मग सृष्टीशीं आमचा संघर्ष सुरू होईल.' वस्तुतः ही सारी विचारसरणी च चुकीची आहे. व्यवस्थेचें महत्त्व आम्ही हि मानतों. आतां च मीं आपल्याला समजावून शांत बसण्यास सांगितलें. पण समजाविण्याच्या ऐवजीं मी जर मारठोक

सुरू केली असती, तर तुम्हीं शांत राहिला असता खरे, पण तुमचें ऐकण्याकडे लक्ष राहिलें नसतें. तुम्हीं कसलें हि ज्ञान मिळवूं शकला नसता. कारण तुमची शांति ही बाह्य शांति झाली असती. पण आंत मात्र भय च ठाण मांडून राहिलें असतें. तेव्हां या शांतीला खरी शांति म्हणतां येणार नाहीं. कारण आंत जो उसळत राहतो, तो क्षोभ असतो. क्षोभ जर बाहेर प्रकट झाला नाहीं, आणि आंतल्या आंत धुमसत राहिला, तर तो अधिक अनर्थकारक ठरतो. तो प्रकट झाला, तर कांहीं बिघडत नाहीं. पाण्याची वाफ आंत कोंडून ठेवली, तर तिच्या शक्तीवर आगगाड्या चालवतां येतात. या च प्रमाणें क्षोभ बाहेर पडला, तर त्यांत फार सामर्थ्य राहत नाहीं. पण आपण जर तो आंत दाबून टाकला, तर त्यामुळें अधिक अनर्थ होतो. आज तुम्ही इतक्या शांततेनें येथें बसलां आहांत, कारण शांत राहण्याबद्दल मीं तुम्हांला नीट समजावून सांगितलें, तुम्हांला दरडावलें नाहीं. पण भीति दाखवून जर आम्ही शांति निर्माण करूं लागलों, तर ती व्यवस्थादेवी 'देवी' राहणार नाहीं, तर 'व्यवस्था-राक्षसी' बनेल. या राक्षसीच्या पोटांत एवढी मोठी व्यवस्था थैमान घालील, कीं तिच्या तुलनेंत बाहेरची प्रकट अव्यवस्था आम्हांला मान्य करावी लागेल. म्हणून च व्यवस्था स्थापित करण्यापेक्षां 'अभय' निर्माण करणें हें अधिक आवश्यक आहे.

## एक होण्याची बुद्धि

झरिया हें एक मोठें कुरुक्षेत्र आहे असें मीं आज ऐकलें. येथें नेहमीं लढाया, झगडे चालतात. येथें किती दुर्योधन, दुःशासन व इतर कौरवपुत्र आहेत हें मला माहीत नाहीं. पण येथें मजूर राहतात एवढें मला ठाऊक आहे. त्यांच्याकडून काम घेतलें पाहिजे व कसल्या हि परिस्थितींत तें करवून घेतलें च पाहिजे, असें मानलें जातें. त्यांच्याकडून कोळसा खणवून घ्यावयाचा असतो. खाणींतून कोळसा निघाला नाहीं तर देशाच्या तोंडाला काळोखी लागेल. तेव्हां मजुरांकडून काम करवलें च पाहिजे असें मानलें जातें. मजूर या शब्दाचा अर्थ आहे श्रमशील. जेथें श्रमशील लोक असतात, तेथें शांति असली च पाहिजे. जेथें लोक आळशी असतात तेथें अशांति निर्माण होते. जेथें श्रम करणारे असतात, तेथें लक्ष्मी निर्माण होते. पण आज तर सगळें उलटें च दिसून येतें. जेथें श्रम करणारे असतात, तेथें दोन पक्ष उत्पन्न होतात

व दोघांचें हित हें भिन्न-भिन्न आहे असें मानलें जातें. एकाचे दोन व दोहोंचे चार याप्रमाणें अधिकाधिक तुकडे करण्याची अक्कल तर जगांत सर्वांना च असते. पण चारांचे दोन व दोहोंचा एक बनविण्याची अक्कल कुणांत नाहीं. गीतेंत जिला राजसी बुद्धि म्हटलें आहे, ती तुकडे करण्याची अक्कल सर्वांना आहे. तिच्यामुळें च याचें त्याच्याशीं व त्याचें याच्याशीं पटत नाहीं आणि अनेक तुकडे होत राहतात. पण सर्व लोकांत जो एक समान अंश आहे, तो घेऊन त्यावर च सर्वांना एकत्रित करण्याची बुद्धि आतां सुचली पाहिजे.

## गुंडांचें राज्य

येथें गुंडांचें राज्य चालू आहे असें मला सांगण्यांत आलें. पण गुंडांचें राज्य नाहीं, अशी एक हि जागा या पृथ्वीवर शोध करून हि आढळणार नाहीं. ज्यांना 'गुंड' म्हणतात अशा प्रकारचे कांहीं गुंड असतात आणि ज्यांना 'सेनापति' किंवा 'कार्यकर्ता' असें म्हणतात, असे दुसऱ्या प्रकारचे गुंड असतात. आम्ही सारे शिक्षित लोक आपल्या रक्षणाचा भार पोलिस व सेना यांच्यावर सोंपवून मोकळे होतों, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. याहून अधिक अनर्थ कोणता होऊं शकतो ? याहून अधिक परतंत्र दशा कोणती असूं शकते ? आणि हे सैनिक तरी कसे असतात ? त्यांच्यांत गुण कोणते हवेत ? तर ज्याची छाती बत्तीस इंच भरेल तो शिपाई होऊं शकतो. बस्स, एवढा च गुण त्यांच्यांत असतो आणि अशांच्या भरंवशावर आम्ही देश अवलंबून ठेवतों. त्यांच्यासाठीं आणखी काय काय करावें लागतें तें पहा. मुंबई प्रांतांत दारूबंदी झाली आहे तर तेथें सैनिकांना यापासून मुक्तता मिळाली पाहिजे अशी मागणी करण्यांत येते. सेनेला दारू पिण्याची सवलत मिळाली पाहिजे ! हें ऐकून मला वाटलें कीं, रावणाच्या सैन्यांत सर्वजण दारू पीत होते. पण रामाच्या सैन्यांतील वानर-सैनिकांना दारूची जरूर वाटत नव्हती. हनुमंताला दारूची गरज जाणवत नव्हती. तेव्हां राष्ट्राची रक्षक अशी ही आमची सेना राक्षसी आहे कीं, सात्त्विक आहे याचा आपण विचार केला पाहिजे. तुलसीदासांनीं 'हनुमान-चालिसा' लिहिलें. वस्तुतः रावण चांगला सामर्थ्यशील होता, पण त्याच्यावर 'रावण-चालिसा' कांहीं लिहिलें गेलें नाहीं. कारण हनुमानाची शक्ति ही आम्हांला रक्षिणारी होती, रावणाची शक्ति तशी नव्हती. हनुमानाच्या शक्तीनें च देशाचें रक्षण होईल, रावणाच्या शक्तीनें नव्हे.

पण आज तर आम्ही गुंडांना हनुमानाची पदवी बहाल करूं इच्छितों. ज्या सैनिकांना दारू पाजणें अवश्य होते, उपभोगाचीं साधनें पुरवणें अवश्य होतें व रणक्षेत्रावर पाठविल्यावर ज्यांच्या भोगविलासासाठीं स्त्रिया पुरवाव्या लागतात, अशा सेनेला आम्ही आपल्या रक्षणाचे आधारस्तंभ मानूं लागलों आहोंत. त्यांच्या अनीतीला हि नीति च मानावें लागत आहे. जेव्हां मी ऐकलें कीं, 'वॉरबेबीज' चा म्हणजे युद्धांत जन्मलेल्या मुलांचा प्रश्न उभा राहिला आहे, तेव्हां युद्धांतून मुलें कशीं जन्मतात हा प्रश्न मला पडला. तेथें तर लोक मरतात. पण आधुनिक युद्धांत मात्र तेथें मुलें हि जन्मतात. आणि या च सेना आमचा आधार मानल्या जातात. याप्रमाणें जोंपर्यंत आमच्या रक्षणाचा आधार अशा गुंडांवर अवलंबून आहे, तोंपर्यंत गुंडांचें च राज्य चालणें अपरिहार्य आहे. मग या राज्याला कसलें हि नांव दिलें तरी त्यामुळें मूळ घटनेंत कांहीं हि फरक पडणार नाहीं. म्हणून च आपण आपल्या समस्या शांतीनें च सोडविल्या पाहिजेत असा माझा आग्रह आहे.

## वधानें, कायद्यानें कीं, हृदयानें ?

कांहीं लोक म्हणतात कीं, तुमचें जें भूदान यज्ञाचें कार्य चाललें आहे, त्यामुळें प्रश्न सुटण्यास उशीर लागेल. तेव्हां कायद्यानें भूमीचा प्रश्न लवकर कां सोडवीत नाहीं? या लोकांना वाटतें की, कायद्यानें प्रश्न चटकन् सुटतात आणि खून करून तर अधिक च लवकर सुटतात. खून पाडून काम चटकन् होईल हें मला मान्य आहे. समजा, येथल्या साऱ्या मजुरांनीं उठाव केला, एक तारीख ठरवली (२६ जानेवारीसारखी) व त्या दिवशीं सगळ्या मालकांचा खून केला, तर विनोबांनीं दहा वर्षांत जें काम केलें असतें, तें एका दिवसांत होऊन जाईल. असें होणें शक्य आहे हें मी च मान्य करतों. पण हा काय प्रश्न सोडविण्याचा प्रकार आहे का? लोकांना वाटतें कीं कायद्यानें काय होणें अशक्य आहे? पण कायद्यानें तुम्ही कुणाला दयाळू किंवा धार्मिक बनवूं शकाल का? यावरून हें स्पष्ट होईल कीं भूमीची समस्या ही कायद्यानें सोडवितां येणें शक्य नाहीं. कायद्यानें जमिनीचें वांटप होऊं शकेल खरें. पण दुरावलेल्या हृदयांना कायदा सांधूं शकणार नाहीं. हें कार्य केवळ हृदय च करूं शकतें.

## शंभर टक्के दानपत्रें पाहिजेत

मी गणिताचा प्रेमी आहें म्हणून नेहमीं गणित मांडीत असतों. आतां-पर्यंत साडेतीन लाख लोकांनीं दान दिलें आहे. एका मनुष्यानें दान दिलें म्हणजे निदान दहा लोकांनीं तरी माझे विचार ऐकले असतील. जितके शेतकरी आहेत तितकीं दानपत्रें मिळालीं पाहिजेत अशी माझी अपेक्षा आहे. मला शंभरटक्के दानपत्रें हवीं. देशांत जर सहा कोटि कमी अधिक सधन लोक असले, तर––त्यांतले कांहीं चार कवडयांचे धनी असोत कीं कांहीं चार कोटींचे असोत––सहा कोटि संपत्ति-दानपत्रें मिळालीं पाहिजेत अशी माझी अपेक्षा आहे. लोक मला विचारतात कीं, कोणत्या हि आंदोलनांत असें शंभर टक्के काम होत असतें कां? आतां च वैद्यनाथ बाबूंनीं म्हटलें कीं, "शंभर टक्के दानपत्रें कशीं मिळवितां येतील? कांहीं ठराविक टक्क्यांची मर्यादा आम्हांला घालून द्या.' यावर मीं उत्तर दिलें कीं, तुम्ही तसें करूं शकतां. पण माझी मागणी मात्र शंभर टक्क्यांची च राहील.

सध्यां येथें जे बसले आहेत, ते सगळे एक दिवस मरणार च आहेत. मरण्यांत जर शंभर टक्के घडतें तर जीवनांत शंभर टक्के कां घडूं नये? तेथें कांहीं टक्के च कां? हें आंदोलन जीवन-निर्माणाचें आंदोलन आहे. हे सर्व लोक मरणारे आहेत. त्या निवडणुकींत प्रत्येकाचें मत पडणार आहे. यमराजाच्या पेटींत प्रत्येकाचें मत पडणार आहे. मरणासाठीं जर हें शंभर टक्के मतदान होणार तर मग जीवनासाठीं कमी टक्क्यांचें कां? जो विचार मला सारखा हिंडवीत आहे, माझ्या पायांना प्रेरणा देत आहे, तो जर तुम्हांला पूर्ण पटला, तर तुमच्यानें हि स्वस्थ बसवणार नाहीं. या जगांत विचाराहून अधिक सामर्थ्यशाली असें कांहीं नाहीं असें मी मानतों. विचारावर माझी इतकी श्रद्धा आहे.

## आत्म-शक्तीचें महत्त्व

एकदां एका बंधूनें विचारलें, 'आपली जन्मकुंडली जरा पाहूं द्या. मंगळ व शनि यांचा आपल्यावर काय परिणाम झाला आहे हें मी पाहूं इच्छितों.' यावर मीं उत्तर दिलें, 'मला च मंगळाची जन्मकुंडली पहायची आहे. त्याच्यावर माझा काय परिणाम होतो हें मला पहायचें आहे. कारण तो जड आहे आणि

मी मात्र चेतन आहें. '—मी ब्रह्म आहें. माझ्याहून अधिक शक्तिशाली असें जगांत कांहीं नाहीं. मी द्रष्टा आहे व ही सारी सृष्टि दृष्य आहे. हिला रूप देणारा मी आहें. कुंभार मातीला वाटेल तें रूप जसें देऊं शकतो, त्या च प्रमाणें मी हि या सृष्टीला हवें तें रूप देऊं शकतों—हा विचार जर तुम्हांला पूर्ण पटला, तर तुमच्यांत असें सामर्थ्य निर्माण होईल कीं जें ॲटमबाँबमध्यें हि नाहीं. ॲटमबाँबची केवढी शक्ति आहे हें जेव्हां लोक मला ऐकवूं लागले, तेव्हां मीं म्हटलें, माझ्यापाशी 'आत्म-बाँब' आहे. आत्म-शक्ति आहे. अखेर ॲटम-बाँब हा माणसानें च बनवला आहे. जो घडवूं शकतो, तो च त्याचा अंत हि करूं शकतो. तुमचें सामर्थ्य कमी नाहीं हें च मी तुम्हांला पटवून देऊं इच्छितों. तुम्ही अत्यंत बलवान् आहांत. तुमच्याहून अधिक बलवान् या जगांत दुसरें कोणी हि नाहीं. पण ती तुमची शक्ति शस्त्रांत नाहीं, तर आत्म्यांत आहे, प्रेमांत आहे. ती च तुमची शक्ति प्रकट करण्यासाठीं हें आंदोलन चाललें आहे.

'सर्वोदया' चा हा नियम आहे कीं, प्रथम माझ्या बंधूला मिळावें व नंतर मला. पण प्रथम मला च मिळालें पाहिजे असें जेव्हां लोक म्हणूं लागतात तेव्हां तो सर्वनाशाचा च मार्ग आहे असें समजावें. म्हणून च प्रत्येकानें प्रथम दुसऱ्याला मिळावें असें म्हणावें, अशी सहज व्यवस्था निर्माण व्हावी, अशी माझी इच्छा आहे. राक्षसी व्यवस्था आम्हांला नको. तुम्ही गीताप्रवचनाचें पठण केलें, तर आपल्या आत्मशक्तीची तुम्हांला निश्चित जाणीव होईल.

झरिया २७–१२–५४

———

## अहिंसेच्या विकासांत शेती व सत्याग्रह यांचा शोध : ३९ :

प्रत्येक देशाच्या रहिवाशाला आपापल्या देशाबद्दल प्रेम व अभिमान वाटत च असतो. प्रेम वाटणें हें उचित च आहे, पण अभिमान वाटणें हें हि उचित च आहे. हा अभिमान जर त्या त्या देशाच्या कांहीं विशिष्ट गुणांमुळें

असेल आणि परदेशांची निंदा करण्याचा हेतु त्यांत नसेल, तर तो योग्य च आहे. ही मर्यादा सांभाळून आपापल्या देशाचा अभिमान बाळगणें योग्य च आहे. पण आम्हां भारतीयांच्या मनांत मात्र भारताबद्दल जी विशिष्ट भावना आहे ती इतर देशांतील लोकांमधें दिसत नाहीं.

## 'दुर्लभं भारते जन्म'—असें कां ?

आपल्या देशांत असें मानलें जातें कीं, "**दुर्लभं भारते जन्म, मानुष्यं तत्र दुर्लभं**"— म्हणजे भरतभूमींत जन्म मिळणें ही दुर्लभ गोष्ट आहे, पण त्यांत हि मनुष्यजन्म मिळणें ही तर अधिक च दुर्लभ अशी गोष्ट आहे. याचा अर्थ असा होतो कीं, हिंदुस्थानांत किडयामुंग्यांचा जन्म मिळणें ही हि सुदैवाची गोष्ट आहे; कारण दुसऱ्या च वाक्यांत असें म्हटलें आहे कीं, हिंदुस्थानांत मनुष्यजन्म लाभणें ही तर अधिक च दुर्लभ गोष्ट आहे. आपल्या देशांत किडयामुंग्यांचा जन्म मिळणें ही देखील सद्भाग्याची गोष्ट आहे, असे उद्गार इतर कुठल्या हि देशांत ऐकूं येत नाहींत. आपले उद्गार हे अतिशयोक्ति-पूर्ण आहेत यांत शंका च नाहीं. पण अतिशयोक्ति जमेस धरली तरी 'या मातींत जन्तु बनून हि राहणें हें सद्भाग्याचें आहे' या विचित्र वाक्याचें कारण कांहीं तरी अवश्य असलें पाहिजे. माझ्या मतें हें कारण असें आहे कीं, या च देशांत प्रथम मनुष्यानें मानवधर्माचें शिक्षण घेतलें आणि अहिंसेच्या मार्गानें जगण्याचा त्याला प्रथम च शोध लागला. अगदीं प्राथमिक अवस्थेंत मनुष्य शिकार करून इतर प्राण्यांसारखा च राहत होता. जंगलांतल्या इतर प्राण्यांना जीवरक्षणार्थ ज्याप्रमाणें हिंसा अपरिहार्य आहे, त्याप्रमाणें च ती मनुष्याला हि त्यावेळीं अपरिहार्य होती. त्या हिंसेंतून सुटका करून घेण्याची युक्ति मनुष्याला प्रथम हिंदुस्थानांत च सांपडली. येथून मनुष्य इतर देशांत गेला व त्यानें आपल्याबरोबर ही आपली युक्ति हि नेली. म्हणून च, 'या भूमींत जन्तु बनून राहणें हें हि सद्भाग्याचें आहे' हे उद्गार निघाले असावेत.

## शेतीचा पहिला शोध भारतांत च

जिच्यामुळें मानवाचें जीवन हिंसेपासून मुक्त झालें व मानवतेचें जगणें माणूस शिकला, ती अशी युक्ति तरी कोणती, असें सहज च कुणी विचारील. शेती करणें ही ती महत्त्वाची युक्ति, हा तो महत्त्वाचा शोध होय. शेतीच्या मागें

एवढें मोठें आध्यात्मिक रहस्य दडलेलें आहे, याची आज आम्हांला जाणीव नाहीं. दोन-चार दाणें पेरून त्यांतून शेंकडों दाणे उत्पन्न करणें व त्यांवर हवें तसें जीवन जगणें हा एक विशेष च शोध मनुष्याला तेव्हां लागला. तेव्हां-पासून च हिंदुस्थानांत लोकांना अहिंसक जीवनाचें मार्गदर्शन लाभलें. नंतर मांसाहाराचा त्याग करण्याची चळवळ सुरू झाली व जैन लोकांनीं त्यांत पूर्णता प्राप्त करून घेतली. भगवान् बुद्धांनीं त्याला अहिंसेची व करुणेची जोड दिली आणि वैदिकांनीं शेतीची उपासना त्याला जोडली. या प्रमाणें एकेक पाऊल पुढें टाकीत टाकीत हिंदुस्थानांतील सर्वसाधारण समाज अहिंसेच्या शोधांत प्रगति करीत चालला. पण अहिंसेचा प्रथम शोध हिंदुस्थानांत च लागला.

माझा वेदांचा जो अभ्यास आहे त्याच्या आधारावर मी हें सांगूं शकतों कीं, वेदांत याबद्दलचें वर्णन मोठ्या आदरानें केलें जाते. 'देव आले, हातांत कुऱ्हाड घेऊन त्यांनीं जंगल कापून जमीन तयार केली'. वेदांत शेती व गाई-बैल यांच्याबद्दल इतका विलक्षण आदर दिसून येतो कीं त्याच्या तुलनेंत जगांतील दुसऱ्या कोणत्या हि देशाच्या भाषेंत तसें वर्णन आढळत नाहीं. आमचे सर्वोत्तम ऋषि (जैनधर्माचे पहिले तीर्थंकर) यांचें नांव 'ऋषभ' म्हणजे उत्तम बैल असें होतें. भगवान् बुद्धांचें हि नांव गौतम म्हणजे उत्तम बैल हें च होतें. याप्रमाणें आपल्या मुलांना बैलाचें नांव ठेवणें हें गौरवाचें लक्षण मानलें जात असे. कारण या बैलाच्या साह्यानें च आम्हांला अहिंसक जीवनाचें दर्शन झालें. आपल्या संस्कृतींत गाई-बैलांबद्दल अतिशय आदर आहे. संस्कृत भाषेंत गौ या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. वाणि, पृथ्वी, बुद्धि इत्यादि. यावरून हें स्पष्ट आहे कीं, या भरतभूमीविषयीं जो इतका आदर आहे, त्याचें कारण हें आहे कीं, शिकारी जीवनापासून म्हणजे प्राणी मारून जीव जगविण्याच्या प्रकारापासून मुक्तता मिळविण्यासाठीं शेतीचा जो प्रथम शोध लागला, तो या भारतांत च. म्हणून च या भूमीला पुण्यभूमि म्हटलें गेलें आहे व या भूमींत जंतूचा जन्म मिळणें हें देखील पवित्र मानलें गेलें आहे.

## विज्ञान-युगांतील व्यापक समस्यांची सत्याग्रहानें सोडवणूक

शेतीचा हा एक शोध येथें झाला, तसा च दुसरा हि एक आम्हांला अभि-मानाचा वाटावा असा शोध येथें च लागला. जगांत जगण्यासाठीं जे हिंसक

प्रकार चालू होते त्यांच्या तुलनेनें आपणाला येथें लागलेला शेतीचा शोध हा अहिंसक च मानला जाईल. मीं तुलनेनें अशासाठीं म्हटलें कीं, शेतींत हि थोडीशी हिंसा घडते च. पण इतर प्रकारांच्या तुलनेंत शेतींत अहिंसेला पुष्कळ च जास्त अवसर मिळाला. त्या काळीं हा शोध जसा लागला व त्यामुळें एकंदर जीवनांत जसा फरक पडला त्याप्रमाणें आजच्या काळांत हि एक नवा शोध येथें लागला आहे. आज विज्ञानामुळें परस्परांचे संबंध, व्यापार व व्यवहार हें संकुचित राहिले नाहींत, तर ते व्यापक बनले आहेत. दळणवळणांचीं साधनें अधिकाधिक वेगवान् बनलीं आहेत आणि लोकसंख्या हि पुष्कळ वाढली आहे. या सर्वांचा परिणाम होऊन जे प्रश्न निर्माण झाले, ते हि सीमित राहिले नाहींत, तर देशव्यापी बनून गेले. अनेक प्रकारच्या अन्यायांविरुद्ध प्रतिकार करण्याची गरज वाटूं लागली. अनेक प्रकारचीं शस्त्रास्त्रें निर्माण झालीं. समाजांत निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यासाठीं उपाय शोधण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. पूर्वींच्या समस्या लहान स्वरूपाच्या असत. समूहांमध्यें किंवा जमातींमध्यें या समस्या उत्पन्न होत व लवकर च सोडविल्या हि जात. पण आज मात्र ज्या समस्या उत्पन्न होत आहेत, त्यांचें स्वरूप पूर्वींप्रमाणें नाहीं.

आजचे वाद अशा प्रकारचे असतात. आस्ट्रेलियामध्यें इंग्लंडच्या लोकांनीं वसाहत केली. ते समुद्राच्या किनाऱ्या-किनाऱ्यानें च राहूं लागले. कारण त्या खंडाच्या आंत-आंत जावें तों तेथें अतिशय उष्णता आहे, म्हणून ते थंड अशा किनाऱ्याच्या च आसऱ्यानें राहिले. बाकीचा सगळा खंड रिकामा च राहिला आहे. तरी हि ते लोक म्हणतात कीं ही भूमि आमची आहे. आम्ही येथें इतरांना येऊं देणार नाहीं. वस्तुतः आज आस्ट्रेलियांत जितकी लोकसंख्या आहे, तिच्या दसपट लोक तेथें सहज सामावूं शकतात. पण तेथले रहिवाशी इतरांना येऊं देत नाहींत व स्वतः त्या खंडांतल्या आंतल्या भागांत जाऊन शेती करीत नाहींत. तेव्हां या देशाचा त्या देशावर कांहीं हक्क आहे कीं नाहीं, त्या देशच्या रहिवाशांचा व जगांतील इतर लोकांचा त्या देशावर हक्क आहे कीं नाहीं, अशा स्वरूपाचे प्रश्न उपस्थित होतात. समजा, एखाद्या देशांत पेट्रोल उत्पन्न होत असलें, तर त्या पेट्रोलवर त्या देशाचा च हक्क आहे कीं सगळ्या जगाचा हि हक्क आहे, असे प्रश्न उत्पन्न होतात. या प्रमाणें समस्यांचें क्षेत्र

आतां अधिकाधिक व्यापक झालें आहे. जे लहान लहान प्रश्न आहेत, ते समस्यांच्या स्वरूपांत पुढें उभे राहत नाहींत. पण सध्यां मात्र जे प्रश्न उत्पन्न होतात, ते समस्यांच्या रूपानें जगापुढें उभे राहतात.

नागरिकत्वाचा च प्रश्न घ्या. लंकेमध्यें हिंदुस्थानचे जे मजूर गेले होते, त्यांना तेथील नागरिकत्वाचा हक्क आहे कीं नाहीं या प्रश्नावर वाद चालू आहे. यांत कटुता हि उत्पन्न झाली आहे. यावर जी चर्चा सुरू झाली ती राष्ट्रीय प्रमाणावर चालली. एका राष्ट्राचा दुसऱ्या राष्ट्राशीं वाद चालू झाला. कांहीं समस्या तर अतिशय च व्यापक असतात. त्या सोडविण्यासाठीं आज जगाला शस्त्रास्त्रांशिवाय दुसरा कोणता हि उपाय सुचत नाहीं.

अशा परिस्थितींत आणखी एका गोष्टीचा शोध येथें लागला. तो 'सत्याग्रहाचा' शोध होय. ज्याच्या साह्यानें समाजव्यापी, राष्ट्रव्यापी किंवा विश्वव्यापी समस्या हि सोडविल्या जाऊं शकतात, त्या सत्याग्रहाचा शोध अर्वाचीन काळांत हिंदुस्थानांत च लागला. म्हणून च मी पुन्हां एकवार सांगतों कीं, '**दुर्लभं भारते जन्म, मानुष्यं तत्र दुर्लभम्।**'

## सत्याग्रहाचा विकास केला पाहिजे

प्राचीन काळीं ज्याप्रमाणें तो शोध लागला, आणि अहिंसक जीवनाच्या मार्गावर आपण पहिलें पाऊल टाकलें, त्या च प्रमाणें या अर्वाचीन काळांत सामाजिक समस्या सोडविण्याच्या प्रकारांत एक नवी रीत आपल्याला गवसलेली आहे. अशा परिस्थितींत काय करावें हें जगाला सुचत नव्हतें. आज शेतींत पुष्कळ च सुधारणा झाल्या आहेत. पण प्राचीन काळीं मात्र शेती करणें हें अतिशय कष्टाचें काम असावें. त्या च प्रमाणें आज आम्हांला आपला 'सत्याग्रह' चालवितांना असे च कष्ट होतील. कारण अजून त्याचें व्यवस्थित स्वरूप आपल्याला गवसलें नाहीं. त्या काळीं शेतीची व्यवस्थित मशागत जशी माहीत नव्हती, तसें च आतां सत्याग्रहाचें आहे. आतां जशा विज्ञानाच्या आधारानें शेतीच्या सुधारणेच्या व्यवस्थित रीति प्राप्त झाल्या आहेत, त्या च प्रमाणें पुढें सत्याग्रहाच्या हि व्यवस्थित रीति आपल्याला माहीत होतील. आज सर्वसामान्य मनुष्यासाठीं आम्हीं सत्याग्रहाचें शास्त्र बनवूं शकलों नाहीं. कारण ही कांहीं सोपी गोष्ट नाहीं. अजून यांत कितीतरी शोध झाले पाहिजेत,

मराठी ग्रंथ संग्रहालय

किती तरी नवें संशोधन झालें पाहिजे. हा विकास आम्हांला केला पाहिजे. आपण जर हें संशोधन सफलतेनें करूं शकलों, तर केवढी तरी मोठी प्रगति आपण करूं शकूं आणि समाजाला सामाजिक हिंसेपासून वांचवूं शकूं.

जीवनांतील अंतर्गत हिंसेपासून मुक्त होण्याचीं साधनें तर आपल्याला मिळालीं आहेत खरीं पण अजून हि आम्ही मांसाहारापासून पूर्ण निवृत्त झालों नाहीं. दूध वाढेल, शेतीसाठीं कालव्यांची सोय होईल ; प्रत्येकाचा शेतीशीं संबंध येईल ; कुणी मेहतर असो कीं मिनिस्टर असो, प्रत्येकजण थोडा काळ तरी शेती करूं लागेल;--अशी परिस्थिति जेव्हां निर्माण होईल, तेव्हां च मांसाहारावर जगण्याची गरज मनुष्याला उरणार नाहीं.

सत्याग्रहाचा हि मार्ग आतां खुला झाला आहे, त्या मार्गाचा पूर्ण विकास करण्याचा विचार आतां झाला पाहिजे. पुढच्या एक-दोन हजार वर्षांत तो हळूंहळूं होत राहील. शेतीचा विकास तर गेल्या पांच हजार वर्षांपासून चालूं आहे आणि तरी हि कितीतरी विकास अजून व्हावयाचा च आहे. मांसाहार व मत्स्याहार यांच्यापासून मुक्त होऊन साऱ्या समाजाला फलाहारी व शाकाहारी बनविण्याची शक्यता आज तरी दिसत नाहीं. या विकासाकरितां जशीं हजारों वर्षें लागलीं, त्या च प्रमाणें सत्याग्रहाच्या पूर्ण विकासासाठीं हजारों वर्षें लागलीं, तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. एक प्रश्न आज सकाळीं एका गृहस्थानें मला विचारला. त्या प्रश्नामागें त्याची जिज्ञासा-बुद्धि च होती. तो म्हणाला, ‘आपण सत्याग्रहाची गोष्ट करतां. पण आपल्याला सत्याग्रह व अहिंसा यांच्यामुळें स्वराज्य मिळालें असें आपण म्हणू शकतां का ?’ मीं उत्तर दिलें, ‘पूर्ण स्वरूपाच्या अहिंसेनें आपणांस स्वराज्य मिळालें असें मी म्हणूं शकत नाहीं. हिंदुस्थानांत आपण जें अपुऱ्या स्वरूपाचें सत्याग्रहाचें आंदोलन चालविलें, त्यांत अनेक प्रकारची हिंसा झाली. मानसिक हिंसा किती झाली याची तर गणति च नाहीं. तरी हि सामान्यपणें आपण एका मर्यादेचें पालन करीत आलों आहोंत. त्यामुळें च आपल्याला स्वराज्य मिळालें असा मात्र माझा दावा नाहीं. जगांतील परि-

स्थिति हि त्या गोष्टीला बरीचशी अनुकूल होती. परंतु स्वराज्य प्राप्त होण्याच्या कारणांत सत्याग्रहाच्या आंदोलनाचा बरा च मोठा अंश होता हें निश्चित.

आमचें तें आंदोलन प्रारंभीचें च होतें. अल्प व अविकसित अशा सक्तीनें तें चालविलें गेलें होतें. सत्याग्रहाचें स्वरूप हें अभावात्मक आहे निषेधात्मक आहे असें च आम्ही आजवर समजत होतों. समोरच्या माणसाच्या अन्यायाचा प्रतिकार जेव्हां आम्ही शस्त्रानें करूं शकत नाहीं, किंवा करूं इच्छित नाहीं तेव्हां, शस्त्राशिवाय प्रतिकार करणें म्हणजे सत्याग्रह करणें असें आम्ही समजत होतों. पण सत्याग्रहाचा हा अल्प व एकांगी अर्थ होय. हें सत्याग्रहाचें केवळ दुरून घडलेलें दर्शन आहे. अजून त्याची शक्ति विकसित करावयाची आहे. सत्याग्रह ही अभावात्मक अकरणात्मक वस्तु नव्हे तर भावात्मक, करणात्मक वस्तु आहे. सारें जीवन सत्याच्या आधारावर उभें करणें हा त्याचा पूर्ण अर्थ आहे. तरी हि आपल्या देशांत सत्याग्रहाच्या एका नव्या शक्तीचें दर्शन आपणांस घडलें यांत शंका च नाहीं. 'या च देहीं याच डोळां' आम्हांला हें दर्शन घडलें याबद्दल मी स्वतःला धन्य मानतों.

## भूदान-यज्ञ हा सत्याग्रह च आहे

लोक मला विचारतात कीं, भूदान-यज्ञासाठीं तुम्ही पदयात्रा कां करतां ? आपण असे च सारखे पायींपायीं जात राहणार का आणि लोकांत स्नेहभाव जागृत करीत राहणार का ? सत्याग्रहाच्या या शस्त्राचा आपण उपयोग करणार नाहीं का ? पण या विचारण्याचा अर्थ असा च होतो कीं, समोरच्या माणसाचा शस्त्रावांचून प्रतिकार करणें व त्याच्यावर दडपण आणण्याचा मार्ग स्वीकारणें एवढा च सत्याग्रहाचा अर्थ आम्ही समजलों. यापेक्षां अधिक आशय आम्हांला समजला च नाहीं असें दिसतें. पण आतां येथून परदेशी सत्तेचें उच्चाटन झालें आहे. लोकांना जागृत करण्याच्या मार्गांत आतां कोणता हि अडथळा उरलेला नाहीं. तेव्हां सत्याग्रहाचा निषेधात्मक अर्थ स्वीकारणें हें आतां चुकीचें ठरेल. आतां त्याच्या विधायक स्वरूपाचा विचार करणें व त्याचा विकास करणें हें च उचित ठरेल.

मी जें सध्यां करीत आहें तो एका अर्थानें सत्याग्रह च आहे असें मी समजतों. थंडी असो, पाऊस असो, ऊन असो, मी सारखा हिंडत च आहें.

लोकांना अविरत समजावून देत आहें. दरिद्री लोकांपासून हि दान घेत आहें. हें सारें आहे तरी काय ? गरीबांपासून दान घेण्याचा अर्थ परोपकारी लोकांना समजत नाहीं. माझे सहकारी हि मला कित्येकदां विचारतात, 'बाबा तुम्ही गरिबांकडून दान कां घेतां ? त्यांना तर दिलें पाहिजे. त्यांच्या-कडून घ्यायचें च काय ?' मीं यावर असें समजावलें, 'सुदाम्याकडून मूठभर पोहे घेतल्याशिवाय भगवान् श्रीकृष्णांनीं हि त्याला कांहीं दिलें नाहीं. त्या गरिबाकडून वस्तुतः काय घेणें शक्य होतें ? पण भगवंतांनीं त्याला माझ्यासाठीं काय आणलें आहेस असें विचारलें च. एक दरिद्री ब्राह्मण राजाकडे गेला, तेव्हां राजानें प्रेमानें त्याला आपल्याजवळ बसबून घेतलें व माझ्यासाठीं काय आणलें आहेस असें विचारलें. बिचारा सुदामा लाजला. कारण त्यानें अगदीं क्षुद्र अशी भेट आणली होती. पण भगवंतांनीं मोठ्या प्रेमानें त्यानें आणलेलें तें मूठभर पोह्यांचें गाठोडें त्याच्या हातून ओढून घेतलें व ते पोहे ते खाऊं लागले. लक्ष्मी माता शेजारीं च बसली होती. ती मोठी चतुर होती. तिनें विचार केला कीं, हे जर सगळे पोहे खातील, तर सुदाम्याला काय काय देऊन टाकतील कोण जाणें ! म्हणून तिनें हि थोडे पोहे मागून घेतले व प्रेमानें ते खाऊं लागली. नंतर सुदाम्याला जेवढें म्हणून द्यावयाचें होतें, तें सारें भगवंतांनीं त्याला दिलें च. परंतु भगवान् असे निष्ठुर कीं, त्यांनीं सुदाम्याकडून कांहीं घेतल्याशिवाय त्याला दिलें नाहीं. कारण त्यांना त्याची शक्ति वाढवावयाची होती. त्यानें यापुढें जगांत भिक्षा मागत राहूं नये अशी त्यांची इच्छा होती. म्हणून त्यांनीं प्रथम त्याच्यापासून घेऊन नंतर च त्याला दिलें. जें भूतदयावादी लोक आहेत त्यांना मात्र याचें रहस्य समजत नाहीं.

मला सत्याग्रहाचें सामर्थ्य संघटित करावयाचें आहे, गरिबांची शक्ति वाढवावयाची आहे. गरीब माणूस जर जमिनीच्या लहानशा तुकड्यावरील आपली मालकी सोडण्यास तयार होणार नाहीं, तर बडा जमीनदार हि आपली मालकी सोडण्यास तयार होणार नाहीं. ही भूमि-समस्या सोडवायची असेल, तर मालकीची भावना नष्ट केली पाहिजे. जेव्हां लहानसे शेतकरी जमीन देतील, तेव्हां च मालकीची भावना ही चुकीची आहे हें सिद्ध होईल. मग मोठे जमीनदार हि मालकी सोडण्यास तयार होतील. त्यांच्यावर एक

प्रकारचें नैतिक दडपण येईल व त्यामुळें ही गोष्ट त्यांच्या हृदयांत प्रवेश करूं शकेल. नैतिक दडपण आणणें हें सत्याग्रहाचें एक अंग आहे. हें ज्यांच्या ध्यानांत येत नाहीं, त्यांना च वाटतें कीं, बाबा फक्त हृदय-परिवर्तनाच्या च गोष्टी करतात, पण शक्ति वाढविण्यासाठीं कांहीं च करीत नाहींत. पण सत्याग्रह करावयाचा असला, तर कोणती शक्ति कामीं पडेल ? आपली जी पदयात्रा अखंड चालू आहे , आपण हें जें अविरत काम करीत आहोंत—हें सारें काय आहे याचा तर जरा विचार करा.

कांहीं लोक मला विचारतात कीं, एखाद्या मोठ्या संस्थेनें आपल्या सभेंत आपणांस बोलावयाचें, तर आपण जाल कीं, असे पायीं पायीं च हिंडत रहाल ? आतां जरा मोटरींतून प्रवास तर करा. दिवस आतां बदलले आहेत.'—पण मोठ्या संस्थेच्या लोकांनीं आपल्या सभेंत मला बोलावलें, तरी मी जात नाहीं. हा हि सत्याग्रहाचा च एक भाग आहे. एका नव्या शक्तीचा अविष्कार झालेला आहे व तिचा आतां विकास करावयाचा आहे, ही गोष्ट लोकांना अजून समजत नाहीं. गांधीजींनीं जें केलें त्याचें बाह्य स्वरूप च आम्हीं पाहिलें. पण आज तेवढ्यानें कार्यभाग होणार नाहीं. त्यांच्या वेळची परिस्थिती वेगळी होती. त्यावेळीं इंग्रजांना हांकून लावण्याचें काम होतें. तें सर्वथा निषेधात्मक असें च कार्य होतें. तरी हि त्यांनीं त्या कार्याशीं हि किती तरी रचनात्मक कार्यें जोडून दिलीं होतीं. त्यावेळीं लोक त्यांना विचारीत हि असत कीं, इंग्रजांना हाकलून देण्यासाठीं खादी, अस्पृश्यता-निवारण किंवा ग्रामोद्योग यांची काय गरज आहे ? हें तर समाजसुधारणेचें कार्य आहे. पण वस्तुतः तें तसें नाहीं. हें सारें सत्याग्रहाचें च अंग आहे.

एकदां तर सत्याग्रह-आंदोलनांत अस्पृश्यता-निवारणासाठीं गांधीजींनीं उपवास हि सुरू केला होता. यावर लोक म्हणूं लागले कीं, 'स्वातंत्र्याच्या या संग्रामामध्यें मंदिर-प्रवेशाची ही गोष्ट कशाला उगी च घुसवली ? राजकीय स्वातंत्र्याच्या कार्याची यामुळें हानि च होते.' यावर गांधीजी उत्तर देत कीं हें हि त्याचें च एक अंग आहे. सारांश, इंग्रजांना येथून हांकून लावणें किंवा त्यांची सत्ता नष्ट करणें एक बाह्य स्वरूप होतें. त्याबरोबर गांधीजींनीं अनेक रचनात्मक कार्यें जोडून दिलीं. आतां स्वातंत्र्य-प्राप्तीसाठीं लढण्याचें

दडपण निघून गेलें आहे. तेव्हां गांधीजींनीं काय काय केलें हें नीट लक्षांत घेऊन आम्हीं पुढें पाऊल टाकलें, तर च आमचा विकास होईल.

## दोन बिंदूंची रेषा

सत्याग्रहाची शक्ति आपल्या जीवनांत उतरविण्याचा आम्हीं सतत प्रयत्न केला पाहिजे. आमच्या कार्यकर्त्यांमध्यें भांडणें उत्पन्न होतात, कुरबुरी चाल-तात. याच्याशीं आपलें पटणार नाहीं, असें एक म्हणतो, तर दुसरा दुसरें च म्हणतो. जेव्हां भांडणें होतात तेव्हां मी म्हणतों कीं होऊं द्या. पण जेव्हां एखादा म्हणतो कीं त्याच्याबरोबर मला काम करतां येणार नाहीं, तेव्हां मी सांगतों कीं तूं माझ्या कार्याला निरुपयोगी आहेस. प्रत्येक माणसाबरोबर मला काम करतां येईल, असे च शब्द वस्तुतः आपल्या तोंडून निघाले पाहिजेत. त्या माणसाचें इतरांशीं पटो वा न पटो पण माझें मात्र सर्वांशीं पटेल, असें च आम्हीं म्हटलें पाहिजे. ही सत्याग्रहाची शक्ति आहे. आमच्यांत श्रद्धेचा व सत्याचा आग्रह असला पाहिजे. सत्यावर आम्हीं दृढपणें स्थिर राहिलें पाहिजे. त्यामुळें निश्चितपणें दुसऱ्याचें हृदय-परिवर्तन होईल व परिस्थिति हि त्यामुळें बदलेल. अशी असीम श्रद्धा आम्हीं मनांत बाळगली पाहिजे. साऱ्या जगाला च स्वातंत्र्याच्या व शांतीच्या मार्गावर घेऊन जाण्याची आमची इच्छा आहे. तेव्हां आपल्या जीवनांत आम्हीं सत्याग्रहाचा विकास केला पाहिजे.

आज मीं एक प्रारंभीची व दुसरी अंतीची गोष्ट सांगितली. हे दोन बिंदु जोडले कीं मधला सारा इतिहास तुम्हांला कळेल. तें समजून घेऊन सत्याग्रहाच्या शक्तीचा विकास कसा करावयाचा यावर विचार केला पाहिजे. त्या शक्तीचा विकास करण्याचें ओझें, जबाबदारी किंवा जीवन-कार्य परमेश्वरानें आपल्यावर सोंपवलें आहे. म्हणून आपण आपलीं मनें क्षुद्र न ठेवतां व्यापक बनविलीं पाहिजेत. सत्याग्रहाच्या शक्तीचा विकास कसा करावयाचा यावर आम्हीं निरंतर चिंतन केलें पाहिजे. आणि सतत सेवा करीत राहिलें पाहिजे.

रघुनाथपुर ३०-१२-'५४

---

संग्रहालय, ठाणे
अनुक्रम

REFBK-0009776